माझा प्रवास.

अथवा

सन १८५७ सालच्या बंडाची हकीगत.

वे० शा. विष्णुभट गोडसे वरसईकर

मरहूम यांनीं लिहून ठेविली ती

चिंतामण विनायक वैद्य.

एम्. ए., एल्.एल् बी.

मुंबई युनिव्हर्सिटीचे ऑनररी फेलो यांनीं

संशोधन करून छापविली.

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

सन १९०७.

किंमत दीड रुपया.

मुंबई, 'इंदुप्रकाश' छापखान्यांत छापून

अमृत रस.

स्वतःच्या क्षणिक सुखाकरितां पदरचे पैसे खर्चून ज्यांनीं आपले शरीराची खराबी करून घेतली असेल व ती अगदीं नवीन—अर्थात ताजी असेल, व ज्यांना आपली संतति आपले द्वारें न बिघडतां चांगली व जोमदार व्हावी अशी इच्छा असेल, त्यांनीं आमच्या आज १४ वर्षांच्या अनुभवानें तयार केलेल्या "अमृत रस" या औषधाचें जरूर सेवन करावें. याचे गुणदोषासंबंधानें विशेष लि- ण्याचें कारण नाहीं. किंमत १। रुपया ट. ख. ६ आणे टली १५ दिवस पुरते.

"बालामृतवटी"

ज्याना आपलीं मुलें कोणत्याही रोगापासून सुर[illegible] अशी इच्छा असेल त्यांनीं ह्या बालामृतवटीचा उप[illegible] ह्या गोळ्यांपासून लहान मुलांना झटका येणें, खोकला, [illegible] तील रोग, कडकी वगैरे लहान मुलांचे रोग कमी [illegible] चांगलें सशक्त होतें. व कोणत्याही प्रकारचे रोग होत [illegible] बालामृतवटीचा मी स्वतः अनुभव आज सतत १० व[illegible] १०० गोळ्यांच्या डबीस किंमत रुपये २. टपालखर्च ४[illegible]

वैद्य व्ही. एच्. शे[illegible]

विठ्ठलवाडी, विठ्ठलमंदिर काळ[illegible]

प्रस्तावना.

आपल्या देशांत खऱ्या इतिहासाची किती उणीव आहे हें सांगावयास नको. पाश्चात्यांनीं लिहिलेले इतिहास सर्वांशीं चांगले व मनाचें समाधान होण्याजोगे नाहींत, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. याचें कारण एक तर त्या लोकांस आपल्या देशस्थितीची पूर्ण माहिती होणे कठीण आहे; व दुसरें असें कीं, जितके इंग्रजी ग्रंथकारांनीं इतिहास लिहिले आहेत तितके साहाजिकच एकपक्षी झाले आहेत. सारांश हिंदू लोकांच्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या इतिहासाची उणीव कोणीतरी हिंदू इतिहासकार निपंजल्यावांचून दूर व्हावयाची नाहीं हें निर्विवाद आहे. असा बुद्धिमान, व्यासंगी व अधिकारी पुरुष जेव्हां निपजेल तो निपजो. परंतु आपल्या हातीं असणारीं इतिहासाचीं साधनें जमा करून ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. व त्याप्रमाणें अनेक लोकांनीं छापलेल्या ग्रंथांतून अशी माहिती आजवर उपलब्ध झाली आहे, हें आपल्यास भूषण मानण्याजोगें आहे.

सन १८५७ सालचे बंडाचे जे इंग्रेजी इतिहास झाले आहेत ते खालील प्रकारचे आहेत. के, मालिसन वगैरे इतिहासकारांनीं जे मोठाले इतिहास लिहून ठेविले आहेत, ते सर्व एकपक्षी आहत. त्यांत बंड इंग्रजांच्या कोणत्या चुकीमुळें उद्भवलें, साहेबलोक ठिकठिकाणीं कसे मारले गेले, थोड्या लोकांनीं मोठ्या शौर्यानें आपले प्राण कसे वांचाविले, व पुढें इंग्रजांनीं दिल्ली, लखनौ, कानपूर वगैरे शहरें कशीं हस्तगत केलीं, इत्यादि हकीगती सविस्तर रीतीनें

वर्णन केल्या आहेत. परंतु बंडापूर्वी हिंदू लोकांच्या समजुती काय झाल्या होत्या, नानासाहेब, झांशींवाली, लखनौची बेगम, इत्यादि लोकांनीं बंडाकरितां काय उद्योग केले, ते आपले ठिकाणीं कसे वागत होते, त्यांस पुढें दुःखें कोणतीं व काय कारणानें भोगावीं लागलीं, व अक्कल, धैर्य, शौर्य, क्रूरपणा, मूर्खपणा इत्यादि निरनिराळे गुण त्यांचे ठिकाणीं कसे दिसून आले व रयतेस बंडाच्या दिवसांत किती संकटें भोगावीं लागलीं, याजविषयीं त्यांचे ग्रंथांतून कोठेंच वर्णनें नाहींत. हें साहजिक आहे कीं, याजविषयीं त्यांस माहिती नसावी व असली तर कचित् प्रसंगीं पायोनियर सारख्या [illegible] 'The tiger instincts of an Imperial race [illegible] नाहींतर आम्ही १८५७ सालाप्रमाणें Fire and sword [illegible] असे उद्गार निघतात, तत्रापि वरील गोष्टीचें वर्णन आपले ग्रंथांत करणें त्यास योग्य वाटत नाहीं. अशा स्थितींत या अशा गोष्टींवि-षयीं आपले लोकांनीं प्रत्यक्ष पाहून लिहिलेल्या हकीगतीच उपयोगी पडणार आहेत. प्रत्यक्ष पाहून किंवा विश्वसनीय [illegible] ऐकून सविस्तर लिहून ठेविलेली त्या त्या वेळची हकीगत [illegible] इतिहासाचें महत्वाचें साधन आहे. सन १८५७ [illegible] कित्येक साहेब लोकांनीं आपआपल्या हकीगती कि[illegible] रीतीनें लिहिल्या आहेत व त्या के, मालिसन इत्यादि इ[illegible] कशा उपयोगी पडल्या आहेत, हें इंग्रजी वाचकांस ठा[illegible] अशा प्रकारची एक हकीगत एका विद्वान् भिक्षुक प्रे[illegible] लेिहिली आहे, ती भावी इतिहासकारास उपयोगी पडेल [illegible] या पुस्तकांत ती वाचकांपुढें मी ठेवीत आहे.

सदर्हू प्रेक्षक मूळचा भिक्षुक असून तो हिंदुस्थानांत बंडाचे दिवसांत द्रव्यार्जनाकरितां गेला होता. त्याची स्मरणशक्ति चांगली असल्यानें व त्यास मजकूर खुबीदार रीतीनें जुळवून लिहिण्याची शैली साहजिक साध्य असल्यामुळें, भिक्षुक असतांनांही त्यानें लिहून ठेविलेली हकीकत छापण्यासारखी आहे, असें मला वाटतें. बिठूर, ग्वालेर, वगैरे ठिकाणच्या हकीगतीशिवाय बाकी पुस्तकांत लिहिलेल्या बहुतेक गोष्टी ग्रंथकारानें पाहिलेल्या आहेत. नाना साहेबांची हकीगत व ग्वालेरची हकीगत, ग्रंथकारानें ऐकिली असून ती जरी इतर हकीगतीपेक्षां कमी किंमतीची आहे तरी, ती त्या वेळेस ग्वाल्हेरीस, व ब्रह्मावर्तास चांगल्या माहितगार लोकांकडून ऐकिलेली असून खरीच विश्वसनीय आहे.

या पुस्तकांत इंग्रज लोकांनीं लिहिलेल्या हकीगतीप्रमाणें किती मनोरंजक रीतीनें हकीगत सांगितली आहे, याजविषयीं वाचक कल्पना करितील; परंतु मला इतकें सांगितलें पाहिजे कीं, मूळ ग्रंथांत मी फार थोडा बदल केला आहे. कोठें कोठें भाषा सुधारली असून अलीकडच्या रीतीनें लिहिली आहे व कांहीं ठिकाणीं मजकूर अधिक झाला तो कमी केला आहे. एकंदरीनें बहुतेक सर्व ग्रंथ मूळचाच आहे असें म्हटलें तरी चालेल. दोनच ठिकाणीं मी आपल्याकडून दहा पांच वाक्यें ज्यास्त घातलीं आहेत, तींही मूळच्या ग्रंथाला अनुसरून आहेत.

या हकीगतीचे वाचनापासून वाचकांस आणखी एक फायदा होण्यासारखा आहे. १८५७ सालच्या बंडास आज ५० वर्षें पुरीं झालीं; त्या वेळच्या सामाजिक व धार्मिक स्थितींत आज किती फरक

पडली आहे, आमची शारीरिक, मानसिक व नैतिक स्थिति सुधारली आहे किंवा वाईट झाली आहे, याचीही कल्पना करण्यास या ग्रंथापासून बरेंच साधन होईल असें मला वाटतें. सारांश, इतिहासाच्या दृष्टीनें, मनोरंजनाच्या दृष्टीनें व व्यवहाराच्या दृष्टीनें, हा अल्प ग्रंथ वाचकांस उपयोगीं पडून प्रिय होईल, अशी आशा करून ही लहानशी प्रस्तावना पुरी करिता.

मुंबई ता. १ दिसेंबर १९०७.

चिंतामण विनायक वैद्य.

अनुक्रमणिका.

भाग	विषय.	पृष्ठ.
१	गोडशे घराण्याचा वृत्तांत	१
२	प्रवास व बंडाची सुरुवात	१४
३	बंडवाल्यांची हकीकत....	३७
४	झांशी येथील पूर्ववृत्तांत	६५
५	झांशी येथील उत्तरवृत्त	९७
६	काल्पी प्रकरण	१३८
७	ग्वाल्हेर व मध्यहिंदुस्थान	१७१
८	तीर्थयात्रा.	१८६
९	उपसंहार.	१९९

माझा प्रवास

अथवा

सन १८५७ सालच्या बंडाची हकीकत.

भाग १ ला.

जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे ।
मातृभिः पाल्यमानानां ते हि नो दिवसागताः ॥

आमचें गोडशाचें घराणें पहिल्यापासून भिक्षुकाचें आहे. आमचे चुलते केशवभट व रामभट मोठे विद्वान् असून श्रीमंताचे पदरीं होते. तीर्थरूप बाळकृष्णपंत मात्र गृहस्थ असून विंचूरकराचे पदरीं कारकून होते. श्रीमंत ज्या वेळेस राज्य सोडून ब्रह्मावर्तास जावयास निघाले तेव्हां ते त्याजबरोबर राहण्याचा निश्चय करून नर्मदे-पावेतों गेले, परंतु प्रकृति फार अशक्त, ज्वर येऊं लागल्यामुळें परत फिरणें भाग पडलें. मग शके १७३९त वरसई मुक्कामीं अतःपर नोकरी करावयाची नाहीं, ब्रह्मकर्मांत वेळ घालवावयाचा असा कृत-निश्चय होऊन स्वस्थ राहिले. घरचें उत्पन्न ह्मणजे फार थोडें, केवळ भिक्षुकी व कांहीं थोडी भात जमीन एवढ्यावर उदरनिर्वाह करावयाचा. पुढें आमचे चुलते विभक्त झाले. मग तर फार हालाचे दिवस आले. आमचे वडील गृहस्थ असल्यामुळें भिक्षुकीचें उत्पन्न अगदीं नाहींसें झालें. शिवाय प्रातःकाळपासून सायंकाळपर्यंत स्नान,

संध्या, ब्रह्मयज्ञ, रुद्राची एकादशणी, देवपूजा, भागवतपाठ, श्रीत्रिजनार्येश्वराचें प्रत्यहीं षोडशोपचार पूजन, भोजनोत्तर अष्टाध्याय गीतेचा पाठ इत्यादि ऋषिकर्मांत निमग्न असल्यामुळें गृहस्थपणाचेंही उत्पन्न बुडालें. काय शेतीवर उदरनिर्वाह होईल तेवढा करावयाचा. त्रिवर्ग बंधु विभक्त झाले, तेवेळेस माझें वय दहा वर्षांचें होतें. वडील गृहस्थकामांत हुशार होते. त्यांनीं मोडी बाळबोध लिहणें, वाचणें, व्याजाचे हिशेब, जमाखर्च वगैरे बाबतींत मला शिक्षण देऊन तयार केलें. पुढें कोठें तरी बाहिरगांवीं मला ठेऊन नोकरी लावून द्यावी, अशा विचारांत आहेत तों वडील चुलते केशवभट यांनीं रात्रौ वडिलांशीं बसून निश्चय ठरविला कीं, "आपली गांवीं परगांवीं यजमानांचीं घरें पंचवीस आहेत, व तिघां बंधूं मिळून मुलगे इतकेच आहेत. मजला मुलगा नाहीं, व रामभटाचें कुटुंब वारलें, तस्मात् यजमानास कुलगुरु नाहींसा होणार हें आपणांस उचित नाहीं. मी दोन तीन विद्यार्थी मिळवून विष्णूस संहिता सांगण्यास मुहूर्तावर प्रारंभ करितों. मुलांस गृहस्थ करून रोजगारांत व परधर्मी राजाचे सेवेंत द्रव्यार्जन करण्यापेक्षां ब्रह्मकर्मांत तयार करवून यजमान कृत्यांत जें उत्पन्न होईल त्यांतच उदरनिर्वाह करणें हें फार इष्ट आहे." इत्यादि उभयतांचा संवाद होऊन सुमुहूर्तावर मला संहिता पढण्यास घातलें. परंतु दुर्दैवानें संहिता होऊन क्रम वगैरे समाप्त होणार तों आमचे विद्यागुरु केशवभट काका शके १७६८ ज्येष्ठमासीं स्वर्गवासी झाले. रामभट काकाही हिंदुस्थानांत ब्रह्मावर्ती श्रीमंताचे पदरीं होमशाळेवर अध्यक्ष होते, त्यांनीं आपला तिकडे विवाह केला, व वरसईत येऊन राहिले.

यामप्रमाणें स्थिति आल्यावर दरिद्रावस्थेनें आम्हास माळ घातली. कवीनें म्हटलेंच आहे "परीक्ष्य सत्कुलं विद्यां शीलं शौर्यं सुरूपताम्। विधिर्ददाति निपुणः कन्यामिव दरिद्रताम्॥" उत्पन्नाची द्वारें चोंहीकडून बंद झालीं. माझी संहिता वगैरे संपली होती, परंतु यजमान कृत्यें चालवून पैसे मिळविण्यास याज्ञिकीची कांहीं माहिती नव्हती. मी लहान होतों तरी मजला चांगलें समजत होतें. आमचे गांवांत विनायक शास्त्री जोशी म्हणून समर्थ ब्राह्मण असत; ते वेदशास्त्र निपुण असून त्यांस ज्योतिष कांहीं अवगत होतें याज्ञिकींत तर केवळ प्रतिसूर्य होते. सूत्रवृत्तिभाष्यांत निष्णात असून कुंडमंडपापर्यंत गति होती. त्यांजकडे जाऊन त्यांजला सर्व वृत्त निवेदन केलें. "आमचे घरांत चुलते वारल्यापासून यजमान कृत्य चालविण्यास कोणी राहिला नाहीं. मजला कृपा करून धर्मशास्त्र समजावून द्याल व याज्ञिकींत तयार कराल, तर फार बरें होईल. याज्ञिकीची विद्या खरी गुरुची कृपा झाल्यावांचून येत नाहीं." शास्त्रीबोवांचें मनांत आपले मागें आपलें नांव राखील असा विद्यार्थी तयार करण्याचें फार दिवसांपासून होतें. त्यांनीं माझी उत्सुकता व बुद्धि पाहून कबूल केलें, व प्रथम थोडी व्युत्पत्ति येण्याकरितां रूपावळी, समासचक्र, अमरकोश व काव्याचे कांहीं सर्ग इतकें मजकडून तयार करविलें, व नंतर धर्मशास्त्रास व नारायण भट्टीस आरंभ केला. शास्त्रीबोवांची मजवर फार कृपा होती. मजला त्यांनीं विद्यादान फार चांगलें दिलें व गरिबीनें टोंचण्या लाविल्यामुळें मीही रात्रंदिवस त्याचाच घोष घेतला होता. शास्त्रीबोवांस कमी दिसत होतें, म्हणून ग्रंथ मीच वाचीत असे व ते अर्थ सांगत असत. याप्रमाणें थोडक्यांतच

निर्णयसिन्धु, प्रयोगपारिजात, स्मृत्यर्थसार इत्यादि ग्रंथ संपविले. मुहूर्तमार्तण्डही म्हटला व शास्त्रीबोवाचे समक्ष प्रयोग चालवूं लागून प्रांतांत लौकिक मिळविला.

आम्हीं एकंदर तिघे भाऊ होतों. हरीपंतास स्नान, संध्या, वैश्वदेव, श्रावणी, रुद्र, पवमान, सौर इत्यादि अवश्य ब्रह्मकर्म शिकवून लिहिण्यास घातला होता. त्याचें अक्षर फार चांगलें होतें, व तो जमाखर्च हिशेबी कामांत तरबेज होता; परंतु ठाण्यास दोन तीनदां परिक्षेंत उतरला नाहीं. शेवटीं त्यानें पेणेस सावकारी नोकरी पत्करिली. यजमानाची मेहरबानी त्याजवर फार असे. धोंडभट सर्वांत धाकटा, हा अति तीव्र बुद्धीचा होता. त्यानें संहितेचा अध्याय अकरा संथांनीं गुरुजीस पाठ म्हणून दाखवावा. याप्रमाणें आपले बुद्धीचे बलानें संहिता पद क्रम वगैरे सर्व म्हणून ज्योतिष म्हणूं लागला, व्युत्पत्ति तयार करून व्याकरणास आरंभ केला. लहानपणींच कविता तयार करूं लागला. याप्रमाणें त्याचा लौकिक फार झाला. आमचे लहानपणापासून दारिद्र्य मागीलदारीं पुढिलदारीं फुगड्या घालीत होतेंच; परंतु ईश्वरकृपेनें भातास खंडीस नऊ दहा प्रमाणें दर होता; सर्व जिनसा स्वस्त होत्या, त्यामुळें कर्ज काढल्याशिवाय दिवस काढीत होतों. आमचे बालबोध व सभ्य घराणें असल्यामुळें मुली आह्मांस पुष्कळ सांगून येत, परंतु आम्हांस कर्तव्य नाहीं, असें आमचे वडील सांगत. पुढें जसे जसे आम्हीं थोडें थोडें द्रव्य मिळवूं लागलों, तशीं आमचीं लग्नें झालीं. लग्नाला सर्व पैसा कर्जाऊ घ्यावा लागला. पुढें आमची बहीण कृष्णाबाई इचाही विवाह झाला. त्या लग्नांत बरेंच कर्ज वाढलें. पहीपाहुंणा जास्ती पडूं लागल्यामुळें

घरखर्च वाढला. कर्ज वर्षाऋतूंतील नदीच्या पाण्यासारखें किंवा जलोदरासारखें फुगूं लागलें. आमची सर्व पैदास्त थोडकीच अस-ल्यामुळें घरखर्चांत नाहींशी होऊं लागली. याप्रमाणें एका संकटां-तून निघून दुसरें संकटांत पडलों. केवळ कविवर्णित खल्वाटाची स्थिति झाली.

खल्वाट चंड किरणें अति तप्त झाला ।
छायार्थ तालतरुमूलसमीप गेला ।
तेथूनि थोर पडलें फल तो निमाला ।
येईल दैवहत येईल तेथ घाला ॥ १ ॥

लहानपणापासून आमचें बन्धुत्व फार चांगलें होतें व दारिद्र्यानें त्यास दार्ढ्य जास्ती आणलें. लहानपणीं एकमेकांशीं तटे वगैरे बि-लकूल करीत नव्हतों व एकमेकांचें विचारांत फरक पडत नसे; व पुढें आमच्या बायका मोठ्या झाल्यावरही फरक पडला नाहीं. भावा-बंदांत मुख्य कलहाचें बीज स्त्रिया सर्वत्र असतात हें अनुभव प्रसि-द्धच आहे. परंतु आमचे येथें त्यांचे मनांत जरी थोडें येत असे तरी त्याचें कांहीं चाललें नाहीं. व त्याही चांगल्या घराण्यांतील अस-ल्यामुळें एखादा परकी घरीं आला तर माहेरवाशिणी कोणत्या व सासुरवाशिणी कोणत्या हें बिलकूल उमगत नसे. आमचें बंधुत्वा-तील प्रेम निरुपम होतें. केवळ रामलक्ष्मणभरताचीच उपमा लोक देत असत. लहानपणीं एके ठिकाणीं खेळणें, तुला जास्ती मला कमी इत्यादि मत्सर भावानें न भांडणें, परस्परांच्या सुखदुःखानें कळ-वळणें, फार तर काय एक तांब्या घेऊन नदीवर शौचास जाणें,

ह्या गोष्टी पाहून लोकांस फारच आनंद वाटे. जेव्हां मोठे झालों, व मिळवत झालों, व समजूं लागलों, तेव्हांपासून रात्रौ एके ठिकाणीं बसून कर्जाबद्दल काय तजवीज करावी, याविषयीं नेहमीं विचार करीत असूं.

शके १७७८ माघ शिवरात्रीचे सुमारास पुण्यास कांहीं यजमानकृत्य चालविण्यास मी गेलों होतों, तेथें अशी बातमी ऐकिली कीं बायजाबाईसाहेब (शिंदे) ह्या मथुरेस सर्वतोमुख यज्ञ करविणार आहेत, ह्या यज्ञांत एकंदर सात आठ लक्ष रुपये धर्मादाय होणार आहे, या संबंधाचीं पत्रें नाशिक पुणें वगैरे ठिकठिकाणचे विद्वान् मंडळीस आलीं आहेत. कर्जाबद्दल मनास हृद्रोग लागलाच होता, व कांहीं तरी परदेश हिंडल्याशिवाय एकरकमी पैसा मिळावयाचा नाहीं, हें मनांत पक्कें बिंबल्यामुळें माझा तात्काळ हिंदुस्थानांत जाण्याचा निश्चय झाला. आपण फार विद्वान् नाहीं खरे, तरी याज्ञिकी व धर्मशास्त्र हे आपले विषय उत्तम गुरूपासून प्राप्त झाले आहेत असा मनाचा दृढ अभिमान होता. शिवाय बायजाबाईसाहेब यांचे पदरीं बाळकृष्णभट वैशंपायन दानाध्यक्ष होते. त्यांजवर बाईसाहेबांचा उत्तम लोभ आहे, असें ऐकिवांत होतें. ते आपले आप्त आहेत, व त्यांचा व तीर्थरूपांचा परिचय चांगला आहे, तेव्हां त्यांजपासून कांहीं मदत मिळेल अशी आशा उत्पन्न झाली. मनाचा निश्चय कायम झाला, पण मातापितरें बंधुवर्ग व पत्नी यांचें अनुमोदन कसें मिळवावें, याची मोठी चिंता येऊन पडली. वरसईस परत आल्यावर हरीपंतास पेणेहून बोलावून आणिलें व त्यास सर्व हकीगत कळविली व पुष्कळ बोलणें झाल्यावर हल्लींचे स्थितीस

हिंदुस्थानांत जाण्याचें धाडस करणें वाईट नाहीं असें कबूल करणें त्यास भाग पडलें. प्रथम बरोबर खुलासा काढण्याकरितां तीर्थरुपाचे नांवानें भाऊसाहेब वैशंपायन यांस ग्वालेरींत पत्र पाठविलें. त्या पत्राचा जबाब तीर्थरूपाच्या नांवावर येऊन पत्र परस्पर त्यांच्या हातीं गेलें. आंतील मजकूर पाहून थक्क होऊन मला जवळ बोला-विलें व प्रथम आपणास न कळवितां पत्र कां लिहिलें याचें कारण विचारिलें. तेव्हां मीं उत्तर केलें कीं, वैशंपायन हे आपले सोयरे खरे, परंतु ते हल्लीं श्रीमान् आहेत, दानाध्यक्षतेचा त्यांजकडे अधिकार आहे. तेव्हां पत्र येतें कीं न येतें व कोणत्या तऱ्हेचें येतें याचा भरंवसा नाहीं, याजकरितां कदाचित् आपल्यास ताप मात्र होईल म्हणून कळविलें नाहीं. हें ऐकून कांहीं समाधान पावून स्तब्ध राहिले व कांहीं वेळानें सांगितलें कीं, हिंदुस्थान फार दूर आहे, तिकडे आपले लोक थोडे आहेत, जाण्याचे रस्ते फार अवघड व दंग्याधोप्याचे आहेत, तिकडे लोक भांग पितात, स्त्रिया नादास लाविणाऱ्या असतात; पुन्हां तुझी कांहीं लोकोत्तर विद्या नाहीं, सबब एकंदरींत तूं हिंदुस्थानांत जावें असें माझ्या मनांत येत नाहीं." हे शब्द ऐकतांच माझी कंबर खचली. मनांतून जावयाचा निश्चय होता खरा, परंतु वडिलांचें अनुमोदन मिळेना याजमुळें निरुपाय झाला, तों पुन्हा कांहीं आशा उत्पन्न झाली. वैशंपायन याची कन्या वरसईस इनामदार करवे पेशव्याचे कुलगुरु यांजकडे दिली होती, त्यांस पत्र आलें कीं, आपण सहकुटुंब ग्वाल्हेरीस यावें, इकडे बाईसाहेब सर्वतोमुख यज्ञ करविणार आहेत, सात आठ लक्ष रुपये खर्च होणार आहे, मौजही दृष्टीस पडेल; कांहीं प्राप्तिही

होईल. आमचे भेटीस बहुत वर्षे झालीं आहेत तर कुटुंबासहित आल्यास फार बरें होईल. येते समयीं बाळकृष्णपंत यांचे चिरंजीव येत असल्यास त्यांस घेऊन यावें, भेटीचा लाभ होईल, आपणांस यात्राही घडेल. करवे यांणीं पत्र आणून तीर्थरुपास वाचून दाखविलें व तीर्थरुपांनीं पुन्हा पूर्ववत् जबाब दिला. मग मी संकटांत पडलों. कोणत्या रीतीनें अनुमोदन मिळवून निघून जावें याचा रस्ता सुचेना. तेव्हां मला एक युक्ति सुचली कीं, रामभट काकांची मध्यस्ती घालावी. आमचे चुलते वरसईस शेजारीं निराळे घर बांधून विभक्त राहिले होते, परंतु त्यांचें बंधुत्वांत रहस्य फार चांगलें होतें. शेतें, माळ, झाडें, पुस्तकें, पोथ्या वगैरेची वांटणी झाली नव्हती, नफानुकसानी संबंधें सर्व एकच आहों असें समजून उभयतां बंधु निष्कपटपणें व काळजीनें वागत असत. त्याचे घरीं जाऊन त्यांना सर्व हकीगत कळविली, व तुम्ही तरी कांहीं सांगा अशी फार गळ घातली. त्यांनीं सांगितलें कीं विचार करून उदईक तुला सांगूं. दुसरे दिवशीं त्याजकडे गेलों; तों अति सुमुहूर्तावर गेलों असे म्हणण्यास हरकत नाहीं.

काकांचा स्वत: हिंदुस्थानांत येण्याचा निश्चय दिसला. ते ह्मणूं लागले कीं, "मजला थोडेबहुत देणें झालें आहे व वास्तु नीट करणें आहे. माझा तर वृद्धापकाळ झाला, मुलगा आहे, पण तो कांहीं विद्या करून पैसे मिळवील असें दिसत नाहीं. त्यापेक्षां लोकांचें देणें नाहींसें करून वास्तु नीट बांधून ठेवणें माझे शिरावर आहे. याजकरितां मीही हिंदुस्थानांत तुजबरोबर येतों. तूं मात्र मजला सांभाळून घरीं आणून पोंचविलें पाहिजे. हिंदुस्थानांत

मी बरोबर असलों तर उभयतांस सुख होईल. पिता पुत्राप्रमाणें परदेशांत वागून जें द्रव्य मिळेल तें निमे वांटून घेऊं. माझ्या माहितीमुळें ग्वाल्हेरीस व झाशींस आपल्यास जास्त फायदा होईल. तुझे बापापासून परवानगी मी देववितो. " हे शब्द ऐकतांच अत्यानंद झाला. हरिपंतास ताबडतोब पत्र लिहून पेणेंहून बोलावून आणिलें. व रात्रौ सर्व कुटुम्ब एकत्र बसून विचार सुरू झाला. मी प्रथम नम्रतेनें बोलूं लागलों:—"एकंदर आपल्यास कर्ज इष्टेष्टीपेक्षां ज्यास्ती झालें आहे. अन्नवस्त्रांचा खर्च तसेंच जीं नैमित्तिक कृत्यें येतात त्यांचा खर्च, लोकव्यवहारसंबंधें पहीपाहुणा पट्टी वगैरेचा खर्च एवढ्यालाच आपली प्राप्ति पुरत नाहीं. याज-मुळें दरवर्षी थोडथोडें कर्ज वाढतें. तेव्हां एक रकमीं पुष्कळ पैसा मिळण्यास देशांतरीं फिरल्याशिवाय इलाज नाहीं. मी जरी दूरदेशीं अद्याप गेलों नाहीं, तरी मला पक्का भरवंसा आहे कीं मी नीट वागेन, व माझ्यानें प्रवासांतील हाल सर्व सोसवतील. तशांत काका मजबरोबर संभाळ करण्याकरितां आहेतच. मला हिंदुस्थानांत जाण्याबद्दल परवानगी द्यावी, कुटुंबाकरितां यत्न करीत आहें, तरी कुटुंबाच्या नशिबानें सर्व संकटें पार पडून सर्व चांगलेंच होईल, कर्वे यांचे गाडींत एक भाग गाडीभाडें देऊन करूं, भोजन खर्च वगैरे हिस्सेरशीनें देऊं, आपले सोयरे धायरे, ग्वाल्हेरीहून पत्र आलें आहे, त्यापेक्षां जावें असेंच म्हणतात. " असें म्हणून स्वस्थ राहिलों. तीर्थरूपांनीं पूर्वीच्या सर्व हरकती पुन्हां काढिल्या, त्यांस मी धीर करून उत्तर दिलें कीं; " मी हिंदुस्थानांत जातों तो स्त्रियां करितां जात नाहीं, व मी शपथपूर्वक सांगतों कीं, मीं त्यांच्या नादास

बिलकूल लागणार नाहीं. भांग वगैरे अमली पदार्थ अगदीं सेवन करणार नाहीं, शरीर प्रकृतीस फार जपून वागेन, शिवाय त्या देशचे पक्के माहितगार काका मजबरोबर आहेतच. ते माझें हित अन-हित पाहतील व मला कुमार्गाकडे जाऊं देणार नाहींत." इत्यादि पुष्कळ वाटाघाट मध्यरात्रीपर्यंत होऊन अखेरीस तीर्थरूपांनीं आज्ञा दिली. दुसरे दिवशीं मातुश्रीशीं बसून तिची समजूत पुष्कळ प्रकारें केली. सर्वांत मातुश्रीचें प्रेम अनिर्वचनीय आहे. दोन तीन घटकापर्यंत मला कुरवाळून रुदन करीत होती; मी दूरदेशीं जाऊन सुखरूप परत कसचा येतों ह्या कल्पनेनें वारंवार तिला अश्रुपात येत. रात्रौ पत्नीनेंही न जाण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला, परंतु तिला सांगितलें कीं तूं नुकतीच जिवावरच्या दुखण्यांतून उठली आहेस काठी धरून दोन पावलें चालतां येत नाहीं, डोकीचे केश पुष्कळ गेले आहेत, तरी आणखी वैद्याचें औषध घेऊन स्वस्थ पांच सहा महिने तीर्थरूप मातुश्रीची सेवा करून राहा. हल्लीं उन्हाळीचे दिवस आले आहेत. व आह्मीं मार्गशीर्ष पौषाचे सुमारास खचित परत येतों. हें ऐकून ती निरुत्तर झाली व जाण्याबद्दल तिचा रुकार पडला. दुसरे दिवशीं काकांनींही येऊन तीर्थरूपांस सांगितलें कीं, "आह्मीं दोघे हिंदुस्थानांत जातों; तुह्मीं काळजी किमपि न करितां येथील दोन्हीं प्रपंच चालवावे. विष्णूबद्दल निर्धास्त असावें, तो पुत्र व मी पिताच आहें, याउपर काय सांगूं." याप्रमाणें बोलणें झाल्यावर तीर्थरूपांनीं मुहूर्त पाहण्यास सांगितलें. आमची मातुश्री फार गरीब व भावार्थी होती, ती नेत्रास पाणी काढून ह्मणाली कीं "विष्णु पुन्हा दृष्टीस पडेल तो सुदिन आहे. मजला बोलण्याचें

ज्ञान नाहीं म्हणून मी बोलत नाहीं सर्व ऐकून घेते." तेव्हां मजला गहिंवर येऊन तिचे अश्रु पुसून मी सांगितलें कीं, मी आपला कार्यभाग झाल्यावर उगीच कांहीं नादानें तिकडे राहीन तर देव पाप मजला साक्ष आहेत. तूं अशीं काळजी करूं नको. इत्यादि बोलून तिचें कांहीं समाधान केलें. गोडभट हा फार लहान होता, तरी मजला एकांतीं बसून दूर जेथें मी जाण्याविषयीं बोलूं लागला. तेव्हां त्याचेंही थोडक्यांत समाधान करून उपदेश केला कीं, "मी व काका गेल्यावर यजमान कार्ये चालविण्यास तूंच राहिला आहेस. त्यांतून वेदाची आवृत्ति म्हणून काव्याचा एक श्लोक म्हणावा. यांनी वेळेस त्रिकाळचे प्रयोग पाठ करावे. एकंदर फार सावधपणें रहावें. हरिपंत मस आहे, तीर्थरूपांपाशीं तूंच आहेस, त्यांचे आज्ञेनें वागावें. मची आठवण होऊं देऊं नये. हरिपंत व्यवहार पाहील. त्या खटला तुलाच पाहिला पाहिजे, आपल्या मुलाचे हाल होऊं नये. मातुश्रीस देवधर्मास जें खर्चास लागेल तें देत जा व तिचे आज्ञेंत वागत जा व तिचें वस्त्र रोज तूंच धूत जा. मी परत आल्यावर हा नियम चालविला आहे व माझे मागें तूं चालव, आळस करूं नको." कृष्णाबाई वहिनी ही लहान होती तिजला आंगावरुनी झारी आणण्याचें कबूल करून तिचें समाधान केलें.

निघण्याचा दिवस प्राप्त झाला. काकांपाशीं गाडीभाडें भोजनखर्च वगैरे संबंधीं ठराव करून आदले दिवशीं रात्रीं सर्व तयारी करून पडशी भरून ठेविली. त्या रात्रीं झोप कोणास आली नाहीं; सर्वांस वाईट वाटत होतें व चिंतेत व आनंदात "रात्रीस व्यर्थसी"

दोन घटका रात्री उठून मुखमार्जनादि आटोपून गाडी घेऊन का बाजार रस्त्यावर येऊन उभे राहिले व आम्हास बोलावणे पाठविले. नंतर तीर्थस्वरूप काका व मी कुळस्वामिणीस हळद कुंकू वाहून प्रार्थना करून तीर्थरूप मातोश्रींचे चरणावर मस्तक ठेविले व बाहेर पडून गाडीपाशी आलो. तेथे हरिमिश्र व वेदशास्त्रसंपन्न विनायकशास्त्री वगैरे आले होते, त्यांचे सर्वांचे समाधान करून निरोप घेतला व प्रयाणास आरंभ केला. गावाबाहेर पुष्कळ लांबपर्यंत आमची सर्व माणसे येतच होती, ती काही केल्या माघारी जाईनात. पुन्हा एकवार उभे राहून त्यांचे समाधान केले. तीर्थरूप व मातुश्री यांचे नेत्रास पाणी येऊन कंठ भरून आल्यामुळे त्यांना बोलण्याचा इलाज नव्हता, व माझाही गळा भरून आला होता, तथापि मन घट्ट करून त्यांस मिठी मारून सांगितले की, मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे आपले प्रकृतीस फार जपेन व माघ फाल्गुनाचे सुमारास घरी खास परत येईन; तू काळजी करू नको. ते समयी मातुश्री बोलली तुझी भेट पुन्हा होईपर्यंत मी आपले प्राण कंठांत ठेविले आहे असे म्हणून माझे डोळे आपले पदराने पुसले. हरहर! मी अतिशय संकटांत पडणार व वेड्याचे तडाक्यांत सांपडून केवळ मृत्युमुखांतून बाहेर सुटणार व सात महिन्यांचे बोलीने निघालो तो दोन वर्षांनी परत येणार, ही घोर दैवगति आमचे स्वप्नींसुद्धां आली न

आता कोठवर यावयाचे असे सर्वांनी आग्रह करून तीर्थरूप व मातुश्री व इतर घरची मंडळी परत फिरविली, परंतु हरिप माघारा जाईना, तो आमचे संगतीत एक कोसपर्यंत आला व पुढे यावयाचे आपल्याबद्दल बहुत आग्रह केला, परंतु परतेना. शेवटी गाडी

मंडळीस तसेच पुढें जाऊं दिलें. व आम्ही दोघे एका झाडाखालीं [illegible]
उभे राहिलों. कंठ दाटून आल्यामुळें कोणाच्यानेंही बोलवेना, कांहीं
वेळ एकमेकांस मिठी मारून कळवळून रडल्यावर हरिपंत म्हणाले,
"[illegible] एक वर्षाचे आंत परत येण्याची मुदत केली आहे. आजपर्यंत
[illegible] मधुलरहस्य फार उत्तम होतें व [illegible] [illegible], ते
आतां प्राप्त झालें आहे. त्याप्रमाणें राम वनवासास निघाले
त्या वेळेस भरतानें पुष्कळ सांगितलें परंतु फिरले नाहीत व त्यांनी
नंदिग्रामास राहून ब्रह्मचर्य व उपोषणाचा नियम केला, त्याप्रमाणें
मी हृदय बांधून तुम्हांस सांगतों कीं, तुम्ही वर्षाअंतीं परत न आल्यास
[illegible] मजला संसाराची कांहीं जरूर नाहीं मी निश्चित [illegible]
धारण करून चालता होईन. एवढा माझा नियम लक्षांत ठेवावा व
[illegible]पणें जावें, आतां तुम्ही घरची कांहीं काळजी करूं नये. मी
[illegible] आठ दिवसांनीं घरचा समाचार देत जाईन" असें [illegible]
[illegible] बोलल्यावर आम्ही चालूं लागलों, पुन्हा पुष्कळ वेळां [illegible]
[illegible] शेवटीं पुन्हा एकदां आपल्या हातें निश्चयाची आठवण देऊन
अश्रुपूर्ण नयनांनीं आमच्याकडे पहात पहात तो माघारा फिरला.

हरिपंतांचे मजवर प्रेम अमर्याद होतें यांत संशय नाहीं. [illegible]
केव्हां आम्ही [illegible] आमची काय स्थिति झाली
बिलकूल भानसुद्धां लागेना, तेव्हां आमचे घरचे मंडळींची [illegible]
पण हरिपंतांची काय स्थिति झाली असेल याची कल्पना
नाहीं. आम्ही सुरक्षित घरीं यावें या करितां त्या बिचाऱ्यानें
दिवस नित्य एकादशी व हजार प्रदक्षिणांचा नेम करून [illegible]
हरीकथादि परमेश्वराची आराधना केली. तेच पुण्याई [illegible]

कामाकडे उपयोगास कशी आली हे पुढे स्पष्ट होणार आहे. असो. आम्ही पुढे चालू लागलों, तो दिवस शके १७७९ कालयुक्त संवत्सर फाल्गुन मास वद्य पंचमी मंगळवार होता. त्या दिवशीं पिंपळी मुक्कामीं धर्मशाळेंत वस्ती करून जेवणें केलीं. पहाटेस घाट चढून गेलों. तिसरे मुक्कामास पुणें शहरांत शिरलों. पुण्यास स्वस्थ एक दोन दिवस राहून वरसईची भाड्याची गाडी परत पाठविली व तीर्थरूपांस एक पत्र व एक [illegible] पाठवून दिला. आम्ही पुण्यास [illegible] वगैरे सर्व सरंजाम तयार करविला. सोबत पाहून एक इंदूरपर्यंत भाड्याची गाडी ठरवून त्यांत कर्वे, [illegible] पत्नी, व एक आठ वर्षांची कन्या व स्वयंपाकीण बाई असा प्रकारें आम्ही कांहीं चालत कांहीं पाळीपाळीनें गाडींत बसत, चैत्र शुद्ध पंचमीस पुणें सोडून प्रवासास आरंभ केला.

भाग २ रा.

देशजातिकुलानां च ये धर्माः प्राक्प्रवर्तिताः ।
तथैव ते पालनीयाः प्रजा प्रक्षुभ्यतेऽन्यथा ॥
जनापरक्तिर्भवति बलं कोशश्च नश्यति ॥ १ ॥

—व्यवहारमयूख.

तारुण्याच्या भरांत, शक्तीच्या उमेदीनींत प्रवासासारखी मौज नाहीं. निराळे प्रदेश, देखावे, नद्या, नाले, डोंगर, झाडें, शहरें, खेडीं,

ाणसें, रीतीभाती कळेस पडून नूतनगणाची ... मनोरंजन होते व निरनिराळी माहिती होते, व शहाणपणा येतो. सुखाची ... आनंद देण्याची शक्ति कांहीं दुःखाची मिळक ... बाहेर पडत नाहीं. चालण्यानें अंग दुखणें, भाजी वेळेवर न मिळणें, उन्हां भर दोनप्रहरीं एखाद्या मामळीच्या विरळ छायेंत ... करीत बसणें, परवां रात्रीच्या अरथंडीत अरण्यांत कुडकुडत बसणें, एखादा जिन्नस विसरणें, थोडीशी मामच्याची भीती असणें, ... प्रसंगीं घडणाऱ्या गोष्टी प्रवासाच्या सुखांत मिळून सुखरूप ... होऊन जातात. पहांटेस उठून ... बहुतेक प्रातःकाळ ... झाडांत चालत असों, व नऊ दहाचे सुमारास कोठें तरी ... करावी. मग एखाद्या सुंदर नदीचे प्रवाहांत दोन हात टाकून ... करावें किंवा प्रसंगोपात एखाद्या डबकयांतील पाणी ... स्नान करावें. स्नान करून अन्नकर्म सपतें ... त पिठलें तयार होऊन शेवीत असूं व बहुतकरून दुपारचें ... उन्हाची वेळ टाळून पुन्हा चालू लागत असूं. ... वाघोलीचा मुक्काम करून मजल दरमजल ... जवळ येऊन पोंचलों. तो जंगलांत ओढ्याचे ... कांनी तांबड्या पांढऱ्या अगणित ... टाकून गेल्या आहेत असें दृष्टीस पडलें. एका दिवसांत ... होईल ... पाहून फार आनंद झाला. या पुष्पें पुष्कळ गोळा केलीं. ... तेथेंच मुक्काम करून दुसरे दिवशीं दहा वाजण्याचे सुमारास न... ...शिरळी व नव्या कारखानाची राजेश्री नाना ... पुढें ... जाऊन उतरलों. ... कांहीं दिवस मुक्काम केला व ...

... पाहिलें. पुढें हिंदुस्थानांत जाणाऱ्या दोन तीन गाड्या मिळाल्या. त्यांत यज्ञाकरतां निघालेले कांहीं विद्वान् ब्राह्मण होते. त्यांचे ...तीनें नगरहून कूच केलें. मुक्काम दर मुक्काम फिरत फाळेगांवचे ... धर्मशाळेशीं उतरण्याकरितां आलों, तों पांच सहा गाड्या उतरल्या आहेत, पंचवीस तीस माणसें खटपटीस लागलीं आहेत, व एकीकडे स्वयंपाक सुरू आहे असें दृष्टीस पडलें. आम्हीही तेथेंच एका कोपऱ्यांत उतरलों. चौकशी अंतीं बापूसाहेब संगमनेरकर येथें उतरले आहेत असें कळलें. ते हारदेहांडे म्हणून जेथें नेहमीं ...चें ठिकाण होतें तेथें जात होते. बापूसाहेबांस वतनाचें ...ना तीस हजार उत्पन्न असून जवळ अर्थही पुष्कळ होता. गृहस्थ फार सज्जन व धर्मशील होते व चांगले व्युत्पन्न असून ...ही बराच पठण केला होता. नेहमीं स्मार्ताग्नि सिद्ध ठेविल्यामुळें ...विधीची माहिती त्यांस चांगली होती. त्यांचे हातून सप्तसंस्था ... चारदां झाल्या होत्या, व जवळ गृह्याग्निसागर वगैरे मोठमोठाले ग्रंथ होते. त्यांची पत्नी फार साध्वी पतिसेवापरायणी होती. अशा गृहस्थाच्या भेटीचा आम्हांस परम लाभ झाला. चार विद्वान् ब्राह्मण सहाजिक आले आहेत तेव्हां जागरण करावें असें त्यांच्या मनांत ...बरून दोन प्रहरीं भजन व दुसरे दिवशीं बरोबर घेऊन ...ति रावबहादुर [illegible] यांच्या भेटीस [illegible]. तेथें सत्कार वगैरे झाल्यावर रात्रीं जागरणाची [illegible] ठरली. फाळेगांवचे चार विद्वान [illegible] आम्ही एकत्र [illegible] मिळून तेरा [illegible] तीन मात्रेतील [illegible] जागरण झालें. [illegible] पुष्कळ होतें व एक एक रुपया दक्षणा मिळाली. नंतर आम्ही धर्मशाळेंत परत येऊन स्वस्थ निजलों. आम्ही

बरोबर मंत्रजागरण होईपर्यंत एक यजुर्वेदी ब्राह्मण बापूसाहेबांचे पदरचा जागत होता व पुढें आमचे बरोबर धर्मशाळेंत येऊन निजला. त्या दुर्दैवी ब्राह्मणास पहांटेच्या सुमारास सर्पदंश झाला. त्याच्या ओरडण्यानें मंडळी जागी झाली, व मोठा घोळ होऊन गेला. मणिमंत्रौषधि वगैरे उपाय सुरू झाले. राजेबाहदरही हें वर्तमान समजतांच मांत्रिक व वैद्य घेऊन तेथें आले. परंतु ‘ सुरक्षितं दैवहतं विनश्यति.’ कांहीं उपाय चालेना. तो गरीब बिचारा आपली घरची आठवण काढून रडूं लागला. पत्नीस रजोदर्शन झालें आहे. घर नगर जिल्ह्यांत आहे तिकडे जाणें आहे, वगैरे त्यानें फार विलाप केला. पुढें शुद्धी नाहींशी झाली व सूर्योदयाच्या सुमारास परलोकयात्रेस आरंभ केला. त्या वेळची ती स्थिति लक्षांत आली ह्मणजे माझे आंगावर कांटा उभा राहतो. प्रवासांत धर्मशाळेंत अरण्यांत पाहिजेल तेथें पडावें लागतें, आणि अकल्पित मृत्यु कसा येतो, ह्याचें ढळढळीत उदाहरण डोळ्यांसमोर असल्यामुळें मनाची फार उद्विग्न स्थिति झाली व घरची आठवण येऊन किंचित अश्रुही आले. असो त्याचें उत्तरकार्य बापूसाहेब यांनीं निवर्तलें, व आम्हीं पुढें चालूं लागलों. तों मजल दर मजल धुळ्यावरून सात पुढ्याच्या पायथ्यापाशीं करबंद बारीचे मुक्कामावर येऊन पोहोंचलों.

सातपुड्यांतील वनप्रदेश अतिरमणीय आहे. एकंदर पर्वताची रुंदी सुमारें साठ सत्तर कोश असून मधूनमधून मात्र उंच शृंगें आहेत, बाकी डोंगर सखल आहे. एकदम चढावही नाहीं. कांहीं चढाव आहे कांहीं उतार आहे. सातपुडा म्हणण्याचें कारण असें आहे कीं, डोंगराचे सात पुडे आहेत व सरसकट डोंगरापलीकडे

जाण्यास सात दिवस लागतात. आम्ही डोंगर पाहाटेच्या चार घटका राहिल्या होत्या तेव्हां चढावयास आरंभ केला. प्रातःकाळचा गार वारा मंद मंद वाहात होता. चांदण्याच्या प्रकाशानें वनप्रदेश संसारसुखाच्या आशेप्रमाणें अस्पष्टरमणीय दिसत होता व अहंपणारूप सुवासानें वन दणदणून सोडलें होतें. आम्हीं पांच साहा कोश आलों तरी सुवास भरून राहिला आहे हें पाहून आश्चर्य वाटलें व अरुणोदयानें दिसूं लागलें तों अनंत बिल्व वृक्ष डोंगरावर लागून राहिले आहेत व त्यांजवर कोंवळ्या आरक्त पल्लवांनीं युक्त सुगंधीं पुष्पें भरलीं आहेत असें दृष्टीस पडलें. अगोदर आम्ही शैव त्यांत पार्थिवपूजा मीं लहानपणापासून घेतली आहे, तेव्हां तें शिवप्रियवृक्षवन पाहून मला अत्यानंद झाला. कोंकणांत सगळ्या गांवामिळून दोन चार बेलाचीं झाडें असतात, तीं पुनः सगळ्या गांवाच्या पूजेकरितां बोरखडून टाकलेलीं असून त्यांत सबंद त्रिदळ मिळावयाची पंचाईत. अशा अवर्षणाच्या देशांतून आलेल्या आह्मां उपोषितांस ते कोमल आरक्त त्रिदळांनीं भरलेले व सुवासिक पुष्पयुक्त बिल्ववृक्ष पाहून परम हर्ष झाला यांत नवल काय ! आम्ही पुष्कळ पत्रें व पुष्पें खुडलीं व लागलीच एके रस्त्याचे बाजूचे धर्मशाळेंत उतरलों. अफूचे व्यापाराकरितां सरकारानें रस्त्याचे बाजूनें सहा सहा कोशावर पाण्याच्या आश्रयानें कौलारू बंगले बांधले आहेत, तशा एका बंगल्यांत स्नान जेवण झाल्यावर पुन्हां चालूं लागलों. ते दिवस वसंताचे होते यामुळें वृक्ष सर्व पल्लवित पुष्पित फलित झाले होते. रक्तचंदन, मधुप, साग वगैरे वृक्ष मोठमोठाले उंच डोंगरावर दाट लागलेले होते. कोशिंबाचे वृक्ष अगदीं लाल होऊन

गेले होते. मधून मधून भिल्ल लोकांच्या गढ्या म्हणजे किल्ले चिरेबंदी तट वगैरे सुद्धां लाखों रुपये खर्च करून बांधलेल्या उंच उंच शिखरावरून रमणीय दिसत होत्या, व रस्त्यावर कोठें पाण्याच्या जागेवर चिरेबंदी चौथरे सोईकरितां बांधलेले दृष्टीस पडले. वाटेनें भिल्लांचीं मातीची बांधलेलीं गांवें फार लागलीं.

याप्रमाणें सातपुड्याची शोभा पहात जातां जातां महूच्या छावणीहून तीन मजलाच्या सुमारास संध्याकाळचे वेळेस सडकेच्या बाजूचे बंगल्यांत उतरून जेवणखाण केलें. रात्र चार पांच घटका झाली तों दोन पलटणी शिपाई बंगल्यांत उतरावयास आले. प्रवासांत ओळखी ताबडतोब होतात. शिवाय ते शिपाई गोव्याकडील असल्यामुळें आह्मी एकदेशी व एकभाषी जुळलों, मग स्वस्थपणें पानसुपारी खात बसून चोहींकडील हकीगती व सुखदुःखाच्या गोष्टी सुरू झाल्या. ते सांगूं लागले कीं आजपासून तिसरे दिवशीं पृथ्वीवर राज्यक्रांति होऊन मारामारी लुटालुटी होणार त्यापेक्षां आह्मांला असें वाटतें कीं तुह्मीं देशीं परत जावें. हें ऐकून आम्हास भीति उत्पन्न झाली व मोठ्या उत्कंठेनें आह्मीं त्यांस पुसूं लागलों. "अहो शिपाईबोवा तुह्मी ह्मणतां याचा अर्थ काय? मारामारी कशासाठीं होणार व कोण करणार?" तेव्हां त्यांनीं सांगण्यास प्रारंभ केला.

"इंग्रजसरकार आजपर्यंत चांगल्या रीतीनें राज्य करीत आले, परंतु आतां त्यांची बुद्धि नष्ट झाली. गुदस्तसालीं विलायतेहून उत्तम रामिनीच्या बंदुका आणविल्या व त्या बंदुकांकरितां काडतुसें तयार करीत आहेत. तीं दांतांनीं तोडावीं लागतात. दमदम छावणींत

अशी गोष्ट झाली कीं, एक ब्राह्मण शिपाई स्नानास गेला असतां एका चांभारानें त्याजपाशीं लोटा पाणी पिण्यास मागितला. तेव्हां ब्राह्मण ह्मणूं लागला कीं, मी लोटा दिला तर तो विटाळेल, हें ऐकून तो रागानें म्हणाला " अरे तुह्मी जात जात म्हणून फार उड्या मारूं नका. हल्लींची काडतुसें तयार करितात त्यांस गाईची व डुकराची चरबी लागते व ती चरबी आम्हीं तयार करून देतों. तीं काडतुसें तुम्हीं दातांनीं तोडलींत ह्मणजे गाईची चरबी तुमचे तोंडांत जाणार व तुह्मी बाटणार. उगीच जातीची घमेण्ड कशाला पाहिजे." असें होतां होतां दोघे हात–पिटीस आले व पलटणी लोक बहुत जमले व त्यांनीं सर्व वृत्तांत ऐकिला. काडतुसें बाटविणारीं आहेत ही बातमी थोडक्यांतच चोहींकडे पसरली. गाईच्या चरबीच्या भीतीनें हिंदु व डुकराच्या चरबीच्या भीतीनें मुसलमान सारखे विथरले. सरकार आपणांस युक्ती प्रयुक्तीनें ख्रिस्ती करणार ही भीति सर्वांचे पोटांत उत्पन्न होऊन स्वधर्मसंरक्षणाकरितां विचार करूं लागले. शिपाई लोकांनीं आम्हीं काडतुसें घेणार नाहीं असें आपापले मुख्य अधिकाऱ्यांस कळविलें. व तो मजकूर कलकत्यास गव्हरनर साहेब यांस समजला. काडतुसाचें वर्तमान इतक्या जलदीनें चोहींकडे पसरलें कीं, याची कल्पनासुद्धां करवत नाहीं.

काडतुसाबद्दल हिंदु व मुसलमान शिपायांत गवगवा चालला आहे ही गोष्ट फौजेंतील हापीसर लोकांस माहीत होती. व कित्येक शिष्ट शिपायांनीं याजपासून दंगा होण्याचा संभव आहे असें त्यांस केव्हां केव्हां मुद्दाम पत्रें पाठवून कळविलें होतें. परंतु याजपासून कांहीं भयंकर परिणाम घडतील असें कोणाच्याही लक्षांत आले

नाहीं. कलकत्यास काडतुसांचे प्रकरणाचा निकाल करावा याजकरितां विलायतेहून एक साहेब आला व त्यांचे आणि गवरनर साहेबांचे विचारें असें ठरलें कीं, ही काडतुसें खुशीनें किंवा बळजारीनें सर्व पलटणीच्या शिपायांस वाटलीं पाहिजेत. यांत धर्माची वगैरे कांहीं एक बाब न ऐकतां जूनचे दाहावे तारिखेस प्रत्येक हापीसर लोकांनीं आपले पलटणीचे शिपाई बिनहत्यार सकाळचे दाहा वाजतां परेडीचे जाग्यावर बोलावून बेलाशक त्याजकडून काडतुसें घेववावी. जीं पलटणें घेतील त्यास हत्यारें घेऊन द्यावी. न घेतील त्यांचें काय करावें याचा मागाहून निकाल होईल. याप्रमाणें धर्म संबंधें एकंकार करणारा हुकूम कलकत्याहून सुटला आहे.

इंग्रज सरकारचे मनांत हिंदु व मुसलमान यांच्या धर्माचा कोणत्याही प्रकारचा मान ठेवावयाचा नाहीं, व होईल तितकी खिस्ती धर्मास मदत करावयाची. असा निश्चय ठरल्यावरून त्यानीं हें काडतुसाचेंच प्रकरण काढलें असें नाहीं. हिंदु धर्म शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टी चालवूं नयेत अशाबद्दल एक चौऱ्यांशीं कलमांची याद तयार करवून हिंदु राजेरजवाडे यांची एक सभा कलकत्यास भरविली. त्या सभेंत सर्वांस पाचारण केलें होतें. शिंदे होळकर गायकवाड धुळपुकार व बिलशियाचा राजा व दतीयेवाले व ओडशीवाले वगैरे सर्व बडे लोकांस बोलावणीं केलीं. त्यांत नानासाहेब पेशवे व लखनूरची बेगम व झांशीची राणी व दिल्लीचा फिरोजशाहा यांस मात्र बोलावणें झालें नाहीं; बाकी दरोबस्त बडे लोक राजे व मांडलीक यांस बोलावणीं सरकारानें कलकत्यास यावें म्हणून केलीं. सर्व लोक आपापले जागीं योग्य सत्कार होऊन बसल्यावर

सभेपुढें ती याद वांचली. त्या यादीचा मुख्य सारांश असा होता कीं हिंदु मुसलमान यांचे धर्मासंबंधें कायद्यानें कांहीं एक हक्क ठेवावयाचे नाहींत. उदाहरणार्थ एक कलम असें होतें कीं जर चौघा भावांपैकीं एक असामी पक्का बाटला म्हणजे खिस्ती झाला तर त्याचा वांटणी संबंधें हक्क जाऊं नये. तो पतित झाला तरी त्यानें आपला भाग घेऊन घरांत जेथें वांटणी येईल तेथें राहावें. दुसरें एक कलम असें होतें कीं हिंदु धर्मात पुनर्विवाह स्त्रियांनीं करूं नये असें लिहिलें आहे. करतील तर त्यांस पतित समजून जातीबाहेर टाकाव्या. असें असतां असा ठराव करण्यांत आला कीं जर कोणी विधवा पुनर्विवाह करील तर तिचे मुलगे हे पतित नव्हत व तिला जिंदगी वगैरेचा सर्व हक्क आहे. असो याप्रमाणें हिंदुमुसलमान धर्माचा अपमान करणारीं कलमें त्या यादींत पुष्कळ होतीं. याद सभेंत वांचून दाखवून, ही याद तुह्मांस कबूल केली पाहिजे व याप्रमाणें पुढें आह्मी हिंदुस्थानांत कायदा चालविणार अशी समजूत दिली. ते वेळेस बाणपूरचा राजा उठोन सभेंत बोलूं लागला कीं 'हें हिंदुस्थान भरतखंड जंबुद्वीप आहे. या भूमीस कर्मभूमी असें ह्मणतात. या द्वीपाला लागून सर्व सिंव्हलद्विपादि आहेत. परंतु हिंदूचें मुख्य हेंच आहे. तर हिंदूचे देवास आमचा कंटाळा आला असल्यास साहेबाचे ह्मणण्याप्रमाणें कबूल होईल, नाहीं पेक्षां जें होणें तें होवो. सार्वभौम राजा प्रजेस अधर्माच्या गोष्टी करण्याविषयीं जरी उपदेश करील तथापि प्रजा ऐकणार नाहींत. जर करितां चौऱ्याशीं कलमें अंमलांत आणावयाचीं आहेत तर धर्मसंबंधीं बखेडा होईल.' नंतर

एक नबाब उठून बोलला कीं या हिंदुस्थानांत मुसलमान व हिंदु एके ठिकाणीं राहत आहेत परंतु परस्पराचे धर्मास उपद्रव करीत नाहींत. (या उभयतांचे धर्मास हानि करणारा राजा जय पावत नाहीं. पहा दिल्लीचे तक्तावरच्या बादशहाचे मनांत हिंदुधर्म बुडवून सर्व मुसलमानी करावी असें येतांच त्यांचें सार्वभौमत्व नाहींसें झालें.) याजकरितां इंग्रज सरकारांनीं या यादींतील कलमें अमलांत आणूं नये. या प्रमाणें त्या सभेंत अनेक भाषणें झालीं असें ऐकतों परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं व राजेरजवाडे लोक आपापले ठिकाणीं नाखुष होऊन परत गेले. *

ते समयीं तेथेंच लोक बोलूं लागले कीं आतां ज्याचा त्यानें विचार पहावा. पृथ्वीवर मनुष्यांचा संहार होणार. हिंदुलोक व मुसलमान लोक धर्माविषयीं आम्ही मरून जाऊं परंतु बेधर्मी होणार

---

* पराचा कावळा होऊन लोकांत कशा प्रकारच्या कंड्या पिकतात यांचे वरील भाषणांत चांगलें चित्र आहे. सन १८५७ चें नुकतें पूर्वी ह्मणजे सन १८५६ त लोकांच्या आग्रहावरून विधवाविवाहाचा कायदा पसार झाला होता. तसाच ख्रिस्ती झालेल्या लोकांचा हक्क कायम ठेवणारा कायदाही त्याच वर्षी पसार झाला त्यामुळें सरकारचा धर्मसंबंधांत हात घालण्याचा विचार आहे अशी लोकांत भीति साहजिक उत्पन्न झाली. इतक्यांत काडतुसाचे प्रकरण उपस्थित झालें. याच संधीस ह्मणजे मार्च सन १८५७ त जयाजीराव शिंदे कलकत्यास गव्हर्नर जनरलचे भेटीस गेले होते. (केचा बंडाचा इतिहास पान ५३८.) या सर्व गोष्टीवर वरील कल्पना रचिल्या गेल्या असाव्या.

नाहीं असा निश्चय करून एक विचार करून वागूं लागले आहेत. ती नेमलेली तारीख आजपासून तीन दिवसावर आली आहे. ठरलेल्या तारखेच्या दिवशीं अधिकारी यांस धर्माकरितां आम्ही काडतुसें घेणार नाहीं असें तीन वार सांगून पहावें, नाहीं म्हणतील तर लागलींच त्या त्या छावणींत जे गोरे लोक असतील त्यांस कापून काढून दारूगोळा मेगजीन खजिना गुदाम सुद्धां आपले ताब्यांत घेऊन छावणीस आग लावून द्यावी अशी गुप्त पत्रें ठिकठिकाणीं मिरत येथील छावणीतून गेलीं आहेत. अशी भयंकर स्थिति आजपासून तिसरे दिवशीं हिंदुस्थानांत येणार सबब आम्ही रजा घेतली आहे. आम्ही घरीं मुलामाणसांत जाणार. तुम्ही दक्षिणी ब्राम्हण पुढें जाण्याचा विचार करीत असल्यास फार संकटांत पडाल. तुम्ही परत जावें हें फार चांगलें असें आम्हांस वाटतें." हा मजकूर ऐकून आम्हीं फार घोटाळ्यांत पडलों. यज्ञाकरितां एथवर दूर आल्यावर कांहींतरी पैसा मिळविल्याशिवाय देशीं परत जाणें फार जिवावर आलें. शेवटीं असें ठरविलें कीं आपण लढवई लोक नाहीं, गरीब भिक्षुक ब्राह्मण आहों. काळे लोक एकत्र होऊन धर्माकारितां भांडतात तर आपल्यास भय नाहीं. असा विचार ठरून नित्याप्रमाणें पहांटेस उठून गाड्या भरून चालूं लागलों. वाटेनें पांचचारदां शिपाई लोक भेटले, त्यांनीं सांगितलें कीं तुम्ही यात्रेकरी लोक कसे सुरक्षित जाल तर खरें. निदान जूनचे दाहावे तारखेपर्यंत इंदूर शहरांत तरी जावें. आम्हीं तसेच जोरानें पुढें चाललों. सायंकाळीं एके बंगल्यांत वस्ती केली, तेथेंही तोच मजकूर ऐकिला. उजाडते

तारीख दाहावी येऊन पोंचली. नित्याप्रमाणें गाड्या भरून आम्हीं सर्व पुरुष चालूं लागलों. आपल्यास मद्दूचे छावणीवरून जाणें आहे. ती उलटेपर्यंत दगा आहे, एकदां मद्दू उलटली म्हणजे सुटलों. अशा धास्तीनें व आशेनें रस्ता जोरानें आक्रमित असतां सकाळचे दाहा वाजायचा सुमार झाला. मद्दूची छावणी मैलावर राहिली. तो एकाएकीं तोफांचे आवाज व बंदुकींचे आवाज शतावधि होऊन दिशा गुंग झाल्या; त्या बाजूस धुराचा कल्लोळ होऊन दिसेंनासें झालें. आमचे मंडळींचे प्राण कंठांत आले. आतां काय होतें या धास्तीनें मंडळी निस्तेज जाहली. परंतु पूर्वीं निश्चय केल्याप्रमाणें हळुहळू पुढें चालूं लागलों; तशांत, मागें फिरणें ही दुरापास्तच होते. छावणीचे जवळ येऊन पोंचलों, तों ती फार मोठी आहे असें दृष्टीस पडलें. उत्तर व दक्षिण हिंदुस्थान यांमधील नांके असल्याकारणानें सुमारें तीन कोश पर्यंत पसरली होती, तेवढी सर्व पेटवून दिली होती. वायु फार सुटल्यामुळें अग्नीच्या ज्वाळा भयंकर चालल्या होत्या. मध्यान्हीचा समय झाल्याकारणानें ग्रीष्म सूर्याचें अत्यंत प्रखर तेज वरतून पडलें होतें. व खालीं वडवानळा सारखे दोन तीन कोशपर्यंत ज्वालाचे समूह तापवीत होते. सर्व जिकडे तिकडे भणभणीत व उदासीन दिसत होते. काळे लोक बेदील होऊन एकमेकांस आरोळ्या मारीत होते. असा भयंकर अनर्थ व कलकलाट होऊन गेला होता.

आम्ही जवळ जातांच दोन तीनशें लोक धांवत येऊन आम्हां भोंवतीं गराडा घातला व गाड्या एकदम उभ्या केल्या. आमची मंडळी धास्तीनें होरपळून गेली होती, परंतु मी धीर धरून बोलूं

लागलों. अहो शिपाईबोवा आम्हीं गरीब भिक्षुक ब्राह्मण आहों. पुणें प्रांतांत राहतों. बायजाबाई साहेब शिंदी सर्वतोमुख यज्ञ करणार आहेत ह्मणून पत्रें आल्यामुळें आम्हीं यज्ञास जात आहों. आह्मांपाशीं पोथ्यापुस्तकें आहेत हीं आपण पहावींत. तुम्हीं हिंदुधर्मासाठीं जर इंग्रजांबरोबर भांडतां तर आम्हां गरीब वेदशास्त्र पढलेले ब्राह्मणांस लुटमार करणें तुम्हांस यशस्वी होणार नाहीं तुम्हीं आमचें या दंग्यांत संरक्षण करून आमची एकाद्या शहरांत सोय लावून द्या. या गोष्टीनें तुम्हांस जय येईल, व दुःख पडणार नाहीं. या* तारखेस दंगा होणार हें आम्हांस तीन दिवस अगोदर माहीत आहे. परंतु आम्हीं निर्भय आहों. कारण काळे लोक जर धर्मासाठीं भांडणार तर आम्हां वेदशास्त्रसंपन्न गरीब भिक्षुकांस बिलकुल भय नाहीं इत्यादि माझें बोलणें ऐकून व आमच्या पोथ्या वगैरे पाहून त्यांनीं एकदम आम्हांस असें सांगितलें कीं आतां यज्ञ तर राहिला परंतु तुम्हीं निर्भयपणें आम्हांबरोबर असावें. खर्चवेचाची कांहींएक काळजी करूं नये. इतक्यांत रस्त्यानें घोड्याच्या गाडीचें टपाल आलें. शिपाई लोकांनीं त्याजवर हल्ला करून डांकवाल्यास ठार मारून दोन तीन ओझीं कागद माळावर फेंकून दिले व लोकांच्या बंग्या वगैरे आपल्या ताब्यांत घेतल्या. नंतर तारायंत्राचे खांब उपटून तारांच्या हातीं धरण्यास काठ्या केल्या.

याप्रमाणें त्या झोटींग लोकांच्या स्वाधीन आम्ही झाल्यावर त्यांनीं पाण्याचे नजीक एका लिंबाचे झाडाखालीं आह्मांस उतरावयास जागा दिली. तेथें गाड्यासुद्धां उतरून

---

* केव्हा इतिहास पाहतां हा दंगा तारीख १ जुलैस झाला असें दिसतें.

स्नानसंध्याभोजनादि कृत्यें आटोपलीं. काळे लोक बायका-पोरांसुद्धां बाहेर पडले होते. काळे लोक फौजेसह रिसाला वगैरे बरोबर घेऊन इंदुराकडे कूच करूं लागले. मजल दरमजल उज्जयिनीवर येऊन दोन कोशांवर पाणी झाडी चांगली पाहून सर्व फौज उतरली. आह्मांसही फौजेंतच जागा उतरावयास दिली होती. नित्य कर्म आटोपल्यावर मोठ्या दिलगीर वृत्तीनें एकेठिकाणीं बसून विचार सुरू झाला. "या बिघडलेल्या लोकांपासून आपली सुटका कशी होणार. हे लोक आपल्या जीवावर उदार झाले आहेत व नेहमीं मारूं मरूं याशिवाय त्यांस दुसरे कांहीं सुचत नाहीं. याजबरोबर राहून आपल्यास सुख व्हावयाचें नाहीं. शिवाय आपल्यास राहण्यावागण्याची फार अडचण होऊन गेली आहे. देतील तितकें खाल्लें पाहिजे. निघतील तेव्हां निघालें पाहिजे. रात्रींबेरात्रीं चाललें पाहिजे. एक घटका दिवस राहिला कीं बिकिट लागून जिकडे तिकडे पाहरेबंदी होणार. मग शौचास सुद्धां जाण्याची हाकाहाक. थेट हवालदारापर्यंत वर्दी पोंचून परवानगी काढावी लागते. आणि शिवाय फिरतांना वेडेंवांकडें पाऊल पडलें तर पटकन एकादी गोळी लागून स्वर्गयात्रा आपोआप घडणार. तेव्हां कांहीं योग्य कारण दाखवून त्याचें त्रासांतून सुटून गेलों तर पुनर्जन्म झाला असें समजून परमेश्वराचें आभार मानूं" इत्यादि विचार झाल्यावर दोन तीन पलटणी सुभेदार माझे परिचयाचे झाले होते त्याजपाशीं मी संधि पाहून स्वतां गेलों आणि बोलूं लागलों "सुभेदार आम्हीं तुह्माबरोबर आज आठदाहा रोज राहिलों. आह्मांस फार सुख झालें. कोणतीच आह्मांस न्यूनता

नाहीं. इंदूर मुक्कामीं आमचें पुण्याहून आणलेले गाडीवान ठरावाप्रमाणें सोडून गेले, तरी तुह्मी आह्मांस गाड्या देऊन येथवर आणिलें हे उपकार या दिवसांत फारच आहेत. आतां आमचा घरून निघाल्यापासून अभिप्राय असा आहे कीं द्रव्य मिळेल तें मिळवावें. व यात्रा घडतील त्या कराव्या. हल्लीं ही उज्जनी नगरी आली आहे इजला अवंतिका म्हणतात. येथें ज्योतिर्लिंग श्रीमहाकाळेश्वर आहे. क्षिप्रा नामक गंगा आहे. हें क्षेत्र श्रीकाशी क्षेत्रासमान आहे. यास्तव येथें क्षेत्रोपोषण करून क्षौर वगैरे प्रायश्चित्तें करावीं व श्राद्धादि कृत्यें धर्माप्रमाणें करावीं असें आमचें मनांत फार आहे. यास्तव आपण कृपा करून गाड्या देऊन आम्हांस क्षेत्रांत पोंचविले पाहिजे. उज्जयनी जवळ आहे खरी परंतु अराजक असल्यामुळें एकटे जाण्यास आह्मांस फार भय वाटतें यास्तव मेहेरवानीनें इतकें आमचें केलें तसें बंदोबस्ताकरितां लोक बरोबर देऊन क्षेत्रीं आम्हांस पोंचतें करावें' इतकें म्हणून स्वस्थ राहिलों.

बंडवाले लोकांची धर्मावर श्रद्धा फार चांगली होती. व अद्याप निर्दय व निरर्थक मारहाण व कामक्रोधादिकांचें प्राबल्य बंडाच्या बाल्यावस्थेमुळें त्याचे ठिकाणीं वसूं लागलें नव्हतें. त्या भाविक सुभेदारांनीं माझें म्हणणें स्वस्थपणें ऐकून घेतलें. व संतोषानें उदईक प्रातःकाळीं तुमची रवानगी करितों असें ताबडतोब सांगितलें. दुसरें दिवशीं उजाडतां कांहीं गाड्या व सुमारें पंचवीस शिपाई बरोबर घेऊन सुभेदार आम्हीं होतों तेथें आले. आमचें पायांवर डोंकी ठेऊन दर ब्राह्मणास दोन दोन रुपये दक्षिणा दिली व आह्मांस गाड्यांत बसवून पन्नास कदमपर्यंत बोळवीत येऊन नमस्कार करून

परतले. ते पुढे शिंदे सरकारचा आश्रय मिळविण्याकरितां निघून जाणार असा त्यांचा अभिप्राय आह्मांस समजला होता. आह्मास मोठ्या संकटांतून सोडविलें याजबद्दल अवंतिका क्षेत्राची मोठी आभारपूर्वक स्तुति करीत चवाठ्यावर येऊन पोंचलों. तेथें गाड्या रिकाम्या करून शिपायांच्या स्वाधीन केल्या व ते आम्हांस रामराम करून परत गेले. आमचे बरोबरचे लोक आपआपले बिन्हाडाचे पत्ते लावून निघून गेले. आम्हीं वरसईकर मिळून दानाध्यक्ष वैशंपायन यांचे आप्त विष्णुपंत जोशी उज्जयनींत राहतात असें माहित असल्यावरून त्यांचा शोध काढीत द्वारकाधीशाचे मंदिरांत गेलों. तेथें शोध लागला, त्यांची भेटही झाली. आह्मांस सुरक्षित पाहून त्यांस फार आनंद झाला व आम्हांस सांगूं लागले कीं 'वैशंपायन यांजकडून पत्र आल्यास पांच चार रोज झाले. त्यांत मजकूर असा कीं आमचे जांवई कवें गोडशासहवर्तमान इकडे येण्यास निघाल्याचे पुण्याहून पत्र आलें आहे. ते आपल्यास भेटल्यास त्यांस कळवावें कीं तूर्त इकडे येऊं नये दंगा फार आहे दंगा कमी झाल्यावर पत्र येईल तेव्हां यावें तेव्हां आतां तुम्ही येथेंच रहावें.' हें भाकित आह्मांस पूर्वीच कळलें होतें. मग विष्णुपंत याजकडेच बिऱ्हाड ठेविलें व यथाक्रम यथावकाश क्षेत्रकृत्यें आटोपलीं.

उज्जनी क्षेत्रांत बराच मुक्काम घडला. क्षेत्रांत क्षेत्रचालीप्रमाणें दाट वस्ती व अरुंद, दगडांनीं माचून काढलेले रस्ते आहेत. हें शहर फार प्राचीन असून येथें मोठमोठाले इतिहासप्रसिद्ध विक्रमादि चक्रवर्ती होऊन गेले. त्यांच्या अमानुष महत्वाची साक्ष देणारीं अशीं मोठमोठालीं दोन तांड उंचीची व पंधरा वीस हात

रूंदीचीं भिताडें चुनेगचीं वरींच दृष्टीस पडतात. असें ह्मणतात कीं उज्जयिनी नगरी पालथी घातली आहे. तेथें विटा नवीन भाजण्याची जरूरी नाहीं. बहुतकरून भुईमध्यें जुन्या विटा सांपडतात. एकादे जमिनींत भिताड लागलें, ह्मणजे मोठ्या इमारतीचें काम होतें. येथें भर्तृहरी पूर्वी राज्य करीत होता त्यास विषय संबंधें अति पश्चाताप होऊन सर्व राज्य सोडून विदेही होऊन तपश्चर्येस बसला, त्या गुहेस हल्लीं भर्तृहरीची गुंफा ह्मणतात. तें ठिकाण भैरवगढावर असून फार रमणीय शांतरसानुकूल आहे. अशी उज्जनीची मजा पहात पहात पांच सहा दिवस लोटले. बंडांसंबंधें दररोज नवीन नवीन बातम्या येऊन जिकडे तिकडे हालचाल होऊन गेली होती. तो एके दिवशीं धारचा राजा मरण पावल्याची खबर आली. धारेस पवार या नांवाचे राजे राज्य करीत होते. हल्लींचा राजा फार चांगला, शूर, विचारी, शाहाणा व धर्मशील असा होता. राज्य चांगलें चालत असल्यामुळें खजिन्यांत द्रव्य सांठलें होतें. वृद्ध झाला तरी पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें विरक्ति उत्पन्न होऊन त्यानें पुष्कळ दानधर्म केला; व नाशिक, त्र्यंबक, वांई, पंढरपूर वगैरे पुष्कळ यात्रा केल्या व पुढें काशीयात्रेची तयारी झाली होती. दिवाणजीनीं शालजोड्या, धोतरें, पितांबर वगैरे ब्राह्मणास देण्याकरितां तयार करून ठेविले होते, व खर्चास आठ लक्ष रुपये रोख तयार होते. तों कोणी दुष्टांनीं त्या सुशील राजास मूठ मारिली. "मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यच्च चिंतयेत्" त्यानें मरणसमयीं आपल्या निकट संबंधाचा एक मुलगा दत्तक घेतला. नंतर राणी व दिवाणजी यांचे विचारें असें ठरलें कीं, यात्रेनिमित्त काढलेला

सर्व पैसा उत्तरकार्यास लावावयाचा. त्याप्रमाणें उत्तरकार्यांतील दक्षिणा मिळविण्याकरितां उज्जनींतून ब्राह्मणाच्या झुंडीच्या झुंडी निघाल्या. मजला बातमी समजतांच येथें स्वस्थ बसण्यापेक्षां धार शहर व उत्तरकार्याची मौज पाहून यावें, असें माझें मनांत फार भरलें. तेव्हां काकांजवळ गोष्ट काढिली कीं, "आपणास मतिका संबंधें दान बिलकूल घ्यावयाचें नाहीं. परंतु आपण मेहनत करून दानखंड, दानचंद्रिका, दानमयूखादि मोठमोठे ग्रंथ पाहिले आहेत; कोणत्या दानास दानांग होम आहे कोणत्यास नाहीं, कोणत्या दानास ब्राह्मणास किती पावलें पोंचवावें वगैरे प्रयोग प्रत्यक्ष पाहण्यास सांपडतील, आजपर्यंत असा लाखों रुपयांचा उत्तरकार्यास दानधर्म झाला नाहीं व पुढेंही होणें कठीण. यास्तव येथें तरी स्वस्थ बसणें आहे, त्यापेक्षां आठ दहा रोजांत सर्व कृत्य जाऊन पाहून येऊं." काकाचे मनांत ही गोष्ट भरली व दुसरे दिवशीं कर्वे यांचा निरोप घेऊन आम्ही उज्जनींतून निघालों. वाटेंत चर्मण्वती नदीचें मनोहर पात्र लागलें. तेथें हजारों ब्राह्मण चोहींकडून जमले होते. यथेच्छ स्नानसंध्या भोजनादि करून मजल दरमजल धारा नगरींत शिरलों, तों सर्व शहर ब्राह्मणांनीं भरून राहिलें आहे, असें दिसलें. उज्जनी, इंदूर, देवास वगैरे ठिकाणाहून सुमारे दहाहजार दक्षिणी ब्राह्मण दक्षिणार्थ जमला होता. शहरांत ब्राह्मणाकडे तर जागा उरण्यास राहिलीच नव्हती. पण शूद्राकडेही मिळण्याची पंचाईत झाली होती. शहरांत शिरल्यापासून एक प्रहरभर बिन्हाड ठेवण्यास जागा शोधीत होतों परंतु मिळेना. शेवटीं बाजारांत एक दक्षिणी सोनार पाहून त्याचे दुकानाचे ओट्यावर नको नको ह्मणतां ओझें ठेवून

उभयतां बसलोंच. जागा मिळावयाची नाहीं असें ते निक्षून सांगतच होते, पण आम्ही बटवा काढून पानसुपारी तंबाखु काढली व त्याला दिली व बोलूं लागलों. "आम्ही मुशाफर आहों, आह्मांस मागिल्दारीं फक्त जेवण करण्यास जागा दिली तर फार मेहेरबानी होईल. आम्ही या ओव्यावर निजत जाऊं, तुह्मांस बिलकूल तोशीस लागू देणार नाहीं." अशी पुष्कळ गळ घातल्यावर सोनारानें कबूल केलें. आम्ही तेथें बिऱ्हाड लाविलें व रात्री फराळ करून स्वस्थ निजलों. दुसरे दिवशीं उठून शहरांत दानें कोठें होणार त्या जागेचा शोध करीत करीत नगराचे उत्तरेस दानशाळा सांपडली, तेथें पाहतों तों मोठा हत्ती जाण्यासारखा दरवाजा असून चोंहीं-कडून बांधलेली जागा दृष्टीस पडली. दानें सर्व आंत होणार; बाहेर पिंपळाचे पार दोन तीन होते, त्याचे छायेखालीं सर्वांनीं जमा व्हावें; ज्याचें नांव निघेल त्याणें आंत जावें, असा बेत दिसला. तेव्हां ज्या हेतूनें आलों तो सिद्धीस जात नाहीं व बाहेर राहिल्यानें दानविधि दृष्टीस पडणार नाहीं असा विचार पडला. बिऱ्हाडीं येऊन स्नानसंध्यादि आटोपून बाजारचा शिधा सरंजाम आणला व भोजन केलें. तिसरे प्रहरीं दानशाळेंत जाण्याची परवानगी कशी मिळवावी याचा विचार करूं लागलों. परंतु रस्ता सुचेना. शेवटीं दानाध्यक्षाच्या नांवाचा एक अर्ज लिहिला. आम्ही देशांतरचे ब्राह्मण आहों, यात्रेस जातांना उज्जनींत येथील सर्व दुःखकारक हकीगत कळली, आह्मांस मृतासंबंधें दान बिलकूल घ्यावयाचें नाहीं, परंतु दानसमारंभ पहाण्याची फार इच्छा आहे. अलीकडे दानधर्मास एवढा खर्च कोणी केला नाहीं व पुढेंही विचारच आहे.

त्यापेक्षां सविधि दानप्रयोग पहाण्याचे इराद्यानें येथें आलों आहों. परंतु दानशाळेंत जाण्यास परवानगी लागते याजकरितां तेवढी परवानगी द्याल तर फार उपकार होतील. मिळत नसल्यास परत गेलें पाहिजे. असा मजकूर लिहून दानाध्यक्षाचे घराचा शोध काढून शिपायाचे हातें अर्ज लावून दिला. अर्जाप्रमाणें ताबडतोब परवानगी चिठ्या मिळाल्या. दुसरे दिवशीं सकाळींच भोजन आटोपून चिठ्या दरवाज्यावर दाखवून दानशाळेंत गेलों. आंत यादीचे ब्राह्मण सुमारें दोनशें जमले होते. एकंदर अनेक दानें झालीं. ऐन्याच्या अंबारीसह सालंकार एक हत्ती दिला. वरती आठ हजार रुपये दक्षणा दिली. शिवाय नुस्ते तीन हत्ती पांच हजार दक्षिणा देऊन दिले. चार घोडे, तीन उंट, दाहा बैल, नऊ ह्मशी व तेरा दासी दिल्या. एक शय्यादान झालें. महादानाचे ब्राह्मणास पायजमा, धोतरजोडा, अंगरखा, शिपाईगिरी पागोटें, ढाल तरवार व पुष्पाचा हार इतकें सामान चढवून पूजा करून गुलाल उडवून जितकीं पावलें यजमानानें बरोबर आलें पाहिजे तितकीं पावलें यजमानानें पोंचवून दरवाज्यावाटे बाहेर काढून द्याव्या. बाहेर पडल्यावर त्याची छी थू काय विचारावी. बाहेर हजारों तेलंग वगैरे लोक जमलेले असतच. त्यांनीं हुर्यो करून त्या बिचाऱ्यावर शेणमार करावा. दासी दान घेणाराची तर फारच फजिती. एखाद्या सुंदर सर्वालंकार युक्त अशा दासीचा पदर एखाद्या गरीब बावळ्या ब्राह्मणाचे धोतराशीं बांधून त्याची दरवाज्याबाहेर धिंड निघाली ह्मणजे लोकांच्या चावनट थट्टांनीं व शेणमारांनीं त्यांची दुर्दशा दुर्दशा होऊन जाई. तशांत ती दासी लुची असली ह्मणजे त्या ब्राह्मणाबरोबर झराझर चाले-

नाशी झाली, कीं ब्राह्मण गयां वर्यां होई. शय्यादान घेणारा मनुष्य एक यजुर्वेदी होता. त्यास ताटीवर बसवून एक सोम्याचा मृत देह करून त्याजजवळ ठेऊन ताटी चार माणसाचे खांद्यावर देऊन दरवाज्या बाहेर काढून दिली. हत्तीदानाचे लोक शहराबाहेर आले की पुन्हां राजाचे सेवकास हत्ती विकून टाकीत. कारण फुकट मिळाला तरी हत्ती रंकाला काय होय ? याप्रमाणें तीन दिवस प्रातःकाळ-पासून बारावर चार वाजे तोंपर्यंत दानाची मौज पाहिली. चौथे दिवशीं भूयसीचा संकल्प होऊन अनुष्ठान पाहण्यास शिष्ट वसत होते त्यांची याद होऊन प्रत्येकास पांच पांच रुपये व धोतरजोडे मिळाले. आम्हांसही मिळाले. नंतर एक दिवस राजधानी सर्व हिंडून पाहिली. धारा नगर फार टुमदार आहे. तेथें भोज वगैरे राजे राज्य करीत होते, अशा कथा आहेतच. या शहरास दगडी चुन्याचा कोट आहे. कोटाबाहेर तलाव पुष्कळ आहेत. पाणी महामूर आहे. अडीच साडेतीन हातांचे आंत मोटे इतके पाणी लागतें, याजमुळें बाग-बगीचे फार सुरेख असून बागाइती उत्पन्न अति स्वस्त आहे. भाजीपाला केळीचीं पानें, पुष्पें व फळें या शहरासारखीं दुसरीं कोठें मिळत नाहींत. धारा नगरचे पश्चिमेस तीन चार मैलावर एक लहान पर्वत आहे त्याजवर कविश्रेष्ट कालिदास याची वरद देवता श्री महाकालिका इचें देवालय सुरेख आहे. देवस्थानाची नेमणूकही फार खाशी आहे. चौघडा आहे. पूजेचे साहित्य, समया वगैरे सर्व रुप्याचें आहे. कालिकेचें दर्शन घेऊन आम्ही धारेहून निघालों. उज्जनीस आलों तों वैशंपायन यांजकडून इंदूराहून पत्र आलेलें

कर्वे यांनीं दाखविलें. त्यांत मजकूर कीं दंगा लवकर मोडेल असें वाटत नाहीं. तरी शिंदे सरकारचे शिपाई सुमारें पंचवीस तीस उज्जनीहून येणार आहेत. त्यांची सोबत पाहून सर्वांसह निघून यावें. नंतर लागलींच शिपायांचा शोध लाविला, व त्याजबरोबर भाड्याच्या गाड्या करून ग्वाल्हेरीस जाण्यास निघालों.

वाटेनें सारंगपूर म्हणून एक टुमदार शहर लागलें. येथील वस्ती चांगली असून बाजार पेठेंत भर मजल्याच्या हवेल्या आहेत. देवळें फार मनोहर आहेत. शहरचे दोन्हीं बाजूनें नदी निकट वाहत आहे व बाहेर हिरवें गार बागाईत लागून गेलें आहे. अशी शहरें पहात पहात ग्वाल्हेरीस पोंचलों. व वैशंपायन यांजकडे उतरलों. चोंहींकडे दंगे उत्पन्न झाल्याकारणानें यज्ञ राहिला होता, परंतु बायजाबाई साहेबांनीं दक्षिणेंतून आलेल्या ब्राह्मणाची बरदास्त चांगली ठेविली होती. पावसाळा सुरू असल्या कारणानें बहुतेक मंडळी चातुर्मास्य तेथेंच राहिली. त्यांस बाईसाहेब दरमहा दाहा रुपये खर्चाबद्दल पोंचवीत असत. आम्ही ही मुजुमदार यांचे वाड्यांत स्वतंत्र बिऱ्हाड करून स्वस्थ चार महिने राहिलों. ग्वाल्हेर किल्यापासून नजीकच लहानसा गांव आहे, महादजी शिंदे बादशाहावर स्वारी करण्याकरितां बरोबर मोठें लष्कर तोफखाना घेऊन जातांना येथेंच मुक्काम केला. येथून स्वाऱ्या करून शत्रूंपासून खंडण्या घेऊन जय होत गेला, याजमुळें येथेंच वाडा बांधून राहिले. लष्करी लोक जेथें जेथें उतरले होते तेथेंच घर बांधून राहिले. एकंदर लष्कर बसाहत सुमारें तीन-साडेतीन कोश झाली आहे. भोंवतालीं भुंडे

डोंगराचें एक कडेंच आहे. झाडी कोठेंच नाहीं. शहरांत कोठें कोठें तलाव उकरले आहेत. राजधानीचे रस्ते प्रशस्त असून फरसबंदीचे आहेत. शहराजवळ फुलबाग म्हणून फार विस्तीर्ण सुंदर उपवन आहे. त्यांत नाना तऱ्हेचे देशोदेशींचे वृक्षवेल पुष्पवाटिका असून मध्यभागीं हवा खाण्याकरितां एक जलमंदीर बांधलें आहे, त्याचें काम पाहण्यालायक आहे. तेथून सुमारे चार मैलावर नदी आहे, त्या नदीचे कांठावर मोठी शिंदेसरकारची छावणी आहे.

याप्रमाणें ग्वाल्हेरींत सकाळसंध्याकाळ फिरून चातुर्मासाचे दिवस काढले. शहरांत एका नामांकित गृहस्थाचे येथें आषाढ महिन्यांत मुलाचा व्रतबंध झाला, त्याजबद्दल मोठें ग्रामण्यच माजलें. त्यामुळें लोकोतर विद्वानाच्या सभा पाहण्यास सांपडल्या. हा फार अलभ्य लाभ झाला. वेदशास्त्रसंपन्न तातु दीक्षित हे फार विद्वान वेदशास्त्रनिष्णात होते व त्यांच्या मतावरून व्रतबंध झाला होता. त्यांनीं विठ्ठलमंदिरांत स्मृतिवाक्यें सूत्रप्रमाणें व मैत्रायणीय परिशिष्टावरून आषाढांत उपनयन विष्णुशयन होई तोंपर्यंत करावें असें सिद्ध केलें. व पंचगौडांत अशी वहिवाट आहे; असें एका मथुरेच्या ब्राह्मणाचे साक्षीवरून ठरलें. सारांश, मुंज शास्त्रोक्त ठरून सभाविसर्जन झाली. कार्तिकांत बाईसाहेबांनीं दक्षिणेंतून आलेल्या ब्राह्मणांची सभा करवून बिदागी दिली. त्यांत आम्हांस पीतांबर व दीडशें रुपये रोख मिळाले. याप्रमाणें ग्वाल्हेरीचें कार्य मनाजोगें झाल्यावर आतां पुढें काय करावें याविषयीं विचार करूं लागलों.

भाग ३ रा.

सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम् ।

ग्वाल्हेरींत असतांना बंडाच्या बातम्या दररोज आह्मांस ऐकूं येतच होत्या. आज ही पलटण उठली, उद्यां ती उठली, येणेंकरून सर्व लोकांचीं मनें घांदलून गेलीं होतीं व निरनिराळ्या लोकांचे नाना तरंग चालत होते. कोणी सव्वाहात रंभापत्रावरच्या भोजनांत गर्क होते. कोणी चीजवस्त कोठें लपवावी याचे विचारांत होते, कोणी दक्षिणेंत जाण्याचा बेत करीत होते. कोणी दुसऱ्याचें द्रव्य उपटावयास सांपडेल या आशेवर बसले होते. शिंदे, होळकर इत्यादि सरदार या प्रसंगास काय करितात याजवर लोकांचें डोळे लागून राहिले होते. ग्वाल्हेरींत दिवाण दिनकर रावजी यांचें चित्त इंग्रजांकडे पूर्ण आहे, असे स्पष्ट दिसून आलें होतें, परंतु त्यांचा पगडा शिंद्यावर कितपत पडतो याचा अंदाज लोकांस झाला नव्हता.

आमचे चुलते श्रीमंत बाजीरावसाहेबांचे वेळेस ब्रह्मावर्तास होम-शाळेवर अध्यक्ष होते ह्मणून पूर्वीच सांगितलें आहे. ब्रह्मावर्ताहून हमेशा काकांचे ओळखीचे लोक जिवाचे आशेनें पळून ग्वाल्हेरींत राहवयास येऊं लागले, व त्यांजपासून तेथील हकीगती समजूं लागल्या. श्रीमंत नानासाहेब यांचें पेनशन अजी बंद केल्यामुळें त्यांचे मनांत इंग्लिशांविषयीं अत्यंत द्वेषबुद्धि उत्पन्न झाली होती; व स्वतः धैर्यवान् व शूर असल्यामुळें व पदरीं बंधु बाळासाहेब व रावसाहेब तसेंच तात्या टोपी इत्यादि हिंमती मंडळी असल्यामुळें राज्यक्रांतीचे विचार त्यांचे मनांत घोळत असत. लखनौची बेगम

व दिल्लीपति इत्यादि इंग्रज सरकारचे अन्यायामुळें समदुःखी झालेल्या लोकांशीं त्यांचा पत्रव्यवहार होता व मधून मधून धर्मभयानें आतुर झालेल्या पलटणीच्या ऑफिसर लोकांशींही त्यांच्या मुलाखती होत. परंतु स्वपरबलाबल जाणून, अग्नींत पतंगासारखें मरून जावें व सर्वस्वी कुलाचा नाश करावा एवढा हिय्या करण्याचें सामर्थ्य त्यांचे मनांस येईना. असें सांगतात कीं, एके दिवशीं संध्याकाळचे सुमारास घाटावर संध्येस निवडक मंडळी बसली आहे, गंगेचें शुभ्र उदक मंद वहात आहे, व उष्णकाळ असल्यामुळें अत्यंत प्रिय 'भागीरथी–निर्झर–शीकराणां वोढा मुहुः कंपित–देवदारुः' असा वायु चित्तास आनंद देत आहे, व वेदमूर्ति रामचंद्र शास्त्री बोवांशीं कांहीं धर्मविषयक बोलणें चाललें आहे तों एक पलटणी अम्मलदार, फेंसानें भरलेला घोडा भरधांव टांकीत घाटावर आला व नानासाहेबांस मुजरा करून बोलूं लागला कीं, सरकार, मिरत येथील छावणींतील लोक धर्मभयास्तव उठून इंग्रज लोकांस ठार मारून दिल्लीस जाऊन त्यांनीं बादशाहास अधिपतित्व दिलें. हिंदु धर्मावरही तोच कठीण प्रसंग आला आहे, व शिपाई लोकही धर्मासाठीं मरूं, परंतु वैधर्मी होणार नाहीं, असे दृढ निश्चयाचे आहेत; हिंदु धर्मास तर आपल्या शिवाय अधिपति राहिला नाहीं. जर हिंदूचें अधिपत्य स्वीकारावयाचें असेल तर ह्याक्षणीं कानपुरावर ही तरवार व हा घोडा घेऊन चला. हा अकल्पित प्रसंग पाहून शास्त्रीबोवादि मंडळी घाबरून जागचेजागीं शून्यदृष्टि बसली. नानासाहेब किंचित् आरक्तनेत्र होऊन त्या स्वाराकडे सारखी टक लावून कांहीं वेळ स्तब्ध राहिले,

शेवटीं एकाएकीं नानासाहेब ह्मणाले कीं, बरें आहे जर हजारों लोक धर्मासाठीं मरून जाण्यास तयार आहेत तर मीही आपल्या बायकापोरांची आशा सोडितों. यास श्री गंगामातुश्री साक्ष आहे. असें ह्मणून घोड्यावर बसून आवेशानें घोडा फेंकला. वाड्यांत येऊन बाळासाहेब इत्यादिकांस मजकूर निवेदन केला, व लागलीच आपले बरोबरचे लोक घेऊन कानपूरचा रस्ता धरला.

[illegible] बंडास जाऊन मिळालें ही बातमी हं हं ह्मणतां चोंहींकडे प[illegible]. कांहीं द्रव्यवान् शाहाणे लोक जिंदगीची व्यवस्था करण्यास लाग[illegible], कांहीं दुसऱ्या मुलुखांत निघून जाण्याचे तयारीस लागले, कांहीं [illegible] तेथेंच राहून धीर देऊं लागले, कांहीं विचारशून्य आनंद [illegible]उड्या मारूं लागले. नानासाहेबांस बंडवाली फौज ब्रह्मावर्ता[illegible]वरच भेटली. फौजेंतील ऑफीसर लोकांचें व नानासाहेबा[illegible]च वेळ खलबत झाल्यावर सर्व शिपायांनीं आम्ही तुमची आज्ञा [illegible] व जीव आहे तोंपर्यंत नोकरी करूं, इंग्लिशांस कधीं शरण [illegible] नाहीं व सैन्य सोडून पळून जाणार नाहीं, वगैरे आणा शपथा [illegible]. नंतर निरनिराळ्या कामाच्या नेमणुका झाल्या व फौज [illegible] परतली.

भाद्रपदमासीं [illegible]सीं ग्वाल्हेर शहरांत फार धांदल उडून गेली आहे असें आ[illegible] पडलें. रस्त्यांत लोकांची गर्दी जमून कुचबुच चालली [illegible]दी स्वार इकडून तिकडे धांवत आहेत. पुष्कळ दुका[illegible]त, असें पाहून कांहींतरी बंडाची धामधूम ग्वाल्हेरींत च[illegible] असें समजून आह्मी बाहेर पडलों

तेव्हां असें समजलें कीं, श्रीमंत नानासाहेबांकडून तात्याटोपी शिंदे सरकारची कुमक मागण्याकरितां आला आहे.

तात्याटोपी यास आह्मी बाजारांत पाहिलें. मुरारीचे पलटणांपैकी चार पलटणी त्यानें अनुकूळ करून घेतल्या, आणि शिंद्यास कळविलें कीं, आह्मी इतके दिवस येथें राहिलों परंतु तुमचे शहरास किंवा मुलुखास बिलकुल धक्का लाविला नाहीं. तरीं आह्मांस ओझ्याकरितां गाड्या, घोडीं, उंटें वगैरे सर्व तयारी तुह्मीं करून दिली पाहिजे. असा त्यांचा अभिप्राय समजल्यावरून जयाजीराव शिंदे व दिनकरराव हे मुरारीचे छावणींत तात्याटोपी यास भेटण्यास गेले. शहरापासून तीन कोशांवर नदीचेकाठीं ती छावणी होती. तेथें जाऊन सर्वांस भेटून—जो जाण्यास सरंजाम लागेल तो आह्मी देतों परंतु आमच्या मुलुखास हात न लावतां तुह्मी निघून जावें—असा ठराव होऊन पानसुपारी, अत्तर गुलाब झाला. दुसरे दिवशीं शिंदे यांनीं जो सरंजाम—गाड्या, घोडीं, उंट, हत्ती, बैल, खेंचरें वगैरे लागला—तो पुरवून तात्याटोपी यास रवाना केलें व ग्वाल्हेरीचें विघ्न टाळलें. मुरारीचे पलटणींत विषाचे गोळे केले होते. एका एका गोळ्यास दोन हजारांवर खर्च झाला असून त्या गोळ्याचा असा चमत्कार असे कीं, गोळा फुटतांच आंतून धूर निघून तो धूर मनुष्याचे डोळ्यांस लागला कीं, डोळे फुटून जावे व मनुष्यही मरावें. जे जे साहेबलोक शिंदे यांजपाशीं जीव बचावण्याकरितां राहिले होते, ते शिंदे सरकारास नेहमीं सांगत असत कीं, मुरारी पलटणी जे मागतील तें त्यांस द्यावें परंतु त्यांस बिघडून देऊं नये.

कारण हे लोक फार लढवई असून यांचेपाशीं विषमूत्राचे गोळे आहेत, ते गोळे व त्या पलटणी तात्याटोपी मिळवून घेऊन चालता झाला.*

नंतर तात्यासाहेब गुलसराईवाले यांचे हद्दींत शिरून केशवराव गुलसरईवाले यांजपाशीं तीन लक्ष रुपये खर्चाकरितां मागूं लागले. केशवराव यांनीं उत्तर केलें कीं, असे शिपाई मिळवून मुलूख काबीज झाले असते तर कित्येक करते. तुह्मीं शुद्ध बंडवाले आहां; आह्मी तुह्मांस कांहींएक देणार नाहीं व तुम्हीं आमचे मुलुखांतून ताबडतोब चालतें व्हावें. हें ऐकून तात्याटोपी यानें लागलीच युद्धाची तयारी करून डंका वाजविला; व शहरास वेढा देऊन तोफांचा भडिमार सुरू केला. केशवराव याजपाशीं लोक थोडे असून त्यांजजवळ बंदुका जुन्या चालीच्या सुताचे तोड्यानें पेटविण्याच्या होत्या. अशा तऱ्हेचे लोक पाहून तात्याटोपी याचे लोक एकदम हल्ला करीत पुढें गेले, व गोळ्या घालून कडाभिनीचे दोन दोन अवाज काढले, तेणेंकरून संस्थानचे बहूत लोक मरण पावले व बाकींच्यांनीं घाबरून पळ काढिला. ते समयीं तात्याच्या लोकांनीं आडवे होऊन पुन्हाः आवाज काढिले. त्यामुळें पुन्हा पुष्कळ लोक मरण पावले, बाकी राहिले त्यांनीं हातांतील बंदुका टाकून देऊन भूमीवर नमस्कार घातले. तुम्हीं गरीब आहां तुह्मांस आह्मी मारीत नाहीं, परंतु केशवराव यांस जिवंत धरून द्यावा असें वचन घेऊन त्यांस जीवदान दिलें.. त्या लोकांनीं

---

* ही हकीगत इतिहास पाहतां कानपूरच्या पहिल्या लढाईनंतरची आहे व या पलटणी कानपुरच्या दुसऱ्या लढाईत होत्या.

केशवराव यास शोधून आणून तात्याटोपी याचे स्वाधीन केला. नंतर खजिना लुटून केशवराव यांस बरोबर घेऊन तात्याटोपी मजल दरमजल करीत कानपुरावर येऊन पोंचला.

कानपुरास गंगातटांत धूस बांधून, ह्मणजे वाळूच्या गोण्या भरून त्या कोटासारख्या रचून आंत गोरे लोकांचीं पलटणें राहिलीं होतीं. तीं त्या धुसाचा आश्रय करून लढाई माजवीत असत. बाहेरून काळे लोक पुष्कळ प्रयत्न करीत परंतु धूस तोफांनीं फुटेनात. बहुत दिवस लढाई चालली. मुरारीच्या पलटणी आल्या त्याही पुष्कळ लढल्या, परंतु कानपूर हातीं येईना. शेवटीं व्यूह कोणत्या आंगानें फोडावा याजबद्दल एक नेपाळी ब्राह्मण नानासाहेबांचे मार्फत अनुकूल करून त्यास पांच सातशें रुपये देऊन कानपुरास आणविला त्यास सर्व धूस दाखवून त्यानें सांगितल्याप्रमाणें तोफांचे मोर्चे बांधून भडिमार सुरू केला. आंतूनही तोफा व कडामिनी सुरू झाल्या. वाद्यें वाजूं लागलीं. ते समयीं विषाचे गोळेही आंत टाकीत चालले त्यामुळें आंतले लोक डोळे फुटून त्रस्त होऊन तडफडून स्वर्गाचा रस्ता धरूं लागले, बहुतेक गोरे लोक मरण पावले. बाकी राहिलेले गंगेकडील बाजूनें बाहेर पडले, ते काळे लोकांनीं धरून कैद केले. या लढाईंत बाळासाहेब स्वतः मोरच्यावर जाऊन तोफेस बत्ती देत असत.

याप्रमाणें जय मिळाल्यामुळें कानपूर शहर हस्तगत जाहलें व गोरे लोकांचें सामान, दारूगोळा, खजिना, तंबू वगैरे श्रीमंतांनीं आपले ताब्यांत घेतलें आणि शहरांत आपल्या नांवाची द्वाही फिरविली. बाजार उघडून सर्व व्यवहार सुरू करविला. श्रीमंतांनीं

ब्रह्मावर्तास जाण्यास जोशीबोवास मुहूर्त विचारून चंद्रानुकूल्य पाहून सांगितल्या मुहूर्तावर मोठ्या थाटानें कूच करण्यास आरंभ केला. हजारों स्वार व पायदळ पुढें चालत होते, व मागें पुढें रोहिले, आरब, शिद्दी, यांचा पहारा चालत होता. चौघडा वाजंत्री ताशे नगारे शिंगे वगैरे अनेक मंगलवाद्यें वाजत होतीं. याप्रमाणें हळूहळू थाटानें मिरवत मिरवत व भालदार वारंवार पुकारत जातां जातां रात्र पडली, तेव्हां वाटेनें शेंकडो चंद्रज्योती लाविल्या. शेवटीं स्वारी ब्रह्मावर्तास पोंचली. शहर गुढ्या तोरणें वगैरे अलंकारांनीं शोभिवंत केलें होतें. व नागरीक लोक पुष्पें दूर्वा स्वारीवर टाकीत होते. नानासाहेब पालखींत बसले होते, व बाळासाहेब आणि रावसाहेब हत्तीवर अंबारींत बसून बाजूनें चालत होते. अशा थाटानें स्वारी वाड्यांत जाऊन पोंचली. नंतर दुसरे दिवशीं शास्त्रीबोवा वगैरे विद्वान् मंडळीस शालजोड्या धोतरजोडे व दक्षिणा देऊन संतोषित केलें, व त्याच्याच विचारें राज्यप्राप्तीकरितां अनुष्ठानें व ब्राह्मण भोजनें सुरू केलीं. याप्रमाणें जिकडे तिकडे शहरांत आनंदोत्सव होऊन नाच तमाशे चालू झाले.

पंचवीस वर्षांचे पूर्वी हिंदुधर्माची स्थिति व त्याजवरील लोकांची श्रद्धा फारच निराळी होती यांत संशय नाहीं. आणि असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं कीं हल्लींचे दिवसांत केवळ काडतुसांचे कारणावरून इतके भयंकर बंड कधींही झालें नसतें. साहेब लोकांचीं पलटणें दक्षिणेंतून व चोंहींकडून राज्य रक्षणाकरितां धांवून येत आहेत व झाडोझाड सापराध निरपराध लोकाचीं प्रेतें लोंबत आहेत अशा प्रसंगांत मनुष्यांस ब्राह्मण भोजनें आठवावीं व पत्रिकेच्या लांब

लांब गुंडाळ्या सोडून गणित करून ग्रहानुकूल्य काढीत बसावें, हें हल्लीं फार चमत्कारिक वाटेल. परंतु त्या वेळच्या लोकांची धर्मश्रद्धा अशी बळकट होती कीं, तरवारीच्या धारेपेक्षां अग्नींतील घृतधारा जास्ती फलद्रुप होईल, आणि सुमुहूर्तावर प्रयाण केलें तर शत्रुक्षय खचित होईल, असें लोक मानीत होते. याप्रमाणें जिकडे तिकडे शास्त्रोक्त अनुष्ठानें व ग्रहशांति चालू केल्या व ब्राह्मण संतर्पणें हीं सुरू केलीं. परंतु शहरचें संरक्षण करण्याच्या बंदोबस्तास विसरले नव्हते. शहरची तटबंदी करून गंगेचे बाजूनें ध्रुव घाटापासून मोर्चे बांधून तोफा लावून ठेविल्या होत्या.

एके दिवशीं क्षेत्राचे खालील बाजूनें इलाबाद उर्फ प्रयागाकडे एक आगबोट गोरे लोकांनीं भरलेली चालली होती; त्यांत साठ सत्तर गोरे लोकांच्या बायका व बीसएक मुलें व सुमारें पंधरा पुरुष होते. ती नांव जात असतां दुर्बिणीनें ध्रुवघांटावरचे गोलंदाजानें हेरली; आणि ताबडतोब श्रीमंतास जाऊन कळविलें कीं एक नांव गोरे लोकांनीं भरलेली प्रयागाकडे जात आहे व त्यांत बहुतेक बायका आहेत. हुकूम झाल्यास नांव टप्यांत आल्यावर गोळा टाकतो. हें ऐकून नानासाहेबांनीं जबाब दिला कीं नांवेंत जर बायका मुलें असतील तर त्यांस मारण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. गोलंदाज परत आल्यावर नांव तशीच पुढें येऊन ध्रुव घाटावरून ब्रह्मेश्वर खालून जात असतां भूतेश्वरा नजीक त्या गोरे लोकांचें दुर्दैवामुळें गंगेचे तळीं वाळवंटांत रुतली. शुद्ध भागीरथींत आगबोट चालत नाहीं धुमाकस ह्मणजे लहानशी आगबोट मात्र चालते. कारण गंगाबाईचा हरवक्त बाळूचा खेळ चालला असतो. ह्मणजे पात्रांत एका-

एकीं एके ठिकाणीं वाळूचा ढिगार बनतो. आगबोट जात असतां वाळूवर लागली, हें पाहून गोलंदाजानें नानासाहेबांस कळविलें कीं, ध्रुव घाटावर नांव आली त्यावेळेस आपण हुकूम दिला नाहीं, परंतु आतां दिला पाहिजे. कारण श्रीगंगेचीच त्यांजवर अवकृपा ह्मणोन शत्रुक्षेत्रांत नांव अडकली, त्यापेक्षां तोफेचा गोळा टाकून आम्हीं सर्व माणसें मारून टाकतों. असें सांगून तोफेवर येऊन तोफेस बत्ती दिली. तिकडे नांवेवरचे लोक कांहीं पाण्यांत उतरून नांव लोटीत होते तों गोळा नांवेंत पडला. गोळा नांवेंत पडतांच आंत दारू होती ती सर्व पेटून भडका झाला आणि सर्व बायका मुलें जळून गेलीं. पैकीं दाहा बायका व तीन मुलें व चार पुरुष इतके वांचले, त्यांस धरून कैद केलें. व छोटी नांव घालून आगबोटीवर दाहा हजार पर्यंत खजिना सांपडला तो आणला.†

ब्रह्मावर्त मुक्कामीं गोरे लोकांच्या बायका सुमारें साठ व कांहीं मुलें अशीं कैद करून ठेविलीं होतीं, त्यांजवर पंचवीस लोकांचा पहारा नेमिला होता. व तुरुंगही मजबुतीचा होता. प्रतिदिवशीं सकाळीं झाड्याकरितां सर्व कैदी लोक पहारेकरी यांनीं गंगेचे वाळवंटावर नेऊन सर्व विधि आटोपून पुन्हा परत आणावे या प्रमाणें क्रम सुरू असतां, त्या बायकांत एक स्त्री मोठी राजकारणी हुशार होती, तिनें एक भंगीण फितूर करून दोन मोहरा देऊन प्रयागास पत्र नेण्याचें तिच्याकडून कबूल करविलें. नंतर एके दिवशीं एक इंग्रजी पत्र

† केचा इतिहास पाहता ही नाव फत्तेगडाहून आली होती के व्हा० २ पा. ३५३.

लिहून जेथें ती स्त्री झाड्यास बसली होती तेथेंच संकेताप्रमाणें टाकून तेथून ती उठून गेली. पलीकडे तें पत्र भंगीणीस उचलून घेतेसमयीं पहारेकरी यांनीं पाहिलें. त्यांनीं त्या भंगिणीस तेथेंच कैद करून व तें पत्र घेऊन नानासाहेब यांजसमोर दोघांस हजर केलें. त्या भंगिणीस पंचवीस फटके देतांच सर्व फितूर कबूल होऊन तिनें सर्व मजकूर सांगितला. नंतर इंग्रजी वाचणारा आणवून त्यांजकडून पत्र वांचून पाहातात तों आंत असा मजकूर होता कीं, कानपुरावर जय होऊन शत्रूचे लोक आनंदानें नाच तमाशे करीत ब्रह्मावर्तांत बेहोष पडले आहेत; फौजेचा बंदोबस्त नीट नाहीं सर्व गाफील आहेत, याजकरितां शत्रूवर चालून येण्याची वेळ ही फार उत्तम आहे, इत्यादि मजकूर ऐकून पलटणी लोकांस एकदम आवेश येऊन दंगा करून ह्मणूं लागले कीं, या शत्रूच्या स्त्रिया इतक्या राजकारस्थानी आहेत कीं, त्यांनीं अशा अडचणींतही फितूर करून प्रयागास पत्र पाठविण्याची तजवीज केली. तर या कोणते वेळेस दगा करतील याचा नेम नाहीं. याजकरितां या सर्वांस ठार मारून टाकावें हें फार बरें. असें ह्मणून शिपायी लोकांनीं फार उचल केली. ते समयीं नानासाहेबांनीं हुकूम केला कीं, स्त्रियांस मारणें हें रास्त नाहीं, यांजकरितां जिणें फितूर केला तीस मात्र तोफेचे तोंडीं द्यावें. हें ऐकून शिपाई लोक बिथरून गेले व मोठ्या आवेशानें तेथून निघून कैदखान्यांत येऊन तरवारीनें व बंदुकांनीं त्या दुष्ट अनावर झालेल्या लोकांनीं बायका-मुलांचा चेंदा-मेंदा केला.

बायकामुलांचा हा जो भयंकर घात झाला तो नानासाहेबांच्या हुकमानें झाला असो किंवा पलटणी लोकांनीं केला असो, परंतु हा प्रसंग अत्यंत निंदास्पद झाला यांत संशय नाहीं. पूर्वी असें मराठेशाहींत कधीं झालें नव्हतें. शिवाजीमहाराजांनीं कल्याण येथें हस्तगत झालेली एक मुसलमानाची स्त्री सत्कार करून नवऱ्याकडे परत पाठविली. तसेंच चिमाजी आप्पा यानींही वसईच्या किल्याच्या वेढ्याचे वेळीं एक शत्रुकडील स्त्री नावेंत पळून जातांना सांपडली तिला लुगडे, चोळी देऊन शत्रूकडे परत पाठविली. याप्रममाणें शत्रूकडील स्त्रियांचा मान पूर्वी ठेवीत गेले. कानपूर येथील घडलेला प्रकार हिंदुस्थानाच्या इतिहासांत मोठाच काळिमा आणणारा झाला, व या कृत्यामुळें अश्वत्थाम्याप्रमाणें नानासाहेबाच्या नांवास कायमचा कळंक लागला. तेच समयीं शाहाणे व वृद्ध बोलूं लागले कीं, या प्रसंगीं आह्मांस वाटत होतें कीं, गोरे लोक विलायतेस परत जातात आणि पुन्हां हिंदु मुसलमानी राज्य होतें; परंतु ती आशा आतां राहिली नाहीं, कारण स्त्रियांचा वध करणें हें महापातक आहे व शास्त्रांतही स्त्रियांस कोणत्याही अपराधांस देहांत प्रायश्चित नाहीं. परंतु हें दुष्कर्म यांजपासून फार घडलें याजमुळें यांना जय येणें दुरापास्त आहे.

या कृत्यास पंधरा दिवस झाले नाहींत तों चोंहींकडून गोरे लोकांच्या पलटणी कानपुरावर जमल्या. प्रयागाहून व कलकत्याहून व उत्तरेकडून व दक्षिणेंतून मद्रासी काळ्या पलटणी एकाएकी कानपुरावर येऊन मोरचे बांधून लढाईची तयारी करूं लागल्या. ही बातमी ब्रह्मावर्तास समजतांच पेशवे यांनीं तात्याटोपी व लालपुरी बोवा

गोसावी व जळका रामभाऊ या तिघांस फौजेसुद्धां तात्रडतोब रवाना केलें व कानपुरास जाऊन मोर्चे बांधून युद्धाची तयारी करण्यास सांगितलें. मागाहून सुमूहूर्तावर नानासाहेब, बाळासाहेब व रावसाहेब देवांस नमस्कार करून बाहेर पडतात तों अपशकून एकाएकीं होऊं लागले, प्रथम मांजर आडवें गेलें, नंतर एक तेलंग ब्राह्मण टोपलींत भस्म घेऊन पुढें आला. पुढें जातात तों लांकडे विकण्याकरितां आलीं. नानासाहेबांचा घोडा एकाएकीं अडला आणि एक घटका खोळंबा झाला. आणि रावसाहेबाचे घोड्याचे नेत्रांस पाण्याची धार लागली होती. याप्रमाणें अनेक अपशकून झाले, परंतु आतां ही फिरण्याची वेळ नाहीं, असें जाणून शूरत्वाचे आवेशानें तसेंच पुढें चालले. कानपुरावर येऊन पोंहोंचलें तों लढाई सुरू झाली होती. दोहों पक्षांकडील तोफा बहुतेक सारख्याच होत्या. परंतु इंग्रजांकडील फौज पुष्कळ व कवाईत शिकलेली व नव्या दमाची होती. तोफा कवाईत वगैरे कामांत इंग्रज लोक काळे लोकांपेक्षां हुशार असतात यांत कांहीं संशय नाहीं. पेशव्यांकडेही इंग्रज लोकांनीं तयार केलेल्या पलटणी होत्या व गोलंदाज होते. याप्रमाणें दोहों पक्षांकडील लढाईची सामग्री बहुतेक सारखीच होती.

कानपुरचा जंग फार निकराचा झाला. इंग्रजी शिपायी मारलेल्या बायकापोरांच्या हकीगती ऐकून अगदीं चवताळून केवळ सूड उगविण्याकरितां लढत होते, व त्यांचेजवळ चांगल्या तोफा व कसबी गोलंदाज असल्यामुळें शत्रूच्या सैन्याचा भराभर नाश करीत चालले. काळे शिपाईही राज्याकरितां व जीवाकरितां लढत होते. तोफेच्या

कामावर स्वतः नानासाहेब व बाळासाहेब जिवाची परवा न धरितां मेहनत करीत होते. शेंपन्नास स्वार घेऊन तोफेवर तुटून पडून गोलंदाजास कापून काढून तोफेच्या कानीवर खिळा ठोकावा, याप्रमाणें बहुत सरदार व शिपाई शूरत्वाचीं कामें करीत. सूर्यास्त झाल्यावर ही दोहींकडे चंद्रज्योति व मशाली लाविल्या व रणभूमीस उजेड करून लढूं लागले. वीरांस श्वास सोडण्यास सुद्धां फुरसत राहिली नव्हती. काळे लोकांस स्नान, भोजन, निद्रा नाहींशी झाली. लढाईचा नंबर आला ह्मणजे लढून मागें येऊन हातावरचे हातावर साखर पुरी खाऊन भिस्त्यांपासून ओंजळीनें पाणी पिऊन पुन्हां युद्धास प्रवृत्त व्हावें. याप्रमाणें युद्ध दाहा दिवस चाललें उभयपक्षाकडील बहुत लोक मरण पावले. शेवटीं पुरुषयत्न निर्फल दैवबळी प्रधान होऊन अकरावे दिवशीं एकाएकीं वारा फिरला. शत्रूकडील व यांचिकडील तोफांचा व बंदुकांचा धूर यांचे अंगावर येऊन शिपायांस दिसेनासें झालें. धुरळीनें नेत्र भरून गेले, अगोदरच काळे शिपाई बहुत मरण पावले होते. पुष्कळ पळाले होते, बाकीचे दुर्दैवानें भयभीत होऊन रण फुटूं लागलें. गोरे लोकांनीं मोरच्यांतून तोफा बाहेर ओढून पुढें चाल केली, व काळेलोक भयातुर होऊन दशदिशा पळत सुटले. बाळासाहेब यांनीं मोठ्या आवेशानें लोकांस परत हांक मारून, एका तोफेवरचा गोलंदाज मेला होता त्या तोफेवर जाऊन तोफ चालू केली, तों दुसरे तोफेवरचा गोलंदाज मेला, याप्रमाणें तोफा रिकाम्या पडत चालल्या व लोकही पळूं लागले. इतक्यांत नानासाहेब व रावसाहेब भरधांव घोडे टाकीत तेथें आले, आणि बाळासाहेबांस विनंती केली कीं, युद्धाची शिकस्त

झाली, परंतु ईश्वरानें यश दिलें नाहीं. तरी येथें विनाकारण रांड-मरणानें मरून जावें त्यापेक्षां येथून पळून जाऊन पुन्हां उद्योग करून सैन्य जमवूं व शत्रूंस लढाई देऊं. मग एक शत्रूस जिंकूं नाहीं तर महारणांत पडून स्वर्ग जिंकूं. तस्मात् आतां ब्रह्मावर्ताचा रस्ता धरणें फार बरें असें वाटतें. हे शब्द ऐकून बाळासाहेब लागलेच आपल्या घोड्यावर बसले व तिघांनीं ब्रह्मवर्ताकडे घोडे फेंकले. बरोबर कांहीं पायदळ व घोडेस्वार मात्र राहिले होते. बाकीच्यांनीं अंतरवेदींत उतरून फत्तेपुराकडे पळ काढला.

संध्याकाळचें श्रीसूर्याचें सरतें रक्तकिरण ब्रह्मावर्तावर पडून ...ळे,'हींसें झालें. दिवसाचे परिणामसमयामुळें जणूं काय अंतकाळ ...ळा चोहींकडे पसरली. जिकडे तिकडे उदास, भयाण व निश्चल दिसूं लागलें. व पक्ष्यांची किलबिल मृतसमर्थांच्या स्वजनांच्या आक्रोशासारखी भासूं लागली. अंधःकार अधिकाधिक पसरून क्षेत्र जणूं काय काळाच्या जबड्यांत शिरतें आहे अशी भीति पडूं लागली. बहुतेक लोक आपापल्या घरीं गेले होतें. परंतु कांहीं रिकामटेकडी मंडळी व कांहीं जिवास जीव देणारी हितेछु मंडळी मिळून सुमारें पन्नास लोक भूतेश्वराजवळ पारावर नित्याप्रमाणें कानपुराकडून काय बातमी येते हें समजण्याकरितां तशीच बसली होती. तों तीन चार स्वार भरधांव येत आहेत असें दृष्टीस पडलें. पटकन् उतरून मंडळी पुढें येत आहे तों स्वार येऊन ठेपले. घोडे नखशिखांत फेंसानें भरले असून वरती धुराळा बसला होता. तिघांही बंधुचे कपडे धुळीनें व रक्तानें भरले असून मुद्रा किंचि-दारक्तनेत्र व उदास व कठोर दिसत होती. प्रत्येकाचे मनांत सर्व

संपलें हा एकच विचार चाललेला होता व तोंडावरही निराशेचा ठसा पूर्ण उठला होता. हें पाहतांच मंडळीचे पोटांत धस्स झालें. व श्रीमंत जवळ येऊन घोडा उभा केला तरी कोणाचे तोंडांतून अक्षर निघेना. नानासाहेब मोठयानें श्वास सोडून हरहर शब्दाचा उच्चार करून बोलले कीं, आजपर्यंत हिंदुधर्माकरितां यत्न केला तो व्यर्थ जाऊन आमचे जीविताचीही आशा आह्मी सोडली आहे असा आज प्रसंग गंगाबाईनें आणला आहे. असो. ईश्वरेच्छा झाली पाहिजे असें ह्मणून क्षेत्रांत शिरले व घोडा फेंकीत वाड्यांशीं येऊन उतरले.

कानपूरावर पेशव्याचा मोड झाला ही बातमी ताबडतोब ब्रह्मावर्तीत पसरली; त्यावेळीं शहरांत जी गडबड उडून गेली तिचें वर्णन करितां येत नाहीं. आतां श्रीमंत फौजेसुद्धां कोठें तरी निघून जातील व गोरे लोक येऊन आमचीं मुलेंमाणसें मारतील, जिंदगी लुटतील, घरें जाळतील, नानातऱ्हेचे हाल करतील, ही दुस्तर भीति चोंहीकडे पसरली. कांहीं भितरे लोक जे पूर्वी भोजनसमारंभांत तृप्त होऊन श्रीमंतांस लांबलचक आशीर्वाद देत होते तेच त्यांस आतां शिव्या देऊं लागले व जिकडे वाट फुटेल तिकडे आपलें वित्त घेऊन पलायन करूं लागले. कांहीं धैर्यशील स्वस्थतेनें आपल्या वित्ताची विहीरींत व जमीनींत व्यवस्था करूं लागले. कांहीं अतिभ्याड बायकांपोरांची व्यवस्था न करितां आतां आमचें काय होईल असा रस्त्यांवर पडून आकांत करूं लागले. याप्रमाणें तें क्षेत्र त्या रात्रीं दुःखरूप दिसूं लागलें.

इकडे श्रीमंतांनीं वरीं येऊन स्त्रियांस थोडक्यांत झालेला मजकूर निवेदन केला व असें सांगितलें कीं आतां शत्रु येईल त्यापेक्षां येथून निघून लखनौचे मुलखांत गंगा उतरून गेलें पाहिजे; तेथें लखनौची बेगम हीस मिळून जें करणें तें करूं याकरितां जें घेणें असेल तें घेऊन बाहेर पडून गंगेवर नांव तयार आहे तिकडे जावें, बरोबर कोणी घेऊं नये. अरेरे! या बिचाऱ्यांस घराबाहेर पालखीशिवाय पडण्याचा कधीं प्रसंगही नाहीं. मग प्रवासांत लागतें काय याची चौकशी त्यांस कशास माहीत. अगोदरच घर कोसळल्याचें दुःख झालें होतें, त्यांत जिवाच्या धास्तीनें भांबावून गेलेल्या त्या बिचाऱ्यांस कांहीं सुचेना. शून्य मनानें बरोबर कांहींएक न घेतां शिपायाबरोबर त्यांनीं नदीचा रस्ता धरला.

नंतर श्रीमंतांनीं घरांत एक मोठा शेला पसरून त्यांत जे अलौकिक अमोल पदार्थ होते ते बांधून घेतले. पूर्वी शिवाजी महाराज छत्रपति यांनीं श्रीसमर्थ रामदासस्वामीस गुरु करून पादशहापासून राज्य मिळविलें तेव्हां दासांनीं महाराजांस प्रसादार्थ आपल्या छाट्या दिल्या होत्या त्या तशाच चंदनाचे पेटींत बहुत बंदोबस्तानें देवघरांत ठेवून राजेसाहेब पूजित होते. त्या छाट्या पुढें शाहू छत्रपति यांनीं श्रीमंतांस दिल्या. ती पेटी देवघरांत ठेविली होती ती आणून पेटींतून छाट्या काढून शेल्यांत घेतल्या. तसेंच थोरले माधवराव यांस अमोलीक रत्नासारखें वडाचें पुष्प मिळालें होतें तेंही घेतलें. दक्षणावर्त शंख घेतला. गौरीशंकर नांवाचा अत्युत्तम कांतीचा बाण होता तोही घेतला. याप्रमाणें

आणखी कांहीं राजरत्नें होतीं तीं शेल्यांत बांधून घेऊन देवास नमस्कार केरून संपत्तीनें भरलेला वाडा सोडून बाहेर पडले, ते समयीं तिघांचेहीं नेत्रांतून अश्रूधारा चालल्या होत्या. ज्या ठिकाणीं लहानपणापासून आपण वाढलों, खेळलों, आनंदानें तारुण्याचे दिवस काढले अशा प्रिय जन्मभूमीचा अत्यंत वियोग किती दुःसह आहे हें सांगावयास नको. वाड्यांतील रस्त्यांतील, देवालयांतील, तीं तीं ठिकाणें पाहून व तेथील त्या त्या आठवणी येऊन त्यांना अधिकाधिक दुःख होई. आतां हें सर्व पुर सर्व मित्र व ओळखी, सर्व सुखें सुटलीं, व पुढें दुःख दारिद्र्य कदाचित मरणही येणार अशा कल्पनेनें त्यांचीं मनें अगदीं होरपळून गेलीं होतीं. रस्त्यांत पुरवासी लोकांची गर्दी झाली होती. त्यांतून दीनवदन अनवाणी तीं माणसें जातांना पाहून लोकांस गहिंवर आला व जिकडे तिकडे हर हर शिव शिव इत्यादि उद्गारांचा कल्लोळ झाला. गंगातीरीं आल्यावर नानासाहेबांनीं श्रीगंगेचें पूजन करून तांबडी पैठणी व हिरवी जरीकांठी चोळी अर्पण करून हात जोडून प्रार्थना केली कीं गंगे भागीरथी मातुश्री आजपर्यंत तूं आमचा सांभाळ केलास आणि आतां तुझ्याच इच्छेनें तुझा वियोग होणार. असो. तुजला जें वाटेल तें कर. आम्ही दीनांनीं तुझी प्रार्थना काय करावी असें ह्मणून तीरावर आलेल्या ब्राह्मणांस साष्टांग नमस्कार घालून नांवेंवर चढले. पाठीमागून तिघांच्या स्त्रिया, कैलासवाशी श्रीमंत बाजीरांवसाहेब यांचे कुटुंब व त्यांची औरस कन्या अशा पांच बायका चढल्या. मागून रावसाहेब बसले. नंतर बाळासाहेब सर्वांस नम्रपणानें नमस्कार करून किंचित् सद्ग-

दित होऊन ह्मणाले कीं 'कानपुरावर आमचा मोड झाला त्या प्रसंगांत तात्याटोपी जळका रामभाऊ व लाडपुरी बोवा गोसांवी इत्यादि आमचे सरदार कोठें गेले त्यांचा आह्मांस पत्ता नाहीं. असो. ते शूर आहेत त्यांजबद्दल आह्मांस बिलकुल काळजी नाहीं. तुह्मांस सोडून जाणें मात्र आमचे जिवावर आलें आहे. परंतु इलाज नाहीं. हिंदु धर्माकरितां व हिंदुराज्याकरितां पुन्हां एकवार झटलें पाहिजे. याजकरितां हें जें संकट ईश्वरानें आमचे हांतून तुमचेवर ओढविलें याजबद्दल व दुसरे जे अपराध आमचे झाले असतील त्याजबद्दल कृपा करून आह्मांस क्षमा करा.' हें ऐकून पदरचे मंडळीपैकीं वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र शास्त्री व जोशीबोवा यांनीं उत्तर दिलें कीं बहुत काळपर्यंत हे देह आपले अन्नानीं पोषण झालें. आपलें आश्रयानें आजपर्यंत संसार केले. आणि आपल्यास विपत्ति आली ह्मणून सोडून देऊन सुखाची इच्छा धरूं तर इहलोकीं निंदेस पात्र होऊं, परलोकीं तर नरकवास यावत्कल्पक्षय होईल तावत् भोगावा लागेल, याजकरितां महाराजांनीं आह्मांस बरोबर न्यावें आपल्या बरोबर कांहींही आमचें होवो. हें ऐकून नानासाहेब नावेंत उभे राहून सर्वांची प्रार्थना करून ह्मणाले कीं आपला आम्हांबराबरोबर येण्याचा निश्चय हा आपल्यास भूषणप्रद आहे परंतु दुर्दैवानें तसा आजचा समय नाहीं. समय येईल त्यावेळेस मी तुह्मांस कधींही विसरणार नाहीं. तुमचा वियोग मजला दुःसह आहे हें मी किती सांगूं. तुह्मीं वृद्धांहीं माझे वडिलांप्रमाणें लालनपालन केलें, बरोबरचे लोकांनीं बंधूप्रमाणें मित्रभावानें आनंदानें मजबरोबर कालक्षेप केला परंतु आजचा प्रसंग फार दुर्घट आहे. यास्तव माझी विनंती अशी आहे कीं,

आपण सर्वांनीं स्वस्थानीं जाऊन आपआपली तजवीज पाहावी. या उपर जर आग्रह धराल तर सर्वांचा येथेंच आज प्राणघात होईल. नाहींपेक्षां ईश्वरेच्छेनें योजित कार्यें होणारीं आहेत व आपला आमचा समागमही लौकर होईल. तर आतां नमस्कार आणि बरोबर येण्याची गोष्ट कोणीं बोलूं नये. बोलेल त्यास श्रीगंगाबाईचीच शपथ आहे. हें श्रीमंताचें उत्तर ऐकतांच सर्व लोक खालीं माना घालून अति दुःखित होऊन स्वस्थ राहिले. इतक्यांत राघोबा नांवाचा शिष्य होता तो पुढें येऊन हात जोडून बोलूं लागला. "माहाराज माझी मातुश्री मी एक वर्षाचा असतां मरण पावली असें सांगतात. तीर्थरूप व्रतबंध झाल्याबरोबर वारले. मला चुलता मामा वगैरे कोणी नाहीं. माझे सर्व आपणच आहांत. माझें घर ऐकण्यांत राजापुराकडे आहे. माझा बाप महाराजांचे अन्नाच्छादनांनीं वाढला सबब माझा पिंडच मुळीं आपले अन्नाचा आहे. आणि आजपर्यंत पोषणही आपण करीत आलांत. आतां मी जीव वांचवून भिक्षा मागून राहवें हें मजला ठीक वाटत नाहीं, आपल्या बरोबरही कोणी नाहीं त्यापेक्षां मी नावेवर चढतों जें होणें असेल तें होवो. महाराजांचे मनांत मजला नेणें नसल्यास गंगेंत ढकलून द्यावें. हें शरीर दुसरीकडे भिक्षान्नानें वांचवावें त्यापेक्षां गंगेंत पडून स्वर्ग प्राप्तीस जाईल तर फार बरें." असें ह्मणून एकदम नावेवर चढलाच. तेव्हां श्रीमंतांचीं मनुष्यें आठ व राघोबा शिष्य अशीं नऊ मनुष्यें नावेवर झालीं. श्रीमंतांनीं कोळ्यांस सांगितलें कीं राघोबा व आम्हीं नाव पलीकडे नेतों तुम्हीं सर्वांनीं उतरून जावें. कोळी उतरून गेल्यावर रावसाहेबांनीं साहा सात मेणबत्त्या

घेतल्या होत्या त्या लाविल्या; व राघोबा व बाळासाहेब यांनीं दोहों-कडे वल्ही घालून होडी लोटली. ते समई क्षेत्रवासी सर्व पुरुष व बायका एकदम हलकल्लोळ करून जसा प्रेत उचलते वेळीं आप्तजन एकदम आकांत करितात त्याप्रमाणें आकांत करून मुक्तकंठ रडूं लागल्या; व नांवेकडे पहात उभा राहिल्या. नांव सुमार मैलभर मोठ्या धारेंत गेल्यावर श्रीमंतांनीं एकदम मेणबत्त्या मालवून अंधार केला व मोठयानें सुस्कारा सोडून जगदीशा आज दीडशें वर्षे ऐश्वर्य भोगून पेशवाईचा आज लय झाला. सर्व वैभव नष्ट झालें, आतां हीं अमानुष रत्नें जगतीतलावर राहून काय उपयोग असें ह्मणून शेला सोडून त्यांतील एक एक वस्तु आपले हातून गंगाबाईस अर्पण केली. इकडे पुरवासी लोकांनीं नांव जातां जातां एकाएकीं नाहीशी झाली याजवरून श्रीमंतांनीं सर्वांसह नांव गंगेंत बुडवून घेतली अशी खात्री होऊन अति शोक करण्यास आरंभ केला. तो काय वर्णन करावा. एक प्रहरपर्यंत सर्व प्रजा गंगातीरीं मोठ्यानें शोक करीत व पूर्वींच्या आठवणी काढीत उभी राहिली व शेवटीं निराशेनें घरीं परत गेली.

इकडे गंगा उतरून पलीकडच्या तीरास सर्व मनुष्यें उतरली. नांव घाटांवर न लागतां भलत्या बाजूंवर लागल्यामुळें त्या ठिकाणीं कांठा पासून एक मैल पर्यंत अति चिखल होता. कोठें ढोंपरभर कोठें पोठऱ्यांभर अति चिकट चिखलांतून श्रीमंताचे मनुष्यांस जावें लागल्यामुळें जें दुःख व श्रम झाले त्याची तुलना कोठेंच नसेल. आजन्म ज्या पायांस भूमीचा स्पर्शही ठाऊक नाहीं, गंगेवर जाणें तर पालख्यांतून, गंगेवर उतरणें तर शालजोड्यावर, तीं जेव्हां

ढोंपर ढोंपर चिखलांत बुडूं लागलीं व नाजुकपणामुळें बाहेर सुद्धां निघतना त्या वेळचा तो प्रसंग पाहून त्या रणशूर कठिण हृदयास अश्रुधारा आल्या. परंतु " आलिया भोगाशी असावें सादर " या न्यायावर दृष्टी देऊन पुरुषांनीं त्या स्त्रियांस हात देऊन एक पाय चिखलांतून काढावा दुसरा द्यावा या प्रमाणें पुष्कळ वेळानें कोरड्या भूमीवर पोंचविलें; नंतर श्री गंगेस वळून सर्वांनीं नमस्कार करून चालण्यास आरंभ केला. कांहीं वेळानें एक गांव लागला तो लखनौचे भागांत असून तेथें मामलेदार होता. त्यास लखनौच्या बेगमचें पत्र होतें कीं नानासाहेब कानपुरचे लढाईत हरले आहेत ते लखनौचे मुलुखांत आल्यास त्यांचा बंदोबस्त नीट ठेवावा. गांवाबाहेर पश्चिम बाजूस एक हनुमंताचें देवालय होतें त्यांत ती सर्व थकलेलीं माणसें जाऊन उतरलीं. तेथें जागा पहातां तीन हातही जागा सपाट नव्हती जिकडे तिकडे खांचखळगे पडले होते. वाटेच्या श्रमानें स्त्रियांस फार तहान लागली होती. देवळाजवळ पाण्याची विहीर होती परंतु जवळ भांडें व दोरीही नव्हती अशा संकटांत राघोबा शिष्यानें आपलें धोतर व नानासाहेबांचें उपरणें यांस गांठ देऊन विहिरींत सोडलें परंतु पुरेना. मग बाळासाहेब यांचा रुमाल घेऊन गांठ देऊन विहिरींत सोडला व पाण्यानें भिजवून काढून स्त्रियांचें ओंजळींत पिळून त्यांची तृषा हरण केली. नंतर मारुतीचे देवालयांत येऊन निद्रा केली. रात्र सुमार पंधरा घटका झाली होती याजमुळें थंडी पडली होती परंतु अंथरावयास व पांघरावयास कांहीं नव्हतें. " शय्या भूमितलं दिशोपि वसनं ज्ञानामृतं भोजनं " अशा साधुवृत्तीनें ती सर्व रात्र त्या दैव फिर-

लेल्या माणसांनीं कंठली. अति दुःखांत रात्र गेल्यावर सकाळीं उठून ईश्वराचें प्रातःस्मरण करून गंगेवर जाऊन शौच मुखमार्जनादि विधि सर्वांनीं आटोपला; व पुनः मारुतीचे देवालयांत येऊन बसले. पूर्व दिवशीं जेवणाचीं तर धांदलच झाली होती व रात्रीं देवालयांत पाणी पिण्यासही पुरतें मिळालें नाहीं, यामुळें सर्वांस फार क्षुधा लागली. ते समयीं बरोबर कांहीं घेतलें नव्हतें, जवळ एक छदाम नव्हता, पाणी पिण्यास पात्रही नव्हतें, पुरुषांजवळ दोन वस्त्रें व एक डोक्यास; व बायकांजवळ एक वस्त्र याशिवाय जास्ती कांहींच नव्हतें. अशा संकटांत ते धीर पुरुष एकमेकांचे तोंडाकडे पाहूं लागले. बायका अबला तर रडूं लागल्या. तेव्हां स्वामिभक्त राघोबा शिष्य पुढें होऊन हात जोडून ह्मणाला, महाराज, आपण किमपिही दिलगीर होऊं नये; माझे बंडीचे खिशांत सुदैवानें एक रुपया आहे. मी गांवांत जाऊन शिधासामुग्री घेऊन सर्व तयारी करितो. हें शब्द ऐकतांच नानासाहेबांस आनंद होऊन ह्मणाले, शाबास, आम्ही नको नको ह्मणत असतां आमच्या दुःख निवारणार्थच तूं आह्मांस ईश्वरानें दिलास यांत संशय नाहीं. तर मग आतां लवकर तयारी कर. राघोबानें बाजारांत जाऊन कणीक, तूप, मीठ, लांकडें वगैरे सामान घेऊन वरण शिजविण्यास एक मडकें, व पाण्याकरितां मोठें मडकें, व पाणी पिण्यास लहान लहान मडकीं, अशी सामुग्री घेऊन आला; व स्नान करून स्वयंपाकास प्रारंभ करून कणकीचे गागर भाजून वरण तयार करून ठेविलें नंतर पुरुषांनीं मडकें घेऊन उपरणें भिजवून स्नानें केलीं. परंतु स्त्रियांचे स्नानांची फार पंचाईत पडली, त्यांचे हाल पाहून पाणी

भरण्यास कांहीं नागरिक स्त्रिया आल्या होत्या त्यांचेही नेत्रांतून पाणी आलें. असो स्नानें झाल्यावर मारुतीची पूजा करून गागराचा नैवेद्य दाखवून सर्वजण भोजनास बसले परंतु त्यांस तें रुक्ष अन्न कसचें जातें. पहिल्या भुकेला जितकें गेलें तितकें खाऊन बाकी टाकून दिलें. इतक्यांत गांवचे मामलेदारास बातमी समजली कीं मारुतीचे देवालयांत कोणी दक्षिणी वाटसरू उतरले आहेत त्यांचे जवळ वस्त्रही नाहीं, पाणी पिण्यास भांडेंही नाहीं, परंतु चेहेऱ्यावरून कोणी मोठे असावेत असें दिसतें. बरोबर बायका आहेत त्यांचे अंगावर कांहीं नाहीं परंतु नाकांत नथी मात्र फार किंमतीच्या आहेत. नथींत हिरेही आहेत. हें समजतांच मामलेदार धांवत आला; व चौकशी करितां हे श्रीमंत नानासाहेब आहेत अशी खात्री होऊन गढीवर परत जाऊन घोडे व मेणे घेऊन आला व श्रीमंतांस गांवांत चलण्याचा आग्रह केला; नंतर सर्व मंडळी मारुतीस नमस्कार करून गढींत गेली. गढींत गेल्यावर आचारी, पाणके, शिष्ये, कारकून वगैरे तैनातीस मिळून वस्त्रप्रावर्णाची सर्व तजवीज लागली व बारावर्षांचा नव्हे पण बारा तासांचा अरण्यवास संपला.

नंतर इकडे दुसरे दिवशीं कानपुरांत ‘ खल्क् खुदाका, मुल्क् पादशाहका अम्मल् अंग्रेजसरकारका ’ अशी शहरांत दवंडी पिटून इंग्रजांनीं रयत निष्काळजी केली व आपला अम्मल चोंहींकडे बसविला. कानपुरांत पेशवे यांचे मसलतींत जे जे होते त्यांचा ठिकाणा लावून कांहीं फाशीं, कांहीं तोफेचे तोंडीं देऊन त्यांचा निकाल केला. कानपुरांत दोन दिवस राहून बंदोबस्त झाल्यावर

गोरे लोकांची एक व काळे लोकांची एक अशा दोन पलटणी बिठूर अगर ब्रह्मावर्ताकडे वळल्या. श्रीमंत गंगापार झाल्यावर तिसरे दिवशीं सकाळीं चार घटका दिवसास ब्रह्मावर्तावर हल्ला सुरू झाला. क्षेत्र निराश्रयच होतें. गोरेलोकांनीं एकदम आंत शिरून सडक बिजनास आरंभ केला. जे पुरुष सडकेवर सांपडतील त्यांस बंदुकीनें ठार मारावें याप्रमाणें चार प्रहर बिजन होऊन हजारों लोक मरण पावले; क्षेत्र अगदीं दीन होऊन गेलें. दुसरे दिवशीं लूट सुरू झाली. गोरे लोकांनीं सोनें रुपें लुटण्यास आरंभ केला. जेथें द्रव्य सांपडेल तेथें खणून काढीत. कांहीं लोक कमरेस अर्थ बांधून रस्त्यानें ध्रुव घाटाकडे पळून जाऊं लागले, त्यांस गोरे भेटले ह्मणजे त्यांनीं लुटावें, सुटले तर गांवकुटार गंगापुत्र वगैरे दांडगे लोकांनीं मारहाण करून लुटावें याप्रमाणें तेथील प्रजेचे दुःखास पारावार नाहींसा झाला. बारावाजे तोंपर्यंत गोरेलोकांची लूट झाल्यावर ते श्रीमंताचे वाड्यांत शिरले. व काळे लोकांनीं शहरांत तांबें पितळ वस्त्र प्रावर्णाची लूट मांडली. या प्रमाणें त्या लोकांनीं आपल्या अनेक पापाबद्दल हजारों जीव व आपलें सर्वस्व इंग्रज सरकारास अर्पण करून प्रायश्चित्त घेतलें. तिसरे दिवशीं इंग्रज सरकारनें आपले नांवाची द्वाही फिरवून लोकांस निर्भय केलें. जनेरेली झेंडा उतरून कलेकटरचा अम्मल सुरू केला.

ब्रह्मावर्त क्षेत्र श्रीमंतांची व नानासाहेबांची निवास भूमि असल्यामुळें गोरे शिपाई हजारों मनुष्यांचे बळीनें व द्रव्य संतर्पणानें शांत झाले नाहींत. त्यांनीं श्रीमंतांचा अनेक वर्षांच्या संपत्तीनें भरलेला वाडा लुटून त्यास शेवटीं अग्नि लावून दिला. शहरचे

तट व दरवाजे पाडून टाकले. राममंदीर सुरेख होतें तें पाडून मूर्ति सुद्धां ठेविल्या नाहींत. बागांच्या भिंती पाडून उध्वस्त करून टाकिल्या. श्रीमंत बाजीराव साहेबांनीं सरस्वतेश्वर सांबाचें देवालय लाखों रुपये खर्च करून संगमरवरी दगडांचें गंगातीरीं बांधलें होतें. त्याचें कारण असें होतें कीं त्यांची सरस्वतीबाई ह्मणून एक अति प्रिय पत्नी होती; ती रूपानें व गुणानें लोकोत्तर असून मोठे मनाची, दानशूर, हस्तमुखी अशी होती. ती इतकी तेजस्वी व न्यायी होती कीं एखादा गैर चालीचा पुरुष अगर स्त्री तिचे दृष्टीस पडल्यास त्यास ती एकदम वाड्याबाहेर हांकून देई व महाराजही कांहीं बोलत नसत. जेव्हा जेव्हां स्वारी महाराजापर्यंत जात असे तेव्हां तेव्हां महाराजांनीं मोठ्या भीतीनें आपले जवळील माणसें असतील तीं दूर करावीं. तिणें एखादी गोष्ट सांगितल्यास ते ताबडतोब करीत. अशी त्यांची प्रियपत्नी नवज्वरानें कैलासवासी झाल्यावर महाराजांस अति दुःख झालें. तिचे मरणकाळीं पंचवीस तीस हजार रुपये धर्म केला. व गंगातीरीं उत्तम जागा पाहून चंदनकाष्ठांनीं व कापुरानें तिचा देह दग्ध केला व मर्तिकासंबंधें दीड लक्ष रुपये दानधर्म केला. ज्या जागेवर दहन केलें तेथें मोठें टोलेजंग देवालय बांधून आंत गर्भागार व सभामंडप पांढरे संगमरवरी दगडांनीं बहुत खर्च करून बांधलें व आंत श्रीसांबाची प्रतिष्ठा करून सरस्वतेश्वर असें नांव ठेविलें. तें देवालय पाडून, शिवलिंग काढून टाकून संगमरवरी दगड खणून नेले, तेथें देवळाचा मागमूस देखील ठेविला नाहीं.

या जगतीतलावर काळाचा महिमा किती थोर आहे ? त्यापुढें समुद्रवलयांकित भूमिपतिचेंही वैभव अगदीं तुच्छ व क्षणिक आहे. जी स्त्री आपल्या अलौकिक गुणांनीं जगतास मोहित करून धन्यता पावली ती आतां लोकांस कर्णोपकर्णी माहित सुद्धां नसेल व तिच्या पतीनें आपल्या अपार सामर्थ्यानें पृथ्वीवर तिचें स्मरण चिरकाल राहावें ह्मणून तिला अनुरूप असें अत्युत्तम शिवमंदिर बांधलें त्या सरस्वतेश्वराची आतां लोकांस कथाही माहित नाहीं. त्या ठिकाणीं तिच्या गुणांची व तिच्या पतीच्या वैभवाची साक्ष देणारा एक संगमरवरी दगडही नाहीं ! येथें चंदनकाष्टांनीं एक लोकोत्तर देह दग्ध झाला आहे याची कल्पनाही मनांत न येतां क्षेत्रस्थ श्वापदें त्या खणून टाकलेल्या जाग्यावर उकिरडा फुंकित असतील.

असो. इकडे श्रीमंत लखनौचे मुलुखांत उतरले ते बेगमेस जाऊन मिळाले. लखनौचें राज्य फार प्राचीन व धनाढ्य होतें. तें बादशाहा मरण पावतांच हावरे इंग्रज सरकारानें मोठ्या शिताफीनें गट्ट केलें होतें. परंतु बेगम आपल्या वाड्यांत राहून तेथेंच राज्य करीत होती. जिकडे तिकडे लढाया सुरू झाल्यावर कांहीं पलटणी बेगमेस मिळून त्याचे साह्यानें व नेपाळचे दिवाण जंगबाहादूर यांचे साह्यानें इंग्रजांस आपले मुलखांतून हांकलून देऊन पुन्हां बेगम राज्यकारभार पाहूं लागली. परंतु इंग्रज सरकारानें जंगबाहादर यास पुष्कळ द्रव्य देऊन आपले बाजूस वळविलें आणि लखनौवर हल्ला केला. ती जबरदस्त लढाई साहासेज चालत होती शेवटीं इंग्रज बाहादुरांनीं शहर हस्तगत केलें. बेगम फौजेसुद्धां बरोबर

...नें लादलेले उंट, हत्ती घेऊन वायव्येकडे पळून गेली; ...बरोबर मोठमोठे सावकारही पळून गेले. इंग्रज सरकारानें ... घेतल्यावर शहरांत एक प्रहरपर्यंत सडकबाजिन ... बहुत लोक मारले व नंतर लुटीस आरंभ केला. लखनौ ... फार श्रीमंत होतेंच. हजारवर्षांपावेतों तेथील राजे व नबाब ... नम्रतेनें वागून खंडणी देत आल्यामुळें लुटलें गेलें नव्हतें ... फार प्राचीन काळापासून शहरांत संपत्ती तुंबली होती ... लुटून इंग्रजानें नेली.

...साळच्या बंडापासून इंग्रजसरकारचें यत्किंचितही नुकसान ... उलटा अनेक तऱ्हेनें त्यांचा फायदाच झाला. ज्यास दैव ... त्याचें अनिष्ट करण्याचा यत्न केला तरी इष्टच होतें. व ... प्रतिकूल आहे त्यानें आपल्या फायद्याकरितां यत्न केला तरी ... नुकसानच होतें. इंग्रज लोकांस हिंदुस्थानांतून हांकलून ... बंडवाल्यांनीं यत्न केला परंतु इंग्रजसरकार जय पावले इ... तर त्यांस दिल्ली, बिठूर, लखनौ, चित्रकूट वगैरे अनेक ... रुपयांचा ऐवज मिळाला व हिरे, माणकें, मोतीं यांचे ... हिंदुस्थानांत जीं अनेक भूषणें राजेरजवाड्यांच्या भांडा... होतीं तीं सर्व त्यांस मिळून त्यांनीं विलायतेची लंका बनविली.

तात्याटोपी जो कान... पळाला तो अंतरवेदींत उतरून पळालेलें सैन्य मिळालें तेव्हां ... यमुना नदी उतरून काल्पीचे मुलुखांत शिरला. तेथें ... बंडवाल्या पलटणी मिळाल्यावर काल्पीचे किल्यावर ... तेथें गोरे लोक फार कमी

होते ते लढाईची हूल दाखवून पळून जाऊं लागले. परंतु शत्रु सांपडून मारले गेले. तात्यानें काल्पी शहरांत लागलीच श्रीमंतांचे नांवाची द्वाही फिरवून शहरचा बंदोबस्त केला. काल्पी खालील मुलुखावर अम्मल चालवून मामलेदार नेमून जमाबंदी सुरू केली. पुढें पलटणीचें असे म्हणणें पडलें कीं आम्हांस यजमान कोणी नाहीं याजकरितां रावसाहेब किंवा बाळासाहेब यांपैकीं कोणी इकडे आल्यास आम्हांस बळकटी ज्यास्त येईल. असा अभिप्राय समजतांच तात्याटोपी यानें पंचवीस स्वार रवाना करून श्रीमंतांस हकीगत कळवून त्यांचे अनुमोदनानें रावसाहेबांस काल्पीवर आणलें. रावसाहेब आठ हजार फौज घेऊन यमुनेचे कांठीं आले तों यमुनेस उतार नाहीं व उतरून जाण्यास नांवाही नाहींत. मग तेथेंच आठ दिवस मुक्काम केला. परंतु गोरे लोकांनीं जवळ असूनही त्यांजवर हल्ला केला नाहीं. तात्याटोपी यांनीं नांवा जमवून सर्व सैन्य उतरून आणिलें. रावसाहेब सुरक्षित आल्यामुळें मोठा आनंद होऊन पंचवीस तोफांची सलामी झाली. नंतर रावसाहेब किल्ल्यांत राहिलें व तात्या मुलुखाचें बंदोबस्ताकरितां फिरूं लागले. लालपुरी बोवा थोडी फौज घेऊन अंतरवेदींतून काल्पीस येऊन यमुनेचे घाटांवर उत्तरेस बारा कोशावर घाटनाकें धरून राहिला. सरदार लक्ष्मण शिंदा काल्पीचे पश्चिम बाजूवर पंधरा कोशावर बंदोबस्त करून राहिला व जळका रामभाऊ आठ हजार फौज घेऊन दक्षिणेस डंघाईचे मुलुखाचे डोंगरावर बंदोबस्त करून राहिला. याप्रमाणें काल्पीचे मुलुखांत पेशवाईचा अंमल सुरू होऊन जिकडे तिकडे भगवे झेंडे फडकूं लागले. नवी पलटणें ठेवून शिकविण्याचें काम जारीनें सुरू झालें. ते समयीं

गोरे लोकांची पलटण हिंदुस्थानांत थोडी असून त्यांचा सर्व भर दिल्लीवर पडला होता. याजमुळें काल्पीप्रांतांत पेशवाईचा अंमल स्वस्थतेनें चालत होता.

याप्रमाणें ब्रह्मावर्ताकडील श्रीमंताच्या हकीगती ग्वाल्हेरींत असतां आह्मांस समजत गेल्या. ग्वाल्हेरींतील बायजाबाईकडील संभावनेचें काम आटोपल्यावर आतां कोठें जावें याचा विचार करितां काकांचे ब्रह्माव-र्ताकडील ओळखीचे गृहस्थ झांशीवाली लक्ष्मीबाई इचेपाशीं झां-शीस आहेत त्यांचे आश्रयानें झांशीस बरीच संभावना होईल असा अभिप्राय काकाचा पडल्यावरून झांशीस जाण्याचा निश्चय झाला. नंतर सोबतीची चौकशीकरितां एक मराठा सरदार ग्वाल्हेरीहून आपले भावाकडे जाण्यास निघणार होता त्याजबरोबर हत्यारबंद पंच-वीस शिपाई होते, त्यांचे आश्रयानें एक गाडी करून कार्तिक शुद्ध पंचमीस तेथून निघालों, तों मजल दरमजल झांशीस येऊन पोचलों.

भाग ४ था.

झांशी येथील पूर्ववृत्तांत.

यन्मनोरथशतैरगोचरं न स्पृशंति कवयोऽपि यद्गिरा ।
स्वप्नवृत्तिरपि यत्र दुर्लभा लीलयैव विदधाति तद्विधिः ॥ १ ॥

झांशी हें संस्थान पूर्वापार कऱ्हाडे ब्राह्मणांचें आहे. पूर्वी हिंदुस्थानांत श्रीमंतांनीं अनेक लढाया मारून दिल्लीचे बादशहापासून पुष्कळ मुलुख काबीज केला व वजीरकीचीं वस्त्रेंही मिळविलीं, त्या मुलुखाचे बंदोबस्ताकरितां महादाजी शिंदे यांची ग्वाल्हेरीस स्थापना करून सर्व मुलुखाचा कारभार करूं लागले. त्या वेळेस शिंदे यांजवर नजर राहण्याकरितां एक स्वतंत्र सुभा पुण्याकडे खासगत असावा असें वाटल्यावरून झांशी हें शहर जुनें मजबूत बांधीव व किल्ला फार बळकट असें जाणून झांशीचा प्रांत सुमार पंधरा लक्षांचा श्रीमंतांनीं खासगत ठेविला व पुण्याहून रा. शिवराम भाऊ पारोळेकर खानदेशांतील पारोळें येथील राहणारे यांस सुभेदार नेमून रवाना केलें. त्यांचे पुत्रपौत्र पेशवाई लयास जाईपर्यंत तें काम चालवीत आले व दरसाल खर्चवेंच जाऊन सुभ्याचें उत्पन्न पुण्यास पाठवीत असत. पेशवाई बुडते वेळीं झांशी सुभा होता तो बुडून संस्थान झालें. संस्थानच्या शेवटच्या दोन चार पिढ्या दत्तकांच्या व निपुत्रिकांच्या झाल्या. शेवटचे संस्थानिक गंगाधर बाबा म्हणून होते, त्यांचें कुटुंब आजारी पडून कैलासवासी झालें. तेव्हां पुन्हां विवाह करण्याची इच्छा झाल्यावरून मोठी, सुरेख व कुलीन

अशा कन्येचा शोध करूं लागले. गोत्राशीं जमणाऱ्या अशा पुष्कळ गोरगुरीबांच्या मुली पाहिल्या, परंतु लग्नाचें जमेना. याचें कारण असें होतें कीं गंगाधर बाबा ह्यांच्या वागण्याविषयीं लोकांत कांहीं विलक्षण ग्रह होता. तत्रापि राज्यसंबंधें गंगाधर बाबाची नोकरांस व रयतेस चांगली जरब होती. रोजचीं कामें वेळच्या-वेळेवर व्हावीं अशी त्यांची ताकीद असे. विलंब झाल्यास अप-राध्यास माशाची शेपटी घेऊन स्वतः शासन करीत असत. न्यायाचे कामांत त्यांचें लक्ष फार विलक्षण होतें. बहुतकरून शहरांत व राज्यांत चोरी फारच थोडी होत होती. असें सांगतात कीं बाबासाहेबांनी चोरीचा बंदोबस्त इतका केला होता कीं, लोकांनीं आपलीं कवाडें उघडीं टाकून निर्धास्त निजावें. प्रत्येक ठिकाणचे सुरक्षिततेबद्दल जिमेदार घेतलेले असत. कदाचित् चोरी झाली असतां हे जिमेदार लोक मालाची नुकसानी भरून देत व कित्येक प्रसंगीं सरकारांतूनही चोरी झालेल्या रकमेबद्दल ऐवज दिला जात असे. चोरी करतांनां पकडलेल्या मनुष्यास धर्मशास्त्रांत सांगितल्या-प्रमाणें कधीं कधीं हात तोडून टाकण्याचीही शिक्षा होत असे. यामुळें गंगाधरबाबांची रयतेवर व विशेषतः बदमाश लोकांवर फारच जरब होती. रयतेस न्याय देण्यास ते कधींही विलंब लावीत नसत; व त्याजकडे कोणाचीही दाद लागल्याशिवाय राहत नसे. तें राज्य एकंदरीनें न्यायानें विचार पूर्वक चालवीत होते. व साहेब लोकांत सतेजपणें आपला मोठेपणा सांभाळून होते. एकदां बाबासा-हेबांचें व गार्दन साहेबांचें भाषण झालें, त्यांत बाबासाहेब ह्मणाले कीं, मी एक लहान मांडलीक राजा आहे, परंतु इंग्रज बहादुरापुढें

पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर देशांत जसे राजेरजवाडे आहेत, तेव- ढ्यांनीं हातांत बांगड्याच भरल्या आहेत असें ह्मटलें तरी चालेल. पहा तुम्ही परद्वीपस्थ असून आमच्या द्वीपांत येऊन आह्मां सर्वांस करद केलें आहेत, हें आश्चर्य नव्हे काय ? अशा प्रकारचे बाबा- साहेबांचे उद्गार ऐकून बाबासाहेबांच्या सतेजपणाबद्दल व कर्तृत्वगारी- बद्दल गार्डन साहेबाची खात्री झाली असली पाहिजे. असो. या- प्रमाणें बाबासाहेबांचे राज्यांत रयतेस सर्व प्रकारें सुख असून त्यांचा इंग्रजांचे दरबारांत मोठा मान असे. परंतु बाबासाहेबांची घरची फार जरब असल्यामुळें त्यांस मुलगी देण्यास लोक धजत नव्हते. इतक्यांत बाबासाहेबांचे कारकुनास अशी बातमी लागली कीं, ब्रह्मा- वर्तास श्रीमंताचे होमशाळेंत तांबे ह्मणून भिक्षुक आहेत. त्यांची कन्या सुरेख असून उपवर झाली आहे. असें समजतांच कार- कुनांनीं गंगाधरबाबांचे कानावर गोष्ट घालून मागणी घालण्याकरितां लागलेच लोक रवाना केले.

आमचे चुलते होमशाळेवर पंधरा वर्षें ऋत्विज्य करून होते, त्यांचेच हाताखालीं मोरोपंत तांबे हे शिष्यपणानें होते. तांबे यांचें कुटुंब वारलें, त्या वेळेस त्यांची मुलगी चार वर्षांची होती. घरांत दुसरें कोणी नसल्यामुळें तांबे यांनीं मुलगी फार प्रेमानें वाढविली. ती दिवसेंदिवस शुक्लपक्षाच्या चंद्राप्रमाणें अधिकादिक सतेज होत चालली मुलगी फार गौर, अंगानें कृश व उंच उभारणीची होती. तोंडावळा किंचित् लांबट असून नाक सरळ, कपाळ उंच, डोळे कमळाप्रमाणें विशाल व वाटोळे होते, व कान मुखाला शोभा देणारे

होते; मध्यभाग शरीराचे झोंकाप्रमाणें बारीक होता. याप्रमाणें ती मनमोहक मुलगी बापाची काय पण सर्वांची लाडकी होऊन गेली होती व याचमुळें तिला छबेली म्हणून ह्मणत असत. घरांत बायकोमाणूस कोणी नसल्यामुळें तिचें खेळणेंरेळणें खाणेंपिणें होमशाळेंत व श्रीमंतांबरोबर होत असे. मुलीस लहानपणापासून पुरुषांत खेळण्याची संवय लागल्यामुळें व जात्या फार अचपळ व हुषार असल्यामुळें तिला पुरुषाचे गुण लागत चालले. लोकांनीं तिला मोडी बालबोध लिहिण्यावाचण्यास शिकविलें. कोणी तिला घोड्यावर बसावयास शिकविलें, कोणी बाण मारावयास शिकविलें, कोणी तिला हत्तीवर बसून फिरवावें, तालमींत घेऊन जावें, बंदूक हातांत घेऊन बायफळ बार काढावे, तरवारीचे हात शिकवावे. याप्रमाणें श्रीमंती सुखांत रुळलेली व ज्यानें त्यानें लाड केलेली ती मुलगी शरीरानें दांडगी होऊन अकरा बारा वर्षांचे सुमारास पित्यास लाज आणूं लागली. त्यानें वराबद्दल पुष्कळ शोध केला; ब्रह्मावर्ती कऱ्हाड्यांची घरें थोडीं असल्यामुळें जालवण गुलसटाई वगैरे ठिकाणीं यत्न केला; परंतु मुलीस भावी राजयोग घडणार असल्यामुळें कोठेंच जमेना. शेवटीं बापास फार काळजी लागून मुलगी ब्राह्मणाचे हातीं देऊन आपण निश्चिंत कधीं होऊं असें होऊन गेलें. असें निरुपम कन्या रत्न मोरोपंत तांब्याच्या जोडीच्या एखाद्या चत्वामंत्रानो करणाऱ्या भिक्षुकांच्या अनभिज्ञ बटूच्या हातीं पडणार नाहीं व कटावर पाण्याचे घट वाहण्याखालीं त्याच्या राजकीय गुणांचे मातेरें होऊन जाणार नाहीं अशी आनंद देणारी कल्पना कोणाचे तरी मनांत आली होती काय? परंतु दैवगती थोर आहे.

गुणज्ञ वैभवारे आपलें योग्य भाजन शोधून काढून तें त्याचें घरीं आपण होऊन चालत आलें.

झांशीवाल्याचे कारकून ब्रह्मावर्तास येतांच मोरोपंत तांब्यास फार आनंद झाला. गोत्रास गणास पडल्यावर मुलगी देण्याचा निश्चय झाला. ब्रह्मावर्ताकडील मध्यस्थ जोशीबोवा यांणीं असें बोलणें लाविलें कीं मुलीबद्दल आह्मांस पैसा घेणें नाहीं. परंतु तांबे याजला पुत्रसंतान नाहीं म्हणून द्वितीय विवाह करणें आहे. त्याजबद्दल खर्च झांशीवाल्यांनी करावा व तांब्यास झांशीस राहण्यास जागा द्यावी. ही शर्त कारकुनांनीं गंगाधर बांबास कळवून मंजुरी आणल्यावर तांबे मुलीसह झांशीस गेले. त्यांस शहरांत स्वतंत्र वाडा देऊन आचारी पाणके ब्राह्मण वगैरे त्यांचे तैनातीस ठेऊन दिलें. सुमुहूर्तावर लग्न समारंभ होऊन वधूचें नांव लक्ष्मीबाई ठेविलें. याप्रमाणें लाडक्या छबेलीच्या थोरल्या लक्ष्मीबाईसाहेब बनल्यावर तांब्याच्या वैभवास काय विचारतां ? जिकडे तिकडे सोनें होऊन गेलें. त्यांचा विवाह होऊन एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्यें झालीं.

लग्न झाल्यापासून लक्ष्मीबाईस कोणत्याही प्रकारचें सुख नव्हतें. नवरा तर षंढच होता परंतु त्याचा अमंलही फार करडा असे. याजमुळें तिजला स्वतंत्रता फार थोडी होती. वाड्याच्या बाहेर पडण्याची तिला मोकळिक नव्हती इतकेंच नव्हे पण बाईसाहेब बहुतकरून कुलुपांत असत. तिच्या भोंवतीं नेहमीं बायकांचा पहारा असे. पुरुषाचें वारेंही तिला लागूं दिलें नाहीं. अशा प्रकारच्या जुलमी वागविण्यानें तिचे राजशाली गुण नाहींसे होऊन तिला कांहीं दुर्गुणही जडते. परंतु सुदैवानें गंगाधर बाबा लग्न झाल्यावर फार दिवस

जगले नाहींत. त्यांस नवज्वर होऊन त्यांचा परिणाम झाला. त्यांस औरस पुत्र नव्हता सबब गार्दनसाहेब रेसिडेंट यांस मरतेसमयीं बोलावून आणून त्यांनीं विनवून सांगितलें कीं माझे आप्त पारोळास पुष्कळ आहेत त्यांपैकीं एक लहानसा हुशार मुलगा पाहून आणून माझे स्त्रीचे मांडीवर द्यावा. गार्दन साहेबांचाही बाबां-बाबांवर लोभ फार होता त्यांनीं पुष्कळ खटपट केली. परंतु गव्हर-नर साहेबांनीं एकदम औरसपुत्र नाहीं सबब राज्य खालसा करावें असा हुकूम केला. गार्दन साहेबांनीं वाड्यास हात न लावितां बाकी सर्व प्रांत आपले ताब्यांत घेतला व चोंहींकडे इंग्रजांचे नांवाची द्वाही फिरविली. लक्ष्मीबाई ही फार दक्ष व हुशार बायको होती; तिनें नवऱ्याचे आज्ञेप्रमाणें पारोळाहून आप्तांपैकीं एक मुलगा आणवून दत्तक घेतला व त्याजला राज्य देण्याविषयीं सरकारांत अर्ज नेला. व आपण त्याचे नांवानें शहरांत व वाड्यांत राज्य करूं लागली. पुढें बंड झाल्यावर इंग्रज लोक राज्य सोडून कसे निघून गेले व लक्ष्मीबाई सर्व मुलुखाचा बंदोबस्त करून राज्य कसें करूं लागली याची हकीगत आह्मी झांशीस आल्यावर आह्मास समजली.

आह्मी झांशीस मजल दरमजल येऊन पोंचल्यावर सोबत्यांबरोबर बाहेर एक मोठा बाग होता त्या बागांत उतरून जेवणखाण केलें. व शहरांत जाऊन कोठें उतरावें याचा विचार करूं लागलों. तांबे हे पक्के परिचयाचे होते खरे परंतु राणीचे वडील असल्यामुळें एकदम त्यांचे येथें जाऊन उतरावें असें मनांत येईना. अशा विचारांत आहों तों शहरांतून सहज हवा खा-ण्याकरितां ब्राह्मण मंडळी बाहेर येतांना दृष्टीस पडली.

त्यांस विचारतां त्यांनीं असें सांगितलें कीं तुम्ही विद्वान् आहां त्यापेक्षां तुह्मांस उतरण्यास उत्तम जागा वेदमूर्ति राजेश्री केशवभट्ट मांडवगणें ह्मणून ऋग्वेदी महाविद्वान् प्रतिष्ठित ब्राह्मण आहेत, राजाश्रय नाहीं तरी स्वतंत्र असून फार सभ्य चालीचे आहेत त्यांचे येथें मिळेल. त्यांची पत्नीही फार साध्वी व माणुसकीस उत्तम अशी आहे त्यांचे येथें आपण जाऊन उतरावें. नंतर आम्ही शहरांत गेलों. आमचे सोबती आपआपले ठिकाणीं गेल्यावर आ-ह्मीही मांडवगणें यांचे घराचा पत्ता लावीत त्यांचे घरीं गेलों. वाड्यांत शिरलों तों स्त्रीपुरुषें सहज बाहेर बसलीं होतीं त्यांस नमस्कार करून राहण्याबद्दल विचारतांच त्यांनीं संतोषानें राहण्यास परवानगी दिली. त्या दिवशीं सायंकाळीं आह्मांस क्षुधा नव्हती तरी त्या स्त्रीनें रात्रौ आह्मास फार आग्रह करून फराळास दिलें व भोजनोत्तर इक-डील तिकडील राज्यसंबंधें सर्व हकीगती झाल्या. तिसरे दिवशीं आह्मी केशवभटजी यांचे आश्रयानें स्वतंत्र बिऱ्हाड त्याच वाड्यांत केलें. गांवची रीतभात व हकीगत पक्की समजल्याशिवाय तांबे यांस भेटूं नये असा विचार ठरून सात दिवस तसेच शहरांत फिरून काढले.

झांशी शहर उत्तर हिंदुस्थानांत फार सुरेख व टुमदार आहे. तेथील किल्ला फार जुनाट असून मोंगलांनीं बांधलेला मोठा बळकट आहे अशी प्रसिद्धी होती, तो शहराचे पश्चिम बाजूला एक लहानसा डोंगर आहे त्याजवर बांधलेला आहे. पायथ्याशीं सभोंवार रुंद व खोल खंदक पाण्यानें भरलेला, असल्यामुळें एकाच बाजूनें आंत जाण्यास रस्ता होता. डोंगराचे माथ्यावर मोठा चुन्नेगच्ची तट सभोंवार बांधून आंत ४००० मनुष्य राहील इतकी जागा आहे.

मुख्य सरकारी वाडा चार पांच मजली व आठ चौकी असून सभोंवती लहान लहान निरनिराळ्या कामाचे उपयोगी बंगले होते. वाड्याचे पश्चिमेस शिपाई लोकांची कवाईत वगैरे करण्यासारखें विस्तीर्ण मैदान आहे. व त्यांत चिचेचीं झाडें पुष्कळ होतीं. तटाची रुंदी पुष्कळ असून मधून मधून टॉलेंजंग बुरूज व बुरुजांखालीं मोठीं तळघरें होतीं. मुख्य वाड्याचें काम जुनें मजबूत व सुरेख होतें. व तो इतका विस्तीर्ण होता कीं सर्व दालनाची माहिती होण्यास सुमार एक महिना लागे. वाड्यास ठिक-ठिकाणीं बैठकी गालीचे व गाद्या टाकून तयार ठेविलेलीं दालनें व हवा खाण्याकरितां कुंड्यातून झाडें ठेऊन रमणीय केलेल्या गच्चया साधल्या होत्या वाड्याचे दक्षिण बाजूचा बंगला फार उंच सात मजली होता. व उत्तर बाजूस पंचवीस पायऱ्या खालीं उतरून सपाट जागा होती तेथें पाण्याचा चोपडा ह्मणजे हौद होता; त्यास पाणी महामूर होतें. व यामुळेंच त्या जागेंत एक मोठी विस्तीर्ण व रमणीय बाग फुलें झाडें द्राक्षाच्या वेली आंबे पेरू वगैरे लहान थोर झाडांनीं भरलेली होती. बागेंत एक लहानसा बंगला होता त्यास शंकर किल्ला ह्मणत. तो केवळ ऐषआरामाच्या उपयोगी सर्व सामानांनीं भरला असून क्रीडाभुवनच होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

किल्याचे नैऋत्य कोणापासून दक्षिणबाजूनें पूर्वेकडे व वायव्य कोनापासून उत्तर बाजूनें पश्चिमेकडे असा शहरचा कोट गेला होता. तोही उंच रूंद व मजबूत असून मधून मधून त्यास बुरूज होते. व मुख्य अंबारीचे हत्ती जाण्यासारखे पांच दरवाजे होते, बाकी

लहान लहान बरेच होते. किल्याचे पूर्वेस कोटाचे आंत बरेंच मैदान टाकून शहरास आरंभ झाला आहे. त्या मैदानांतून शहरांत जाण्याचे रस्ते फार सुरेख दिसतात. पुढें शहरची वस्ती दाट असून रस्ते ही अरुंद आहेत व कोष्टीपुरा हलवाईपुरा वगैरे कांहीं मुख्य मुख्य भाग उंच उंच हवेल्यांनीं भरलेले असून सुरेख आहेत. शहराचे मध्यभागीं भिड्याचा मोठा बाग आहे व त्यांत पांच सहा मोठ्या विहिरी आहेत. या शिवाय लहानसहान शहरांत अनेक बाग आहेत. शहरांतील मुख्य सरकारी चारचौकी वाडा आहे त्याचें काम पाहाण्यासारखें आहे. एकंदर घरें मजल्याची व विंध्याद्रिजवळ असल्यामुळें पर्जन्य पुष्कळ पडतो सबब धाब्याचीं नसून कौलारू आहेत. घरोघर विहीरी व विहिरींस पाणी जवळ आहे. शहरचे दक्षिण दरवाज्या बाहेर एक मोठा तलाव आहे. त्यांत महालक्ष्मीचें एक टोलेजंग देऊळ आहे. ही देवी झांशीवाल्याची कुलस्वामिणी असल्यामुळें देवस्थानाचा बंदोबस्त फार मोठ्या खर्चाचा ठेवला असे. नंदादीप, पूजा, महानैवेद्य, चौघडा, गायक, नर्तकी व धर्मशाळा यांची व्यवस्था मोठ्या थाटाची होती. आषाढापासून तों चैत्रापर्यंत देवास जाणें तें होडींतून जावें लागत असे. वैशाख ज्येष्ठ महिने मात्र थोडा पायरस्ता मिळे. तटाच्या आंत या-शिवाय शहरांतही गणपति विष्णु इत्यादिकांचीं मोठीं देवालयें पुष्कळ आहेत व त्यांचे पूजेबद्दल नेमणूक सरकारांतून असे. शहराचे नैऋत्य कोपऱ्यांत एक मोठा चोपडा ह्मणजे पाण्याचा हौद आहे. त्यास पाणी फार आहे.

शहरची रीत वगैरे फार चांगली आहे व लोकही श्रीमान उद्योगी व कसबी आहेत. गालीचे, रेशमी वस्त्रें व पितळीसामान या शहरासारखें दुसरें कोठें होत नसे. तसेंच कागदावर चित्रें काढण्याचेंही काम येथें अप्रतिम होत असे. शहरांत ब्राह्मणांचीं घरें सुमार ३०० असून ब्राह्मण्याला शहर फार चांगलें आहे. ह्मणच असे कीं दक्षिणेंत पुणें व हिंदुस्थानांत झांशी. सकाळीं उठून प्रातःस्नान करून आपले हातानें धोतरें धुवून व दुसरीं स्वच्छ गुलाबी नेसून उद्योगास बाहेर पडावें असा या शहरचा रिवाज असे. संध्याकाळीं मोतिया जाई जुई वगैरे सुवासिक फुलांचे गजरे घेऊन गंध्याचे दुकानांतूनही रिकामकी मंडळी बरीच दृष्टीस पडे. झांशी बुंदेलखंडांतला भाग असल्यामुळें येथील स्त्रिया सुरेख व विशेषेंकरून विशाल व काळ्याभोर डोळ्याच्या असतात. पुरुषांत षंढत्व बरेंच आढळतें. याजमुळें स्त्रियांस मोकळीक फार असे. संध्याकाळीं हातांत रुप्याचा पेला घेऊन देवदर्शनाचे निमित्तानें बाहेर पडावें व कोणा सोद्याकडे जाऊन यावें. अशा चालीचा डंका शहरांत पुष्कळ होता. या शहरांत पूर्वी घडलेली एक विलक्षण गोष्ट ऐकिवांत आली ती सांगण्यासारखी आहे. थोरले माधवराव पेशवे यांचे वेळीं झांशीत पारोळकर यांचे पदरीं नारायण शास्त्री म्हणून विद्वान् ब्राह्मण होते ते शृंगारशास्त्रांत फार निष्णात होते. त्यांनीं एके दिवशीं श्रीचक्रा जवळ भंगिणीची पोर पाहिली. तिच्या नेत्र चरणहस्त वगैरेच्या लक्षणावरून व व अंगाचे सुवासावरून ही पद्मिनी आहे असा शास्त्री-

बोवाचा निश्चय झाला. नंतर तिच्या आईस अनेक फुसलावण्या देऊन ती मुलगी वश करून घेऊन चांगलें अन्न वस्त्र देऊन वाढविली व वयांत आल्यावर शास्त्रीबोवा तिजशीं रममाण होऊं लागले व तिला वेळोवेळी घरींही आणूं लागले. त्याच स्त्रीवर शहरांतील पुष्कळ लोकांचा डोळा होताच. तेव्हां त्या भंगिणींनें शास्त्रीबोवांस विचारितां तिला असें सांगितलें कीं तुला द्रव्याची ईच्छा तर नाहीं तर तूं प्रत्येकापासून द्रव्य न घेतां एक एक यज्ञोपवीत घेत जा. याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर शास्त्रीबोवांचे हे वर्तमान त्यांच्या पत्नीस सहजच समजलें. तिनें बहुत प्रकारें त्यांची विनवणी केली. घरांत बाटवडा केल्याबद्दल आक्रोश केला, परंतु शास्त्रीबोवांनीं मारहाण करून तिला गप्प बसविलें. त्याजमुळें ही बातमी कर्णोपकर्णीं पारोळकर यांस समजल्यावर त्यांनीं गुप्त हेर ठेवून शास्त्रीबोवांस व भंगिणीस एक ठिकाणीं पकडविलें व आपल्या समोर आणून निक्षून विचारितां शास्त्रीबोवांनीं उत्तर केलें कीं मीच तर काय परंतु शेंकडों ब्राह्मण बाटले आहेत. असें ह्मणून भंगिणी कडून यज्ञापवीतें काढून दाखविलीं. हें पाहतांच पारोळकरांस फार धास्ती पडली. कारण हें सर्व शहर बाटल्याचें वर्तमान पुण्यास समजलें तर फार आकांत होईल. नंतर ताबडतोब दुसरे गांवचे ब्राह्मण आणवून त्यांजकडून शहराबाहेर पंचगव्य तयार कराविलें. व दर एक ब्राह्मणाकडून क्षौर करवून यज्ञोपवीत व पंचगव्य देऊन शुद्ध केलें. व सर्व शहरभर रस्त्यावर व घरांतून गोमूत्राचा सडा केला. खुद्द शास्त्रीबोवा प्रायश्चित्त घेण्यास नाखुष असल्यामुळें त्यांस भंगिणीसह हद्दपार केलें. असो.

शहरसंबंधीं सर्व मौजा पाहिल्या व ऐकिल्यावर एके दिवशीं मुहूर्त पाहून सकाळींच भोजन वगैरे आटोपून मोरोपंत तांब्यांचे भेटीस निघालों. वाड्यांत जाऊन पाहारेकऱ्याकडून कोणी ब्रह्मावर्ताचे ब्राह्मण भेटीस आले आहेत अशी वर्दी देवविली. परवानगी मिळाल्यावर माडीवर गेलों तों तांब्ये तक्याशीं मंडळीसहवर्तमान बसले होते. त्यांनीं काकांस पाहतांच उठून चार पावलें पुढें येऊन त्यांस तक्याशीं जागा घेतली. मीही जवळच बसलों. कुशलवृत्त वगैरे झाल्यावर भेटीचें कारण विचारतां काकांनीं सांगितलें कीं हा ज्येष्ठबंधूचा ज्येष्ठ पुत्र आहे. कार्यप्रयोजनामुळें पुष्कळ ऋण झालें याजकरितां त्याजला बरोबर घेऊन आपले भेटीचा हेतु धरून आलों आहें. ग्वाल्हेरीस वैशंपायन यांजकडे बरेच दिवस काढिले. व येथें कांहीं दिवस राहून काशीस जाऊं व तेथून घरीं जाऊं वगैरे बरींच बोलणीं झाल्यावर तांब्यांनीं सरकारचे उपाध्ये लाडू भाऊ ढेंकरे यास भेटण्याविषयीं सांगितलें व आपणही बाईसाहेबांचे कानावर गोष्ट घालितों ह्मणून ह्मणाले. दुसरे प्रहरीं आह्मीं लाडूभाऊ ढेंकरे यांस भेटावयास गेलों. ब्रह्मावर्ताकडील कोणी विद्वान ब्राह्मण आले आहेत अशी बातमी त्यांस अगोदरच समजली होती व आह्मांस पहातांच उठून आमचा आदरसत्कार चांगला केला व आपण स्वस्थ असावें असें आश्वासन दिलें.

शत्रुक्षय व्हावा व राज्य सुरक्षित रहावें या हेतूनें बाईसाहेबांनीं अनेक अनुष्ठानें चालू केलीं होतीं. महालक्ष्मीस रोज नवचंडी सुरू होती. ग्रहाबद्दल जप व दानें चालू होतींच. गणपतीचें देवालयांत रोज अथर्वशीर्षाचीं सहस्र आवर्तनें होत असत. त्यांतच काम्य-

ग्रहयज्ञ गृह्यपरिशिष्टोक्त सहस्रपक्ष कुंडमंडपासहित करावा, असा ठराव झाला. सरकारवाड्याजवळ जागा पाहून तेथें विस्तीर्ण छाया-मंडप टाकून कुंडे वेदी वगैरेची सर्व तयारी झाली. काशी-हून ब्रह्मावर्ताहून मोठे मोठे विद्वान् ब्राह्मण बोलाविले होते व रोज होमाकडे शंभर ब्राह्मणांची नेमणूक झाली. मुहूर्ताचे दिवशीं पदरची बाहेरची सर्व मंडळी बसली आहे, बाईसाहेब स्वतां स्वच्छ वस्त्र परि-धान करून दत्तक मुलास घेऊन बसल्या आहेत, लाडू भाऊ ढेंकरे कुलोपाध्याय जवळ व्यवस्था करीत आहेत, वेदशास्त्रसंपन्न भय्या उपासने उत्तम पाटावर बसून देखरेख करीत आहेत, व जवळच मोरोपंत तांब्ये राझीजनक हजर आहेत, अशा थाटानें संकल्पास आरंभ झाला. तो सर्वानुमतें बाईसाहेबांचे नांवानें केला. नंतर नांदीश्राद्ध सुरू झालें तों त्यांत मुलाचे पितृगणाचा उच्चार करूं लागले. ते समयीं मजला विचार पडला कीं, मुख्य संकल्प बाई-साहेबांचे नांवाचा, व नांदीश्राद्ध भलत्याचें होतें हें कसें? येथें मोठ-मोठे याज्ञिक शास्त्री पंडित बसले आहेत पण कोणी बोलत नाहीं. आपण न बोलावें तर अनुष्ठानांत चूक होत आहे. शिवाय कुचिष्ठा केल्याशिवाय प्रतिष्ठा वाढत नाहीं इत्यादि विचार करून गुरूचें स्मरण करून सभेंत बोलण्यास आरंभ केला. "अहो! किंचित् अनुष्ठान बंद करा. मला कांहीं प्रश्न केला पाहिजे. स्त्री वेदाधि-कारी नसल्यामुळें पुण्याहवाचनादि कर्मास उपाध्याय प्रतिनिधि असतो म्हणून त्याच्या पितरांचें नांदीश्राद्ध होईल काय? मुख्य संकल्पीं रावसाहेबांनीं आपले नांवाचा उच्चार केला असता तर ठीक होतें. परंतु येथें बाईसाहेबाचेच नांवाचा संकल्प झाला आहे,

तर त्यांचेच पितरांचें नांदीश्राद्ध केलें पाहिजे असें मला वाटतें." हें म्हणणें भय्या उपासने यांस सयुक्तिक वाटलें परंतु विनायक भटजी याज्ञिकांना रुचलें नाहीं. उगाच बोलून तंटा उत्पन्न करण्यांत कांहीं होणार नाहीं, ग्रंथाधार पाहिजे असें म्हणतांच मी मयूख, हेमाद्रि वगैरे ग्रंथांचीं नांवें घेतलीं. ग्रंथ जवळच होते ते आणून पाहतां नांदीश्राद्ध बाईसाहेबांचे पितरांचें करावें, असें सर्वानुमतें ठरलें. तेव्हां मला फार आनंद वाटला. मी दूर बसलों होतों तो मला उपासने बोवांनीं पुढें घेऊन नांदीश्राद्धांत बाईसाहेबांचा ऊह कसा आणावा असा प्रश्न केला. मी लागलीच 'ग्रहयज्ञविधायिन्याः मम मातुः' असा करावा म्हणून सांगतांच सर्वांनीं माना डोलविल्या. याप्रमाणें त्या सभेंत जय मिळाल्यावर उपासने बाबांनीं माझे अंगावर पोथी टाकून मजला सादस्याचा वर्ण दिला. मीही गुरुकृपेंकरून एक चुकी न होऊं देतां कर्म चालवून चवथे दिवशीं पूर्णाहुति देऊन समाप्त केलें. अनुष्ठान संबंधें दररोज ब्राह्मणभोजन होत होतें व चवथे दिवशीं मुक्तद्वार होतें. सर्व ब्राह्मणांस दक्षिणा बक्षिसें वाटलीं त्यांत मला बारा रुपयांचा धोतरजोडा व वीस रुपयांचें पागोटें बक्षीस मिळालें. बाईसाहेबांची व काकांची ओळख पटून बरेंच बोलणें झालें. त्यांत त्यांनीं असें ह्मणून दाखविलें कीं, तुमचा मुलगा चांगला विद्वान् आहे तो येथेंच राजाश्रयानें राहील तर बरें. त्याजवर काकांनीं उत्तर केलें कीं, याकरितांच मीं त्याजला घेऊन सरकारचे भेटीस आलों आहे. त्याजवर कांहीं दिवसांनीं सप्तशतीस पल्लव लावून शतचंडीचें अनुष्ठान करावें असा बेत झाला. सर्व तयारी होऊन मुहूर्त पाहून किल्यांत एक मोठी जागा पाहून तेथें

घटस्थापना केली. चवदा ब्राह्मण मूळमंत्रजपाकडे बसविले. प्रत्ये- काचे समोर तुपाची समई, एक अगरबत्ती व सुवासिक पुष्पें ठेविलीं असत व त्यास दिवसास क्षिप्राभोजन व रात्रौ फराळ असा व्रत होता. याप्रमाणें अनुष्ठान झाल्यावर व त्यांतही शाबासकी मिळा- ल्यावर मार्गशीर्ष शुद्ध ९ चे दिवशीं बाईसाहेबांनीं आह्मास किल्यांत बोलावून नेऊन हुकूम केला कीं, आजपासून उभयतां शहरचे वाड्यांत बिऱ्हाड आणावें. तेथें कारकून तुह्मांस चीजवस्त देऊन सर्व बंदोबस्त ठेवील. तूर्त तुह्मांस तीस रुपये दरमहा मिळेल. याप्रमाणें हुकूम होतांच मांडवगणें यांस मजकूर निवेदन करून दुसरे दिवशीं बिऱ्हाड सरकारी वाड्यांत नेलें. तेथें सर्व प्रकारची उत्तम रीतीची सोय होऊन वस्त्रप्रावर्णें उंची उंची वापरावयास मिळून आह्मी आनंदानें राहूं लागलों. मोठमोठाल्या आश्रितमंड- ळीच्या ओळखी झाल्या व अब्रूही वाढली. पुढें थोडक्याच दिव- सांनीं मजला बाईसाहेबांनीं किल्यांत हुजूर आश्रितांत घेतलें, तेव्हां पासून तर आमचा फारच बडिजाव झाला. नेहमीं रेशिमकाठीं धोतरें नेसावयास, शालजोडी पांघरावयास, उत्तम पागोटें डोकीस घालावयास मिळत असे. एके दिवशीं बाईसाहेबांनीं मला शाल- जोडीशिवाय फिरतांना पाहिलें तेव्हां मला संध्याकाळीं समक्ष बोलावून जरीकांठी हिरवी शाल बक्षीस दिली. बाईसाहेबांस शेंकडों नजराणे येत. ते सर्व आश्रित मंडळीचे फायद्यावर पडत. आमचें महत्वही फार वाढलें. महालक्ष्मीचे देवालयांत ब्राह्मण सहस्रभोजनें चार झाली. बांकनीस नेमून चार आणे दक्षिणा व मोतीचूर पक्वान्न असा ठराव करून कंत्राट दिलें होतें. प्रतिदिवशीं अकरा वाजतां

कोणीतरी पाळीप्रमाणें पीतांबर नेसून रुप्याची पळीपंचपात्री घेऊन महालक्ष्मीस जावें, नंतर उपाध्यांनीं उदक सोडल्यावर भात भाज्या कोशिंबिरी पक्कान्न याची चौकशी करून मग किल्यांत परत यावें. याप्रमाणें मीही दोनचारदा गेलों होतों. अशीं अनेक सुखें भोगीत बाईसाहेबाचे सन्निध राहूं लागलों व दरबारसंबंधें व राज्यसंबधें सर्व प्रकारची माहिती झाली.

बाईसाहेबाचा नित्यक्रम येणेंप्रमाणें होता. त्यास शरीराचा शोक लहानपणापासून होता तो त्यांनीं स्वतंत्रता मिळाल्यावर पूर्ण केला. पहांटेस उठून कसरत शाळेंत जाऊन जोर जोडी मलखांब करावा नंतर घोड्यावर बसून फिरावयास जावें व घोडा मंडळावर धरावा, कुंपणावरून उडवावा, खंदकाचे पार घालवावा, एकदम खालीं बसवावा इत्यादि नानाप्रकारच्या घोड्याच्या कसरती कराव्या. कधीं कधीं हत्तीवरही बसत असत. याप्रमाणें सात आठ वाजेपर्यंत मेहनत झाल्यावर नेहमीं खुराख खात असत. नंतर तासभर कधीं निजत असत कधीं तशाच स्नानास जात. स्नानाविषयीं बाईसाहेब फार हौशी असत. नेहमीं पंधरा वीस हांडे कडकडीत पाणी लागत असे. दर आठ दिवसांनीं नाहाणाचे दिवशीं उत्तम सुवासिक द्रव्यानें स्नान इतका वेळा करीत असत कीं स्नानाचे पाणी नळांनीं बाहेर स्वच्छ कुंडींत सोडलें होतें तेथें पुष्कळ बायकांचें नाहाण होत असे. स्नान झाल्यावर स्वच्छ पांढरें चंदेरी पातळ वस्त्र परिधान करून आसनारूढ होऊन भस्म धारण करीत. प्रथम पति मरणानंतर केंश राखण्याबद्दल तीन कृच्छ्र प्रायश्चित आहे, त्यांचें उदक सोडून नंतर रुप्याचे तुळशी वृंदावनांत तुळशीची पूजा करीत असत. नंतर

श्रीपार्थिव लिंग पूजेस आरंभ होत असे. ते समयीं सरकारी गवई गात असत पुराणिकाचें पुराणही त्यांत सुरू असे व सरदार व आश्रित लोकांचे मुजरे होत असत. परंतु बाईसाहेबाचें लक्ष चोंहीकडे सारखें असे. जर एखादे दिवशीं दीडशें मुजरे करणारांपैकीं कोणी आला नाहीं तर दुसरे दिवशीं काल आपण कां आला नाहीं ही चौकशी झाल्याशिवाय राहत नसे. याप्रमाणें बारा वाजावयाचे सुमारास देवार्चन आटोपून जेवण होत असे. नंतर कांहीं वेळ इकडे तिकडे काढल्यावर कधीं वामकुक्षि झाल्यावर सकाळीं आलेले नजराणे रुप्याचे ताटांत रेशमीवस्त्रांनीं आच्छादून ठेवले असत ते आपले समोर आणून मनास आवडतील ते पदार्थ ग्रहण करून बाकीचे आश्रित मंडळीकरितां कोठीवाल्याचे स्वाधीन करीत. तीन वाजायाचे सुमारास कचेरींत जात असत. त्या वेळेस कधीं पुरुषवेष धारण करीत. पायांत पायजमा, अंगांत जांबळे आंबव्याची बंडी, डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बांधलेली बत्ती, कमरेस काच्या किंवा जरीचा दुपेटा व त्यास लटकवलेली तरवार, या प्रकारच्या पोषाखानें ती गौरवर्ण उंच मूर्ती गौरीप्रमाणें दिसत असे. कधीं बायकांचा पेहराव असे परंतु पतिमरणानंतर नथ वगैरे अलंकार त्याणीं बिलकुल घातले नाहींत. फक्त हातांत सोन्याच्या बांगड्या व गोठ. गळ्यांत एक मोत्यांचें पेंडे व अनामिकेंत एक हिऱ्याची आंगठी या शिवाय दुसरें अलंकार आम्हीं बाईसाहेबाचे अंगावर कधींच पाहिले नाहींत. केशाचा नेहमीं बुचडा बांधलेला असे व नेसावयास पांढरा शालू व अंगांत स्वच्छ पांढरी चोळी असे. याप्रमाणें कधीं पुरुषवेषाने तर कधीं स्त्रीवेषानें दरबारांत येऊन, एक खोलीसारखी

पडतपोशीची जागा होती व त्याच्या दरवाज्यास बाहेरून सोनेरी मेहराब होती. त्या दरवाज्याचे आंत गादी घालून सरपोस घातलेल्या जाग्यावर लोडाशीं टेकून बसावे. दरवाज्याचे बाहेर दोन भालदार रुप्याची काठी घेऊन हजर असत. समोर राजेश्री लक्ष्मणराव दिवाणजी कंबर बांधून हातांत कागदांचें पुडके घेऊन उभा असे व पलीकडे हुजूरचे सात आठ कारकून बसलेले असत. लक्ष्मणराव जातीचा देशस्थ ब्राह्मण होता. तो अगदीं अक्षरशत्रु असे. त्यास लिहितां किंवा वांचतां बिलकुल येत नसे, परंतु तोंडची पाटिलकी करणारा मात्र फार हुषार होता. एकादें पत्र वाचा किंवा लिहा म्हटलें म्हणजे लागलीच आपल्या हाताखालच्या कारकुनाकडे नजर. कचेरींत सर्व दिवाणी, फौजदारी, मुलकी कामें होत असत. बाईसाहेब बुद्धीच्या फार चपळ असल्यामुळें हकीगत ताबडतोब समजून भराभर हुकूम सांगत असत. कधीं स्वतां लिहितां वाचतां येत असल्यामुळें मजकूर जुळवून आपण हुकूम लिहीत असत. बाईसाहेब न्यायाचे कामांत फार दक्ष व कडक होत्या व अपराध्यांस कधीं कधीं स्वतः छडी घेऊन शिक्षा करीत. दर शुक्रवारीं व मंगळवारीं सर्व स्वारी तयार करवून मुलास बरोबर घेऊन संध्याकाळीं महालक्ष्मीचे दर्शनास जाण्याचा नियम होता.

लक्ष्मीबाईचे स्वारीसारखा थाट आतां पुन्हां नजरेस पडणार नाहीं. बाईसाहेब कधीं मेण्यांत व कधीं घोड्यावरून दर्शनास जात. मेण्यावर किनखापी कापडास जरीनें बांधलेले चिकाचे पडदे असल्यामुळें मेणा फारच सुशोभित असे. कधीं स्वारी स्त्रीवेशानें असे त्यावेळेस पांढरे पातळ नेसून जुजबी मोत्यांचे दागीनें आंगावर

असत. पुरुषवेशाने असल्यास अंगांत अंबऱ्याची बंडी असून पायांत पायजमा, डोकीस टोपी व टोपीवरून भरजरी पगोट्याची बत्ती बांधलेली असून पाठीवर बत्तीचा पदर जरीचा लोळत असे तो फार मनोहर दिसे. अशी स्वारी मेण्यांत बसून मेणा झराझर चालवीत असतां मेण्याचे खूर धरून दोन किंवा चार सुंदर दासी दवडत असत. या दासी लहानपणापासून याच कामाकरितां बाळगलेल्या असत. दक्षिणेतून लहानपणी सुरेख कुणब्यांच्या मुली विकत आणून त्यांस उत्तम खावयास घालून १५।१६ वर्षांचे सुमारास या कामावर नेमीत. त्या अविवाहीत असल्यामुळें तारुण्यमदानें रसरसलेल्या असत. पांच सहा वर्षें काम केल्यावर बहुतकरून त्या रतीसारख्या सुंदर दासी एखाद्या लुच्च्याच्या नादास भुलून फसून जात व एकदां त्या गर्भार राहिल्या म्हणजे मग या कामावरून दूर होऊन त्यांची गणना कुळंबिणींत होत असे. त्यांनीं जामदारखान्यांत जाऊन सोनें मोंतीं, हिरे, यांचे दागीने नखशिखांत घालून, भरजरीच्या चोळया घालून हिरव्या तांबड्या भस्मी रंगाच्या पैठण्या नेसाव्या, पायांत मोठे मोठे तोडे घालून तांबडे लाल नवे उत्तम चर्मी जोडे घालावे, कधीं लुगड्याची कांस मारावी, आणि एका हातांत रुप्याचे किंव सोन्याचे दांड्याची चवरी घेऊन एक हात मेण्याचे दारास लावून मेण्याबरोबर दवडावे. तेव्हां त्या अविवाहित सुंदर सिहकटी सर्वालंकारयुक्त दासींकडे कोणाची टक लागत नसे. स्वारीपुढें डंका निशाण असून रणवाद्यें हलके वाजत असत. निशाणामागून सुमारें दोनशें विलायती लोक असत. व मागें पुढें सुमारें शंभर स्वार असत. स्वारी निघण्याची वेळ झाली म्हणजे बाईसाहेब दोघींस

किंवा चौघांस बरोबर येण्याविषयीं हुकूम करीत. मग मेण्याबरोबर घोड्यावर कारभारी मुत्सद्दी मानकरी भयासाहेब उपासनें कांहीं आश्रित मंडळी असत. बरोबर सिबंदीचे लोकही असत.

याप्रमाणें थाटानें, शिंगें कर्णे वाजत, बंदुकीचे शेंकडों आवाज काढीत, स्वारी किल्याचे बाहेर पडली ह्मणजे किल्याचे बुरुजावरील चौघडा सुरू होई. तों स्वारी परत येईपर्यंत वाजत असे. व तसाच महालक्ष्मीचे देवालयाचे नगारखान्यांतील चौघडा सुरू होत असे किल्यांतून निघून भर बाजारांतून महालक्ष्मीस स्वारी जाऊन परत येत असे. कधीं कधीं सडी स्वारी घोड्यावरून जाई तेवेळेस दासी आश्रित कारकून पायदळ वगैरे कोणी बरोबर नसत. फक्त घोडेस्वार व विलायती लोक असत. स्वारी परत येतांना रात्र झाली तर मशाली पेटवीत. परंतु घोड्यावर स्वारी असल्यास मशाली न लावितां दवडत दवडत किल्यांत परत येत.

बाईसाहेबांची आश्रित मंडळीवर फार श्रद्धा असे. त्यांस खाया प्यायास चांगलें मिळावें, कपडे लत्ते चांगले असावे, त्यांस सर्व प्रकारचें सुख असावें याजविषयीं त्यांची फार दक्ष नजर असे. त्यांस सर्व गुणांची परीक्षा असून चहा असे. जवळ मोठमाठोले शास्त्री, विद्वान्, वैदिक, याज्ञिक होते व वडिलोपार्जित कित्याप्रमाणें पुस्तकांचा संग्रह फार अमोलिक केला होता. चांगले पुराणिक, गवई, सतार वाजविणारे वगैरे लोक, निरनिराळ्या .कसबाचे नामांकित कारागीर त्यांच्या पदरी होते. बाईसाहेब स्वतां फार निष्कपट व निर्मळ वृत्तीनें रहात असत तरी त्यांस सर्व प्रकारची हौस असे. कोणी उत्तम गवई आल्यास त्याचें गाणें करून बिदागी पोंचविल्यायांचून रहात

नसत. शिमग्यांत रंगाचा खेळ चांगला होत असे. दत्तकपुत्र रावसाहेब यांचे स्वारीबरोबर मी त्या वर्षाचे शिमग्यांत शहरांत गेलों होतों. जागोजाग मुत्सदी लोकांकडे पानसुपारी होऊन रंग खेळून पुन्हां किल्यांत परत आलों. त्याच दिवसांत ग्वाल्हेरीस कोंकणची नाटक मंडळी सुमार पन्नास आली होती त्यांस शहरा-तल्या लोकांनीं पत्र पाठवून झांशीस बोलावून आणविलें. त्यांचे खेळ शहरांत पुष्कळ झाले. तेव्हां बाईसाहेबांनीं त्यांस सरकारांतून शिधा चालू करवून किल्यांत पुष्कळ नाटकें करविलीं. एकदां हरिश्चंद्राचें आख्यान झालें त्यावेळेस सदोबा नाटकवाला यानें विचारिलें कीं या नाटकांत डोंबाचे घरीं हरिश्चंद्राचे डोक्यावर मडकें फोडावें लागतें तर त्याजबद्दल परवानगी असल्यास मडकें आणवून फोडीन. त्यावर विचार होऊन बाईसाहेबांनीं परवानगी दिली. परंतु जेव्हां नाटकांत बैठकीवर घागर फोडली तेव्हांच वृद्ध मंडळी बसली होती त्यांस हा अपशकुन आहे असा चरका बसला. नाटकें फार सुरेख होत असत नाटकवाल्यांस संध्याकाळीं किल्यांत घेऊन सर्व सरकारी खजिना त्यांचे पुढें मोकळा ठेविला असे. मग खरे हिऱ्याचे अलंकार व जरींचीं वस्त्रें मिळाल्यावर पात्रें कां खुलणार नाहींत. नाटक झाल्यावर सर्वांचा झाडा घेऊन नंतर किल्याबाहेर पाठवीत असत. कांहीं नाटकें झाल्यावर दोन तीन नाटकें दरबारच्या मंडळीच्या बायका बोलावून त्यांस दाखविलीं. शेवटीं नाटकवाल्यांस एक मेजवानी करून बिदागी देऊन रवाना केलें. कोणास पागोटीं कोणास धोतरजोडे दिले व सदोबा म्यानेजर यास रोख चार हजार रुपये दिले.

बाईसाहेबांस अश्वपरीक्षा चांगली होती. उत्तर हिंदुस्थानांत त्यावेळेस तिघांचें नांव गाजत असे. एक नानासाहेब पेशवे, एक बाबासाहेब आपटे ग्वाल्हेरीकर व एक लक्ष्मीबाई झांशीवाली. एके दिवशीं एक सौदागर फार देखणे व चलाख दोन घोडे विकावयास घेऊन आला. बाईसाहेबांनीं त्यांजवर बसून मंडळावर धरूत किंमत ठरविली ती एकाची हजार व दुसऱ्याची पन्नास. व असें सांगितलें कीं दुसरा घोडा जरी दिसण्यांत फार उमदा व चलाख आहे तरी तो छातींत फुटला आहे. याजमुळें अगदीं नादान आहे. त्याजवर सौदागरानें बाईसाहेबाच्या कुशलतेची तारीफ करून कबूल केलें कीं, या घोड्यास मी उत्तम मसाला देऊन देखणाऊ ठेविला आहे. याची परिक्षा मी पुष्कळ फिरलों परंतु कोठें झाली नाहीं. बाईसाहेबांनीं दोन्हीं घोडे ठरविलेल्या किमतीस विकत घेतले, व सौदागरास बक्षीस देऊन मार्गस्थ केलें.

बाईसाहेब रयत लोकांची काळजी फार वाहत असत व राजकारणाकरितां स्वतः मेहनत घेण्यास कधीं मागें पुढें पाहत नसत. बलवासागर म्हणून एक लहानसें शहर झांशीचे अमलांत आहे तेथें चोरट्यांचा उपद्रव फार होऊन प्रजेस पीडा होऊं लागली. तेव्हां स्वतां स्वारी तयार करून बलवासागरास जाऊन पंधरा दिवस मुक्काम करून चोरांचा ठिकाणा लाविला व कांहींस फांशी देऊन कांहींनां कैद केले व प्रांत निर्भय केला. अशा अनेक गुणांनीं भरलेल्या त्या स्त्रीरत्नाचे औदार्य व शौर्य हे गुण तर निरुपमच होते. कोणीही दरिद्री भिक्षुक कधींही विन्मुख गेला नाहीं. एके दिवशीं एक काशीकर विद्वान् ब्राह्मण उपाध्यांचे मार्फत किल्यांत नित्य दानास गेला तेथें

लाडू भाऊ ढेकरे यांनीं त्याची विद्येविषयीं व शीलाविषयीं फार स्तुति केली व असेंही सांगितलें कीं, प्रथम स्त्री मरण पावल्यामुळें व वय अल्प असल्यामुळें दुसरा विवाह करण्याची भटजीची ईच्छा आहे परंतु मुलगीस पैसा फार पडतो सबब फार दुःखी आहेत. हें ऐकून बाईसाहेबांनीं प्रश्न केला कीं, रुपये देऊन मुलगी देणारा आहे कीं काय. त्याजवर भटजी नम्रतेनें बोलले कीं आमचे जातीचा एक देशस्थ ब्राह्मण काशीस आहे त्याची मुलगी सुमार बारा वर्षांची असून रूपानें बरी आहे रास घटित वगैरे सर्व जमलें आहे. परंतु त्यास मुलीबद्दल रुपये चारशें दिले पाहिजेत. ते मी गरिबानें कोठून आणावे. शिवाय लग्नाचे खर्चाकरितां सुमार शंभर लागतील. हे शब्द ऐकतांच बाईसाहेबांनीं पांचशें रुपये तांब्याचे ताम्हनांत आणवून उदक सोडून भटजीचे पदरांत ओतले व सांगितलें कीं लग्न होईल ते वेळेस आह्मांस कुंकुत्री पाठविण्यास विसरूं नये. याप्रमाणें त्या भटजीबोवाचे नशीब उदयास आल्यावर तो मोठ्या उत्कंठेनें काशीस परत गेला व लग्नसमारंभाची तयारी करून बाईसाहेबास मूळ धाडिलें.

एके दिवशीं बाईसाबांबरोबर मी महालक्ष्मीचे दर्शनास गेलों होतों. स्वारी परत येतानां दक्षिणदरवाज्यांतून आत शिरली तों हजारों भिकारी रस्ता आडवून उभे आहेत व गलका करीत आहेत हें पाहून बाईसाहेबांनीं दिवाणजीस कारण पुसतां लक्ष्मणराव यांनीं विदित केलें कीं, महाराज, हे लोक गरीब भिकारी आहेत; हल्लीं थंडी फार पडते व यांस पांघरूण

नसल्यामुळें त्यांचे फार हाल होत आहेत याजबद्दल विचार होण्याविषयीं सरकारचे पायापाशीं याचा अर्ज आहे. हें ऐकून बाईसाहेबांस फार वाईट वाटलें व लागलाच हुकूम केला कीं, आजपासून चवथे दिवशीं भिकारी लोकांचा रमणा करावा व दर मनुष्यास एक रूदार टोपी, एक रूदार बंडी व एक काळी किंवा पांढरी घोंगडी द्यावी. असा हुकूम होतांच दुसरे दिवशीं शहरचे दर्जी जमा करून टोप्या व बंड्या शिवण्यास आरंभ केला. व नेमिलेल्या दिवशीं दंवडी पिटवून शहरचे वाड्यासमोर भिकारी लोक जमा केले. त्यांत सामान्य गरीबलोक शिरले होते. दरएकास टोपी, बंडी व घोंगडी वांटली. सुमारें चार हजार टोपी वांटली गेली असेल. असो. अशा अनेक गोष्टी आहेत. ग्रंथविस्ताराचे भयानें लिहितां येत नाहींत. बाईसाहेबांचे शौर्य कसें होतें ह्याची सर्व जग साक्ष देतच आहे व ह्या ग्रंथांतही पुढें त्याचेंच वर्णन होणार आहे. असो.

अशा त्या उदार शूर राजकारस्थानी बायकोशीं इंग्रज सरकारचें वर्तन फार अन्यायाचें झालें होतें यांत संशय नाहीं. प्रथम जेव्हां तिनें आपले दत्तकपुत्रास राज्य देण्याविषयी सरकारास अर्ज केला. आमचें घराणें पुष्कळ जुनें आहे व इंग्रज सरकाराशीं मोठ्या नेकीनें व प्रेमानें वागत आलें आहे आमच्या तहनाम्यावरून आम्ही दत्तक घेऊं नये असा निषेध नाहीं, सबब आमच्या जुन्या राज्यावर व नेकीवर व तहनाम्यावर लक्ष देऊन सरकारानें मेहरबानीनें राज्य खालसा न करितां माझा दत्तक घेतलेला मुलगा कबूल करावा इत्यादि तिनें अनेक कारणें अर्जांत दाखविलीं परंतु राज्य खालसा

झालें. मात्र शहरातील राजवाडा व त्यांतील द्रव्य तसेंच तिजकडे राहूं दिलें होते. तिनें मोठ्या हिंमतीनें आपले नवऱ्याचे वेळचे जुने नोकर कांहीं पगार कमी करून आपले पाशीं ठेऊन घेतले, त्यांच्या खर्चाकरितां व स्वतांच्या इतमामाकरितां तिजला इंग्रज सरकारांतून दरमाहा चालू झाला होता तो मोठ्या काटकसरीनें पुरत असे. परंतु दुःखावर डाग याप्रमाणें तोही तिचे नवऱ्याचे कर्जाकरितां कांहीं दिवस बंद केला. तिनें केशवपन करण्यासाठीं काशीस जाण्याविषयीं परवानगी मागितली तिही तिला मिळाली नाहीं. अशा प्रकारची हेळसांड झाल्यामुळें त्या मनस्विनीचे मनांत इंग्रजाविषयीं द्वेषबुद्धि उत्पन्न झाली. परंतु जेव्हां धर्माचे बाबतींतही इंग्रज सरकार अन्याय करूं लागले तेव्हां तर तिची आग मस्तकास गेली. हिंदुधर्मांत गोब्राह्मण फार पवित्र मानले आहेत व गाईचे वधाची फार निंदा केली आहे. झांशी शहरांत गाईचा वध करूं नये अशाबद्दल लक्ष्मीबाईनें अर्ज केला परंतु त्या अर्जाकडे कोणी यत्किंचितही लक्ष दिलें नाहीं. दुसरी एक गोष्ट अशी झाली कीं महालक्ष्मीचे देवालयाचे पूजेकरितां दोन गांव तोडून दिले होते ते सरकारांत खालसा करावे असा सरकारचा हुकूम सुटला. तसें न होण्याविषयीं लक्ष्मीबाईनें पुष्कळ यत्न केला परंतु यःकश्चित् बायकोचें ऐकतो कोण? पण लक्ष्मीबाई कांहीं साधारण बायको नव्हती. तिच्या अंतःकरणांत इंग्रजाविषयीं द्वेषाग्नि पेटून अगदीं कल्पांत होऊन गेला. तिच्या बाळपणचा भाऊ व समदुःखी नानासाहेब त्याजपाशीं तिनें पत्रव्यवहार सुरू केला. व इंग्रजाचा सूड कसा घ्यावा या विचारास व उद्योगास ती लागली.

बंडाचें नेमिलेल्या तारखेच्या आदले दिवशीं छावणींतील गोरे लोक घाबरून गार्डनसाहेबासहित बाई हिजला भेटले व विनंति केली कीं, उद्यांपासून आम्हावर वाईट प्रसंग येणार असें खचित दिसतें. यापेक्षां आपण आपले राज्याचा बंदोबस्त ठेवावा. झांशीखालीं दुसरा मुलूख आहे तो मिळून २६ लक्षाचे प्रांताचा बंदोबस्त पुन्हा इंग्रजी अंमल होईपर्यंत आपण संभाळला पाहिजे व होईल तितकें करून आमचेंही रक्षण करण्यास फार उपकार होतील. असें ह्मणून दप्तर स्वाधीन केलें. तेव्हां बाईसाहेबांनीं उत्तर केलें कीं, पूर्वी स्वस्थता होती त्यावेळेस मी राज्य मागितलें तेव्हां मला मिळालें नाहीं व आतां दंग्यांत तुमचे जवळ राहणार नाहीं ह्मणून मला देतां काय? कलकत्त्यास सभा झाली त्यास मला बोलाविलें नाहीं. आमचे येथें मरतेवेळेस विनंती केली कीं, माझे मागें माझ्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन त्याजकडे राज्य चालवावें तीही तुह्मी जुमानली नाहीं व मला असें सांगितलें कीं, अलीकडे रुळी नवीन झाली आहे कीं, संस्थानिकांनीं दत्तकपुत्र घेऊं नये, घेतल्यास खासगी जिंदगीचा मालक ठरेल राज्य मिळणार नाहीं. नंतर केश वपन करण्यास प्रयागास जाण्याविषयीं हुकूम मागूं लागले तोही मला मिळाला नाहीं त्यापेक्षां आतां ज्याचा रस्ता त्यानें पहावा. शिवाय तुह्मांस आश्रय दिल्यास काळ्या पलटणी आह्मांस लुटून जाळून फस्त करितील. यास्तव होईल त्या रीतीनें आपला जीव तुह्मींच वांचवावा. असें ह्मणून बाईसाहेब उठून गेल्यावर साहेबही निघून गेले.*

---

* झांशीस कानपुराप्रमाणेंच इंग्रजी बायकापोरांची कत्तल शिपाई लोकांनीं केली. मात्र ती दंग्याच प्रथम दिवशींच झाली. या कत्तलींत बाईसाहेबांचें

दहावाजायाचें सुमारास टरावाप्रमाणें काळे लोक हेदील होऊन दंगा करूं लागले. बंदुकीचे आवाज होऊं लागून छावणीस आग लागली, त्या छावणींत गोरे लोक थोडे होते ते सर्व त्यांनी मारून टाकून दारूगोळा मेखजीन खजिना तंबू वगैरे सर्व सामान आपले ताब्यांत घतलें व छावणी जाळून टाकिली. काळ्या पलटणी तेथून निघून बाईसाहेबांचे वाड्यासमोर येऊन बाईसाहेबांस हांका मारूं लागल्या. तेव्हां त्यांनीं बाहेर येऊन अफिसर लोकांस भेटून त्यास अभयवचन दिलें व त्यांनींही सांगितलें कीं तुह्मीं आमचे यजमान, आह्मीं तुमचा हुकूम ऐकूं व तुह्मांपासून दरमाहा मुशारा घेत जाऊं. याप्रमाणें राज्य हातीं आल्यावर आपले नांवाची शहरांत "खुलक खुदाका मुलक बादशाहाका अंमल लक्ष्मीबाईका" अशी द्वाही फिरवून सर्व कामें सुरूं करविलीं. किल्यांत साहेब लोक शिरले होते ह्मणून तेथील भुया नवीन करवून व गोमुत्रानें सर्व किल्ला शुद्ध करवून बाईसाहेब सुमुहूर्तावर तेथें रहावयास गेल्या. नवीन बंदुका व तोफा व दारू कर-

---

काहीं अंग नव्हतें असे केसाहेबाच्या खालील उताऱ्यावरून दिसतें. I have been informed on good authority that none of the Ranee's servants were present. It seems to have been mainly the work of our own old followers. The irregular cavalry issued the bloody mandate and our jail Daroga was formost in the butchery. (केचा इति व्हा ३० पान ३६९). माल्सननें आपल्या पुस्तकांत याच्या उलट अभिप्राय दिला आहे पण तो केच्या अभिप्राया इतका मरंवशाचा नाहीं हें दोन्ही इतिहास वाचणारास तात्काळ समजेल.

स्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालू केलें. जुनी माणसें कमी पगारावर बाईसाहेबांचे पदरीं होतींच त्यांचा पगार पूर्ववत् करून राज्यसंबंधें सर्व कामाचा बंदोबस्त केला. शहरचे तटाची दुरुस्ती सुरू केली व राज्यरक्षणाकरितां अनुष्ठानें ग्रहयज्ञ सुरू केले.

झांशी शहर हस्तगत झाल्यापासून सुमार अकरा महिने उत्तर हिंदुस्थानांत इंग्रज बिलकूल नव्हता असें ह्मटलें तरी चालेल. काल्पी खालचा छावणी लष्कराचा मुलूख तात्याटोपे याचे ताब्यांत असून तहशीलदार वगैरे नेमून दिवाणी मुलकी सर्व कामें सुरळीत चालली होती. नंतर इंग्रज लोकांच्या विलायतेहून पलटणी आल्यावर मद्राशी काळ्या पलटणी बरोबर घेऊन हैद्राबादेचे निजामापासून पांच हजार स्वार घेऊन शिंदे होळकर गायकवाड घोरपडे वगैरे सरदाराच्या मदती घेऊन कप्तान साहेब* मुंबईहून निघाला तो जरनेली झेंडा फडकावून खानदेश सातपुडा वगैरे मुलुखाचा बंदोबस्त करीत चालला. महूचे छावणींत कांहीं दिवस राहून इंदूरचे राज्यांत कोठें कोठें बदमाश लोकांनीं बखेडे केले होते ते सर्व मोडून टाकले.

झांशीपासून पश्चिमेस वेत्रवती नदीजवळ बाणपूर म्हणून एक लहानसें संस्थान आहे तेथील राजा लक्ष्मीबाईचा मानलेला थोरला भाऊ होता. तो दंगा करून पलटणी लोकांस आश्रय देऊन राहिला होता. त्यानें असा विचार केला कीं या शहरावर इंग्रजाची व आपली लढाई होणार त्यापेक्षां शहरचे लोकांस

* सर ह्यू रोज.

येथून जाण्याचा हुकूम देऊन आपलें कुटुंब अर्थासहीत झांशी येथें रवाना करावें. त्याप्रमाणें कप्तान साहेब जवळ आला अशी बातमी लागताच आपली रयत बोलावून आणून त्यांस कळविलें "की येथें थोडके दिवसांत जग होणार सबब तुह्मी येथून निघून कोठें तरी ग्रामांतरी जाऊन आपली व्यवस्था पाहावी." नंतर राजानें आपलीं माणसें व अर्थ घेऊन झांशीस येऊन राणीचे स्वाधीन केलीं. तेथें त्यांस स्वतंत्र वाडा देऊन माणसें तैनातीस ठेऊन बाईसाहेबांनीं त्याचा योग्य बंदोबस्त केला. नंतर राजा बाणपुरास परत गेला तो लवकरच इंग्रजी फौज बाणपुरावर आली. शहरास वेढा देऊन सात दिवसपर्यंत लढाई झाली. अखेरीस इंग्रज बहादुरांनीं शहर हस्तगत करून घेऊन दोनप्रहर बीजन करून शहरांत आपले नांवाची द्वाही फिरविली व राज्य निर्भय केलें. बाणपुराचा राजा राहिलेली फौज घेऊन शहरांतून निघून जाऊन वेत्रवतीचे बेहड्यांत दबा धरून बसला. वेत्रवतीचे कांठीं मोठमोठें बेहडे ह्मणजे ज्यांचा हजारों फौज राहील अशा पडलेल्या आहेत. इग्रजांनीं बाणपूर घेतलें व राजा जिवत असून कोठें तरी पळून गेला आहे, ही बातमी झांशीस समजताच गडबड होऊन गेली. झांशीवर लढाई करावयाची हा निश्चय बाईसाहेबांनीं करून तटबंदीच्या तयारीस लागल्या. फौजेंत लोक जास्तो ठेऊन तटावर दाट सारखी फौज लानिशी व बुरुजावरून मोठाल्या तोफा लावून ठेविल्या. दारूगोळ्याचें सामान जारीनें तयार करविण्याचे कामावर लालुभक्षी यास नेमिलें. गरीब लोकास पुढें खाण्यास मिळणार नाहीं सबब खंडो-

गणती चुरमुरे व फुटाणे भाजून ठेविले. शहरांत सर्व सामग्री भरून ठेविली. गणपतांचे देवालयांत प्रसंग पडल्यास भोजनाचें मुसद्दूर ठेवण्याचा विचार ठरवून तूप, साखर, कणिक, तांदूळ वगैरे सामानाची तजवीज करून ठेविली. खजिन्यांत सर्व खर्चाला पुरे इतकें द्रव्य नव्हतें ह्मणून राजवाड्यांत जितकीं मोठमोठीं पातेलीं, हांडे, घागरी, डबे, घगाळें वगैरे रुप्याची भांडीं होतीं तीं सर्व टांकसाळेंत पाठवून हजारों रुपये पाडविले. लढाईंत आपणास जय यावा ह्मणून परमेश्वरप्रीत्यर्थ अनुष्ठानें देवालयांतून सुरूं केलीं. काल्पीस रावसाहेब व तात्याटोपीस पत्रें लिहून मदत मागितली. याप्रमाणें ती शूर बायको यत्किंचितही न डगमगतां मोठ्या शांततेनें व हुशारीनें शहरचा बंदोबस्त करून राहिली.

इकडे इंग्रजसरकारची फौज सर्व बुंदेलखंडाचा बंदोबस्त लावून झांशीवर पश्चिमेस दीड कोशावर येऊन थडकली. तेथें डेरे, राहुट्या वगैरे देऊन कप्तानानें स्वाराबरोबर बाईसाहेबास पत्र दिलें. ते दिवाणजी घेऊन किल्ल्यांत आल्यावर पांच चार मुत्सद्दी व बाईसाहेब एकत्र होऊन पत्राबद्दल विचार करूं लागले.

पत्रांत मजकूर असा होता कीं, “बाईसाहेबांनीं खुद्द बरोबर लक्ष्मणराव दिवाणजी, लालूबक्षी, मोरोपंत तांबे वगैरे आठ असामींचीं नांव लिहिलीं होतीं त्यांस घेऊन मला येऊन भेटावें. याशिवाय दुसरे कोणीही बरोबर आणू नये व कोणतेंही हत्यार कोणतेंही आणूं नये. आजपासून दोन दिवसांत भेटावें. पलीकडे भेटूं नये.” झांशीस लढाई द्यावयाची हा निश्चय अगोदर झालाच होता. फक्त पत्रोत्तर कसें द्यावें याचाच विचार होऊन खालील जबाब पाठवून

दिला. " भेटीस कशास बोलाविलें आहे व दगा होईल कीं नाहीं याचा पत्रांत कांहींच खुलासा नाहीं. संस्थानचे चालीप्रमाणें हत्तेरबंद लोक बरोबर घ्यावयाचे ते लोक घेऊन दिवाणजी भेटीस येतील. मी बायकोमनुष्य, माझे येणें होणार नाहीं. याजवर आदली मर्जी. " असा मजकूर लिहून बाईसाहेबांची सही होऊन लाखोटा त्याच स्वाराबरोबर इंग्रजाचे गोष्टांत पाठवून दिला. पत्रोत्तर पाहून फौज परत दतियावर गेली व तेथें झांशीस वेढा देण्याची सर्व तयारी केली. डंघाईचे मुलुखाकडे ह्मणजे काल्पीचे दक्षिणेस पंचवीस कोशावर एकदोन अफिसराबरोबर फौज रवाना केली. पेशवे व तात्याटोपी यांनीं झांशीवाली बाईचे मदतीस येऊं नये ह्मणून त्यांजबरोबर लढाई नेहमीं सुरूं ठेवावी हे काम त्यांजकडे सोंपवून दिलें. इकडे बाईसाहेबांनीं चांगला मनुष्य पाहून त्याजबरोबर पाच स्वार देऊन काल्पीस रावसाहेबांकडे रवाना केला. त्या लोकांनीं श्रीमंतास झांशींतील सर्व मजकूर कळवून अशी विनंती केली कीं, बाईसाहेब आपले भरंवशावर लढाई करीत आहेत. आपण बाहेरून येऊन इंग्रजांबरोबर लढावें व आह्मीं आंतून लढतों ह्मणजे आपणांस जय येऊन इंग्रजांचें कांहीं चालणार नाहीं. रावसाहेबांनीं त्यांस सर्व कबूल करून आश्वासन देऊन परत पाठवून दिलें. इंग्रज सरकारानें झांशीचे भोंवतालीं गावोगांवीं जाहीरनामे लाविले कीं झांशीवर जंग होणार आहे याजकरितां सर्व लोकांनीं सावध असावें. शहर घेतल्यावर तीन दिवस विजय चालेल. त्याचा नियम असा कीं, पांच वर्षांवर व ऐंशी वर्षांचे आंत सर्व पुरुष मारले जातील याजकरितां जंगाचे दिवसांत तेथें कोणी जाऊं नये.

भाग ९ वा.

झांशी येथील उत्तर वृत्त.

हता वा प्राप्स्यासि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ १ ॥

चैत्र महिना अगदीं सरत आला, उन्हाळ्याची झांक मारूं लागली, वसंत जाऊन ग्रीष्म ऋतूचा अंमल बसूं लागला. नंतर झांशी येथें थोडक्याच दिवसांत जंग होणार हे निश्चित झाल्यावर कांहीं कांहीं. सावध ग्रामस्थांनीं आपला अर्थ व बायकांमुलें ग्वाल्हेरीस रवाना केलीं. याजमुळें शहरांत हळदी कुंकवाची गर्दी व्हावी तशी झाली नाहीं जिकडे तिकडे उदास वृत्तीनें लोक वावरत होते. बाईसाहेबांनीं मनांत आणिलें कीं पुन्हां हळदकुंकू करण्याची वेळ येईल तो सुदिनच समजला पाहिजे; याजकरितां महालक्ष्मीची सेवा, वैभव आहे तो पूर्ण करून घ्यावी. असें मनांत आणून राजवाड्यांत हळदकुंकवाची मोठी कडाक्याची तयारी केली. चार खंडी हरभरे एका लहानशा हौदांत भिजत घातले. आणि शुक्रवारचा बेत धरून सकाळी तमाम शहरचे स्त्रियांस बोलावणें केलें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, मराठे सर्व जातीच्या स्त्रियांस पाचारण करून सर्वांस हळदकुंकू, सुवासिक फुलें, चंदनलेप, खिरापत, हरभ्याचे ताम्हणभर दाणे, गुलाब अत्तर व पानसुपारी देऊन संतुष्ट केलें. असें समारंभाचें हळदकुंकू मी कोठेंच पाहिलें नाहीं व पुन्हा पहाणारही नाहीं. सर्व जमाव्या स्त्रिया उत्तम प्रकारची वस्त्रें नेसून व अलंकार घालून दुपारचे दोन वाजल्यापासून रात्री नऊ वाजेपर्यंत

किल्यांत एकसारख्या येत होत्या. त्यांत सरदार लोकांच्या स्त्रिया मेण्यांत पालखींत बसून भालदार चोपदार शिबंदी लोकांसहित थाटानें येत असत. स्त्रियांस हळदकुंकू वाटण्याकरितां सुमारें शंभर बायको उभी असेल. लाखों फुलें वेचलीं, खंडोगणती खिरापत लागली. दिवाणखान्यांत उंच एका मजल्याइतकी गौर मांडून उतरत उतरत जमीनीपर्यंत एकसारखें सामान ठविलें होतें. सर्व प्रकारचे आपूप जिन्नस, फळफळावळ, रुप्याचें सामान, झांशी येथील प्रसिद्ध पितळी सामान, व कागदाचीं कोरींव चित्रें, नानातऱ्हेची मातीचीं चित्रें, लांकडी सामान, कुड्यतून बारीक झाडें वगैरे शेंकडों जिन्नस गौरीपुढे ठविले होते. जिकडे तिकडे किनखापाचे पडदे असून जरीचे छत लाविलें होतें, व हांड्याझुंबराचा तर चकचकाट करून सोडिला होता.

चैत्र महिना सरून वैशाख लागला, तों एके दिवशीं शहरचे दक्षिण अंगास मैदानांत तंबू दिसूं लागले व जिकडे तिकडे बारीक आगट्या पेटल्या. तेव्हां आम्ही सायंकाळीं किल्याचे उंच बुरुजावरून पाहूं लागलों तों शहरचे चारी अंगांस ठिकठिकाणीं तंबू मारून पलटणी उतरल्या आहेत, आगटी पेटल्या आहेत व जिकडे तिकडे चळवळ सुरू आहे, असें दृष्टीस पडलें. परंतु देखाव्याप्रमाणें मनुष्य कमी आहे असा आम्ही तर्क बांधला. रात्रौ बातमीदार आला त्यानेंही सांगितलें की मनुष्य सरंजाम दिसतो त्यापेक्षां कमी आहे. सुमार लढवाई साठ हजार आहेत. बाकी बाजारबुणगे पुष्कळ आहेत. वेढा येऊन पडला असें समजतांच रात्रौ बाई-साहेबांनीं किल्याचे तटावर व शहरचे तटावर फिरून बंदोबस्त

केला. सर्व बुरुजावर मोरचे बांधून तोफा टेवून रोखून ठेविल्या व गोलंदाज नेमून दिले. शहरचे तटावर जंग्या जंग्यातून कडा-मिनी घेऊन शिपाई लोक उभे केले. ठिकठिकाणीं दरवाज्याजवळ शिपाई लोकांच्या टोळ्या टेवून वर विश्वासू व दक्ष सरदार नेमून दिले.

झांशी शहरचे बाहेर चोंहीकडे मोठमोठीं मैदानें आहेत म्हणून सांगितलेंच आहे. दुसरे दिवशीं सकाळीं शहराचा तट आटोक्यांत येई असा मोरचा बांधण्याकरितां इंग्रजाचे स्वार पांच पंचवीस दवडत दवडत जवळ आले, ते किल्याचे पश्चि-मेस येऊन माऱ्यांत आले असें पाहून गोलंदाजानें नेम धरून तोफेस बत्ती दिली. त्यायोगानें पांच सहा स्वार मरून उधळून गेले. याप्रमाणें पहिले दिवशीं इंग्रजी फौज शहरास चोहोंबाजूनें मोरचे बांधण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु तटावरून व बुरुजावरून दक्ष व हुशार गोलंदाज असल्यामुळें माऱ्यांत माणसें पुढें आलीं कीं, बत्ती देऊन फडशा उडवून टाकीत. याप्रमाणें दुसरे दिवशींही मोरचा बांधण्याकरितां इंग्रज झटत होता परंतु मोरचा लागू होईना. शहरांत जुने म्हातारे लोक होते त्यांस शहरास व किल्यास कोठें मोरचा बांधून लागू होतो हे माहीत होते परंतु ही माहिती फार थोड्यास होती. आंतील फितुराचे योगानें म्हणा किंवा बाहेरील कोणी माहितगार इंग्रजास मिळाला म्हणा, तिसरे दिवशीं ही माहिती त्यास मिळाली मग रात्र पडल्यावर तीं तीं ठिकाणें साधून मोरचे बांधून अवशों चार घटका रात्रीस किल्याचे पश्चिम बाजूवर दक्षिणेकडील अंगानें गरनाळीं तोफ चालू झाली. इकडून

वायव्य बाजूनें ही तोफ गोळा टाकूं लागली. शहरावर चार तोफा लागू झाल्या. अशा तोफा चालू झालेल्या पाहून बाईसाहेबांस अति दुःख झालें व निराशेची पहिली पायरी त्यांस लागली. परंतु न डगमगतां लोक जास्ती ठिकठिकाणीं ठेऊन आपण स्वतो अन्नपाण्याची काळजी न करितां किल्यावर व शहरचे तटावर खपूं लागल्या.

शहरावर तोफांचे गोळे सुरू झाल्यापासून रयतेस अति त्रास होऊं लागला. एखादां गोळा रस्त्यांत पडला ह्मणजे तो फुटून पांच पंचवीस मनुष्यें जखमी होत व दहा पांच मरत. याशिवाय घरा- वर गोळा पडला ह्मणजे लहान घरें धक्यानें कोसळून जात, कांहीं घरें जळून जात असत. मग त्यांत जीवाचा व वित्ताचा अनर्थ होण्याचा संभव असे. परंतु बाईसाहेबांनीं शहरांत बंब तयार करून ठेविले होते. आग लागली कीं ती, बंबानीं विझवीत असत. शह- रचे व्यापार अगदीं बंद झाले. मनुष्यास इकडे तिकडे फिरण्याव- याची धास्ती वाटूं लागली. याप्रमाणें शहरांतील लोकांसच काय पण किल्यावरही अति त्रास होऊं लागला. किल्यांत वाड्याचे गच्चीवर गोळा पडला ह्मणजे तेथें तो फुटून मोठा आवाज होऊन त्याच्या सात आठ कपच्या उडत व त्या जवळचे माणसांस जखमी करीत. नंतर तोच गोळा गच्ची फोडून खालचे मजल्यावर पुन्हां आवाज होऊन फुटे व पुन्हां कपच्या उडोन शेजारचे माणसांचा प्राणघात करी. नंतर पुन्हां तक्तपोशी फोडून त्याचे खालचे मजल्यावर फुटून नासाडी करीत असे. शेवटीं मोठा आवाज होऊन आंतून खिळे कातरी वगैरे छरे लाल झालेले उडून फार मनुष्यें जाया होत. अशा

प्रकारचे किल्ले तोडण्याचे गोळे इंग्रज सरकारानें बहुत खराब केले. ते गोळे फार खर्च करून तयार केलेले असत. एक दोन गोळे फुटल्यावांचून तसेच पडले होते, ते आह्मीं वजन करून पाहिले ते साठ पासष्ट पक्के शेर भरले. याप्रमाणें इंग्रजाजवळ कसबी गोलंदाज व उत्तम दारूगोळ्याचें सामान असल्यामुळें किल्यांत व शहरांत फार नासाडी झाली. परंतु बाईसाहेबांनी गरिबगुरीबाचें दुःख होईल तितके कमी करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. दक्षिणी ब्राह्मणांकरितां गणपतीचे देवालयात अन्नछत्र सुरू केलें. इतर लोकांकरितां सदावर्त चालू केलें. या खेरीज गरीब लोकांस चणे, फुटाणे, चुरमुरे वाटू लागले.

इकडे बाईसाहेबांनींही आपलेकडून शिकस्त केली. इंग्रजाकडील लोक पुष्कळ मारले चवथे दिवशीं दोनप्रहरीं किल्यावरच्या दक्षिण बुरुजाची तोफ इंग्रजानें बंद केली. त्या तोफेवर माणस ठरेनासे झालें तेव्हां लोक फार हवालदील झाले. तेव्हां पश्चिमेकडील बुरुजावरचे गोलंदाजानें मोरयांतून तोफ काढून दक्षिणेकडे मोर्चा बांधून व दुर्बिणीनें उत्तम संधान राखून तोफेस बत्ती दिली आणि तिसरे आवाजासरसा इंग्रजाकडील उत्तम गोलंदाज ठार केला व दक्षिणची तोफ चालू करून इंग्रजाची तोफ बंद केली. तेव्हां बाईसाहेबांनीं संतुष्ट होऊन गोलंदाजास ऐंशी तोळ्याचा चांदीचा तोडा बक्षीस दिला.

रात्रीचे प्रहरीं शहरावर व किल्यावर गोळे पडत त्याची फार भयंकर शोभा दिसे. पन्नास साठ शेर वजनाचा जरी गोळा असे तरी गरनाळी तोफेंतून उडाल्यावर लहान चेंडूसारखा व खदिरांगारासारखा लाल दिसे. दिवसास सूर्याचे तेजामुळें

गोळे साफ दिसत नसत परंतु रात्रीच्या काळोखांत ते लाल-भडक गोळे चेंडूफळी सारखे इकडून तिकडे उडतांना दिसत. मनुष्यास असें वाटावें कीं हा गोळा आतां मजवर येऊन पडेल परंतु तो गोळा सात आठशें कदम पुढें जाऊन पडत असे. याप्रमाणें रात्रंदिवस युद्ध होऊन शहर जर्जर झालें. पांचवे साहवे दिवशीं या प्रमाणेंच युद्ध झालें. प्रहर दीड प्रहर पर्यंत बाईसाहेबांचा जय होऊन इंग्रजांचा फार नाश होत असे. व त्यांच्या तोफाही कांहींवेळ बंद पडत. नंतर कांहीं वेळानें इंग्रजांचा जय व्हावा. पलटणी लोक हवालदील होऊन बाईसाहेबांच्या तोफा बंद पडाव्या. सातवे दिवशीं सूर्यास्त पासून पश्चिम बाजूची तोफ बंद झाली. तेथें मनुष्य ठरेना व शत्रूच्या तोफेनें मोरचाही पाडून टाकला. नंतर रात्रीं हुशार गंवडी लोक आणून युक्तीनें घोंगडी पांघरून हळूहळू बुरुजांवर चढविले. व विटा वगैरे सामान खालपासून मनुष्याची माळ लावून त्यांस जमिनीवर निजवून त्यांकडून पोंचविलें नंतर त्या गंवड्यांनीं निजून निजून मोरचा बांधला. याप्रमाणें इंग्रजांस कळूं न देतां मोरचा बांधल्यावर तोफ मोरच्यावर ठेवून चालू केली. तेव्हां इंग्रजाकडील लोक गाफिल होते. त्यांचे फार नुकसान होऊन त्यांच्या दोन तोफा प्रहरपर्यंत बंद झाल्या.

उजाडते आठवे दिवशीं इंग्रज फौजेनें शंकर किल्यावर मारा सुरूं केला. इंग्रज सरकारापाशीं किल्ले दुर्ग यांचे वेढ्यांत उपयोगी पडणाऱ्या अति मौल्यवान् दुर्बिणी होत्या, त्या इतक्या चांगल्या असत कीं, अति दूरचा देखावा अगदीं जवळ व स्पष्ट दिसत असे, व कोणचे मनुष्य कोठें काय काम करीत आहे हें दिसे. अशा

दुर्भिणी लावून किल्यांत पाण्याची जागा होती ती रोखून त्याजवर तोफेचा भडिमार चालू केला. त्यांत प्रथम रांगडे ब्राह्मण सहासात कावडी घेऊन पाण्यास गेले होते. त्यापैकीं चार असामीस देहांत प्रायश्चित मिळून बाकीचे कावडी टाकून पळून गेले. याप्रमाणें प्रहरभर पाणी न मिळाल्यामुळें स्नानादि कर्मे अडकून राहिलीं. किल्यांत पाण्याचा मोठा हाकांटा झाला. तेव्हां पश्चिम व दक्षिण बुरुजावरचे गोलंदाजांनी ज्या तोफा शंकर किल्यावर चालू होत्या त्याजवर एकदम भडिमार करून त्या बंद पाडल्या. मग हौदावर पाणी भरण्याची मोकळीक होऊन स्नान भोजनाची व्यवस्था लागली. नंतर जेवण होऊन कांहीं वेळ गेला नाहीं तों एकदम मोठा आवाज होऊन जिकडे तिकडे धूर व धूळ उसळली. त्यामुळें दशदिशा गुंग होऊन कोणास दिसेनासें झालें. सर्वांचे पोटांत धस्स होऊन काय झालें याची धास्ती पडून गेली. मग दोन घट-केनें धूर नाहींसा होऊन चौकशी करूं लागलों तों वाड्याचे समो-रचे मैदानांत दारूचे कारखान्यांत तीस असामी पुरुष व आठ बा-यका मरण पावलेल्या दृष्टीस पडल्या व चाळीसपंचेचाळीस माणसें भाजून जखमी पडलीं होतीं. चिंचेचे मैदानांत दारूचा कारखाना सुरू होता. दोन मण दारू झाली म्हणजे बुरुजाखालीं तळघरांत नेऊन ठेवावी. त्या कारखान्यांत गोळा पडतांच तेथें दारू होती ती पेटली व तसेंच दारुचे बारीक बारीक कण सर्व धूळभर पसरले होते ते पेटून त्याजबरोबर धूळ उधळली. अष्टम दिवशीं फार कहर झाला युद्ध फार तुंबळ झालें. वीर मोठमोठ्यानें आरोळ्या देत होते. बंदुका कडामिनीचे व तोफाचे आवाज अगणित होत होते. शिंगें,

कणें बिगुल जिकडे तिकडे वाजत होते. धुळीनें धुरानें व नाना प्रकारच्या ध्वनीनें सर्व दिशा भरून राहिल्या होत्या, इंग्रज फौजेनें फार शिकस्त केली. रात्रीं आकाशांतून तोफेचे लाल गोळ्यांची शहरावर एकसारखी वृष्टी चालली होती. शहरांत हजारो माणसें मरण पावली. बाकीची जिवाचे आशेनें कोठें वळचणीला, कोठें घरांत पिच्छाडीस दडून राहिली. तटावरचे शिपाई गोलंदाज पुष्कळ मेले व त्याचे जाग्यावर दुसरे उमे केले. बाईसाहेबांस फार मेहनत पडत होती. चोहींकडे नजर ठेऊन जी जी उणीव पडेल ती स्वतां पुरविण्याचा हुकूम करीत होत्या. परंतु त्यांस अति दुःख होऊन घोर काळजीही लागली होती. पेशव्यांकडून मदत कां येत नाहीं या विचारांत गुंग पडल्या. शेवटीं लाल्ह भाऊ ढेकरे व व भया उपासने यांचे विचारें रावसाहेब पेशवे याजकडून मदत लवकर यावी ह्मणून शंभर ब्राह्मण गणपतीचें मंदिरांत अनुष्ठानास बसविले. नंतर बाईसाहेबांस कांहीं आराम वाटून सर्व दिवसभर थकल्या होत्या ह्मणून दिवाणखान्यांत किंचित् अंग टाकिलें तों एक भयंकर स्वप्न दृष्टीस पडलें तें असें, कोणी एक सुवासिनी मध्यम वयाची, गौरवर्णाची, नाक सरळ, कपाळ मोठें, डोळे काळे व विशाळ अशी रूपवान् स्त्री अंगावर सर्व मोत्याचे दागिने घालून तांबडें मोठें काठाचें लुगडें नेसून अंगांत पांढरी रेशिमकांठी चोळी घालून पदर बांधून ओंच्याची कांस मारून किल्याचे बुरुजावर उभी आहे व मोठ्या कठोर मुद्रेनें तोफेचे लाल गोळे झेलीत आहे. व गोळे झेलतां झेलतां काळे ठिक्कर पडलेले हात, बाईसाहेबांस दाखवन म्हणते आहे कीं मीच म्हणून हे गोळे झेलीत आहे. असें स्वप्न

पाहून बाईसाहेब दचकून जाग्या झाल्या व आश्रित मंडळींस स्वप्न सांगितलें तें ऐकून सर्वांस आश्चर्य वाटलें.

इकडे तात्याटोपी काल्पीहून पंधरा हजार फौज घेऊन निघाला तो मजलदरमजल दबाने कूच करून झांशी जवळ येऊन पोंचला. व रातोरात मोरचे बांधून तोफेस बत्ती दिली. इकडून कप्तान साहेबही इंग्रजी फौज घेऊन त्याजपाशीं लढावयास येण्याचा बंदोबस्त करून आला. तो दिवस दहावा होता, झांशीतील सर्व लोक त्या लढाईवर झांशीचा परिणाम अवलंबून असल्यामुळें मोठ्या भीतीनें लढाईचा परिणाम काय होतो हें पाहण्यास तटावर जमले होते. दोन्ही पक्षाचे शिपाई जिवापाड मेहनत करीत होते. कोणास भान राहिलें नव्हतें. समोरासमोर लढाईचे प्रसंगांत पायदळा बरोबर पायदळ, स्वाराबरोबर स्वार लढत होते व सर्व रणांत बिगूल शिंगें बंदुका तोफा इत्यादिकांचा आवाज धुंद भरून राहिला होता. झांशीवाली बाई व तिचे सरदार तटावरून दुर्बिणी लावून पहात होते. परंतु झांशीच्या दुर्दैवानें ह्मणा अगर तात्याटोपीचे कमी कसबानें ह्मणा किंवा हिंदु शिपाई लोक नादान व नाशूर असल्यामुळें ह्मणा, तात्याटोपीची फौज फुटूं लागून शिपाई पळ काढूं लागले. इंग्रज फौजेनें तोफा मोरच्यांतून काढून पाठलाग करण्यास आरंभ केला. रिसाल्याच्या स्वारांनीं एकदम हल्ला केला. तात्याटोपी स्वतां चोवीसपन्ही छत्तीसपन्ही तोफा टाकून रण सोडून पळून गेला. इंग्रजी फौजेचा जयजयकार होऊन त्यांची हिंमत दुप्पट झाली व लढाईचें सामान मिळालें. पेशव्याचे फौजेचा मोड होऊन तिनें पळ, अपयश, व दुःख यांचा स्वीकार केला. व झांशी-

वाल्याच्या फौजेंत हाहाःकार होऊन सर्वांचीं मनें होरपळून जाऊन दुःख, भीति, निराशा यांचा एकामागून एक अंमल बसला.

परंतु निराशेची शक्ति कांहीं विलक्षण आहे. आतां बहुतकरून झांशी इंग्रजाचे हातीं पडेल व ते आमची दया करणार नाहींत ही कल्पना मनांत येऊन शिपाई लोकांस उलट अधिक वीरश्री चढली. बाईसाहेबांनीं सरदार लोक जमवून ठरविलें कीं, आजपर्यंत झांशी लढली ती पेशव्याचे बरोबर लढली नाहीं व आतां पुढेंही तिला त्यांच्या मदतीची जरूर नाहीं. असा निश्चय करून सरदार लोक व बाईसाहेब स्वतां तटाच्या बंदोबस्ताकरितां पुन्हां तटावर मेहनत करूं लागल्या. त्या रात्री इंग्रज गोलंदाजांनीं शिकस्त केली. शहरावर व किल्यावर तांबडे लाल गोळ्यांचा वर्षाऋतूंतील पर्जन्याप्रमाणें वर्षाव केला. किल्यांतील सर्व लोक रात्रभर जागरण करीत बसले होते.

उजाडता दिवस अकरावा युद्धास येऊन पोचला. बाईसाहेबांनीं स्वतां तरवार बांधून गोलंदाज लोकांस बक्षिसें देऊन ज्या तोफा बंद झाल्या होत्या त्या सर्व सुरू केल्या. इंग्रज फौजेनें सर्व गरनाळी तोफा किल्यावर सुरू केल्या तेव्हां वाड्यांत आकांत होऊन गेला. इतक्यांत एक मोठा व सुस्वर ध्वनी ऐकू आला. पाहतात तों दुसरे मजल्यावर गणपतीचें मखर भाद्रपद मासीं व नवरात्रांत उत्साहांत कथा कीर्तन वगैरे करण्याकरितां पूर्वापार केलेलें होतें तेथें सर्व ऐने माहालच होता. सर्व जाग्यास आरसे ठखनौचे लाविले होते व छतासही आरसे होते व काचेची झाडें व हांड्या गलासे वालछते लावून जागा भरली होती. त्या जाग्यावर तीन मजले होते तेथें गरनाळी तोफेचा गोळा पडून अवाज फार मोठा झाला आणि तोच गोळा खालील मजल्यावर

पडतांच मोठा आवाज होऊन त्यांतील खिळे छरे वगैरे उडाले तेणें-करून तेथें चार माणसें मरण पावलीं व नऊ मनुष्यें जखमीं झालीं आणि आवाजाबरोबर खालील कांचाचा सुस्वर आवाजानें खळखळ चूर होऊन राशी पडल्या; हांडी ग्लास किंवा ऐना एकही राहिला नाहीं.

त्या दिवशीं शेंकडों तोफेचे गोळे वाड्यावर पडत होते परंतु वाड्यास इजा झाली नाहीं. गोळा गच्चीवर हापटून तो गोळा तीन छतें तोडून खाली येऊन पडून शांत होत असे परंतु जुना बादशाई चुना कमाविलेला असल्यानें गोळ्यापुरतें मात्र भोक पडून गोळा खालील मजल्यावर पडे परंतु भोकापेक्षां जास्त काम तडावलें नाहीं व फुटलेंही नाहीं व मजल्यास गोळ्यामुळें चाळणीस जशी भोंकें असतात अशीं भोंकें दरोबस्त ठिकठिकाणीं पडलीं. वाड्याचे दरएक दालनास गोळे अति पडूं लागले तेव्हां सर्व मनुष्यें घाबरून मध्येंच एक खोली तोही त्या खोलीस निर्भय मानून त्या खोलींत शिरलीं कारण की त्या खोलीवर पांच मजले होते. त्या खोलींत मनुष्यें जमतां जमतां चौसष्ट माणसें जमलीं आणि खोलींत गर्दी झाली. त्यांत आम्हीही शिरलों होतों दासी बायका ही त्यांतच होत्या सर्व माणसें उभींच होती उन्हाळीचे उष्णतेमुळें व गर्दीमुळें व जीवाचे भीतीमुळें अंगांस घाम फार सुटला होता श्वास सोडण्यास देखील जागा नव्हती आम्ही अगदीं घाबरून गेलों होतों. त्या खोलींत एकंदर चार घटका होतों. मृत्यु भयाहून दुसरें भय नाहीं. सर्वांचे जीव कासा-वीस झाले इतक्यांत बाईसाहेबांकडील गोलंदाजांनीं गर्दी उडवून इंग्रजांच्या तोफेवर गोलंदाज वगैरे मनुष्यें ठरूं दिलीं नाहीत.

तेणेंकरून वाड्यावर गोळे पाडण्याचे नाहीसें झालें. मग त्या खोलींतून सर्व लोक बाहेर निघाले.

याप्रमाणें प्रहर दोन प्रहर अति संकट येऊन पडे. तेच दिवशीं रात्रीं एकांतांत अंथरुणावर पडलों असतां माझे मनांत अनेक विचार येऊं लागलें. मी येथून जिवंत सुटतों कसा व मला घरचीं माणसें भेटतात कशीं ? इतक्यांत हरीपंताची व त्याच्या शपथेची आठवण झाली. असे अनेक विचार येऊं लागले तेव्हां या संकटांतून वैजनाथेश्वराशिवाय दुसरा कोणीही पार पाडणारा समर्थ नाहीं असा पक्का भरंवसा ठेऊन त्याचा मनोमय धांवा करीत स्वस्थ पडलों.

याप्रमाणें अकरा दिवस लढाई एकसारखी चालली होती. तरी बाईसाहेबांचे मेहनतींत व हिंमतींत यत्किंचितही फरक पडला नाहीं शाबास त्या बायकोची. त्या रात्रीं नेहमींप्रमाणें बाईसाहेब स्वतां शहरचे तटावर व किल्यावर फिरून बंदोबस्त ठेवीत होत्या. इतक्यांत बातमीदारानें असें कळविलें कीं, इंग्रजसरकारानें झांशीवर दोन अडीच लक्ष रुपयांची दारू खर्च केली. तरी परिणामीं जय येईल असें दिसत नाहीं. व दारूगोळाही संपला आहे. सबब उदईक प्रहर दिवस लढाई करून लष्कर उठून जाईल. ही बातमी ऐकून बाईसाहेबांस किती आनंद झाला असेल याची कल्पना एक त्यांचे मनास ठाऊक. त्यांचे तोंडावर जास्ती टवटवी येऊन त्यांची शक्ति व हिम्मत दुणावली. त्या रात्रीं दोहोंच्या सुमारास त्यांस गाढ झोंप आली. पण बाईसाहेबांचें दैवचटित चांगलें नव्हतें. पहाटेच्या सुमारास एकाएकी शहरच्या दक्षिण बाजूच्या तटावरील तोफ बंद पडली होती तेथून एक बातमीदार येऊन त्यानें बाई-

साहेबांस जागे केलें. त्याची हकीकत ऐकून सर्वांच्या पोटांत धस्स झालें; व आमचे प्राण अंतळे आंत विरघळून गेले. हरहर! आठ्यायशीं प्रहर मोठ्या शूरत्वानें लढून सरशेवटीं शहर इंग्रजानें सर केलें. आह्मीं साहावे मजल्यावर जाऊन पाहूं लागलों; ते वेळेस सकाळचे अंधुक अंधुक दिसूं लागलें होतें. हजारों मजूरलोक डोक्यावर गवताचे भारे घेऊन शहरच्या तटाकडे येत आहेत, व त्या भाऱ्यांच्या आश्रयानें मागें बाजूनें गोरे शिपाई चालत आहेत, असें दृष्टीस पडलें. पाहतां पाहतां गवताचे भारेवाले तटापर्यंत येऊन पोंचलें. भारेवाल्यांनीं तटापाशीं येऊन भराभर डोकीवरचे भारे एकावर एक टाकून तटाशीं जिन्यासारखी वाट रचली त्याजवरून झराझर गोरे शिपाई तटावर चढले. तटावर बाईसाहेबांनीं जे शिपाई होते त्यांपैकीं कांहींनीं पळ काढला, कांहीं शूर होते त्यांनीं गोरे शिपायास हरकत केली, परंतु ते थोडे असल्यामुळें कापले गेले आणि दहा बारा मिनिटाच्या आंत हजारो गोरेलोक शहरच्या दक्षिणतटावर दिसूं लागले.

प्रथम बाईसाहेबांस हकीगत समजली त्या वेळेस त्यांस सहस्र विंचू चावल्याप्रमाणें एकदम दुःख झालें. त्यांच्या तोंडावरचें पाणी पळालें. अक्कल गुंग झाली, आतां झोंप घेण्यापूर्वी बातमी ऐकिली काय, आणि ह्या बातमीचा अर्थ काय, अशा भीति, दुःख व आश्चर्य यांच्या घोटाळ्यांत पडून पुढें काय करावें, याचा विचार न सुचतां शून्य दृष्टीनें बाहेर येऊन दक्षिण बाजूकडे पाहतात. तों हजारों गोरे शिपाई तटावर दृष्टीस पडले. बाईसाहेब आज्ञा भट भिक्षुकांसारख्या नादान नव्हत्या. अक्कल गुंग व भीति यांचा क्षणभर

पगडा पडला होता तो दूर होऊन बाईसाहेबांस शूरत्वाचा आवेश चढला. व विलायती ह्मणजे मुसलमान आरबा सारखे बहुत दिवसाचे नोकर सुमारें दीड हजार तरवारबंद होते ते बरोबर घेऊन स्वतः तावडतोब हत्यारबंद होऊन किल्याचे खालीं उतरल्या व मोठ्या दरवाज्यांतून बाहेर पडून दक्षिण बाजूकडे वळल्या. शहरचे दक्षिण तटावरून आंत उतरून हजारों गोरे आले त्यांच्याही तरवारी म्यानांतून बाहेर पडल्या होत्या. बाईसाहेब सर्वांचे मागें चालत असतां आवेशानें हातांत नागवी तरवार घेऊन सर्वांचे मध्यभागीं गेल्या. गोरे लोकांची व विलायती लोकांची गांठ पडतांच एकदम तरवारीचा चकचकाट होऊन लोक एकमेकांत मिसळून गेले. ते वेळेचे युद्धास भारती युद्धाचीच उपमा साजेल. उभयतांची पांच पन्नास अंक मोजण्यासही उशीर लागेल इतके अवकाशांत तरवार चालली व शेंकडों गोरा कापून काढला गेला. बाकी राहिले ते शहराकडे पळून जाऊन झाडाच्या व घराच्या आडून बंदुकेचे बार काढूं लागले. मागूनही दुसरे गोरे लोक येतच होते तेही तरवार न चालवितां दुरून बंदुकीच्या गोळ्या घालूं लागले. ते वेळेस बाईसाहेबांचे पदरचा पाऊणशें वर्षांचा जुना सरदार होता तो पुढें होऊन बाईसाहेबांचा हात धरून बोलूं लागला, "महाराज, या समयीं आपण पुढें जाऊन बंदुकीचे गोळीनें मरणें आणि रांड मरणें बरोबर आहे. गोरे लोक इमारतीचे आड होऊन गोळी घालीत आहेत. शिवाय शेंकडों गोरा शहरांत शिरला असेल. शहरचे सर्व दरवाजे खुले झाले असतील तरी येथें लढण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यापेक्षां आपण किल्यांत जाऊन दरवाजा बंद करून पुढें ईश्वर

युक्ति सुचवील तसें करूं, ही वेळ परतण्याची आहे." असें म्हणून त्यानें बाईसाहेबांस धरून परतविली. व आरोळी देऊन विलायती लोकांसही मागें फिरविलें. बाईसाहेब विलायती लोकांसह किल्यांत येऊन दरवाजा बंद करून अडसर ओढून स्वस्थ राहिल्या.

इकडे गोरे लोक चोंहो दरवाज्यांतून आंत शिरले ते बिजन करीत चालले. जितका ५ वर्षांवर व ८० वर्षांचे आंत पुरुष दिसत चालला तितका गोळीनें अगर तरवारीनें मारीत चालले व एकीकडून शहरास आग लावून दिली. ती प्रथम हलवाईपुऱ्यास लाविली. ते वेळेस शहरांत दुःखाचा जो कल्लोळ उसळून गेला त्यास पारावार नाहीं. मेंढरांच्या कळपांत लांडग्यांनीं उडी घालतांच जशी त्या प्राण्यांची स्थिति होते त्याप्रमाणें लोक भयानें आतुर होऊन जिकडे तिकडे सैरावैरा पळूं लागले. कांहीं पळतां पळतां मुडदे होऊन खालीं गळूं लागले. कोणी या गल्लींत शीर, कोणी घरांत अडचणींत लप, कोणी दाढी मिशा उतरून स्त्रीचा वेष धारण करून बस, कोणी शेतखान्यांत जाऊन लप, याप्रमाणें जशी ज्यास जीव बचाविण्याची युक्ति सुचली तसें तो करूं लागला. गोरे लोक शहरांत शिरून बिजन करूं लागले, असें समजतांच शहराचे मध्यभागीं भिड्याचा बाग होता, त्यांत हजारों लोक चोहींकडून शिरले. तेथें गोरे येतांच सर्व लोक दीन होऊन जमिनीवर साष्टांग नमस्कार घालून करुणस्वरानें बोलूं लागले कीं, साहेब आम्ही निरपराधी रयत आहों. आम्ही लढवई नाहीं. आम्हांस दयाळू होऊन प्राणदान द्यावें आम्हांस मारूं नये. अशी त्यांची करुणा भाक ऐकतांच त्या सर्वत्रांचे नशीबानें गोऱ्यावरील मुख्य आफिसरास दया आली.

त्यानें त्या प्रणतांस अभय वचन देऊन व लागलीच बागाभोंवतीं पहारा ठेवून दरवाज्यास कुलुपें मारिलीं व हुकूम केला कीं बाहेरील लोक आंत येऊं देऊं नये, व आंतले बाहेर सोडूं नये. याप्रमाणें तीं माणसें बायका पोरें मिळून वीस हजार त्या बागेंत वांचलीं गेलीं.

दुसरीकडे गोरे लोक घरांत शिरून मनुष्यांस ठार मारून सोनें व रूपें यांची लूट करूं लागले. घरांत शिरल्याबरोबर पुरुष सांपडला व त्यानें तावडतोब आपला अर्थ गोरे लोकांच्या स्वाधीन केला तर तो जिवानिशीं सुटे. अर्थ लवकर निघाला नाहीं तर त्याचे हाल हाल करीत. कित्येक लोकांचे गळ्यास त्यांचे धोतराचा गळफास करून रस्त्यावर नेऊन मारझोड करीत. त्याचे घरांत खणून पाहात, भितीं फोडीत व अर्थ प्राप्त झाला ह्मणजे त्यास गोळी घालून मारून टाकीत. जो पुरुष अर्थ देऊन सुटला तोच पुन्हां दुसरे गोरे लोकाचे हातीं सांपडला ह्मणजे गोळीनें मारला जावा. गोरेलोकांनीं स्त्रियांस बुद्धिपुरःसर मारलें नाहीं. परंतु कांहीं कुलीनाच्या तरुण स्त्रिया गोरेलोक पुढील दारी आले ह्मणजे ते आपल्यास बाटवतील या भीतीनें मागील दारी विहीरींत जीव देत असत. कोठें असेंही झालें कीं, गोरा घरांत शिरून नवऱ्यास गोळी घालतो आहे तो त्याचे बायकोनें येऊन त्याच्या अंगास वेष्टन करावें. मग गोळी सुटून त्या पतिव्रते स्त्रियेस लागून तिच्या देहाचे जन्मजन्मांतरींचें सार्थक होत असे. गोळी बायकोस लागली असें पाहून गोऱ्यानें पुन्हा गोळी घालून नवऱ्यास ठार मारावें. याप्रमाणें कित्येक दृढ व्रतांच्या स्त्रिया मरण पावल्या, परंतु मुद्दाम स्त्रियांचा प्राणनाश किंवा विटंबना गोरे लोकांनीं केली नाहीं. इतका चांगुलपणा त्या पशु

तुल्य सोजीर लोकांस कोठून येणार हें खरें; परंतु इंग्रज सरकारानें त्यांस दाबांत ठेवण्यासाठीं प्रत्येक सोजिराबरोबर दोन दोन काळे शिपाई दिले होते, त्यांस कपतानसाहेबांच्या असा हुकूम होता कीं कोणी गोरा स्त्रियांचा अपमान किंवा घात करील तर त्यांस तेथेंच गोळी घालून मारून टाकावा. या इंग्रज सरकारच्या दूरदर्शी व न्यायी तजविजीमुळें बहुतकरून स्त्रियांस इजा झाली नाहीं. घरांत शिरल्यावर स्त्री दृष्टी पडल्यास गोरे लोकांनीं तिजपासून दूर उभें राहून तिचे अंगावरील सर्व वस्तवानी उतरून घ्यावी व तिच्यापासून सामोपचारानें जी माहिती निघेल त्याप्रमाणें घर शोधून सांपडेल तें वित्त घेऊन जावें. याप्रमाणें सायंकाळपर्यंत विजन व लूट करून ते यमरूपी गोरे शिपाई रात्रीबद्दल शहरचा बंदोबस्त करून आपले गोटांत परत गेले.

इकडे बाईसाहेब किल्यांत आल्यावर अति शोकविव्हल होऊन निश्चलपणें दिवाणखान्यांत बसल्या. त्या तेजस्वी स्त्रियेची ते वेळची स्थिति पाहून व तिच्या अमानुष पराक्रमाचा हा अत्यंत दुःखकारक परिणाम मनांत आणून आश्रित मंडळीस अति दुःख झालें व मंडळी जिकडे तिकडे चिंताक्रांत होऊन आतां पुढें बाईसाहेबांनीं काय करावें याजविषयीं आपसांत हळूहळू विचार करूं लागली. परंतु बाईसाहेबांजवळ कोणी जाईना. एक प्रहरानंतर बाईसाहेब शहरची काय हवालदील आहे हें पाहण्याकरितां गच्चीवर आल्या. तेव्हां त्या दीन शहराचे जें दुःख त्यांचे दृष्टीस पडलें त्यानें त्यांच्या अंतःकरणास कळवळा येऊन खळखळा डोळ्यांत पाणी आलें. हलवाईपुरा मोठा व संपन्न असा शहराचा भाग होता. तो पेटून

मोठा आकांत झाला होता. भर उन्हाळीचे दिवसांत मध्यान समय असल्यामुळें त्या गगनापर्यंत जाणाऱ्या ज्वालाची उष्णतेची आग अति दुःसह झाली होती. जिकडे तिकडे रडारड ओरडाओरड पळापळ चालली होती. बंदुकाचे शतावधि आवाज एका मागून एक फटाफट होत होते व तितके निरपराधी लोकांचे जीव फटाफट जात होते. हजारों श्वापदें मरण समयींचा दुःखकारक शब्द काढून ओरडत होतीं. कांहीं सुटलीं होतीं तीं अन्नपाण्याकरितां सैरावैरा पळत होतीं. व कुत्रे, बैल, घोडे, खेचरें, उंट, गाढवें यांच्या करुण स्वराचा एकच कल्लोळ होऊन गेला होता. त्या भयंकर स्थितीची आठवण झाली ह्मणजे अंगावर कांटा उभा राहतो. आपल्याकरितां या निरपराध प्राण्यांचे असे भयंकर हाल होत आहेत असें वाटून बाईसाहेबांस दे माय धरणी ठाय झालें. स्त्रियांचें हृदय फार कोमल असतें. त्यांस दुसऱ्यांची दया फार लवकर येते. पुरुषासारखी त्यांचीं मनें कठोर नसतात. बाईसाहेबांच्या हृदयांत दुःख व करुणा इतकी ओतप्रोत भरली कीं त्यास आपण महापातकी आहों असें वाटूं लागलें. व त्यांचे मनाचा निश्चय कायम झाला. पदरचे सर्व लोकांस बोलावून आणून असें कळविलें कीं, मीं वाड्यांत दारूगोळा घालून पेटवून मरून जाणार; ज्यास येथें मरणें असेल त्यानें रहावें, बाकीच्यांनीं रात्र होतांच किल्ला सोडून शहरांत जाऊन जीव बचावण्याची सोय पाहावी. ते वेळेस ज्या वृद्ध सरदारानें बाईसाहेबांस मागे फिरविलें होतें, त्यानें पुढें येऊन बाईसाहेबांचा हात धरून त्यांस दिवाणखान्यांत नेऊन बसविलें व बोलूं लागला कीं, "महाराज आपण किंचित् शांत व्हा. ईश्वरानेंच हें दुःख या शहरावर आणलें

आहे, त्यास आपला कांहीं इलाज नाहीं. कारण सर्व गोष्टी पूर्वसंचित कर्माप्रमाणें होतात. आत्महत्या करणें हें मोठें भयंकर पातक आहे. पूर्वपातकांची या जन्मीं आपण फळें भोगतों त्यांत आणखी महान पातकाची भर या जन्मांत घालूं नये. जीं दुःखें येतील ती आपण निमूट सोसलीं पाहिजेत ह्मणजे पुढें आपल्यास त्यांचा उपसर्ग लागणार नाहीं. शिवाय आपण शूर आहांत, आपण आत्महत्येचा विचार बिलकूल मनांत आणूं नये. रात्रीं तयारी करून शहराबाहेर निघून जाऊन शत्रूशीं प्रसंग पडल्यास युद्ध करून शत्रूचा घेर फोडून पेशव्यास जाऊन मिळूं. मध्यंतरी मृत्यु आला तर फारच चांगलें होईल. येथें आत्महत्या करून पातकाचा संचय करण्यापेक्षां धारा तीर्थी स्नान करून स्वर्ग जिंकणें हें फारच चांगलें आहे. त्यापेक्षां आपण आतां किमपिही दुःख करूं नये, स्वस्थपणें स्नान भोजन करून रात्रीं शत्रूचा घेर फोडून जाण्याचे तयारीस लागावें."

हे शब्द ऐकतांच बाईसाहेबांस किंचित् समाधान वाटून त्यांस पुन्हां शूरत्वाचा आवेश चढला. व त्यांनीं दोन वेळ पित्याप्रमाणें सुमार्ग दाखविल्याबद्दल त्या वृद्धाचें पादवंदन केलें. नंतर सर्वांनीं त्या वृद्धाचे बोलण्यास मान देऊन समाधानवृत्तीनें स्नानभोजनादि नित्य कर्मे आटोपलीं. दिवे लागण्याच्या सुमारास आश्रासारखी भिक्षुक मंडळी होती त्यांस योग्य बक्षिसें देऊन मोठ्या प्रेमानें बाईसाहेबांनीं निरोप दिला. व शहरांत जाऊन आपला जीव जसा रस्ता सुचेल तसा वाचवावा ह्मणून किल्याचा दरवाजा उघडून बाहेर काढून दिलें. नंतर जे लढवंई लोक नव्हते त्यांस व दास

दासी वगैरे सर्व नोकरांस तमाम जाण्याची परवानगी दिली. याप्रमाणें सर्व लोक किल्यांतून निघून शहरांत आले त्यांत आह्मीही मांडवगणें याजकडे आलों.

इकडे बाईसाहेब अवशीचे बारा घटकाचे सुमारास सर्व तयारी करून किल्याचे बाहेर निघाल्या. मोरोपंत तांबे वगैरे जी आप्त मंडळी होती ती सर्व हत्यारबंद होऊन घोड्यावर बसून तयार झाली व प्रत्येकाजवळ कमरेशीं बांधण्यास मोहोरा पुतळ्या दिल्या. संस्थानांत जो अर्थ होता तो सर्व हत्तीवर खलित्यांत भरून घेतला व तो हत्ती मध्यभागीं घेतला. बरोबर सुमारें दोनशें निवडक स्वारांनिशीं जुने जिवास जीव देणारे सरदार होते तेही घेतले. शिवाय सकाळीं इंग्रजाबरोबर जी चकमक झाली त्यांतून सुमारें १२०० विलायती लोक जिवंत राहिले होते ते घेतले. स्वतः बाईसाहेब अडीच हजार रुपये किंमतीचा पांढरा खंदा राज रत्नासारखा घोडा होता त्याजवर आरूढ झाल्या. पायजमा स्टाकीन बूट वगैरे सर्व पुरुष वेष धारण केला. अंगांत तारेचें चिलखत घातलें. कंबरेस जंब्या वगैरे हत्यारें बांधून खाकेंत तरवारही लाविली. व जवळ कांहींएक अर्थ घेतला नाहीं. फक्त एक रुप्याचा जांब ह्मणजे पेला पदराशीं बांधून घेतला, नंतर रेशीमकांठीं धोतरानें पाठीशीं बारा वर्षांचे वयाचा दत्तक मुलगा बांधून घेतला. शाबास त्या बायकोची.

याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर "जय शंकर" असा शब्द करून सर्व मंडळी किल्याखालीं उतरली व भर शहरांतून उत्तर दरवाज्यांतून बाहेर पडली. शेंकडो लोक बाईसाहेबांचा शेवटचा निरोप घेण्याकरितां रस्त्याचे बाजूनें उभे होते. ते वेळेस त्या शूर लोकांचे

अवसान पाहून मृत्यूचे दाढेंत हात घालणारे हे वीर पुरुष शत्रुची फळी फोडून जातील असा पाहणारास पूर्ण भरंवसा आला. बाईसाहेब शहराबाहेर पडल्या नाहींत तोंच शहरांत इंग्रजाचे लोक बंदोबस्ताकरितां होते त्यांनीं हाक ठोकून गलबला केला, व बाईसाहेबांचे लोकांचे आंगावर धांवले. बाहेर शत्रूचे लोकही सावध होऊन त्यांनींही हल्ला केला व तोफा सुरू केल्या. बाईसाहेबाजवळ बंदूक होती, तिचा उपयोग करीत करीत त्यांनीं भरधांव घोडा फेंकला. त्या हल्यांत पुष्कळ लोक मरण पावले व बाकीचे लोक राहिले ते अंधारांत वाट चुकून ज्यास जिकडे वाट फुटली तिकडे पळूं लागले. चोहींकडे स्वार पळों लागले त्यांत बाईसाहेबांचा घोडा कोणता हें इंग्रज शिपायांस उमगलें नाहीं. त्यांचा घोडा जो निघाला तो एका क्षणांत इंग्रज फौजेचा गराडा फोडून त्यास मागें टाकून पुढें चालला. बरोबर एक घोड्यावर पुरी बसणारी दासी होती ती व एक बारगीर असे दोघांचे घोडे पळत होते. गोठ फोडून बाहेर जे निघाले ते तिघे काल्पीच्या रस्त्यानें चालले. ते समयीं त्यांचा पाठलाग एक कोशपर्यंत कांहीं इंग्रजाचे स्वार करीत होते. परंतु बाईसाहेबांचे घोडे फार चपळ असल्या कारणानें, त्या स्वारांस थोडक्या अवकाशांत दिसतनासे झाले. व रात्रींचा विषय असल्यामुळें घोडे कोठें गेले याचा पत्ता लागेना, सबब ते निराश होऊन मागें फिरले. बाईसाहेब कोठें गेल्या व त्यांचे सरदार कोठें गेले किंवा ते आपल्याच गोठांत गर्क होऊन गेले आहेत, याचा पत्ता इंग्रज शिपायांस लागेना. याजमुळें पुष्कळ वेळ पर्यंत तोफा व बंदुका सुरू ठेविल्या

होत्या. उजाडल्यावर शोध करितां बाईसाहेबांचे पदरचे लोकांची अनेक प्रेतें सांपडलीं, परंतु मुख्य मंडळी कोठेंही सांपडली नाहीं.

इकडे बाईसाहेब उजेडतां उजेडतां झांशीचे मुलुखाचे हद्दीवर एक गांव आहे तेथें जाऊन पोंचल्या. तेथें दत्तक पुत्रास पाठीचा सोडून महालकरी याचे घरीं त्यास फराळास घातलें. व माहालकरी यास झालेलें सर्व वृत्त निवेदन केलें. नंतर आपण कांहीं एक आहार न करितां पुन्हां मुलास पाठीस बांधून काल्पीचा रस्ता धरला. एकसारखा सर्व दिवसभर भरधांव घोडा टाकीत रात्रीं बारा घटकांचे सुमारास बाई काल्पीस जाऊन पोंचली. अन्नपाण्या-शिवाय चोवीस तास, पाठीशीं ओझें बांधून भरधांव घोड्यावर काढले तेव्हां त्या बाईचे शक्तीची, हिमतीची व बारगीर पणाची कमाल समजली पाहिजे. असो. गुदामांत पोंचल्यावर रात्र फार झाल्यामुळें बाईसाहेबांनीं श्रीमंतांस कळविलें नाहीं. उजाडतांच शौचमुखमार्जनादि विधी आटोपून पेशव्यांस कसें भेटावें याचे विचारांत आहेत तों स्त्रीधर्माप्रमाणें अस्पर्श दशा प्राप्त झाली. त्या वेळेस बाईसाहेबांचे अंतःकरणांत पूर्वीपेक्षां दसपट दुःख झालें तें काय वर्णन करावें. पहा स्त्रियांनीं अति शौर्य केलें तरी काय उपयोग! प्रसंगांत घात येणारा असा त्यांचा शारीरीक धर्म त्यांजवळ भरलेलाच आहे. परंतु अग्नींत तेल घातल्याप्रमाणें बाईसाहेबांजवळ स्त्रियांचें एकही वस्त्र नव्हतें, . एक लहानसें नेसू पातळ होतें व आं-गांत पांढरी चोळी . होती, या शिवाय सर्व पायजामा - बंडी वगैरे पुरुष वेशाचे कपडे होते. नवीन विकत आणावयास जवळ एक पैसा सुद्धां नव्हता, एक रुप्याचा जांब व बोटांत एक हिरकण्याची

आंगठी येवढी कायती संपत्ति जवळ होती. बरोबर दासी आली होती तिज जवळही वस्त्र किंवा पैसा यांतून कांहींच नव्हतें. आतां कोणाचे तोंडाकडे पाहावें. पेशव्यांचे येथें स्त्री नाहीं सर्व पुरुष आहेत. त्यांचे येथें जाऊन लुगड्याबद्दल मजकूर कळविण्याचें बाईसाहेबांचे जिवावर आलें. हरहर त्या विपरीत प्रसंगीं त्यांस अबलांच्या मनोधर्माप्रमाणें एकसारखे अश्रु येऊं लागले, बरोबरची दासीही रडूं लागली. याप्रमाणें घोळ चालू होतांच साहाजीक हें वर्तमान रावसाहेबांस कळलें तेव्हां तात्याटोपीस बाईसाहेबांचा योग्य बंदोबस्त करण्यास पाठविलें. नंतर तात्यांनीं बाजारांतून किंमतवान लुगडीं व मुकटा आणवून पंधरा पात्रांचीं स्वयंपाकाचीं भांडीं, रुप्याचीं भांडीं, आचारी, पाणके तंबू कनाथी बिछाईत शिबंदीचे शिपाई वगैरे सर्व व्यवस्था लाऊन दिली. नंतर तात्याटोपी व रावसाहेब प्रत्यक्ष बाईसाहेबांस येऊन भेटल्यावर परस्परें सर्व हकीगती समजल्या. बाईसाहेबांचे घोड्यानें फार उत्तम नोकरी बजावली खरी, परंतु तो अगदीं थकून जाऊन गुदामांत पोंचतांच खालीं पडला. त्याजवर बाईसाहेबांचे अत्यंत प्रेम होतें. मग दुसरे दिवशीं सात आठ मजूरदार घोड्याच्या शिरा मळण्याकरितां दोन प्रहरपर्यंत लाविले होते. त्याजमुळें त्या घोड्यास पूर्ववत् हुशारी आली.

असो. याप्रमाणें बाईसाहेब मृत्युमुखांतून सुटून आपल्या मित्रमंडळींत जाऊन पोंचल्या, परंतु त्यांच्या झांशीची दैना सरली नाहीं. दुसरा दिवस उजाडणार तो विजनाचाच होता. याजमुळें झांशींत प्रत्येक मनुष्यास आपण स्मशान भूमीचे कांठावर आहों असें वाटत होतें. जो तो आपण या संकटांतून कसे वांचतों

याचा विचार करीत होता. आह्मींही मांडवगणे यांचे घरीं आल्यावर मोठ्या उत्कंठेनें प्रथम उद्यांची तजवीज काय करितां असा केशवभटजीस प्रश्न केला. तेवेळेस मांडवगणे यांनीं सांगितलें कीं तुह्मी किमपिही धास्ती बाळगूं नका. आपले समोर वाडा आहे, त्याच्या मागें मोठ्या चौसोपी वाड्याची बखळ पडली आहे. वाडा मोडून भिताडें अर्धी पडीं पडलीं आहेत. सर्व ओसाडी भर आघाडा गवत वगैरे पर्जन्यकाळाचें उत्पन्न तसेंच आहे. तेथें गुरूं किंवा मनुष्य जाण्यास वाट नाहीं. पूर्वीं वाड्यास जाण्यास बोळांतून रस्ता होता. वाडा ओसाड पडल्यावर दाहा पंधरा वर्षांनीं एका रंगाऱ्यानें बोळाचे तोंडावर लहानसें घर बांधलें आहे. याजमुळें ती जागा कोणास सांपडावयाची नाहीं. तेथें जाऊन भितींतील बंड्यांत लपून बसूं. तेव्हां केशवरावास मीं विचारलें कीं बंडा ह्मणजे काय ? त्यांनीं सांगितलें कीं बुंदेलखंडांत पूर्वीं चोराचें भय फार असे. सबब मोठाल्या घराच्या भिंती फार रुंद बांधलेल्या असून त्यांत मोठमोठाले चोरकोनाडे राखलेले असतात. ते कधीं कधीं येवढे मोठाले असतात कीं त्यांत सर्व मनुष्यें बसून भांडींकुंडीं कपड्याचे गट्टे वगैरे सामान राहूं शकतें. चोराचें भय फार झालें ह्मणजे अशी व्यवस्था लावून घर मोकळें टाकण्याची वहिवाट या प्रांतांत असे. त्या वाड्यांत अशा बंड्यांत आपणास लपून राहण्यास जागा आहे. तेथें काळोख फार आहे, व वारा बिलकूल मिळावयाचा नाहीं. बाहेर जीव जाईल ह्मणोन तेथें राहणें आहे. असें ऐकून किंचित् जीवांत जीव आला व ही आमची सुदैवानेंसुटका हा हरीपंताच्या उपासनेचाच प्रभाव

होय असें मला आतां खचित् वाटतें. असो रात्रौ कांहीं स्वस्थपणानें संध्या जेवण खाण आटोपिलें नंतर माडीवर जाऊन शहरची हवाल पाहूं लागलों. सर्व शहर प्रेतभूमीसारखें दिसूं लागलें. रात्र होती तरी शहरास भयंकर आग लागली असल्याकारणानें चोंहीकडे साफ दिसत होतें. आप्त जन दुःखानें वेडे होऊन आपल्या स्वजनाच्या प्रेतापाशीं गल्लों गल्लीं मोठ्या करूणस्वरानें रडून आकांत करीत होते. गरीब लोक अन्नाकरितां ओरडत रडत फिरत होते. जनावरेंही दाणा वैरणीकरितां व पाण्याकरितां आरडत इकडे तिकडे फिरत होतीं. हलवाईपुऱ्यांत मोठमोठीं श्रीमान लोकांचीं घरें असल्यामुळें आग लागली होती तिचा तर अनिवार अनर्थ चालला होता. ज्वाळा गगनचुंबीत जात होत्या. ती आग विझवण्यास कोणीही प्रयत्न करीत नव्हता. त्या विशाळ भयंकर ज्वाळा जिकडे जातील तिकडे जाऊन दुसरीं घरें पेटत होतीं, परंतु त्यास कोणीही अडथळा केला नाहीं. असा दुर्धर प्रसंग झांशीवर गुदरलेला पाहून माझे सर्वांगास कंप सुटला, अति भीति उत्पन्न झाली, व पोटांत आग भडकून गेली, तीस उपमा नाहीं. जीवाची भीति फार भयंकर आहे. मला झोंप येईना. ती रात्र तशीच जागून घालवली. पाहाट होतांच सर्व मंडळींनीं उठून स्नान संध्यादि करून भोजनें आटपलीं व नेमिलेल्या वाड्यांत जाण्याकरितां आह्मी चुलते पुतणे व केशवभट्ट व त्यांचे चिरंजीव दामोदरभट्ट असे चौघे सिद्ध झालों. तों घराशींच बंदुकीचा आवाज ऐकूं येऊन जीवच जाण्याचा प्रसंग आला. अजून प्रातःकाळ झाला नाहीं. सबब तुह्मास मारण्याचा अधिकार नाहीं असें त्या यमकिंकरास

कोण सांगेल. त्यांची स्वारी दरवाज्यापाशीं दृष्टी पडतांच आतां आपण जगत नाहीं अशी दुर्धर भीति व्यापून गेली. माझें सर्व शरीरास कंप व घाम सुटला, तोंड शुष्क होऊन जिव्हा आंत ओढून गेली. कंबरेखालीं पाय आहेत कीं नाहींत असें वाटूं लागलें. दोघे बाप लेंक घरांत पळून कोठें एकीकडे काळोखांत जाऊन लपले. आह्मी चुलते पुतणे मात्र गर्भगळीत होऊन ठिकाणच्या ठिकाणीं खिळून गेलों. दोन गोरे धांवून बंदुक पुढें करून आले. ते समयीं परमेश्वरानेंच आह्मांस बुद्धि दिली यांत संशय नाहीं. आह्मीं लागलीच पृथ्वीवर साष्टांगनमस्कार घाढून हिंदुस्थानी भाषेनें बोलूं लागलों. "साहेब आम्ही मुंबईजवळील ठाणें जिल्ह्यांतील राहणारे आहों, आम्ही इकडे यात्रेकरितां आलों आहों, आम्हास आपण मारूं नये, आम्हीं इंग्रज सरकारचे रयत आहों, आम्हीं पिता पुत्र आहों, व गरीब भिक्षुक असून या घराचे यजमानाची ओळख पडून येथें कांहीं रुपये मिळतील म्हणून आलों आहों. साहेबांनीं आम्हास मारूं नये" असें आम्हीं बोलतांना त्यांनीं आमचे भाषेवरून आम्ही या देशांतील राहणारे नव्हत अशी परिक्षा केली व आम्हापाशी रुपये मागूं लागले व चोहींकडे शोधूं लागले. आम्ही किल्ल्यांतून येतांना बरोबर अडीचशें रुपये आणले होते त्यांची पुरचुंडी करून बिछान्याचे वळकुटींत ठेविली होती. ती वळकुटी गोरे लोकांनीं पाडतांच आंतून रुपयांची पुरचुंडी खळकन बाहेर पडली. तेवढे रुपये घेऊन ते यमदूत आमच्या पूर्वसुकृतांमुळें व आयुष्याची दोरी बळकट असल्यामुळें दुसरीकडे चालते झाले. या मृत्युसंकटांतून तारल्याबद्दल वैजनाथेश्वराची स्तुति करून आम्हीं व मांडवगणे

लागलीच ठरलेल्या वाड्यांत लपण्याकरितां गेलों, तों तेथें चोहोंबाजूच्या पुरुषांनीं व बायकांनीं ती जागा भरली होती. कांहीं बंड्यांत म्हणजे भिंतींतील चोरकोनाड्यांत तीन तीन माणसें बसण्यासारखी जागा असून त्यांत चार चार माणसें बसलीं होतीं. आम्ही बंड्यांत जाऊन बसल्यावर एका घटकेनें साफ उजाडून चोंहीकडून बंदुकीचे शतावधि आवाज होऊं लागले. दर आवाजास एक एक मनुष्य मेला असेल असें मनांत आलें म्हणजे अंगावर रोमांच उभे राहात. हरहर काय इंग्रजांचा दुष्टपणा ! निरपराध दीन लोकांस दुसऱ्याच्या पापाबद्दल किती शासन हें ? मारणारे शिपाई लोकांपैकीं एकासही त्या गरीब लोकांची दया आली नसेल काय ? याप्रमाणें विचार करीत बंड्यांत अडचणींत बसलों असतां, बारा वाजायच्या सुमारास मजला अतिशय ताहान लागली. अगोदरच वैशाखाचे दिवस त्यांत जेथें वारा नाहीं, अशा कोंदट जागेंत दाटींत बसलेलों, शिवाय ऐन दोनप्रहरचा वेळ झाला होता, अशा अनेक उष्णतेच्या कारणांनीं अगोदरच भीतीनें शुष्क झालेल्या कंठास अत्यंत कोरड पडली ती इतकी पडली कीं, अंगांतील सर्व रक्त शोषून गेलें. आतां प्राण जातो कीं काय असें वाटूं लागलें. आपणास तहान लागेल हें मंडळीस वाटल्यावरून त्यांनीं त्याची तजवीज करून ठेविली होती. आपल्या मोहल्यांत आवाज होत नाहीं असें पाहून बाहेर येऊन पाणी पिण्याकरितां विहिरीच्या राहाटास दोर लावून ठेविला होता, व जवळच एक मडकें ठेविलें होतें. परंतु मला बाहेर जाण्याचा धीर होईना. शेवटीं येथें बसून तरी प्राण जाणार मग तृषा भागवून कां जाईना असें वाटून जवळ आसपास

कोठें आवाज होत नाहीं अशी संधी पाहून बंड्यांतून बाहेर पडलों. धांवत धांवत विहिरीवर येऊन मडकें फांसास लावून झराझर पाणी काढलें व मडकें तोंडास लाविलें. घोट दोन घोट पाणी घशाखालीं उतरतें न उतरतें इतक्यांत जवळच्या वाड्यांत बंदुकीचा आवाज झालेला कानीं पडला. जिवाची आशा मनुष्यास कधींही सुटत नाहीं. मडकें हातांतून टाकून धांव ठोकली तों घोंटाळून जाऊन आमचे बंड्याचा रस्ता चुकलों. तेव्हां माझे हातपाय कापूं लागले, व सैरा वैरा इकडे तिकडे घाबरून धांवत सुटलों, इतक्यांत एका बंड्याचें तोंड दृष्टीस पडलें. त्यांत डोकें घालून शिरण्यास लागलों तों आंत दोघी तरुण बायका दृष्टीस पडल्या. त्यांनींही मोठ्या घाईनें आंत लवकर या असें सांगितलें. तो बंडा फार लहान असल्यामुळें आंत दोघा बायकांसही पुरेशी जागा बसण्यास नव्हती. परंतु त्या कोमल अंतःकरणाच्या स्त्रियांनीं अडचण सोसून मला आंत घेतलें. त्यांचीं तोंडें पश्चिमेस होतीं व मी आंत शिरून फिरावयास जागा नव्हती म्हणून माझें तोंड पूर्वेस होतें. याप्रमाणें तोंडास तोंड लावून उराशी ऊर लावून आम्हीं बसलों. पुढेंच जी स्त्री होती तिचें आंग सर्व घामानें भिजलेलें होतें. त्या वेळेस माझें वय सुमारें ३० वर्षांचें असावें व त्या स्त्रीचें वय १८ वर्षांचें असावें. अशीं तरुण स्त्रीपुरुषें एकमेकाशीं घट्ट मिठी मारून बसली असतांहीं कामवासना बिलकुल उत्पन्न झाली नाहीं, हा भयंकर मृत्युभीतीचा प्रभाव म्हटला पाहिजे. साहा सात घटका झाल्यावर जवळ आसपास कोठें आवाज होत नाहींत असें पाहून मीं त्या बंड्यांतून बाहेर पडलों आणि आपल्या

बंड्यांत जाऊन बसलों. मला परत आलेला पाहून काकांस परमावधी आनंद झाला. ह्यास मी मारला गेलों, असें पक्कें वाटून, अति शोक उत्पन्न झाला होता. असो याप्रमाणें परमेश्वराच्या दयेनें व हरीपंताच्या पुण्याईनें तो दिवस पार पडला. रात्र होतांच आम्ही आपल्या गुहेंतून बाहेर पडलों व घरीं येऊन बसलों. तों शेजारचे करकरे याची बायको व सून आमचे येथें येऊन सर्व वृत्त आम्हास सांगूं लागल्या. तो ब्राह्मण बिचारा ६०–६५ वर्षांचा व त्याचा पुर्ण वयस्कर मुलगा असे दोघे मारले गेले होते. तेव्हां-पासून सासू व सून आपल्या पतीच्या प्रेताशीं मोठा आकांत करीत बसल्या होत्या; परंतु रात्र पडतांच त्यांस भीति वाटूं लागली. तेव्हां आम्हाकडे येऊन आम्हांस प्रेतशुद्धी करण्याविषयीं विनवूं लागल्या त्यावेळेस जरी सर्वांस भुका लागल्या होत्या तरी लागलीच शेजार पाजरचे सात आठ लोक जमा करून करकरे यांचे घरीं गेलों. नंतर तुळशी अंगणांत चिता रचून प्रेतें दहन केलीं. लांकडें भर-तीचीं नव्हतीं सबब घरांतील फळ्या, पाट, पाळणे, बाज भरतीस घातलीं. प्रेत शुद्धी झाल्यावर त्या बायकांस आम्ही आपले घरीं घेऊन आलों. झाशीच्या त्या भयंकर प्रसंगांत कोणाचे कोणास अ-शौच नाहीं. दुसरे दिवशीं अदले दिवशींच्या प्रसंगाची आठवण हो-ऊन अपरात्रींच उठून रात्र सरली नाहीं तो बंडयांत जाऊन बसलों ते दिवशीं फार माणसें मेलीं. गोरे दुरून दृष्टीस पडले ह्मणजे जीव बचावयाकरितां कितीएक लोक गवताचे गंजींत जाऊन लपले, तेथें गोरे येऊन त्यांनीं गवताचा गंजी पेटवून दिली ह्मणजे तें अग्नींत जळून गेले. कितीकांनीं गोरा आला असें पाहून विहिरींत उड्या घातल्या

परंतु गोरे लोकांनीं विहिरीवर बसून पाण्यावर डोकें दिसूं लागतांच गोळ्याचा भडिमार करून त्यांस तेथेंच मारलें. कित्येक लोक शेतखान्यांत लपून बसले होते, त्यांसही शोधून ठार मारलें. आमचे शेजारीं अग्नीहोत्री बुवाचें घर आहे. अग्निहोत्री बुवां होम देऊन बाहेर येतात तों घरांत दोन गोरे व गोरे लोकांचे बंदोबस्ताकरितां चार काळे शिपाई शिरले. गोरे जे गेले ते होमशाळेंत समोर गेले. तेथें अग्नीचे कुंडावर टोपल्या पाट्या उपड्या घातलेल्या होत्या. यामुळें गोरे लोकांस असें वाटलें कीं यांत अर्थ आहे. म्हणून लाथेनें पाट्या उडवून पहातात तो राखाडी दृष्टीस पडली. यांत पुरलेला अर्थ आहे हें मनांत आणून आंत हात घातला, तो अग्नीच्या योगानें हात भाजला, मग ते गोरे अति क्रोधायमान होऊन अग्नीहोत्री यास व त्याचे भावास व मुलास बंदुकीच्या गोळ्यांनीं ठार मारून कांहीं सोनें रुपें होतें ते घेऊन दुसऱ्या घरीं गेले. एकंदर अग्नीहोत्री बाबासुद्धां त्याचे घरचीं मनुष्यें अकरा मारलीं गेलीं. सर्व कुटुंबघातच झाला. कित्येक लोक गोरा पाहून पळण्यास लागले त्यांस रस्त्यांतच कडाभिनीच्या गोळ्यांनीं मारीत असत. भिडे यांचे बागेंतील सर्व मनुष्यें दोन दिवस उपवाशीं होतीं. तिसरे दिवशीं पाहांटेस दरवाज्यावर पाहारेकरी गोरे लोक होते त्यांनीं बागांत येऊन सर्वांस असें सांगितलें कीं, आपापले घरीं जाऊन भोजनाचा सरंजाम आणोन येथें जेवणें करा. असें सांगतांच सर्व मनुष्यांस अत्यानंद झाला, व घरीं धांवत धांवत जाऊन ज्याचा त्यानें सरंजाम आणला. व माणसें पुन्हां बागांत शिरलीं, त्यांत दुसरे लोकही जीव बचावण्याकरितां शिरले व तिसऱ्या दिवसाचे विजनांतून वांचले गेले.

याप्रमाणें तीन दिवस विजन करून. शहरांत जितकें सोनें, रुपें, हिरे, पांच, मोतीं, पोंवळें सांपडलें, तितकें गोरे लोक घेऊन गेले. त्यावेळेस शहरांत कोट्यावधि रुपयांचा अर्थ गोरे शिपायांस सांपडला असेल. पुरुषाचें भाग्य फार चमत्कारिक आहे. तिसरे दिवशीं इंग्रजांचे लोक शहरचे वाड्यांत शिरले आणि तेथें सर्व प्रकारची लूट मांडली. सोनें, रुपें, पितळ, तांबें वगैरे सर्व जिनस इंग्रजसरकारानें लुटून आपले गोटांत नेला. त्यांत त्यांनीं कांहींएक अर्थ किंवा वस्त्र किंवा पात्र ठेविलें नाहीं. पोथ्यांचीं वेष्टणें यांवर सुद्धां त्यांची धाड येऊन पडली. झांशीची पुस्तकशाळा फार मोठी व उत्तम व्यवस्थेची होती. कारण झांशीचा सुभा पेशव्यापासून ज्या पुरुषांनीं मिळविला, त्या पुरुषापासून गंगाधर बाबा उर्फ बाबासाहेब या शेवटच्या पुरुषापर्यंत झांशीवाले पुस्तकांविषयीं फार उद्योगी झाले. चारी वेदांची भाष्यें व सर्व शाखांचीं सूत्रें भाष्यांसहीत व परिशिष्टें भाष्यें सुद्धां व स्मृति टीकासह दरोबस्त पुराणें याखेरीज ज्योतिष शास्त्राचे ग्रंथ व वैद्यकी ग्रंथ, असे बहुधा पृथ्वीवरचे सर्व तऱ्हेचे उपयुक्त ग्रंथ तेथें होते. झांशीपासून चार पांचशें कोशांवर ग्रंथ नवा असल्याचें कळतांच त्या शहरांत झांशीहून लेखक पाठवून ग्रंथ लिहून आणिले होते. कारणपरत्वें ग्रंथ लागल्यास काशीक्षेत्रीं झांशीहून ग्रंथ पाहण्यास नेत असत. सर्व ग्रंथांस वेष्टणें फार मजबुतीचीं व फळ्या शिसव्याच्या होत्या. त्या प्रसंगांत इंग्रज सरकारांनीं पुस्तकांच्या फळ्या व वेष्टणें सोडून घेऊन पुस्तकें धडाधड तिसरे मजल्यावरून रस्त्यांत टाकून दिलीं. त्या पोथ्यांचीं पानें वाऱ्याच्या योगानें रस्तोरस्तीं उडून जात होतीं. तसेंच फरास-

खान्यांतील जाजमें, लोड, तक्के, तंबू, पाले वगैरे सर्व गोठांत घेऊन गेले. नगारखान्यांत जाऊन सर्व नौबदी, नगारे वगैरे फोडून तांब्याचीं भांडीं घेऊन गेले. याप्रमाणें वाड्याची अगदीं दुर्दशा करून टाकिली. लक्ष्मीचें देवालयही लुटण्यास सोडलें नाहीं; देवीचे अलंकार, वस्त्र वगैरे सर्व सरंजाम लुटून नेला. मला वाटतें कीं, महालक्ष्मीस आपलाच राग येऊन तिचा सर्व सरंजाम तिला नकोसा झाला होता. उद्यांपासून बिजन बंद होणार म्हणून बिजनाचें काम ते दिवशीं फार जारीनें व शिताफीनें चाललें होतें. घरांत शिरून कोनाकोपऱ्यांत अंधारांत लपलेलीं माणसें शोधून मारीत होते; धर्मशाळाही शोधल्या, देवळाचे गाभारेही शोधून प्रेतांनीं भरून काढले. कोष्टीपुऱ्यांत अति प्राणनाश झाला, त्यांत बिचाऱ्या कांहीं बायकाही मारल्या गेल्या होत्या.

तिसरा दिवस बिजनाचा सरल्यावर जिवाचे भितीचें डोंगरा एवढें ओझें डोक्यावरून कमी होऊन आह्मांस फार आनंद झाला व बंद्यांतून निघून घरीं येऊन मोकळे मनानें बसलों. नंतर स्वस्थपणें स्नान भोजनें केलीं. तीन दिवसपर्यंत रात्रीं घरांत जें धान्य होतें तें शिजवून भोजनें करीत असो. शहरची वस्ती असल्यामुळें आठा दिवसांपलीकडे महिन्याचा धान्यसंग्रह केलेला असा ग्रहस्थ थोडा होता. तिसरे दिवशीं लोकांनीं सावधपणें खाण्याकरितां धान्य व सौंठ वाड्याचे चौकाचे गटारांत न दृष्टीस पडे असें ठेविलें होतें. कोणी भूमींत पुरून ठेविलें होतें. ज्याजपाशीं मुळीं धान्य नव्हतें ते उपोषणें करून राहत होते. आह्मी मांडव-

गणे यांजकडे गटारांत जोंधळे व बाजरी थोडी ठेविली होती. मांडवगणे गरीब भिक्षुक असल्यामुळें तांदूळ वगैरे धान्यें जुजबी होतीं तीं मुळींच संपलीं होतीं. यामुळें जेवणाचे हाल होत असत, तरी त्याविषयीं आह्मांस विशेष दुःख वाटलें नाहीं. परंतु जेव्हां आह्माजवळची तंबाखू सरली तेव्हां आह्मांस उपोषण पडल्यासारखें होऊन गेलें. बिजनाच्या दिवसांत तंबाखूची आठवण सुद्धां आली नाहीं. कधीं रात्रीं घरीं येऊन जेवण झाल्यावर थोडीशी खात असूं. परंतु जिवावरची भीति संपतांच तंबाखूशिवाय करमेनासें झालें. गांवांत तंबाखू कोठें विकत मिळण्याचें तर नांव नको. याप्रमाणें मोठ्या संकटानें ती रात्र घालविल्यावर सकाळचे प्रहरीं एक पंचा नेसून स्वस्थपणें काय होतें याची मौज पाहण्याकरितां ओटीवर बसलों, तो काळे मंद्राजी लोक शहरांत तांबे पितळ वगैरे धातूंची लूट करण्याकरितां आलेले दृष्टीस पडले. त्या लोकांनीं बरोबर मोठमोठाले गळ विहिरींतून भांडीं काढण्याकरितां आणिले होते. बिचाऱ्या मूर्ख लोकांनीं आपलीं भांडींकुंडीं वांचवावीं ह्मणून विहिरींतून टाकून ठेविलीं होतीं. परंतु विहिरी उथळ असल्यामुळें मंद्राजी शिपायांनीं सर्व काढून नेलीं. लोकांचे घरांत शिरून जे पात्र सांपडेल ते लुटून नेत असत. आमचे घरीं लोक येतांच आह्मीं त्यांस नम्रतेनें सर्व हकीगती विचारल्या; तेव्हां ते सांगूं लागले कीं, तीन दिवस बिजन होऊन गोरे लोकांस सोनें रुपें सांपडलें तें बक्षी[illegible] दिलें आहे, आतां पुढें चार दिवस लूट होईल. यादिवशीं क[illegible] चाही प्राणघात होणार नाहीं. लुटीचे दिवस जेवढ्या [illegible] पलटणी व हिंदुस्थानचे राजेरजवाड्यांकडून मदतीस पलट[illegible]

आहेत त्यांस हिशेबानें वांटून दिले आहेत. आजचा दिवस आमचे वांटणीस आला आहे. उद्यां सकाळीं बारा वाजेपर्यंत हैदराबादवाल्यांची वांटणी आहे. असें सांगितल्यावर आह्मी त्यांजवळ तंबाखू खावयास मागूं लागलों, ती त्यांनीं आह्मांस खुशीनें पुष्कळ दिली. नंतर घरांत सांपडलीं तीं भांडीं घेऊन ते दुसरीकडे चालते झाले. आह्मी जेवण करण्यास भांडीं रात्रौ बाहेर भूमींत पुरून पांचचार ठेविलीं होतीं. बाकी सर्व त्या लोकांनीं नेलीं. घटके घटकेनीं दुसरे काळे मंद्राजी येत असत. सबब सायंकाळपर्यंत उपोषणें घडलीं. रात्रौ सर्व लोक शहराबाहेर गेल्यावर आह्मीं स्नानें करून शाळीग्राम, बाण व नर्मदी गणपति घरांत राहिले होते,—बाकीं उपकर्णीं व धातुमूर्ति, देवांचीं कमळें वगैरे नेलीं होतीं,—त्या देवांची पूजा केली. माझी मुळींच पार्थिवलिंगपूजा असल्यानें कांहींच अडचण आली नाहीं. बेल मात्र पाहिजे होता तो दारचा काढून पूजा केली. नंतर जोंधळे व कांहीं बाजरी ठेविलेली गटारांतून काढून दळून अग्नि पेटवून तवा पितळी नसल्यामुळें गागरासारखे पानगे अग्नीवर भाजले व मीठ मुळींच नव्हतें सबब मिठाशिवाय तसींच भोजनें केलीं. सायंकाळीं दिवे लावण्यास समया नव्हत्या तेव्हां दिवल्या मातीच्या लाविल्या होत्या. कांहीं वेळानें जवळचे घरची उमेदवार मंडळी पांच सात असामी आमचे बिऱ्हाडीं येऊन [illegible] बरोबर घेऊन शहर पाहण्यास गेली; आह्मांस रस्त्यांतून ठिक- [illegible]ीं प्रेतें आढळूं लागलीं. शहर जळतच होतें. जे जिवंत [illegible]होते ते बहुधा उपाशीं असल्यामुळें क्षुधार्त होऊन करुण [illegible]ोरडत होते. हजारों जनावरें श्वासमात्र—शेष होऊन

रस्तोरस्तीं पडलीं होतीं. गल्लोगल्लीं प्रेतांशीं बसून लोंक रडत होते. आम्ही सुमारें पाव घटका इकडे तिकडे फिरल्यावर आह्मांस अति भीति व किळस उत्पन्न झाला, व ताबडतोब परतलों व घरीं येऊन स्वस्थ निद्रा केली. दुसरे दिवशीं उजाडतांच हैदराबाद वाल्यांचे शिपाई शहरांत लूट करण्यास शिरले, ते वस्त्रांची लूट करीत चालले. घरांत शिरून जेवढें वस्त्र ह्मणजे फाटकें धोतर किंवा उंची पितांबर असो, तेवढें घेत चालले. दोन तीन वाड्याचे संधींत हत्ती उभा करून त्याजवर मोठा सलिंदा ह्मणजे कंठाळी-सारखा असतो तो टाकून त्यांत चिरगुटें पांघुरणें, सत्रंज्या, गाद्या, बैठकी, जाजमे, वगैरे सर्व भरून नेऊं लागले. याप्रमाणें त्यांनीं मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या घरीं लाखों रुपयांची लूट मिळविली. आम्ही ओटीवर बसून जे लोक भेटतील त्यांजपाशीं गोड बोलून तंबाखू खाण्यास मिळवीत असों. तिसरे दिवशीं शहरांत पलटणीलोक शिरले, त्यांनीं धान्य लुटण्यास आरंभ केला. त्यांनीं बरोबर मोठ-मोठे बैल आणिले होते. बैल दरवाज्यापाशीं उभा करून लोकांचे घरीं जोंधळे, बाजरी, तांदूळ, डाळी वगैरे जीं धान्यें सांपडलीं तीं भरून नेलीं. धान्यादिकांनीं भरलेलीं मडकीं ओतून घेऊन तेथेंच फोडून टाकीत असत. चवथे दिवशीं सर्व प्रकारची लूट करण्यास आरंभ केला. ज्यास जें नेण्यासारखें वाटेल, तें तो घेऊन जाई. लोकांचे घरीं उपयोगी वस्तु एकही ठेविली नाहीं; विहिरींचे राहाटही काढून नेले. राहाटाचे दोरखंड नेले. दारचीं केळीवरचीं केळ-वंडें, आंब्यावरचे आंबे, झाडावरचें फळ, लोकडी खुर्च्या वगैरे सामान या प्रमाणें सर्व जिनसांची लूट मांडली. ते दिवशीं आह्मापाशीं

कांहींएक खाण्यास नव्हतें. जुजबी धान्य होतें तें सर्व सरून गेलें होतें. बाजारांत कोठें विकत घेऊं झटलें तर कोठेंच मिळण्यासारखें नव्हतें. सायंकाळपर्यंत उपोषण पडल्यामुळें व वैशाखमास असल्यामुळें जीव अगदीं हलक होऊन गेला. सायंकाळानंतर थंड पाण्यानीं स्नान करून अतिशय भूक व तहान लागल्यामुळें निरुपायास्तव थंडा फराळ केला. हरहर! काय हा दुःखाचा प्रसंग! सर्व शहरांत हजारों लोक उपाशीं होते. लाखों मेले होते. शहर जळत होतें. लोक तर अगदीं नागवून गेले होते. कोणाचे घरांत भांडें अगर मडकें अगर धान्य अगर वस्त्र कांहीं उरलें नव्हतें. परमेश्वराच्या घरचा न्याय मोठा चमत्कारिक आहे. ज्या गरीब लोकांनीं इंग्रज सरकारचा कोणत्याही प्रकारें अपराध केला नव्हता त्यांस निरर्थक किती भयंकर शिक्षा ही! परंतु इंग्रज सरकारास अगर परमेश्वरास तरी बोल काय म्हणून लावावा? शुक्रनीतिमध्यें शत्रूंचे पारिपत्य असेंच करावें म्हणून सांगितलें आहे. परमेश्वरानें तरी काय अन्याय केला आहे? झांशीच्या लोकांचे पदरीं पूर्व दुष्कृतच फार मोठें असलें पाहिजे. बुंदेलखंडांत व्यभिचाराचें पातक पूर्वीपासून सांचत आलें होतें. भंगिणीचा इतिहास मागचे भागांत वर्णन केलाच आहे. या पातकपर्वताबद्दल लक्ष्मीबाईचे निमित्तानें सर्व शहरास देहांत प्रायश्चित देऊन ईश्वरानें ही भूमी शुद्ध केली असें आम्हांस वाटूं लागलें. याप्रमाणें मनाचें समाधान करून उदईक काय करावें याचा विचार करूं लागलों. घरून निघाल्यापासून सुमारें चार-पांचशें रुपये ग्वाल्हेर व झांशी येथें मिळवले. परंतु जवळ कांहीं उरलें नव्हतें. घरीं वृद्ध तीर्थरूप व मातोश्रीस टाकून द्रव्य मिळ-

विण्याकरितां देशांतरीं आलों. अनेक संकटें भोगून पैसा मिळविला परंतु दैव विपरीत असल्यामुळें सर्व द्रव्य नाहींसें होऊन जीव जाण्याचाही प्रसंग आला. त्या वेळेस राजनीतींतील एका आर्येचें आम्हास स्मरण झालें. " अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री ॥ नहि नहि तत्र धनाशा जीविताशापि दुर्लभा भवति " झांशीस अशी स्थिति अक्षरशः होती. अशा राज्यव्यवस्थेंत द्रव्य मिळण्याची अशा तर फार लांबच राहिली, परंतु जीविताची आशासुद्धां धरावयास नको. तेव्हां या दुस्तर संकटांतून वांचलों हें आमचें महत्पूर्व सुकृतच समजलें पाहिजे. असो.

अष्टम दिवस उजाडतांच शहरांत इंग्रज सरकारानें 'खुल्क् खुदाका मुल्क् बादशाहाका अंमल इंग्रज सरकारका' अशी दंवडी पिटवून सर्व लोकांस निर्भय केलें. ज्याचें त्यानें प्रेत नेऊन मूठमाती द्यावी असा हुकूम फरमाविला, व शहरांत हजारों भंगी लावून रस्ते शुद्ध करण्यास आरंभ केला. हलवाईपुऱ्यापासून कोष्टीपुऱ्यापर्यंत भयंकर आग लागून शहर जळत होतें, ती आग विझविण्याकरितां पाण्याचे बंब सुरू करून बहुतेक आग विझवून टाकिली. इंग्रज सरकारच्या लोकांनीं दोनचार रस्ते मिळतात अशा चवाठ्यावर जीं प्रेतें तशींच पडलीं होतीं, त्या प्रेतांची खाई म्हणजे ढीग रचले व लोकांचे घरांत शिरून जितकीं जळाऊ लांकडें सांपडलीं तितकीं त्यांजवर आणून टाकिलीं. घरांत जितकें सुटें लांकूड होतें तितकें भरतीस घातलें. दाराच्या फळ्या, खिडक्यांच्या फळ्या, तक्तपोशीचे सुटे तक्ते, पाळणें, झोपाळे, माच, लाकडी सुटे कठडे, वगैरे

जितकें लाकूड मिळालें तितकें काढून चितेंत टाकून अग्नी पेटवून दिला. ते समयीं तें शहर स्मशानासारखें दिसूं लागलें. दर चवाठ्यावर प्रेतांची खाई जळूं लागली. ज्यांस प्रेतसंस्कार देण्याची इच्छा व ऐपत होती, ते लोक आपले आप्तजनांचीं प्रेतें उचलून नेत होते. बाकींचीं प्रेतें खाईत टाकीत होते, या शिवाय हजारों बैल, उंट, हत्ती, कुत्रीं, घोडे, म्हशी मेलेलीं पडलीं होतीं, तीं सर्व उचलून शहराबाहेर एक जबरदस्त खंदक खणला होता, त्यांत नेऊन टाकिलीं, व वरतीं माती लोटली. याप्रमाणें त्या दिवशीं सर्व शहर शुद्ध झाल्यावर इंग्रज सरकारानें सरकारवाड्यापुढें सर्व प्रकारचे जिनसांचीं दुकानें मांडलीं; तेव्हां हजारों लोकांची गर्दी होऊन जो तो आपल्या प्रपंच्याचे जिन्नस विकत घेऊं लागला. लोकांजवळ कांहीं कांहीं कोठें अर्थ उरला होता. आमचे पाशीं हातांत दोन तोळ्याचीं जोडवीं व बटव्यांत पांच रुपये इतकें होतें, याशिवाय कांहीं नव्हतें. आम्ही बाजारांतून पान, तंबाखू, तांदूळ, वगैरे जिन्नस आणून यथेच्छ भोजनें केलीं. त्यावेळेस सर्व प्रकारें मनास हुशारी येऊन आनंद झाला होता, परंतु शहरांत प्रेतें जळत होतीं त्यांची मात्र दुर्गंधी वाऱ्याचे योगानें, अतिशय सुटली होती. त्यामुळें मनास फार किळस येत असे. नंतर जितक्या मौल्यवान वस्तु इंग्रज सरकारानें लुटल्या होत्या, त्यांचा लिलांव शहराबाहेर सुरू केला. हत्ती, उंट, घोडे वगैरे लढाईचे उपयोगी सरंजाम शिंदे सरकारांनीं विकत घेतला. दुसरें मोठमोठें सामान राजेरजवाडे लोकांनीं विकत घेतलें. एक अति

उत्तम पितळी पाळणा गुणी कारागिरानें केलेला वडलोपार्जित झांशी-वाल्यांचा होता, तो शिंदे सरकारानें विकत घेतला.

या विक्रींत इंग्रज सरकारानें अनंत द्रव्य उत्पन्न केलें, व शहरांतील पैसा अगदीं धुवून काढला असें म्हणण्यास हरकत नाहीं. जितकें द्रव्य सांपडलें तितकें गोरे शिपायांनीं लुटून नेलें; बाकी कोठें कोठें चुकून राहिलें तें—लोकांचेंच धान्य भांडीं वगैरे त्यांस—विकून काढून घेतलें. याप्रमाणें नववे दिवसापासून सर्व लोक निर्द्रव्य होऊन गतकर्माबद्दल प्रायश्चित्त घेऊन नवीन संसार पुन्हां मांडण्याचे उद्योगास लागले.

नगरवासी लोक निष्काळजी झाले खरे, परंतु ज्या लोकांचें राज्यकारस्थानांत विशेष अंग होतें, त्या लोकांवरचें अरिष्ट संपलें नाहीं. इंग्रज सरकारांनीं बाईसाहेबांचे पदरचे सरदार, मुत्सदी, वगैरे लोकांचा शोध करण्याचा उद्योग सुरू ठेविला होता. जे जे सरदार या बंडांत होते, ते ते सांपडले असतां शहरांत वाड्यापुढें फांशी देत असत. अकरावे रात्रीं बाईसाहेब इंग्रज सरकारचे लष्करांतून फळी फोडून गेल्या ते समयीं त्यांजबरोबरचे स्वार, सरदार व पायदळ विलायती लोक, बहुधा मरण पावले. कांहीं कांहीं लोक बाहेर पडून जीव बचावून पळून गेले. कांहीं सांपडले ते परत झांशीस आणून फांशी दिले. बाईचा बाप मोरोपंत तांबे ह्यास त्या रात्रीचे प्रसंगांत पळतां पळतां तरवारीचा वार पायाचे मांडीस लागला होता. मांडी पायज़ाम्यांतून फार कापली गेली होती, तरी तसाच घोड्याचे रिकिबीवर भार देऊन घोडा पळवीत पळवीत उजेडतां दतिया शहरानजीक गेला, तों शहर

शत्रुचें आहे असें दिसलें. परंतु सर्व अंग रक्तानें भरलें आहे, कपडे लाल झालेले आहेत, असें पाहून फार घाबरून निरुपायास्तव शहरचे दरवाज्याजवळ गेला. तेथें एक तांबोळी दरवाज्यांत पानें विकण्याकरितां बसला होता. त्यास पाहून घोड्यावरून हळूच उतरून घोडा सोडून दिला आणि तांबोळ्यास शरण जाऊन त्यांस कांहीं मोहरा देऊन वश केला. मग तांबोळ्यानें मोरोपंतास हळूहळू आपले घरीं नेऊन ठेविला. नंतर त्यानें राजास सर्व मजकूर सांगून राजाकडील लोक घेऊन येऊन त्यांचे स्वाधीन मोरोपंतास केला. पुढें दत्तियावाले राजांनीं त्यास कैदखान्यांत ठेऊन इंग्रज सरकारास कळवून त्यांचे स्वाधीन केलें. इंग्रज सरकारानें त्यास डोलींत घालून झांशींत आणून वाड्यापुढें फांशी दिला. याप्रमाणें जिकडे जिकडे शोध लागला तिकडून गुन्हेगारास धरून आणून झांशींत फांशी देत होते. किल्याखालीं काळा जरनेली झेंडा लाविला होता. शहरांतही शोध करून गुन्हेगार पकडून लागलीच फांशी देत होते.

बिजन व लूट सरल्यावर आह्मी झांशींत पंधरा दिवस काढले. नंतर एके दिवशीं रात्रौ आह्मी उभयतां दोघेजणांनीं बसून विचार केला, त्यांत असें ठरलें कीं, या देशांत आलों त्यापेक्षां आतां श्रीगंगेचीं स्नानें करून, व काशीक्षेत्र पाहून, ब्रह्मावर्तक्षेत्रीं चार महिने राहून देशीं जावें हें बरें. घरून निघाल्यापासून अर्थ प्राप्त न होतां महासंकट मात्र प्राप्त झालें, हा आपले दैवाचा योग आहे. आतां काशी यात्रा घडण्याकरितां कांहीं पैसा मिळविलाच पाहिजे. घरीं पैसा नेण्यापुरता न मिळाला तरी हरकत नाहीं, परंतु यात्रेकरितां पैसा मिळविणें प्राप्त आहे. सबब येथून निघून, श्रीक्षेत्र चित्रकूट येथें, आपले यजमान

वर्सईकर हरीपंत तात्या भावे, सरकार आश्रित बहुत दिवसांचे आहेत, तेथें जाऊं. ह्मणजे तेथील यात्राही होऊन कांहीं पैसाही मिळेल. येथून डाक चालते असें ह्मणतात, तर प्रथम एक खुशालीचें पत्र घरीं उदईक रवाना करावें, व दिवस पाहून येथून प्रयाण करावें, असा विचार करून दुसरे दिवशीं वर्सईस तीर्थरूपाचे नांवें पत्र लिहिलें. त्यांत झांशीचा थोडा मजकूर लिहून आह्मी पुढें सराईस मार्गशीर्ष पौष अखेर वर्सईस परत येतों, हल्लीं ब्रह्मावर्त क्षेत्रीं निघून गेलों, खुशाल आहों, काळजी करूं नये वगैरे मजकूर लिहून, पत्र डाक मार्गें रवाना केलें. व पुढें मुहूर्त पाहून ब्रह्मावर्तास जावयास निघालों. ते समयीं तेथील शेजारी लोकांस आमची स्थिति पाहून फार वाईट वाटलें. ब्राह्मण येथें येऊन महासंकटांत पडून अर्थ, पात्र, वस्त्राशिवाय जाणार असें वाटून, मांडवगणे याजकडील मनुष्यें डोळ्यांस पाणी आणून फार गहिंवर येऊन स्तब्ध राहिलीं. आम्ही उभयतां काका व मी कंबरेस करगोटे बांधून, लंगोटे नेसून लंगोट्यांचे आंत करगोट्यास सोन्याचें जोडवें बांधून ठेविलें, आणि दोघांत मिळून तंबाखूचा बटवा एकच राहिला होता, तो बाहेरून फाटून चिंध्या लोंबत होत्या, तोच फाटका बटवा बरोबर घेतला. त्यांत साधारण लोखंडी अडकित्ता व एक जस्ती डबी होती. आणि रुपये तीन व एक रुपयाचा खुर्दा इंग्रजी, याप्रमाणें बरोबर अर्थ होता. कंबरेस एक पंचा फाटका नेसण्यासारखा गुंडाळून घेतला, एक पंचा डोकीस बांधला, व एक उपर्णा अंगावर घेऊन अंगांत फाटकें बन्यानं घातलें. अंबाडीची दोरी पाऊणशें हात सुमार पाणरसी घेऊन, त्यास तांब्याभर पाणी

राहील असें मातीचें मडकें लाविलें व तो रसी लोटा बरोबर घेतला. अशा अवधूत वैभवानिशीं सर्वांस नमस्कार करून घराबाहेर पडलों. मांडवगणे हे शहरचे दरवाज्यापर्यंत पोंचविण्यास आले होते. तेथें त्यांनीं असा करार करून घेतला कीं, तुह्मीं यात्रा करून देशीं परत जाल तेव्हां या वाटेनें येऊन पुन्हां भेट दिल्याशिवाय जाऊं नये; तें आह्मीही कबूल केलें; नंतर मांडवगणे परत गेले व आह्मी दोघांनीं काल्पीचा रस्ता धरला.

भाग ६ वा.

काल्पी प्रकरण.

मा धाव मा धाव विनैव दैवं । श्वा धावमानो लभते न लक्ष्मीम् ॥

काल्पीचा रस्ता धरल्यानंतर मजल दरमजल जातां जातां एके दिवशीं सायंकाळीं एका खेडे वस्तीस येऊन पोंचलों. तेथून काल्पी सुमोरें साहा कोश राहिली होती. गांवाबाहेर चिंचेची झाडी आहे, तेथें स्वयंपाक तयार करून भोजनें झाल्यावर स्वस्थ निद्रा केली, पाहाटेच्या प्रहर रात्रीच्या सुमारास, एकाएकीं मोठा गलका झाला. त्यासरसे उठून पाहतों तों शेंकडों स्वार रस्त्यानें उधळत चालले आहेत, असें दृष्टीस पडलें. हें काय अरिष्ट आलें आहे याची कल्पना होईना. आम्हीही तसेच घाइघाईनें आपलें सामान गुंडाळून, खाकोटीस मारून, शिपाई लोकांच्या बरोबर पळ काढूं लागलों. कांहीं वेळानें असें समजलें कीं, पेशव्यांची व इंग्रजांची

चरखारीवर लढाई होऊन, त्यांत पेशव्यांचा मोड झाला. त्यांत झांशीवाली राणी ही होती. ती फौज परत काल्पीवर चालली आहे. मग आम्ही किंचित् स्वस्थ होऊन झुंजु मुंजूचे सुमारास एका विहिरीवर पाणी काढून शौच मुखमार्जन करण्यास बसलों. तों पांच चार स्वार विहिरीवरून जात होते. त्यांत झांशीवाली दृष्टीस पडली. तिनें सर्व पठाणी पोषाग केला होता, व सर्व अंग धुळीनें भरलें होतें, तोंड किंचित् आरक्त असून म्लान व उदास दिसत होतें. तिला तृषा फार लागली असल्यामुळें घोड्यावरूनच आम्हांस तिनें तुम्ही कोण, आहां असा प्रश्न केला. तेव्हां आम्ही पुढें होऊन हात जोडून विनंती केली, कीं आम्हीं ब्राह्मण आहों आपल्यास तृषा लागली असल्यास पाणी काढून देतों. बाईसाहेबांस ओळख पटली व खालीं उतरल्या. मी रसी मडकें घेऊन लागलीच विहिरींत सोडणार, तों बाईसाहेब ह्मणाल्या कीं, तुम्हीं विद्वान् ब्राह्मण, तुम्हीं मजकरितां पाणी काढूं नका. मीच काढून घेतें. हे तिचे उदासपणाचे शब्द ऐकून मला फार वाईट वाटलें. परंतु निरूपायास्तव रस्सी मडकें खालीं ठेविलें. बाईसाहेबांनीं पाणी काढून, त्या मृण्मय पात्रांतून ओंजळीनें पाणी पिऊन, तृषा हरण केली. दैवगति मोठी विचित्र आहे. नंतर मोठ्या निराश मुद्रेनें बोलल्या कीं, मी अर्धा शेर तांदुळाची धनीन, मजला रांडमुंडेस विधवा धर्म सोडून हा उद्योग करण्याची कांहीं जरूर नव्हती, परंतु हिंदुधर्माचा अभिमान धरून या कर्मास प्रवृत्त झालें, व याजंकरितां विचाची, जीविताची सर्वांची आशा सोडिली. आमच्या पदरीं पातकच फार ह्मणून आह्मांस ईश्वर यश देत नाहीं. चरखारींवर मोठी लढाई झाली, परंतु आह्मास

यश आलें नाहीं. काल्पीवरही इंग्रज चालून येत आहे. तेथें थोडक्यांतच जंग होईल; जें अदृष्टांत लिहिलें असेल तें होईल, असें ह्मणून बाईसाहेब उठल्या. आह्मीही उभे राहिलों. बाईसाहेब घोड्यावर बसल्या. इतक्यांत आठवण होऊन आह्मांस विचारलें कीं, तुह्मी गरीब भिक्षुक ब्राह्मण तुह्मांस घोड्यावरही बसतां येत नाहीं. काल्पीस काय हेतु धरून जात आहां? असा प्रश्न करितांच आह्मी सांगितलें कीं, काल्पीस दक्षिणी ब्राह्मण पुष्कळ आहेत; त्यांजपासून दक्षणा मिळेल ती मिळवून, यमुना उतरून गंगास्नानार्थ ब्रह्मावर्त क्षेत्रीं जाणार आहों. 'बरें आहे, तुह्मी काल्पीस गुदामांत यावें,' असें ह्मणून बाईसाहेब चालत्या झाल्या.

आह्मीही हळूहळू निघून नऊ वाजायाचे सुमारास काल्पीस जाऊन पोंचलों. आतां कोठें जावें, याचा विचार करीत एका झाडाखालीं बसलों. इतक्यांत काकांचे परिचयाचा एक ब्रह्मावर्ता-कडील ब्राह्मण सहज बाजारांत जाण्याकरितां निघाला होता, तो दृष्टीस पडला. त्याची आमची भेट होतांच त्यानें आह्मांस दक्षिणी-लोकांसाठीं एक मोठा विस्तीर्ण मंडप स्नान, संध्या, भोजनाकरितां यमुनाकांठीं घातला होता तेथें नेऊन पोंचविलें. नंतर आह्मी स्नानसंध्या करून भोजन आटोपून शहर पाहण्यास निघालों.

काल्पी हें लहानसें टुमदार शहर यमुनाकांठीं आहे. यमुना उत्तर दक्षिण वाहत असून, पश्चिम किनाऱ्यावर काल्पीचा किल्ला बांधलेला आहे. त्यास तिन्ही अंगांनीं मोठा मजबूत कोट आहे व चवथे बाजूस यमुना फार खोल आहे, याजमुळें हा किल्ला फार शोभिवंत असून तसाच बळकट आहे. किल्याच्या पश्चिमेस मैदान टाकून पलीकडे

शहर वसलें आहे. तेथें साखरेचा व्यापार फार मोठा चालत असल्यामुळें, मोठ मोठ्या धनिक व्यापाऱ्यांच्या हवेल्या शहरांत लागून गेल्या आहेत. व रस्तेही चांगले रुंद आहेत. यमुना फार खोल असल्यामुळें शहरांत विहिरीही फार खोल आहेत. शहरचे पश्चिमेस मोठें विस्तीर्ण लढाईस योग्य असें एक दुसरें मैदान आहे. त्यास चौऱ्यांयशीं घुमटाचें मैदान ह्मणतात. तेथें पूर्वी बादशाहींत एक मोठी लढाई झाली होती. बादशाहाचा जय झाल्यावर मोठमोठे चौऱ्यांयशीं सरदार रणांत पडले होते, त्यास तेथें तेथें पुरून त्यांजवर चुनेगच्ची मजबूत व सुंदर कबरी बांधल्या आहेत. त्या कबरस्थानांच्या उंच घुमटांनीं तें मैदान फार शोभिवंत दिसतें.

याप्रमाणें सायंकाळपर्यंत काल्पी शहर पाहिल्यावर दुसरे दिवशीं तेथें पुष्कळ दक्षिणी ब्राह्मण होते, त्यांजपासून दक्षिणा मिळवून काल्पींतून निघून यमुना पार जाण्याच्या विचारास लागलों. तेव्हां लोक सांगू लागलें कीं, इंग्रज सरकारचे लोक फार नजीक आले आहेत व एक दोन दिवसांत काल्पीवर लढाई होईल. काळे लोक शहर आंत घेऊन बाहेरून सारखे मोरचे बांधून, लढाईस तयार होऊन राहिले आहेत. यमुना उतरून पलीकडे जाण्यास रस्ता नाहीं. पलीकडे इंग्रजांचा पक्का बंदोबस्त आहे. या हकिगती ऐकून आह्मांस भीति पडली. एका मृत्युमुखांतून निघून पैशाचे लोभानें दुसऱ्यांत येऊन पडलों असें वाटूं लागलें. शेवटीं झांशीवाली बाईसाहेबांस भेटून कांहीं तरणोपाय शोधावा, असा निश्चय करून बाईसाहेबांची भेट घेतली. त्यांनींही असें सांगितलें कीं, बहुधा आजच रात्रीं लढाई येथें सुरू होईल. तुह्मी येथें राहाल तर व्यर्थ प्राणसंकटांत पडाल. यमुना

पार इंग्रजाचा पक्का बंदोबस्त आहे खरा, परंतु येथून उत्तरेस चार कोशावर आपले लोक यमुनेचा घाट धरून राहिले आहेत. तेथें आतांचे आतां निघून जावें. व आमची खूण सांगून नदी उतरून मोठा रस्ता न धरितां आड रस्त्यानें ब्रह्मावर्तास जावें. असें ह्मणून आह्मांस वाटखर्चास कांहीं रुपये दिले. बाईसाहेबांचा आह्मावर फार लोभ होता, त्यांचे अति उपकार मानून दिलेले रुपये घेऊन, बिऱ्हाडीं आलों व निघण्याचे तयारीस लागलों. पाहाटेच्या सुमारास निघणार तों अगोदर मध्यरात्रीचे सुमारास तोफा, बंदुका, कडामिनी वगैरे मृत्युयंत्रांचे शतावधि आवाज होऊं लागले. तेव्हां आम्ही ठिकच्याठिकाणीं जागे होऊन भीतीनें विरघळून गेलों, व निरुपाय झाल्यामुळें काल्पीसच राहिलों.

काल्पीवर तीन दिवस लढाई चालली होती. पेशव्यांकडील फौज पुष्कळ प्रकारें लढाईच्या कामास निरुपयोगी झाली होती. इंग्रजाचा दिल्ली, लखनौ, झांशी वगैरे ठिकठिकाणीं जय होऊन बंडांतील लोक बहुतेक निराश झाले होते. याजमुळें पुष्कळ जुने माहितगार पलटणी लोक, जिवाच्या भीतीनें पलटणी सोडून आपले घरीं ठिकठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या जाहीरनाम्यास भुलून, वेशांतर करून जाऊन राहिले, वं दुसरे उद्योग करूं लागले. नवीन लोक ठेविले ते नवशिके असल्यामुळें त्यांस कवाईत चांगली येत नसून, टिकाऊ नव्हते, इतकेच नव्हे, परंतु चांगले व दमदार लोक बडांत मिळण्यास नाखूष असल्यामुळें, नवीन लोकांत बहुतकरून चोरटे, लुचे, लुटारू लोकच भरले असत. त्यांचे लक्ष लढाईवर फारसें नसून लुटीवरच असे. तिसरे दिवशीं

इंग्रजाचा जय होऊन पेशव्यांचा मोड होणार, असा रंग दिसतांच शेंकडों शिपाई लढाईचा उद्योग सोडून शहरांत शिरले, व त्यांनीं लूट, दंगा, अनीति यांचा रस्ता पकडला व चांगल्या संभावित श्रीमान् लोकांचीं घरें फोडून लुटीस आरंभ केला. साखरेच्या गोण्या, पोतीं रस्त्यावर ओढून टाकल्या, व अनाथ स्त्रियांची दुर्दशा केली. याप्रमाणें कांहींसें शहर लुटलें गेलें नाहीं तों इंग्रजांनीं मोरचे जिंकून शहरांत शिरकाव केला. काळे शिपाई ज्यास जिकडे वाट फुटेल तिकडे पळून गेले, शेंकडों मरण पावले. तात्या टोपी, रावसाहेब व झांशीवाली बाई यांनीं रंग फिरलेला पाहतांच पळ काढून पूर्वीच अरण्याचा रस्ता धरिला होता.

आम्हींही, लढाईंत पराभव झाला असें समजतांच जिवाच्या भीतीनें व्याकूळ होऊन कांहीं दक्षिणी ब्राह्मण पळत सुटले होते, त्यांचे बरोबर पळ काढूं लागलों. परंतु त्या वेळची त्या शहरची दीनावस्था पाहून आम्हांस आमचे दुःखाचा व भीतीचा क्षणभर विसर पडला. सर्व रस्त्यावर काल्पीची साखर पसरली होती. ठिकठिकाणीं सावकार लोकांस शिपाई लोक मारहाण करून द्रव्य उपटीत होते. बहुतेक रहिवाशी आतां इंग्रज आमचें काय करितो या धास्तीनें होरपळून जाऊन दीन दिसत होते. कोठें कोठें गांवचेच लुच्चे, अन्यायी व दांडगे लोकही लुटींत मिसळून आपला कार्यभाग साधीत होते. कोठें स्त्रियांचीही विडंबना होतांना नजरेस पडली. याप्रमाणें शहरची हवालदिल स्थिति पाहून आमचें दुःख दुणावलें व आम्हीं आडवाटेनें होईल तितकें जलदीनें शहराच्या बाहेर पडलों व बाईसाहेबांनीं सांगितलेल्या घांटाचा रस्ता धरिला. तेथें येऊन

पोंचलों तों नावाडी लोकांस अगोदरच बातमी समजून ते पळून गेले होते. तेव्हां निरुपाय होऊन भीतीनें अगदीं वेडावून गेलों. इतक्यांत एक सरदार तेथें आला, त्याचे फार फार आर्जव करून नावाडी बोलावून आम्हीं यमुना उतरून अंतर्वेदींत शिरलों.

यमुनेच्या पलिकडच्या तटावर पाय ठेवतांच जीवांत जीव येऊन अत्यानंद झाला. व कुळस्वामिणीचा व परमेश्वराचा स्तव करून आडरस्त्यानें मार्ग आक्रमिण्यास आरंभ केला. ते दिवस उन्हाळीचे असल्यामुळें वाटेनें फार हाल होत. एके दिवशीं प्रखर तापानें तप्त होऊन आराम करण्यासाठीं एका वृक्षाखालीं बसलों आहों, तों पांचचार रांगडे चोर आह्मापुढें येऊन उभे राहिले, व आह्मांस धमकी देऊन आमच्या जवळचा ऐवज मागूं लागले तेव्हां आह्मी मोठया काकुळतीनें त्यांस सांगितलें कीं, आह्मी गरीब यात्रेकरी ब्राह्मण आहों आमचे जवळ कांहीं अर्थ नाहीं. परंतु आह्मांस फत्तेपुरास पोंचविल्यास आह्मांवर फार उपकार होतील. असें ह्मणतांच त्यांनीं आह्मांस धरून आमचे जवळील सर्व रुपये काढून घेऊन उलटे खर्चाकरितां पांच रुपये आह्मांस दिले. ही चोरी झाल्यावर आमचें मन फारच निराश झालें. झाशींहून तापल्या तेलांतून बाहेर पडलों, परंतु पुन्हां द्रव्यार्चनाकरितां जीव धोक्यांत घालून काल्पीस गेलों. कांहीं द्रव्य मिळवून तेथून केवळ मृत्युमुखांतून सुटलों, तोंच येथें या दुष्टांनीं एका क्षणांत आह्मांस पुन्हां निर्द्रव्य करून सोडावेंना! असा अत्यंत ताप झाला. परंतु शेवटीं सरोम्भश्चातकेनात्तं गलरंध्रेण गच्छति ॥ इत्यादि सुभाषितांची आठवण होऊन मनाचें समाधान केलें.

असो, देवावर भरंवसा ठेऊन पुढें चालूं लागलों. आडरस्त्यांनीं जातां जातां कांहीं दिवसांनीं ब्रह्मावर्तापासून तीन कोशावर खिरागाडेश्वर [क्षीरगतेंश्वर] ह्मणून सांबशिवलिंग आहे, तेथें येऊन पोंचलों. देवाचें दर्शन घेऊन तसेंच पुढें जाऊं लागलों. ते दिवशीं सकाळपासून मनास कांहीं विलक्षण प्रकारचा आनंद व उत्साह वाटत होता. ज्या स्वर्गंगेला भगीरथानें भगीरथप्रयत्न करून अनंत तपाचे प्रभावानें पृथ्वीवर आणलें, जिच्या पावनोदकाचा स्पर्श झाल्यानें सर्व पातकांचा नाश तत्काल होतो, जिच्या सुरम्य पात्राचीं मनोहर वर्णनें वाल्मीकि, व्यास, जगन्नाथ इत्यादिकांच्या काव्यांत भरलीं आहेत, अशा त्या श्रीभागीरथी देवीचें दर्शन होऊन, उदकाचें स्नानपान होणार, हें मनांत येऊन मनाची फार चंचल स्थिति होऊन गेली होती. व त्या पर्वकालाचा महिमा मनांत आणून, सकाळपासून उपोषण केलें होतें. सायंकाळीं चार वाजावयाचे सुमारास ब्रह्मावर्ताजवळ जाऊन पोंचलों. क्षेत्राकडे न जातां प्रथम गंगेवर गेलों; श्रीगंगेचें दर्शन होतांच अत्यानंद होऊन नमस्कार घातला. नंतर येथेच्छ निर्भलपणें स्नान करून, आजपर्यंत भोगलेल्या सर्व दुःखाचें व क्लेशाचें सार्थक्य होऊन, आह्मीं जन्मजन्मांतरींच्या पातकापासून मुक्त झालों, असें वाटलें.

ब्रह्मावर्त क्षेत्रीं भागीरथीचें पात्र फारच मनोहर आहे. तें सुमारें दीड मैल रुंद असून, मूळ नदीच्या धारेचा प्रवाह मधल्या अर्ध्या मैलांतून वाहत आहे. अयोध्येकडील तटाक सखल असल्यामुळें, पाणी लांबवर पसरलें आहे. परंतु अंतरवेदीचा कांठ उंच असून, त्यास ठिकठिकाणीं मोठे चंद्राकार घस आहेत. त्यांतून गंगेचें स्वच्छ

शुभ्र उदक इतकें शांत व गंभीर वाहत असतें कीं, ब्रह्मावर्ताकडील कांठ शेंकडों ल्हान ल्हान रम्य सरोवरांचा बनला आहे कीं काय, असा भास होतो. याजमुळें नदीचे सर्व गुण, व सुंदर देखावा, व सरोवरांत असणाऱ्या सर्व रमणीय पदार्थांची शोभा, एके ठिकाणीं मिश्र झाली आहे. ठिकठिकाणीं पांढरीं, निळीं, तांबडीं कमळें प्रफुल्लित होऊन पाण्याच्या बाहेर आलेलीं फार मनोहर दिसतात. किनाऱ्यावर कुश काश दर्भ वेतस वगैरे ब्रह्मकर्मोपयोगी तृणाची समृद्धि आहे. सरोवरांच्या पाण्यांतून असणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या वेलींचीं पानें बाहेर पडलेलीं दिसतात. पाणी नेहमीं वाहत असल्यामुळें नदीच्या पाण्यासारखें फार स्वच्छ आहे, व शांत असल्यामुळें त्यांत सरोवराप्रमाणें मासे मोठ्या आनंदानें नेहमीं खेळत असतात. याचमुळें जागोजागीं बगळ्यांच्या शुभ्र पंक्ति, मोगऱ्याच्या कळीच्या गजऱ्याप्रमाणें शोभिवंत दृष्टीस पडतात. कांठावर मोठमोठाले जुने वृक्ष हजारों लागून गेले आहेत. ठिकठिकाणीं सुरम्य उंच देवाळयांचीं शृंगें, त्यांतून बाहेर पडलेलीं दृष्टीस पडतात. कलियुगाच्या प्रारंभापासून, अनेक राजांनीं नाना प्रकारचे घाट बांधलेले आहेत, ते फार मजबूद व गुळगुळीत आहेत. त्याजवरून शेंकडों स्त्रीपुरुषें ऋषिकर्मांत निमग्न झालेलीं दृष्टीस पडतात. सारांश भागीरथीच्या पात्राचा सुंदर देखावा पाहतांच, व तिच्या पावन स्वच्छ शुभ्र उदकांत स्नान करितांच, व तिच्या ठिकाणीं ओतप्रोत भरून राहिलेल्या, ऋषिधर्मानुकूल वस्तूंचा उत्कर्ष मनांत येतांच, कांहीं विलक्षण आनंद होऊन विस्मय वाटला. फार काय वर्णन करावें, "त्वत्तीरे वसतः त्वदंबु पिबतः त्वद्वीचिषु प्रेंखतः। त्वन्नाम

स्मरतः त्वदर्पितदृशः स्यान्मे शरीरव्ययः ।" अशी मनाची स्थिति होते, यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं.

असो. स्नान झाल्यावर किंचित् फलाहार केला, व रात्रभर गंगातीरींच राहण्याचा निश्चय करून, तेथें एका देवालयांत निद्रा केली. पहांटेस उठून चालूं लागलों, ते सकाळीं आठ वाजावयचे सुमारास श्रीक्षेत्र ब्रह्मावर्त येथें येऊन पोंचलों. व शोध करून वेदशास्त्रसंपन्न रा. बाबा कर्वे यांचे वाड्यांत, मामासाहेब वाकनीस यांचे घरीं उतरलों. नंतर तीर्थविधि करून क्षेत्र संबंधीं श्राद्धादि कृत्यें आटोपिलीं. तेथें झालेला सर्व वृत्तांत लोकांनीं सांगितला, तो पूर्वीचे भागांत लिहिला आहे. सर्व क्षेत्र भूतेश्वरापासून ध्रुवघाटापर्यंत पाहिलें. इतक्यांत, चित्रकूट येथें श्रीमंत नारायणराव पेशवे, व माधवराव पेशवे, यांनीं कांहीं अनुष्ठानें सुरू केलीं आहेत, त्यांत दक्षिणा मिळविण्याकरितां कांहीं ब्रह्मावर्ताकडील ब्राह्मण निघणार आहेत अशी बातमी लागली. या अनुष्ठानांत आपणही कांहीं प्राप्त करून घ्यावें, ह्मणजे आपल्याजवळ काशीयात्रेच्या खर्चापुरता पैका होईल, व आपले यजमान राजेश्री हरीपंत तात्या भाव्ये वरसईकर, बहुत दिवसांचे श्रीमंताचे नोकर आहेत, त्यांचीही भेट होईल असें मनांत आणून, चित्रकूटास जाण्याचा निश्चय केला; व जाणारे मंडळीचा शोध लावून त्यांजबरोबर निघालों. वाटेनें मजल दर मजल जात असतां, एके मुक्कामावर मजला सरदगर्मीचा विकार होऊन अतिज्वर आला, तेणेंकरून वमन व रेच ही बरेच झाले. ब्रह्मावर्ताकडील मंडळी ती० काकांच्या पक्की परिचयाची असल्यामुळें, त्यांनीं तेथेंच दोन दिवस मुक्काम केला. नंतर मला बरें वाटून आह्मी पुन्हां चालूं लागलों. चित्रकूटास येऊन

हरीपंत भाव्ये त्यांचे घरीं उतरलों. राजेश्री हरीपंत हे तीर्थस्वरुप काकांचे परिचयाचे होते. त्यांचें वय सुमारें पंच्याऐंशी वर्षांचें होतें, परंतु सर्व शरीर स्वाधीन होतें. त्यांची स्त्री मरण पावली होती. पुत्र, कन्या मुळींच झाली नव्हती, सबब एक दत्तक पुत्र घेतल्यावर त्याचें लग्न केलें. तोही पांच चार वर्षांनीं मरण पावल्यावर त्याची बायको व ते अशीं दोघेंच होतीं. पुढें हरीपंत यांनीं वरसईस पत्र पाठवून, आपले सखे बंधूचा पुत्र काशीनाथराव हा दत्तक घेण्याकरितां चित्रकूटास आणिला होता, त्यास येऊन तीन वर्षें झालीं होतीं. दत्तविधान झालें नव्हतें. तो त्यांजपाशीं वरसईहून आल्यावर मागें त्यांचे तीर्थरुप मोरोपंत भावे यास देवाज्ञा झाली. ही बातमी त्यास दंग्याचे दिवस असल्यामुळें व डांका वगैरे सुरळीत चालत नव्हत्या, याजमुळें समजली नव्हती. मोरोपंतास अश्वीन वद्य ९ स देवाज्ञा झाली, ही खबर आम्हांस शिंद्याचे लष्करांत समजली होती. पुढें सर्वांच्या भेटी होऊन आह्मांस व त्यांस आनंद झाला. परस्पर कुशल वृत्तें कळवितां हेंही वर्तमान आह्मी सांगितलें. मग पयोष्णी गंगेवर काशीनाथ यास नेऊन क्षौरादि कृत्य करविलें. और्ध्वदेहिक कृत्य आटोपल्यावर आह्मी चित्रकूटाजवळील कांहीं यात्रा केल्या. रामायणांतील प्रसिद्ध चित्रकूट पर्वतावर कामथानाथाचे यात्रेस गेलों. पयोष्णी गंगा शहराचे निकट भागीं पश्चिमेस वाहत आहे ती उतरून राघोप्रयागीं स्नानें करून, कामथानाथाचें दर्शन घेऊन, पर्वत प्रदक्षिणेस गेलों. तेथें त्या पर्वतावर वानरें व माकडें हजारों आहेत. यामुळें भाजलेले चणें बरोबर बरेच घ्यावे लागतात. त्यांच्या हद्दी वाटलेल्या आहेत. हद्दीपर्यंत मांकडें व वानरें यात्रेकरूं लोकांबरोबर येतात, व त्यांस चणें, फुटाणें

द्यावे लागतात. या पर्वतावर कोणी चढू नये, असा शाप दिला आहे, व त्या पर्वतावर श्रीराम व सीता एकांतांत असतात यामुळें तेथें कोणी जात नाहीं. लक्ष्मणही त्या पर्वतावर गेले नाहींत. जवळच एक दुसरा पर्वत आहे, त्याजवर फक्त लक्ष्मण राहतात, तेथेंही आह्मीं जाऊन यात्रा करून आलों. त्या पर्वतावर पारिजातकाचे वृक्ष फार आहेत. तिकडील लोक पारिजातकाच्या काठ्यांनीं घराचीं ओमणें करून वर कवलें लावितात. पयोष्णी गंगेंत रोज स्नान केलें असतां, तीरीं बचनागांचे वृक्ष फार असून त्याचें मुळांतून पाणी येत असल्यामुळें, अंगास कंडू उत्पन्न होतो.

असो. यात्रा करून परत चित्रकूट शहरांत आलों. राजश्री हरीपंत तात्यांनीं आह्मांस असें सांगितलें कीं, वेदमूर्ती राजश्री चिमणभट्ट यांस तुमचेबद्दल सांगितलें आहे, तर तुह्मीं त्यांना जाऊन भेटावें ह्मणजे तूर्त नित्य दानें देतील, व पुढें अनुष्ठानेंही लावितील. असें हरीपंतांनीं सांगितल्यावरून त्याच दिवशीं सायंकाळीं आह्मीं चिमणभट्टजीस जाऊन भेटलों. तेव्हां त्यांनीं तुमची अनुष्ठानाकडे एक महिन्याची योजना केली आहे, तर तुह्मी उदईक सकाळीं आठ वाजतां यावें असें आह्मांस सांगितलें. परंतु घराहून निघाल्यापासून आमचें दैव फिरलेंच होतें. आह्मांस पैसे मिळणार कोणीकडून? अनुष्ठान सुरू होण्यापूर्वीच शहरांत बखेडा उत्पन्न होऊन सर्व गोष्टी जागच्याजागीं राहिल्या.

श्रीमंत नारायणराव व माधवराव पेशवे हे इंग्रजांशीं बिघडले नव्हते; परंतु त्यांचा दिवाण राधाकिसन ह्मणून परदेशी होता तो बिघडला होता. प्रथम जेव्हां इंग्रजसरकारावर गहजब गुदरला तेव्हां

तेथील कलेक्टर वगैरे साहेबलोकांनीं चित्रकुटाखालचा २५ लक्षाचा मुलूख व डंघाईचा मुलूख श्रीमंत नारायणराव पेशवे यांचे स्वाधीन करून दत्तर स्वाधीन केलें, व आपण जीवभयास्तव पळून गेले. मुलूख स्वाधीन झाल्यावर दिवाणजींनें बंदोबस्ताकरितां ह्मणून नवीन शिपाई ठेविले. बिघडलेल्या पलटणांस आश्रय दिला व दारूगोळा, तोफा वगैरे सामान तयार करण्याचा कारखाना सुरू केला. परंतु नारायणराव पेशवे यांचे मनांत कोणतेही प्रकारचा कितू आला नव्हता. इत्यादि हकीगती आह्मांस चित्रकूटास आल्यावर समजल्या होत्या. आंही अनुष्ठानाचें आमंत्रण घेऊन घरीं आलों तो अशी बातमी समजली कीं, कपतानसाहेब* बरोबर दोन पलटणी घेऊन पयोष्मी गंगेपलीकडे दोन कोशावर येऊन उतरला आहे. साहेबानें स्वाराबरोबर एक पत्र पाठवून श्रीमंतास कळविलें कीं, आह्मांस तुमचे भेटीचें प्रयोजन असल्यामुळें तुह्मी उदईक सायंकाळपर्यंत उभयतां बंधु दिवाणजीस बरोबर घेऊन आमचे गोटांत येऊन भेटावें. बरोबर हत्यार किंवा शिपाई आणूं नये. श्रीमंताचे मनांत स्वतांविषयीं कोणत्याही प्रकारचा संशय नसल्यामुळें आपण निर्दोषी आहों असें पूर्ण जाणून व इंग्रजाचे न्यायावर भरंवसा ठेवून श्रीमंतांनींही लागलीच त्याच पत्रावर उदईक येऊन भेटतों असा शेरा लिहून पत्र परत पाठवून दिलें. तत्रापि या भेटीपासून काय होतें याची काळजी लागल्यामुळें उभयतां बंधूंस सर्व रात्र झोंप आली नाहीं. ही बातमी शहरांत पसरतांच शहरचे लोक अगदीं तजा-वजा होऊन गेले. जिकडे तिकडे याच गोष्टी चालू होऊन हालचाल होऊन राहिली. कैक लोकांचे अभिप्रायांत श्रीमंतांनीं

* जनरल व्हिटलॉक ६ जून १८५८ रोजी चित्रकूटास आला. मालीसन.

जाऊं नये, गेल्यास व्यर्थ कैदेंत पडून कदाचित् प्राणांसही मुकतील व सर्व शहर लुटलें जाईल असें होतें. कित्येक श्रीमंत निर्दोषी आहेत व खरे रीतीनें वागल्यास त्यांस भय नाहीं, असेंही ह्मणत होते. रात्रौ बारा घटकाचे सुमारास परदेशी दिवाणजी श्रीमंतांस भेटून न जाण्याबद्दल अनेक प्रकारचा उपदेश करूं लागला. "उदईक तुम्ही जाऊं नये हेंच फार चांगलें आहे. गेल्यास मूठभर दारू खर्च न होतां इंग्रजांचा मनोदय साध्य होऊन तुम्ही कदाचित् प्राणास मुकाल; तुमची जिंदगी सर्व लुटली जाईल. याजपेक्षां आपल्यापाशीं दारूगोळा आहे, लढवई लोक आहेत, आपण येथेंच राहून जंग करूं, यांत लौकिक आहे. मनुष्यांस कधींतरी मरणें आहेच, परंतु रांडमरणानें मरून जाणें हे तुमच्या शूर कुलास उचित नाहीं, अशीं अनेक प्रकारचीं शूरत्वाचीं भाषणें करून पेशव्यांचें मन वळविण्याचा यत्न केला. परंतु त्याजवर त्यांचा कांहीं ठसा पडला नाहीं. शेवटीं राधाकिसन परदेशानें कळविलें कीं, आम्ही तर तुह्माबरोबर येत नाहीं. आतांच आम्ही येथून दारूगोळा तोफा फौज वगैरे घेऊन जिकडे वाट फुटेल तिकडे निघून जाणार. परंतु तुम्ही आह्मास खर्चाकरितां दोन लक्ष रुपये दिले पाहिजेत. न दिल्यास आम्ही जबरदस्तीनें घेऊन जाऊं. हें ऐकतांच श्रीमंतांनीं विचार केला कीं, हा मनुष्य जिवावर उदार झाला आहे, त्यांजला आपण खुशीनें रुपये न दिले तर वाड्याबाहेर फौज आणली आहे, ती सर्व लुटून फस्त करून टाकील. याजकरितां सामोपचारानें रुपये द्यावे हे बरें. असा विचार करून रुपये तेव्हांच दिले. ते रुपये घेऊन दिवाण

वाड्यांतून बाहेर पडून सर्व फौज बरोबर घेऊन मध्य रात्रीस जंगलांत निघून गेला. दाहा बारा कोशावर पाहाडी किल्ला बंदोबस्ताचा होता त्याचा आश्रय करून राहिला. इकडे श्रीमंतांनीं ज्योतिषीबुवांस बोलावून आणून त्यांस असें विचारलें कीं, उदईक सायंकाळपर्यंत आह्मांस साहेबांचे भेटीस जाण्यास मुहूर्त केव्हां आहे तो सांगावा. तेव्हां जोशीबुवांनीं मुहूर्त उजाडतां साडेपांच वाजतां लग्नशुद्धी बरी आहे, बाकी दिवस उद्यांचा चांगला नाहीं, मर्जीस येईल तसें करावें. असें सांगितल्यावरून नारायणराव व माधवराव साहेबांनीं साडेपांच वाजतां जावें असा निश्चय केला.

आह्मीं हरीपंत भावे यांचे माडीवर निजलों होतों. तेथें पांहटेच्या सुमारास जागे होऊन गोष्टी बोलत बसलों आहों, इतक्यांत स्वारांच्या घोड्यांच्या टांपाचा टप–टप आवाज कानीं पडतांच धामधूम काय आहे हें पाहण्याकरितां रस्त्याकडील खिडक्या उघडून पाहतों तों श्रीमंताची स्वारी साहेबांकडे जाण्यास निघाली आहे, असें दृष्टीस पडलें. बरोबर शिबंदीचे लोक सुमारें दोनशें बिनहत्यार होते. खुद्द श्रीमंत माधवराव व नारायणराव मेण्यांत बसले असून पुढें भालदार पुकारत होते. उजेडाकरितां शेंकडों मशाली पेटविल्या होत्या. त्या बिनहत्यार स्वारीचा थाट पाहतांच आह्मांस झांशीवालीबाई किल्याबाहेर पडून शत्रूचा घेर फोडण्याकरितां निघाली त्या वेळचें स्मरण होऊन फार वाईट वाटलें, व हे लोक केवळ अपमान व दुःख पदरीं घेण्याकरितां जात आहेत असें वाटूं लागल. स्वारी झराझर चालून उजेडताचे सुमारास पयोष्णीचे पार गेली. स्वारी साहेबांचे तंबूपाशीं येऊन पोंचली तों सहा घटका

दिवस आला. पुढें जाणार इतक्यांत साहेबांकडील स्वार येऊन असें कळविलें कीं, सर्व लोकांनीं येथें राहून फक्त नारायणराव व माधवराव साहेबांनीं मेण्यांतून उतरून पायींच भेटीस यावें. बरोबर एकही मनुष्य घेऊं नये. ते समयीं श्रीमंतांस अति दुःख झालें, परंतु येथवर आल्यावर दुसरे गत्यंतर नाहीं व आपण निर्दोषी आहोंत असें मनांत आणून निरुपायास्तव मेण्यांतून खालीं उतरले. व बरोबर एकही मनुष्य न घेतां तंबूकडे निघाले. श्रीमंत लोकां-बरोबर छत्री धरण्याकरितां एक मनुष्य असतो परंतु तोही बरोबर घेऊं दिला नाहीं. दिवस ऐन ग्रीष्म ऋतूचे असल्यामुळें सूर्याचा प्रखर ताप सुरू झाला होता. श्रीमंतांस उन्हांत जाण्याचा कधींही प्रसंग नसल्यामुळ व चित्तवृत्तीचा क्षोभ झाला असल्याकारणानें त्यांचीं मुखकमळें आरक्त होऊन गेलीं, डोळे लाल झाले, श्रीमंत तंबू समोर येऊन पोंचले तेव्हां साहेब खाना खात बसला होता. व पुढेंही चार घटका श्रीमंताची दाद घेतली नाहीं. त्याजमुळें भर दोनप्रहरच्या उन्हांत तंबूसमोर छत्रीशिवाय श्रीमंतांस उभें राहवें लागलें. त्यांस बसावयास कोणी खुर्चीही आणून दिली नाहीं. त्याची अशी दीनावस्था पाहून त्यांचे लोक दूर उभे होते, त्यांस अति त्वेष येऊन त्वेषानें त्यांचे डोळ्यांस अश्रु येऊं लागले. परंतु त्यांचा कोणत्याही प्रकारचा इलाज चालेना. या शरीराच्या व अप-मानाच्या तापामुळें श्रीमंतांस दे माय धरणी ठाय झालें. जीव कासा-वीस होऊन सर्वांगास घाम सुटला. अति क्षुधा व तृषा उत्पन्न झाली, परंतु स्वीकारलेला मार्ग सोडणें गैर आहे, असें समजून त्या सत्वशील पुरुषांनीं होणारा ताप गट्ट करून तसेच धीर धरून

उभे राहिले. शेवटीं साहेब बाहेर येऊन एकदम तुह्मांस सरकाचे हुकुमावरून कैद केलें आहे असें सांगितलें, व लागलीच गोरे शिपायांस भोंवताली गराडा घालण्यास हुकूम केला. याप्रमाणें नागवे तरवारीचे पाहऱ्यांत ठेविल्यावर जवळच एका झाडाखालीं श्रीमंतांचे मनुष्याकडून स्नान भोजनाची तयारी करविली, व तेथें त्यांस नेऊन गोरे शिपायांचे पाहऱ्यांतच दिवसाचा नित्य विधि त्यांचेकडून करविला.

दुसरे दिवशीं सकाळीं चार घटका दिवसास चित्रकूट शहरांत पांचसहाशें गोरे व कांहीं काळे लोक येऊन श्रीमंतांचे वाड्यांत शिरले. समोर दिल्लीदरवाज्यावर नगारखाना होता त्यांवर चढून नौबदी, नगारे, शिंगें वगैरे सर्व बाहेर रस्त्यांत धडाधड लोटून दिले. वाड्यांत जाऊन सर्व कामगार मनुष्यें बोलावून टीप करून कैद केलीं. तितक्यांत नारायणराव साहेबांची बायको जवळचे बंगल्यांत जाऊन माडीवर बसली. गोरे लोकांनीं सर्व जिंदगी गाड्यांत भरून गोटांत नेण्याचें काम सुरू केलें. लहान मोठीं भांडींकुंडीं सर्व भरून घेऊन जात होते. वाड्यापासून एक कोशपर्यंत एकसारख्या गाड्या वाहत होत्या. सोनें, रुपें, जडाव हिरे, मोतीं, माणिक, मोहरा, पुतळ्या वगैरे सर्व घेऊन गेले. खजिन्यांत कांहींएक ठेविलें नाहीं. कापडांचीं दिंडें, सुटें कापड, बिछाने, सत्रंज्या, जाजमें, लोड, तक्के वगैरे सर्व फरासखाना लुटून नेला. त्यांत कांहीं ठेविलें नाहीं. हत्यारें तरवारी, बंदुका वगैरे वाड्यांत कांहीं ठेविकें नाहीं. दहीं, दुध, तूप, साखर, गूळ, तांदूळ गहूं वगैरे सर्व कोठी लुटून घेऊन गेले. फार काय लिहूं सुपें, टोपल्या, रोळ्या, चांगल्या लांकडी फळ्या, घोंगडी,

कांबळे चिंद्या सुद्धां वस्तु मात्र नेली. द्रोण पत्रावळी देखील ठेविल्या नाहींत. नंतर नारायणरावांचे बायकोजवळ जाऊन आंगावरील दागीने मागीतले. तिनें नथीखेरीज सर्व काढून दिले. ते घेऊन, आपले या गांवांत कोणी आप्त असल्यास तेथें राहण्यास जावें, हा मेणा भोईसुद्धां तयार आहे असें सांगितल्यावरून बाईसाहेब ईश्वरस्मरण करून मेण्यांत बसून आपले माहेरचे आप्ताकडे निघोन गेल्या. नंतर शिपायांनीं देवघरांत जाऊन देवासहित सर्व उपकरणीं नेलीं. शिवाय पाठ, चौक्या, चौरंग वगैरे जिंदगी गाड्यांत भरून तमाम गाड्या नेल्या. चित्रकूटवाल्यापाशीं अर्थ बहुत असून व्यवस्थित सर्व जिनसा होत्या. एकंदर सोनें मोतीं जवाहीर मिळून चार कोटीची मुख्य दौलत होती. याखेरीज भांडीं वगैरे; यापैकीं कांहींएक ठेविलें नाहीं.* असो. त्यांचे मनुष्यांपैकीं आचारी, पाणके, शिष्ये, हुजरे वगैरे बिनहत्यारी शंभर मनुष्यें ठेऊन बाकी माणसांस रजा दिली. वाड्यांत कारकून होते त्यांचाही तपास करून सर्व कागदपत्रांचा थोडक्यांत हिशेब घेऊन त्यांनाही रजा दिली.

---

* या लुटीविषयीं मालिसननें असें लिहिलें आहे. "In the palace itself was stored the where-withal to compensate soldiers for many a hard fight. In its vaults and strong rooms were specie, jewels and diamonds of priceless value." पान २०१ व्हा. ३. या लुटीवर हक्क कोणाचा आहे याजबद्दल सर ह्यूरोज व जनरल व्हीटलॉक या उभयतांत तंटा लागून हायकोर्ट आफ अॅडमिरल्टीनें व्हिटलॉकचे लोकांचा या लुटीवर हक्क आहे असा निकाल दिला.

इंग्रजसरकारनें दुसरे दिवशीं श्रीमंताचे वाड्याभोंवतीं पूर्व पश्चिम, दक्षिण उत्तर, जितके वाडे होते, तितक्यांचे मालकांस हुकूम केला कीं, आठ दिवसांत तुह्मी आपले वाडे पाडून टाकून जागा मोकळी करून द्यावी. नाहीं तर आह्मी वाडे मोडून टाकूं. त्याप्रमाणें आठ दिवसांचे आंत वाड्याभोंवतीं मैदान करून टाकिलें. दुसरे दिवशीं चित्रकूटावर बंदोबस्तकरितां कांहीं फौज ठेवून कपतान साहेब श्रीमंत नारायणराव व माधवराव यांस बरोबर घेऊन धुळ-पुकारचे मुलुखांत बांद्याचे बंदोबस्ताकरितां निघून गेला.

चित्रकूटांत क्रोडो रुपयांचा ऐवज इंग्रजानें लुटला, त्यांत हरिकर्ण रविकर्ण ह्मणून एक अति श्रीमान बांद्याचा सावकार होता, त्याचा ठेव ठेविलेला अर्थ लुटला गेला. पूर्वी हिंदुस्थानांत पेशव्यांनीं स्वारी केली ते वेळेस जवळ पैशाचे पुरवठ्याकरितां एक सावकार घेण्याचे इच्छेनें श्रीमान् सावकाराचा शोध करूं लागले तेव्हां हरिकर्ण रविकर्ण यानें असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांत माझी हुंडी चालत नाहीं असें एकही शहर नाहीं. असें सांगितल्यावरून त्या सावकारास पेशव्यांनीं हिंदुस्थानांतील स्वाऱ्यांचे सोईकरितां आपलेबरोबर घेतलें. सावकारानीं बांदें हें शहर चांगलें मनास आणून तेथेंच वाडा बांधला. त्याचे पुत्र पौत्रही त्याच नांवानें प्रसिद्ध असून फार मोठे सावकार होते. बांद्याचा नबाब जेव्हां बिघडला तेव्हां सावकारानीं कदाचित् बांदे शहर लुटलें जाईल, अशा धास्तीनें चित्रकूटचे यजमान बिघडले नाहींत व तो किल्लाही चांगला मजबूद आहे, असें मनांत आणून चित्रकूटास अर्ध सुमार एक कोटीच्या मोहोरा पुतळ्या पोंचवून श्रीमंताचे खजिन्यांत ठेविल्या होत्या, व त्याच खजिन्यांत पोहे

कुटणाऱ्या अनेक विधवा स्त्रियांनीं सर्व जन्मभर कष्ट करून मिळविलेले शेंदोनशें रुपये पुरचुंडी बांधून निर्भय पाहरेबंदीचा वाडा समजून ठेविले होते. परंतु सर्वांचे नशीब फुटकें असल्यामुळें सर्व अर्थ इंग्रज सरकारानें लुटला. आपला अर्थ सर्व लुटला असें समजतांच हरिकर्ण रविकर्ण यांनीं इंग्रज सरकारास असें कळविलें कीं चित्रकूट येथील लुटींत आमचा अर्थ, आह्मी बंड फितूर वगैरे किंचितही अपराधी नसून, व्यर्थ लुटला गेला आहे, आह्मीं अर्थ ठेविल्याबद्दल जमा खर्चाचें कागदपत्र आपल्यास सर्व सांपडले आहेत, व आमचे अर्थाचे बतेल्यावर आमचे नांवाची चिटी आहे. तो अर्थ आमचा आह्मांस परत देण्याविषयीं दयाळू होऊन सरकारानें हुकूम द्यावा. आमचा अर्थ एकदम नाहींसा झाल्यामुळें आमचे पेढीचें वगैरे सर्व काम अगदीं बंद पडण्याचा सुमार आला आहे. सबब अर्थ आह्मांस परत देणें नसल्यास सरकाराकडे आमचे रुपये व्याजी आहेत ते आमचे व्यापाराचे सोईकरितां आह्मांस एक महिन्याचे आंत सव्याज परत द्यावे. असा अर्ज होतांच इंग्रज सरकारानें हरिकर्ण रविकर्ण यांचा लुटींत घेतलेला अर्थ परत केला. ही बातमी चित्रकूटास समजतांच तेथील पोहे कांडणाऱ्या विधवांनीं आपला पैका मिळण्याविषयीं भडाभड अर्ज इंग्रज सरकारास केले. परंतु त्या बिचाऱ्यांची दाद कोठून लागणार! हरिकर्ण रविकर्ण इंग्रज सरकारचा धनको असल्यामुळें त्यांचा ऐवज त्यांस परत मिळाला. गरीब बिचाऱ्या विधवांचे अर्ज कचऱ्याचे पेटींत गेले.

याप्रमाणें मौजा ऐकत कांहीं दिवस चित्रकूटांत आमचे यजमान हरीपंत भावे यांचे घरीं काढले. नंतर पुढें आतां काय करावें याचे विचारास लागलों. आह्मीं चित्रकूटांत कांहीं द्रव्य मिळविलें, परंतु त्याचे वस्त्रपात्र वगैरे कांहींएक न घेतां रोख रुपये बरोबर घेतले, व कांहीं मंडळी बांद्यास जाण्यास निघाली होती त्यांचे बरोबर बांद्यास कांहीं द्रव्य मिळविण्याकरितां जाण्याचा निश्चय करून निघालों.

बांदे शहरचा नबाब इंग्रजांशीं बिघडला होता. प्रथम बंड झाले ते वेळेस कांहीं पलटणी धुलपुकारचे नबाबास मिळून त्यांनीं दंगा करून इंग्रजांचे फार नुकसान केलें होतें. पुढें इंग्रज फौज बांद्यास येऊन शहरास वेढा देऊन पांच दिवस लढाई केली. व शहर हस्तगत करून घेतलें. नबाबाचा सर्व वाडा लुटून फस्त केला. शहरचे लोक आमचें आतां काय होतें ह्मणून अगदीं घाबरून गेले होते. परंतु त्यांचे पूर्व पुण्याईमुळें इंग्रज फौजेनें शहरास हात लाविला नाहीं. याप्रमाणें बांद्याकडील हकीगत समजल्यामुळें बांदे शहर निर्भय मानून द्रव्य मिळविण्याच्या इच्छेनें हरीपंत भावे यांचा निरोप घेऊन बांद्यास जाण्यास निघालों. ब्रह्मावर्ताकडील कांहीं ब्राह्मण व कांहीं चित्रकूटाकडील मिळून नऊ ब्राह्मण आह्मांशिवाय होते. बरोबर एक गाडी भाड्याची घेतली होती, त्यांत सर्वांनीं आपआपलीं गांठोडीं ठेविलीं होतीं व सर्व आह्मीं पायीं चालत होतों. मजल दर मजल जातां जातां एके दिवशीं सकाळीं उठून सर्व मंडळी चालूं लागली. आमची सामानाची गाठोडीं गाडींत असून अंगांत बन्यान, नेसूं पंचा व अंगावर उपर्णे व तंबाखूचा बटवा, त्यांत सतुची पिशवी, साखर, मेथीचा वाळलेला

पाला व एक पितळेचा मोठा कटोरा एवढें ऐश्वर्य जवळ होतें. बाकींचीं चिरगुटें पांघरुणें व भांडीं वगैरे सर्व चिजवस्त गाठोड्यांत होतीं व गाठोड्याची गाडी पांहाटेस आमचे अगोदर रवाना केली होती. दाहा वाजायाचे सुमारास एका गांवांशीं छायेखालीं उतरून स्नानसंध्यादि कर्मे आटोपून पुनः चालूं लागलों. दिवस उन्हाळीचे असल्यामुळें सुर्याचें तेज अति प्रखर पडून जीव कासावीस होऊं लागले म्हणून पुनः एकवार झाडाचे छायेखालीं बसून बारावर दोहोंचे सुमारास पुनः चालूं लागलों. मंडळी एकमेकांशीं बोलत चालत होती. आह्मीं चुलते पुतणे मागाहून बोलत बोलत चालत होतों. बोलतां बोलतां काका कांहीं बोलत नाहींत असें पाहून मी त्यांजकडे पाहिलें तों काकांचे तोंड आरक्त झालें होतें, नेत्र लाल झाले होते व शरीराचे झोकांडे जाऊं लागले होते. ही दशा पाहतांच मी घाबरून जाऊन काकास हातानें धरून चालूं लागलों. परंतु पांच दहा मिनिटांत त्यास उन्हाळीची लूक पूर्ण लागून सर्व भार माझे आंगावर टाकिला व काका बेशुद्ध झाले. तेव्हां सर्व मंडळीस हांक मारून त्यांस काकाची स्थिति दाखविली. सर्वांनीं असें सांगितलें कीं, जवळच एक विहीर आहे तेथें त्यांस घेऊन जावें. नंतर सर्वांनीं मिळून काकांस त्या विहिरीवर नेऊन झाडाचे छायेखालीं माझे अंगावरील उपर्णे जमिनीवर आंथरून त्याजवर ठेविलें. रसी व लोट्या ऐवज़ीं एक पितळेची तपेली घेऊन मी विहिरीवर धांवत जाऊन पाणी काढून आणलें व काकांचे डोळ्यांस व मस्तकास लाविलें, बटव्यांतील मेथीचा पाला काढून, पाण्यांत कुसकरला व काकांस बसले करून सर्वांगास चोळला.

परंतु त्यांस कांहीं केल्यानें शुद्ध येईना. ते वेळेस मी वेड्यासारखा होऊन मंडळीस विचारूं लागलों कीं, येथून गांव किती दूर आहे? मंडळी सांगूं लागली कीं, दोन कोश मागें पुढें गांव नाहीं. येथें आमचा बराच खोळंबा झाला. आमची भाड्याची गाडी लांब वर गेली आहे, तीस संध्याकाळीं मुक्कामावर गांठले पाहिजे. येथें आम्हीं सर्व बसलों तर गाडी मुक्कामावरून चुकून जाईल व आमचे नुकसान होईल. आम्हांस येथें बसतां येत नाहीं. आम्हांस गेलें पाहिजे, असें म्हणून ते सर्व नऊ असामी उभे राहिले. हे शब्द ऐकतांच माझे पोटांत धस्स होऊन माझें अवसान गळून गेलें. आतां हे सर्व असामी मजला अरण्यांत सोडून गेले तर माझी व काकांची काय अवस्था होईल, हें मनांत येऊन मजला रडूं कोसळलें. तेव्हां मी गयांवयां होऊन मंडळीचे पायां पडून बोलूं लागलों कीं, तुम्ही ब्राह्मण आहांत; तशांत काकांचे परिचयाचे आहांत; तुम्ही या दीन ब्राम्हणाला संकटांत सोडून जाऊं नकां. मजला इकडील भाषा साफ येत नाहीं, व काकांस शुद्ध नाहीं श्वास मात्र राहिला आहे. मागें पुढें दोन कोशाचे आंत गांव नाहीं, याजकरितां मजला येथें सोडून गेलां तर काकांस कदाचित् मृत्युही येईल. मजवर कृपा करून मला या संकटांतून काढलें तर मी तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाहीं, आपण काकांस उचलून या पुढील गांवांत घेऊन जाऊं, मग तुम्ही गेल्यास हरकत नाहीं. असें मीं पुष्कळ प्रकारें त्यांची विनवणी करून बोललों. परंतु त्या कठिनहृदयांस माझी दया आली नाहीं. आमची गाडी दूर गेली आहे, आम्हांस तीस मुक्कामावर गांठलेंच पाहिजे, असें म्हणून मंडळी

चालती झाली. तेव्हां मी रडत रडत त्यांचे मागें धांवत जाऊन त्यांस विनविलें कीं, आपली गाडी पुढें गेली आहे, तर दोन जलदी चालणारे असामींनीं पुढें जाऊन गाडीस मुक्कामावर गांठून थांबवावें. बाकी सात असामी येथें राहून मजला संकटांतून काढा. या अनाथाला अरण्यांत सोडून जाऊं नका. असें ह्मणत शेंपन्नास कदम दीनासारखा रडत रडत त्यांचे मागें गेलों व मागें फिरण्याविषयीं त्यांची विनवणी केली, परंतु ते निर्दय ब्राह्मण थांबले नाहींत. शेवटीं मीं सांगितलें कीं, तुम्ही आमचे जातभाई असून या देशांत राहिल्यामुळें अति निर्दय झाला आहांत. तुह्मांस तुमचे जातभाईची व स्नेह्यांची सुद्धां दया येत नाहीं. एकवार तरी तुम्ही मजवर दया करून तुमचे मित्राकरितां आपला निर्दयपणा टाका. गाडी पुढें जाऊन नुकसान झालें तरी हरकत नाहीं, मी यथाशक्ति तुमचें नुकसान भरून देईन. तुमच्या पापामुळें ब्रह्मावर्त क्षेत्रीं लुटींत तुमचें नुकसान काय कमी झालें आहे? तुम्ही आणखी मित्रत्यागाचें भयंकर पातक करूं नका. इत्यादि निर्भत्सना करूनही त्यांस मागें फिरवण्याचा यत्न केला. परंतु ते पाषाणहृदयी ब्राह्मण उलटे झराझर चालूं लागले. तेव्हां मला क्रोध अतिशय येऊन माझे हात, पाय, ओंठ थरथरा कांपूं लागले. व तोंडांतून शब्द निघेनासा झाला. मग मी निरुपायास्तव तेथेंच उभा राहून त्या ब्राह्मणाधमांस शाप दिला. “ तुम्हीं नराधम ब्राह्मणबीजाचे खचित नव्हत. तुम्हांस या घोर पापाबद्दल नरकवास यावत्चंद्रदिवाकर भोगावा लागेल. तुमच्या भरंवशावर आम्हीं चित्रकूटाहून निघालों असतां या अरण्यांत आम्हांस संकटांत सोडून

जातां याजबद्दल परमेश्वर तुम्हांस खचित शासन केल्यावांचून राहणार नाहीं. असें म्हणतां म्हणतां ते ब्राह्मण दिसतनासे झाले. मग मी रडत रडत काकांपाशीं येऊन बसलों.

त्या प्रसंगांत माझे हृदयांत जो दुःखोदधि उसळून गेला त्यापुढ मोठ्या वादळांतील समुद्राचा क्षोभही अगदीं शांत आहे, असें म्हटलें तरी साजेल. एक तर त्या क्रूर ब्राह्मणाच्या निर्दयतेमुळें माझें चित्त अगदीं खवळून गेलें होतें, परंतु माझा नाईलाज असल्यामुळें त्या क्रोधाचें पर्यवसान केवळ अश्रूंतच होई. इकडे काकांची दुर्धर चिंता येऊन पडली होती. आतां मी यांस शुद्धीवर आणण्यास काय यत्न करूं व येथेंच जर मला टाकून काका स्वर्गवासी झाले तर त्यांची मी व्यवस्था कशी लावूं. गावांत जाऊन कांहीं मदत घेईन तर रात्र पडून माणसें येण्याचे पूर्वींच काका, कोल्हे, कुत्रे वगैरे दुष्ट श्वापदांच्या भक्ष्यस्थानीं पडतील. इत्यादि निरनिराळ्या तरंगांनीं माझें मन व्याकूळ होऊन गेलें. मजला मदत करण्यास या बंडाचे दिवसांत या रस्त्यानें कोण भेटणार, आणि भेटला तरी तो मला महापातक्याला मदत कां करील, असें मनांत येऊन डोळ्यांतून एकसारख्या अश्रूधारा चालल्या. पुन्हां एकवार मनांत उमेद येऊन रसी लोटा घेऊन धांवत जाऊन विहिरीचे पाणी काढून आणलें, व काकांच्या डोक्यांवर शिंपडलें, नेत्रांस लाविलें, बटव्यांतील साखर मेथीचा पाला काढून कटोऱ्यांत कालवून अंगास लाविला, परंतु त्यांस शुद्ध येईना. मी दुःखानें वेडा होऊन काकांस मोठमोठ्यानें हाकां मारिल्या, परंतु ते ओ कसचे देतात! याप्रमाणें एक तासभर खटपट केली, तरी यश येईना तेव्हां अत्यंत भांबावून

जाऊन माझें अवसान अगदीं सुटलें व मी मोठमोठ्यानें रडूं लागलों. आतां मला हे खचित सोडून जाणार असें वाटूं लागून काकांचे मोठेपणाची मला आठवण येऊं लागली. त्याचे ओळखीनें व विद्वत्तेनें उज्जनी, ग्वाल्हेर, झांशी, ब्रह्मावर्त इत्यादि ठिकाणीं सुख कसें झालें, अशा अनेक तऱ्हेच्या आठवणी होऊन अधिकाधिक रडूं कोसळलें. अनेक वार, दुःखांतून—केवळ प्राणसंकटांतून सुटून परमावधि आनंद झाला, त्या आनंदाचा कळस येथें झाला काय असें वाटून माझा शोक भडकून गेला. लहानपणापासून इत्थंभूत सर्व वृत्त डोळ्यांसमोर उभें राहिलें, मजला विष्णू दृष्टीस पडेल तो सुदिनच समजला पाहिजे ह्या मातुश्रीचे शब्दाची आठवण येऊन कंठ दाटून गेला. तीर्थरुपांचें, हरीपंताचें, त्याच्या शपथेचें स्मरण होऊन दुःखानें जीव कोंबून गेला. त्यांचा तर वृद्धापकाळ झाला आहे, पण घरचे संसाराचें ओझें माझे डोक्यावर आहे, त्या संसाराची आतां काय वाताहात होणार, या एका बन्यान्याचें ऐश्वर्यानें घरीं परत मी कसा जातो, त्या गुलामांनीं आमचा गाडींत असलेला सर्व अर्थ चोरला असेल, व त्याकरितांच त्या दुष्टांनीं हें काम केलें असेल, इत्यादि अनेक विचारांनीं मन उद्विग्न होऊन रडतां रडतां डोळ्यांतून पाणीही पडेनासें झालें. संध्याकाळचा सुमार झाला सूर्य तांबडा होऊन बहुतेक क्षितिजावर जाऊन पोंचला. सर्व आकाश . व पृथ्वी सूर्याचे तांबड्या किरणांनीं रक्तमय व उदास दिसूं लागली. वृक्ष निश्चल दिसून मेल्यासारखे भासूं लागले. मीही निश्चल प्रेतासारखा होऊन काष्ठवत झालेल्या काकांचे डोक्याशीं बसलों होतों.

यापुढें रात्रीचा समय होऊन व रात्र पडल्यावर सर्पांनीं व श्वापदांनीं भरलेल्या अरण्यांत मी आपला व काकांचा जीव कसा वांचवूं ही कल्पना मनांत येतांच दुःखानें व माझ्या अनाथ स्थितीनें अगदीं व्याकूळ होऊन एकदम उभा राहिलों व पश्चिमेकडे तोंड करून हात जोडून प्रार्थना केली. हे सूर्यनारायणा ! मजवर दया कर. तूं ब्राह्मणाचा कैवारी आहेस ? मला एकट्याला या अरण्यांत टाकून जाऊं नकोस. असें म्हणतांच त्याचे कृपेनें, काकांचे पूर्वपुण्याईनें व आमच्या कुटुंबाचे नशीबानें, सर्वांत हरीपंताच्या विलक्षण ईश्वराराधना-प्रभावानें एक रांगडा गाडीवान दुरून येतांना दृष्टीस पडला. त्यास पाहतांच मजला परमावधि आनंद होऊन एकदम मी त्या गाडीकडे धांव ठोकली. गाडी जवळ जाऊन त्यास काकांची सर्व हकीकत सांगितली व काकुळतीनें विनवणी केली कीं, कसें तरी करून काकांस गाडींत घेऊन या जवळील गांवांत पोंचव. मी तुजला दोन आणे मजूरी देईन. या दुःखांतून पार पाडल्यास मी तुझे उपकार जन्मभर विसरणार नाहीं. असें सांगतांच त्यानें कबूल केलें, व आह्मी दोघांनीं काकास उचलून गाडींत ठेविलें, व मी गाडींत काकाजवळ बसून गाडी चालती केली. तेव्हां गाडीवान यानें या गांवांत माझे आप्त पुष्कळ आहेत म्हणून मी गांवांत येणार नाहीं; गांवाबाहेर ठेवीन असें सांगितलें. गांवांजवळ येऊन पोंचतांच एका लिंबाचे झाडाखालीं आह्मी काकांस उतरून ठेविलें व मी पंच्या अंगावर टाकून मान सावरून नीट करण्याच्या नादास गुंतलों. तों इतक्यांत गाडीवान भाड्याचे पैसे न घेतां बैल उधळीत चालता झाला. हें पाहतांच मी त्याजमागें पैसे देण्याकरितां धांवत

गेलों, परंतु गाडी दूर गेल्यामुळें नाईलाज होऊन परत आलों. नंतर मला वाटूं लागलें कीं हा कोणीतरी ईश्वरस्वरूपी गाडीवान मजला दुःखांतून काढण्याकरितां आला होता, यांत संशय नाहीं. कारण त्यास दुसरीकडे जाण्याचें असून या गांवांत त्याचे मनांत येण्याचें नसतां मजला येथवर पोंचविलें व पैसे न घेतां निघून गेला. शिवाय परमेश्वराचा धांवा करितांच गाडीवान पुढें येऊन ठाकला, हा चमत्कारच झाला, मला प्रत्यक्ष परमेश्वर भेटला असतांना मीं मूर्खानें त्याचें चरण धरून आपले जीविताचें सार्थक केलें नाहीं. याजबद्दल मला पुष्कळ वेळपर्यंत अति पश्चात्ताप झाला. अशा विचारांत गर्क आहे तों दोन रांगडे ब्राह्मण येतांना दृष्टीस पडले. त्यांजपाशीं जाऊन त्यांस काकांचें सर्व वृत्त सांगून दोन दोन पैसे देण्याचें कबूल करून काकांस गावांत नेंवविलें व पिंपळाचें पारावर आपलें उपरणें आंथरून वरती ठेविलें. त्या पाराभावतीं ब्राह्मण कळंबी वगैरे लोकांची वस्ती होती.

सर्व दिवसभर श्रम केल्यामुळें मजला भूक अत्यंत लागून जीव अगदीं गळून गेला. काकांस श्वास होता व त्यांचें आंगही गार पडलें नव्हतें. हें चिन्ह मनांत आणून काका सावध होतील अशी मला आशा उत्पन्न झाली होती. काका सावध झाले तर त्यांस लागलीच खावयास लागेल असें मनांत आणून प्रथम कांहीं खावयास तयार करण्याच्या उद्योगास लागलों. गांवांत हिंडून कुंभाराचा शोध करून पाण्याकरितां एक मडकें व खिचडीकरितां एक मडकें अशी दोन घेतली. नंतर वाण्याच्या दुकानीं जाऊन मुगाची डाळ, तांदूळ व मीठ इतके जिन्नस घेतले, आणि पारावर परत येऊन पाण्याची चौकशी करूं लागलों, तों पाराजवळची विहीर खारे पाण्याची आहे,

व गोडें पाणी दूर आहे, असें समजलें. तेव्हां मोठ्या कष्टानें गोडे पाण्याचे विहीरीवर जाऊन पाणी आणलें. प्रवासांत काय काय प्रकारचें दुःख आहे, याचे पक्कें चित्र डोळ्यांसमोर उभें राहिलें. इतक्या खटपटीस घटकाभर रात्र झाली. नंतर गवऱ्यांची थाळ रचून मडक्यांत खिचडी शिजत ठेविली. तो एक बैरागी तेथें होता त्यानें माझें सर्व वृत्त पाहून सदय होऊन काकांची हकीगत विचारिली व असें सांगितलें कीं, तुम्ही या खाऱ्या विहिरींतील पाणी काढून त्याचे मस्तकावर शिंपीत बसा. दोनचार घागरी पाणी शिंपलें ह्मणजे तो ब्राम्हण सावध होईल. असें सांगतांच गोडे पाण्यानें घागर भरलेली होती ह्मणोन आसपास मातीची दुसरी एक घागर मिळण्याविषयीं यत्न करितां एका सदय बाईनें एक मातीची घागर दिली. मग पाणी शिंपडण्याचा प्रकार सुरू केला. इकडे खिचडी शिजत होती. रात्र चांदण्याची होती, त्यामुळें साफ दिसत होतें. घागर भरून आणोन कांहींवेळ शिंपडून अर्धी घागर झाली ह्मणजे मस्तकावर पाण्याची धार धरीत असे, याप्रमाणें चार घागरी पाणी घातलें, तेव्हां काका शुद्धींत येऊन त्यांनीं असें भाषण केलें कीं, अरे विष्णु मजला थंडी फार वाजते पाणी पुरें कर. असें काकांच्या तोंडचे शब्द ऐकतांच मजला जो आनंद झाला त्यास उपमा नाहीं. मग काकांनीं प्रश्न केला कीं, नऊ असामी ब्राह्मण कोठें गेले; तें समयीं मीं त्यांस सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून काकांस गहिंवर आला तो सावरत नाहींसा झाला व मलाही गहींवर येऊन बोललों कीं, काका या देशांत तुह्माशिवाय मी अनाथ झालों होतों, परंतु ईश्वराचे

कृपेनें माझे मठा तुह्मी परत मिळालांत, असो. आतां बोलणी पुढें होतील, तुह्मांस भूक लागली असेल, मी खिचडी शिजविली आहे ती थोडीशी खा. असें ह्मणून सोवळें नव्हतें सबब एक दोर कंबरेस लाऊन बटव्याचा फडका भिजवून लंगोटा नेसून, खिचडी थोडी ओले पंचावर घेऊन तोंडी लावण्यास साखर घेतली आणि काकांस गेली तितकी खावूं घाढून त्यांस कोरडें वस्त्र नेसवून एका उपरण्यावर निजविलें. व मीही ते दिवशा स्वस्थ-पणें खिचडीभोजन केलें. इतकें होईतों रात्र दाहा घटका झाली. आतां तुह्मांस चालत जाण्याची शक्ति येईपर्यंत येथेंच राहिलें पाहिजे. गाडींत आपलें गांठोडें गेलें व त्यांत आपले रुपये गेले, परंतु त्याचा आतां शोक करून उपयोग नाहीं. तूर्त बटव्यांत दाहा रुपये आहेत तितक्यावर होईल तितका गुजारा करूं. गेल्या रुपयाचा शोक कशास पाहिजे? आपण जिवंत आहों तर शेंकडों रुपये मिळतील. परमेश्वरानें तुह्मांस वांचविलें हाच परम लाभ मानला पाहिजे. इत्यादि बोलणीं होऊन स्वस्थ मनानें पिंपळाचे पारावर निद्रा केली. सकाळीं उठून दूध तूप साखर आणून काकाकरितां लवकरच भोजन तयार केलें. याप्रमाणें सकाळ संध्याकाळ लवकर भोजनें आटोपीत असूं. आठ दिवस राहिल्यानंतर काकांस थोडी शक्ति आली व चार चार कोश रोज चालूं असें त्यांनीं सांगितल्यावरून तेथून निघालों.

परमेश्वराच्या कृपेनें एका संकटांतून निघाला तों दैव विपरीत असल्यामुळें नळ राजाप्रमाणें दुसऱ्यांत येऊन पडलों. जातां जातां आह्मी एका पुऱ्यांत ह्मणजे सुमारें दाहा पंधरा घराचे खेड्यांत लिंबाचें झाडाखालीं उतरलों. तेव्हां एक वृद्ध ग्रामस्थ येऊन आ-

ह्मांस सांगूं लागला कीं, येथून वीस कोशावर जलालपुरास लढाई होऊन इंग्रज सरकारचा जय झाला आहे, व बंडवाले पळून गेले आहेत. याजकरितां आह्मांस इंग्रज सरकारचा असा हुकूम आहे कीं, येथें कोणीही मुशाफर अगर बैरागी आल्यास त्यास कैद करून जलालपूर येथें पाठवून द्यावें. जलालपुरास फांशी लावून ठेविली आहे. जो सांपडेल त्यास फांशीं देतात. हें ऐकतांच आमची पांचावर धारण बसली. आह्मी त्या वृद्धाचे हातापायां पडून सांगितलें कीं, आह्मी बंडवाले नाहीं, यात्रेकरी पितापुत्र आहों. आह्मी दक्षिण देशचे राहणारे असून इकडे यात्रेकरितां आलों तों या भयंकर तापत्रयांत सांपडलों. याजकरितां आह्मांवर दया करा. तें ऐकून तो वृद्ध सदय होऊन म्हणाला, बरें आहे. आह्मी मुद्दाम तुह्मांस त्रास देणार नाहीं. परंतु चौकशीकरितां येथें पलटणी लोक आले तर तुमचें नशीब. तुह्मी मग रस्ता सुचेल तसें करा. असें ह्मणून तो निघून गेल्यावर आह्मी स्नान भोजनें केलीं. आह्मी घरून कोणत्या कुमुहूर्तावर निघालों होतों हें मला समजत नाहीं. त्या मुहूर्ताचा योग आम्ही एका संकटांतून निघावें तों दुसऱ्या संकटांत पडावें, दुसऱ्यांतून निघून तिसऱ्यांत पडावें याप्रमाणें संकटपरंपरेंत पडून अत्यंत दुःखी व्हावें असाच होता. आम्ही जेवण होऊन स्वस्त बसलों नाहीं तों अकस्मात कांहीं यमस्वरूपी गंगापारी काळे पलटणींचे लोक तेथें आले. त्यानीं आह्मांस पाहतांच ठीक आहे तुह्मीं दक्षिणी बंडवाले आहां, तुमचें नांव कांय? तुह्मांस जलालपुरास घेऊन गेलें पाहिजे, मग तुह्मांस साहेब मारो अथवा तारो, असें ह्मणून त्यांनीं आह्मांस कैद केलें. आम्हीं जिवाचे भीतीनें व्याकूळ होऊन त्याची

अनेक प्रकारें विनवणी केली, व आम्हीं लढवई नसून मुंबईकडचे भट्टभिक्षुक आहों, आह्मांस तुह्मी जीवदान द्यावें, वगैरे सर्व हकीगत सांगितली. परंतु त्यांनीं—आम्हांस, हुकूम आहे त्याप्रमाणें आम्हांस जलालपुरास नेलेंच. पाहिजे तुमची हकीगत तुह्मीं साहेबांस सांगा. मग तो तुम्हांस पाहिजेल तर सोडील,—असें सांगून ते आपले जेवाखायचे उद्योगास लागले. आम्हीं भयातुर हो-ऊन ठिकच्या ठिकाणीं वेड्यासारखे बसलों. उद्ईक पहाटेस आह्मांस घेऊन जलालपुरास निघण्याचा त्यांचा बेत दिसला. परंतु संध्याकाळचीं जेवणें करण्याची आह्मांस इच्छा होईना. जीवाच्या भीतीनें भूक, तहान, निद्रा सर्व नाहींसे होऊन आमचे मनांत अनेक विचार येऊं लागले. जलालपुरास गेल्यावर साहेब आह्मांस सोडावयाचा नाहीं असें आह्मांस निर्विवाद वाटून आह्मी फांशी जा-णार असी दुस्तर भीति येऊन पडली. शेंकडों ठिकाणीं जिवावर प्रसंग आले, परंतु आपला मृत्यु जलालपुरासच ठरला असल्यामुळें त्या सर्वांतून वांचलों गेलों व ह्या पुन्यांत येऊन ह्या यमकिंकराच्या हातांत सांपडलों. "विवाहश्चार्थ मन्नच जननं मरणं तथा॥ कंठे बद्धा दृढं सूत्र यत्रस्थं तत्र नीयते॥" शेवटीं गुडघ्यावर हात टेकून दीन वदनांनीं त्या यमस्वरूपी हांसत खिदळत असलेल्या शिपायांकडे संध्याकाळ होईपर्यंत पहात बसलों होतों. प्रत्येकाचे मनांत निरनिराळे विचार चालले होते. आह्मी फांशी गेल्याची बातमी आपले घरीं कळेल कशीं, याचेंच कांहीं वेळपर्यंत मला वाईट वाटत होतें. चार घंटका रात्र पडल्यावर ते शिपाई लोक आह्मांवर पाहारा नेमून झोंपी गेले. मनुष्याचे

मनांत विचार चालले ह्मणजे ते कोणत्या थरास पोंचतात याचा कांहीं विलक्षण चमत्कार आहे. विचार करितां करितां मला असें सुचलें कीं, जर ध्रुव नक्षत्र पाहिलें तर साहा महिने मृत्यु नाहीं असें शास्त्रांत सांगितलें आहे. तर आपण ध्रुव नक्षत्र पाहिलें ह्मणजे आपल्यास कांहींएक भय नाहीं असें वाटून मी काकांस ध्रुव नक्षत्र दाखविण्याकरितां बाहेर बोलाविले. मग आह्मी दोघांनीं ध्रुव पाहिला, व आपल्या ठिकाणीं कांहीं स्वस्थ मनानें येऊन बसलों. त्यावेळेस दोन गौड ब्राह्मण आह्मावर पहारा करीत होते. त्यांनीं आह्मांस तुह्मी काय करितां असें विचारल्यावरून आह्मी त्यांस वाक्यासह ध्रुव नक्षत्र पाहिल्याचें फळ शास्त्रांत सांगितलेलें सांगितलें. आमचे सुदैवानें त्या ब्राह्मणांनीं लहानपणीं कांहीं शास्त्राभ्यास केला होता, त्यांचे ठिकाणीं आह्मांविषयीं किंचित पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन त्यांनीं आह्मांस अनेक धर्मसंबंधें प्रश्न केले, व आह्मीही आपला कार्यभाग साधेल या आशेनें बरेंच पांडित्य केलें. तेव्हां त्या शिपायांची आह्मीं भिक्षुक आहों अशी खातरी होऊन त्यांनीं आह्मांस सांगितलें कीं, आह्मी तुह्मांस गांवांचीं नांवें लिहून देतों, त्या त्या गांवावरून जालवणास जावें, नाहीं तर फुकट मारले ज़ाल. कोणत्या मनुष्याची कोणत्या प्रकारें ओळख पडून त्याजपासून आपल्यावर कसे उपकार होतात हें दैवचरित्र मोठें अतर्क्य आहे. असो, त्यांनीं वचन दिल्यावर आह्मीं स्वस्थपणें निद्रा केली. सकाळीं उठून त्या शिपायापासून गांवें टिपून घेतलीं व त्यांचे उपकार मानून त्यांस राम राम करून आम्हीं चालते झालों, आणि यादीप्रमाणें मुकाम दरमुकाम करीत जालवणास जाऊन पोंचलों.

भाग ७ वा.

ग्वाल्हेर व मध्यहिंदुस्थान.

इत्थं विचिन्तयति कोशगते द्विरेफे ।
हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार ॥

यादीप्रमाणें मुक्काम दर मुक्काम करीत आम्हीं जालवणास पोंहोंचून तेथें विष्णुमंदिरांत उतरलों. तेथें एक प्रमाणिक उपनांवाचा ब्राह्मण, ग्वाल्हेरीहून आलेला भेटला; त्यानें लष्करांत बंडवाले लोकांनीं केलेल्या दंग्याची समग्र हकीगत सांगितली. ती येणेंप्रमाणें:—ग्वाल्हेरींत शिंद्यांच्या पदरीं लढवाई लोक होते, ते तात्या टोपी यांनीं फितूर केले असल्यामुळें, काल्पीवर मोड झाल्यावर बंडवाल्यांनीं ग्वाल्हेरीकडे रोंख फिरविला, व मुरारावर शिंद्याच्या फौजेची छावणी होती, तेथें पोंहोंचून मोर्चा बांधला; व शिंदे यांस असें कळविलें कीं, आम्हांस खर्चा-करितां चार लक्ष रुपये द्यावे, नाहीं तर लढाईस सिद्ध व्हावें. तेव्हां दिनकरराव राजवाडे दिवाण यांनीं जबाब दिला कीं, आम्ही लढाईस तयार आहों. जयाजी महाराज शिंदे व दिवाण व इतर सर्व मंडळी मुरारचे नदीवर पोंचून लढाईची सिद्धता केली. शिंद्याकडील कित्येक लोकांनीं तेव्हां शिंद्यांस असें कळविलें कीं, आम्हीं लढाईचा आव मात्र घालूं, परंतु पेशव्यांवर गोळा टाकणार नाहीं, कारणं ते आमचे व तुमचे सर्वांच मालक आहेत. इतक्यांत बंडवाले लोकांकडील तोफेस बत्ती झाली, व वाद्यें वाजूं लागलीं. शिंदे व दिवाण यांनीं आपलेकडील गोलं-

दाजास तोफेस बत्ती देण्याविषयीं सांगण्याची शिकस्त केली, परंतु गोलंदाजांनीं-आम्हीं निमकहरामीपणा करणार नाहीं-असा जबाब दिला. राजवाडे घोड्याखालीं उतरले व राजाही खालीं उतरला व तोफेस बत्ती देऊं लागले. परंतु तोफांत बाजरीच्या थैल्या घातल्या असल्यामुळें आवाज खोटे होऊं लागले; ते समयीं राजा व दिवाण घाबरून गेले, व घोड्यावर स्वार होऊन आग्र्यास जाण्याचा विचार करून घोडे पिटाळले. इकडे लढाईचे तोंड लागलें, इकडील तिकडील शें दोनशें माणसें जाया झाली नाहीं इतक्यांत समजलें कीं, राजा व दिवाण निघून गेले, तेव्हां शिंद्याकडील लोक पळून गेले. लढाई बंद झाली. श्रीमंतांनीं शाहाजाण्या वाजवून ते लष्कराकडे येण्यास निघाले. शिंदे सरकारचा फुलबाग म्हणून एक अति रमणीय बाग होता, त्यांत शिरून बंगल्यांत श्रीमंत एक रात्र राहिले. बंडवाल्यांनीं बागेचा सर्व विध्वंस केला. हत्ती, उंट वगैरेंनीं झाडें उपटून टाकिलीं. बंगल्यांतील आरसेसुद्धां फोडले. इकडे शहरांत सराफा वगैरे ठिकाणीं मनुष्यें फिरतनाशीं झालीं, व दुकानें बंद पडलीं. मग श्रीमंतांनीं दवंडी पिटवून दुकानें उघडवून व्यवहार सुरू करविला. प्रथम शहरांत सरकारवाड्यांत कोणास पाठवावें असा रावसाहेब विचार करितात तों झांशीवाली बाई शहरांत जाण्यास तयार होऊन तिनें आज्ञा मागितली. श्रीमंतांनीं सांगितलें कीं, शत्रूचें शहर आहे, वाड्यांत अनेक धोके असतील, बंदोबस्तानें जावें. तेव्हां बाई दोनशें स्वार बरोबर घेऊन मोठ्या सावधपणानें शहरांत शिरल्या व सराफ्यांतून मोठ्या थाटानें बंदुकांचे आवाज काढीत, शिंद्यांचे वाड्यांत प्रवेश केला. वाड्याकडील पिछाडीकडे लोक मुलांच

गेले नाहींत. कारण बायजाबाई शिंदीचे कारकून तेथें होते, त्यांनीं इकडे बाईसाहेबांचें राहणें आहे इकडे आपला मनुष्य येऊं नये, असें सांगतांच झांशीवालीनें सर्व लोकांस ताकीद दिली कीं, जीं कुलुपें बाईजाबाईचीं असतील तिकडे आपणास जाणें नाहीं. बायजाबाईसाहेब चार पांच दिवसांपूर्वींच वाडा सोडून परेडीकडे निघून गेल्या होत्या. झांशीवालीनें वाड्यांत आघाडीकडे जाऊन सर्व जिंदगी आपल्या कबज्यांत घेतली, व तात्याटोपी आणि श्रीमंतांस निरोप पाठविला कीं, आपण आतां यावें, वाड्यांत कांहींएक कपट नाहीं. तेव्हां रावसाहेब मोठ्या थाटानें शहरांत येऊन, हळूहळू बाजारांतून वाड्यांत आले. शिंदे सरकारचे कारभारी, कारकून वगैरे भेटले, त्यांस श्रीमंतांनीं सांगितलें कीं, आह्मांस येथें ब्राह्मणभोजन करणें आहे; त्यास उद्यांपासून येथें मुक्तद्वार भोजनाचा बंदोबस्त करावा. बेसनाचे लाडू पक्वान्न करून, पात्रीं एक रुपया दक्षिणा द्यावी; असें आम्ही आहों तोंपर्यंत चाललें पाहिजे. तेव्हां बांकनीस वगैरेंनीं, " महाराज हुकूम करतात त्याप्रमाणें सर्व सिद्धता आहे, बंदोबस्त करतों " ह्मणून सांगितलें. आणि दुसरे दिवसापासून मुक्तद्वार सुरू केलें. दर पात्रास रुपाया दक्षिणा मिळूं लागली. दोनचार दिवसांनंतर शिंदे सरकारची गंगाजळी ह्मणून खजिना ठेवण्याची जागा, माहादजी बाबा होते तेव्हांपासून होती, ती गंगाजळी कोठें आहे ह्मणून तपास करून, रावसाहेब व तात्याटोपी, व झांशीवाली वगैरे सर्व सरदारांनीं जाऊन तो खजिना आपल्या ताब्यांत घेतला. सोनें, रुपें, मोतीं वगैरे सर्व अर्थ पाहून, तात्याटोपी यांनीं प्रश्न केला कीं, जर माहादजीबाबा शिंदे सरकारापासून यांत अर्थ ठेवीत आले

तर तसा अर्थ येथें कां नाहीं ? तेव्हां गंगाजळीवरील मुख्य कारभाऱ्यानें उत्तर दिलें कीं, अर्थ ठेवीत आले, परंतु जशी जशी खर्चाची गरज लागली, तसा काढून खर्चही करीत गेले; व केव्हां केव्हां हलीमानीही झाली. हें ऐकून समाधान झालें. मग असा विचार ठरला कीं, आपण येथें येण्यानें निर्भय झालों असें नाहीं; मुलखाचा बंदोबस्त ठेवण्यास आपल्यापाशीं फौज नाहीं. इंग्रज आतां येऊन येथें लढाई होईल; तेव्हां आपल्यास जंगलांत जावें लागेल. यास्तव जितका अर्थ मिळेल तितका संपादन केला पाहिजे. व येथून पश्चिमेस पाण्याची जागा पाहून, तेथें कांहीं लोक ठेवून, मग तेथें सामानसुमान पोंचविलें पाहिजे. असा ठराव झाल्यावर शिंदे सरकारच्या घरीं जितक्या मौल्यवान जिनसा होत्या त्यांचा लिलाव सुरू केला. बिछायती होत्या त्याही आणोन बारादरीपुढें रास केली. मौल्यवान वस्त्रें शहरांत कोणी घेईना, तेव्हां चौथे भागांत वर्णन केलेल्या नाटकी लोकांना, तीं राजवस्त्रें थोड्या किंमतींत मिळालीं; ते लोक कोकणचे होते व अशीं वस्त्रें नाटकास मिळणें कठीण असें जाणून त्यांनीं तीं विकत घेतलीं. भरजरी पैठण्या २५।२५ रुपयाला घेतल्या. असो. याप्रमाणें शिंदेसरकारची दौलत हस्तगत करून हत्ती, घोडे, तोफांचे बैल, तोफा व कांहीं बंडवाली फौजही हस्तगत करून घेतली. श्रीमत ग्वाल्हेरीस अठरा दिवस होते; मुक्तद्वार सुरू होतेंच. मुरारवर एक पलटण होती, व शहरचा बंदोबस्त चांगला ठेविला होता. अठरावे दिवशीं अकरापासून बाराचे सुमारास, एकाएकीं लोक घाबरून शहरांत गोंगाट सुरू झाला. व आग्र्याहून इंग्रजी फौज येऊन, तिनें मुरारचे पलटणीवर हल्ला सुरू केला. तेव्हां झांशीवाली

बाई, तात्याटोपी, व रावसाहेब घोड्यावर बसून बरोबरचे लोक घेऊन मुरारकडे निघून गेले. मुक्तद्वारांत ब्राह्मण भोजनाची धांदल उडून गेली. उदक सुटून ब्राह्मण भोजनास बसले होते, कांहीं ठिकाणीं दक्षिणा ठेविली होती, कांहीं ठिकाणीं नव्हती. तोंच भयाचे योगानें ब्राह्मण पात्रें टाकून उठून गेले; एकही मनुष्य तेथें राहिला नाहीं. इकडे लढाईत झांशीवालीस बंदुकीची गोळी लागली तथापि मानिलें नाहीं, तों तरवारीचा वार मांडीस लागला. तेसमयीं घोड्यावरून खालीं पडतां पडतां तात्याटोपी यांनीं बाईचें प्रेत घोडा पुढें घालून धरिलें. आणखीही लोक जमले, त्यांनीं प्रेत आणलें. बंडवाले लोक पळूं लागले, व इंग्रजाचे लोक पुढें होऊन बंडवाले लोकांच्या तळावर तळ दिला. इकडे बाईचें प्रेत नेमलेल्या जागेवर नेऊन दहन केलें. याप्रमाणें त्या शूर बाईला रणांगणांत मृत्यु येऊन तिला सद्गति मिळाली. पण बंडवाल्यांच्या बाजूस एकाएकीं प्रत्यक्ष वीरश्रीच नाहींशी झाली असें ह्मटलें पाहिजे.

दुसरे दिवशीं जयाजीराव महाराज व दिनकरराव साहेब शहरांत येऊन वाड्यांत पोहोंचले, तों तेथें गाद्या सतरंज्या वगैरे बैठका सुद्धां नाहींत. तेव्हां सावकार लोकांकडोन आणून व त्यांजकडून ऐवज काढून, नवीन सरंजाम भांडींकुंडीं वगैरे सर्व आणविलीं व शहरांत दवंडी पिटून बंदोबस्त केला. राजाच्या वस्तु किंमत देऊन लोकांनीं नेल्या होत्या त्या जशजशी बातमी लागली तशतशा किंमत न देतां परत घेतल्या. त्या प्रसंगांत नाटकवाले बिचारे नागवले व संकटांत पडले. त्यांचें बिन्हाड जप्त केलें जाऊन तेथें राजवस्त्रें सांपडलीं तीं घेतलीं गेलीं व त्यांस कैदही केलें. त्यांचा

ऐवज कांहीं सावकाराकडे होता तोही दण्डादाखल जमा केला गेला. याप्रमाणें त्यांची दुर्दशा झाली. मात्र दोनचार दिवसांनीं दिवाण दिनकरराव हे कोंकणचे असल्यामुळें त्यांनीं त्यांस शिक्षा न देतां सोडून दिलें. याप्रमाणें ग्वाल्हेरचें राज्य परत मिळून शिंदे इंग्रजाचे विचारें राज्य करूं लागले. बंडवाले लोक पश्चिमेकडे पळून गेले ते तेथेंच आहेत, वगैरे हक़ीगत त्या ब्राह्मणांनीं आम्हांस सांगितली.

नंतर आह्मी उभयतां असा विचार केला कीं, चित्रकूटचे श्रीमंत हल्लीं बांद्यास कैदेंत आहेत, तेथें शंभर सवाशें रुपये रोजचा खर्च होत आहे, तेथें जाऊन कांहीं द्रव्य मिळवून कोठें जाणें तें जावें. असा बेत करून जालवणाहून निघून मजल दरमजल बांद्यास पोंचलों. तेथें पाहारेकरी यांचे परवानगीनें काका श्रीमंतांस भेटले. त्यांनीं उदईक नित्यदानास यावें ह्मणून आज्ञा केली. त्याप्रमाणें जाऊन रोज नित्यदानें घेत होतों. तेथें हरिकर्ण रविकर्ण ह्मणून एक गुजराथी सावकार होता. त्यांनीं अन्नछत्र घातलें आहे. दक्षिणी ब्राह्मण, सुवासिनी, विधवा वगैरे बारा वाजेतों येतील तितक्यांस तेथें जेवूं घालतात; दक्षिणा पाव आणा मिळतो. या कारणानें बांद्यास दक्षिणी ब्राह्मणांची बरीच वस्ती आहे. आह्मी तेथें दहा दिवस होतों. तेथून ब्रह्मावर्तास जावें असा विचार करून निघालों, तों रस्त्यांत अकस्मात पांच चार स्वार येऊन त्यांनीं आह्मांस खर्चास १० रुपये देऊन बाकी ७९ रुपये व जिन्नसपानस आमचें लुटून नेलें. तेव्हां परत शिंद्याचें लष्कराकडे फिरलों. विचार केला कीं, काशीयात्रेकरितां रुपये जमा करावे ह्मणून यत्न करितों परंतु आधीं रुपये मिळत नाहींत, आणि मिळाले तर चोर लुटून नेतात, तेव्हां

आतां ग्वाल्हेरी भोंवतालीं असावें. असा विचार करून फिरत होतों. बुंदेलखंडांत सूर्ययंत्र म्हणून फार प्रसिद्ध क्षेत्र आहे; तेथें महाव्याधीचे लोक कांहीं दिवस राहिले असतां महाव्याधि दूर होते असा लौकिक ऐकिल्यावरून आम्हीं तेथें जाऊन यात्रा केली. तें स्थान फार रमणीय आहे. देवालयानजीक मोठी नदी आहे. पूर्वपश्चिम चाळीस धनुष्यें उदक आहे त्यास सूर्यावर्त ह्मणतात. तेथें स्नान केलें असतां ज्या पातकांनीं अंगावर अष्टप्रकारचीं कुष्टें होतात तीं नाहींशीं होतात. श्री सूर्याचें देऊळ फार मोठें आहे. देवळाचे मध्यभागीं चतुरस्त्र एक चबुतरा फार मोठा आहे. त्या चबुतऱ्यावर मध्यभागीं कुरुंदी साहाण तांबडे रंगाची दोन अडीच हाताची वाटोळी, शिसें ओतून पक्की बसविली आहे, त्याजवर सूर्ययंत्र काढलेलें आहे. यंत्राचे मध्यभागीं केसरकर्णिक जागा आहे, तेथें मध्यान्ही मोठ्या दिव्याचे वातीची जशी ज्योत असते त्याप्रमाणें लखलखित तेज, यंत्राचे मध्यभागीं पडतें. तें थोडा वेळ असतें. त्या संधीस तेथें दर्शनाची दाटी फार जमते; परंतु देवळा सभोंवतालीं आवार नाहीं, सबब चोहींबाजूनें लोक येऊन यंत्राच्या मध्यभागाचें दर्शन घेतात. कुष्टी-व्याधिष्ट लोक तेव्हां नदींत स्नान करून ओल्यानें वाट पाहत असतात. मग ज्योतीचें दर्शन करून नमस्कार करून जातात. देवळाभोंवती दोन दोन तीन तीन मजली धर्मशाळेची फार गर्दी आहे. कारण धनिक लोकांस व्याधि कोठेंही झाली म्हणजे ते येथें येऊन सेवा करून राहतात. आम्ही तेथें चार पांच. दिवस स्नान-तीर्थविधि वगैरे करून होतों. नंतर तेथून निघून जातांनां वाटेंत दहा बारा स्वार भेटले त्यांस विचारतां आम्ही श्रीमंत रावसाहेबाचे

नोकर आहों, आमचे बरोबर येत असल्यास चलावें, जवळच तळ आहे, असें सांगितलें. तेव्हां आम्ही त्यांजबरोबर श्रीमंतांच्या मंडळींत गेलों.

या वेळीं श्रीमंतापाशीं फौज बरीच होती. एकंदर लढवई लोक सुमारें २० हजार होते व बाजारबुणगें १० हजार होते. दक्षिणी ब्राह्मण आठ दाहा होते व आचारी पाणकेही होते. त्यामुळें आह्मांस कोणतीच काळजी राहिली नाहीं. आम्ही बंडवाल्यांबरोबर जात असतां देश कोणता हें भान मुळींच राहिलें नाहीं. पर्जन्य काळचे दिवस होते. जातां जातां जयपुराचे जवळ गेलों. जयपूरवाल्यापासून बंडवाल्यांनीं खंडणी घेतली; याशिवाय लहान सहान राजे रजवाडे रस्त्यांत लागले त्यांजपासूनही खण्डणी घेतली. नंतर बुंदीकोटच्या राजाकडे बंडवाले वळले व बुंदी कोटाहून आठ कोशावर चांगली जागा पाहून तेथें तळ दिला; व बुंदीकोटाचे *राजास स्वाराबरोबर पत्र धाडलें. त्यांत मजकूर कीं, आम्हीं धर्माकरितां इंग्रजाबरोबर लढत आहों, यास्तव तुह्मीं आह्मांस दोन लक्ष रुपये द्यावे न द्याल तर आम्हीं लढून घेऊं. तें पत्र स्वारांनीं राजास नेऊन दिलें. राजानें सर्व सरदार जमा करून विचार केला, तेव्हां असें ठरलें कीं, हे बंडखोर लोक आहेत यांस विनाकारण रुपये देऊं नये. नंतर स्वाराला तोंड जबानीच असा निरोप सांगितला कीं, सार्वभौम इंग्रज बहादर आहे, त्यांस खण्डणी द्यावी लागते, त्यास तुम्हीं मुलुखांतून काढून लावा. ह्मणजे आम्हीं तुह्मास खंडणी देऊं. हा निरोप

* ही गोष्ट केचा इतिहास पाहतां झालरा पाटण कोट्याखालील एक राजा आहे तेथील आहे.

स्वारानीं आणतांच बंडवाल्यांनीं बुंदीकोटावर चाल केली. मला हग-वणीचा उपद्रव होता ह्मणून आम्हीं तेथेंच राहिलों. चार पांच दिव-सांनीं बुंदीकोटाकडील हकीगत एका गृहस्थानें सांगितली कीं, श्रीमं-ताकडील लोकांनीं शहराजवळ जाऊन मोरचे बांधून तोफेस बत्ती दिली. राजाकडील लोक सरदार वगैरेही रणभूमीवर तयार होऊन आले. राजापाशीं फौज मराठी होती व बंदुका तोड्यांनीं पेटविण्या-च्या होत्या. एक प्रहरभर लढाई झाली. श्रीमंतांकडील लोक लढवई असल्याकारणानें राजाच्या फौजेचा मोड झाला, व ते लोक दशदिशा पळून गेले, व राजाही त्या गर्दींत पळून गेला. श्रीमंतांकडील लोक हल्ला करीत शहरच्या दरवाज्यापाशीं येऊन शहरांत शिरले. शहरची लूट ज्यास सांपडेल त्यास बक्षीस ठरली होती, व सरकाराकडील द्रव्य श्रीमंतानीं घ्यावें असें ठरलें होतें. पलटणी टोळयांनीं, शहरांत शिरून तमाम लूट केली. या शहरांत लोक बहुत धनिक होते, तो अर्थ सर्व पलटणच्या शिपायांनीं घेतला. राजवाड्यांत राजाची राणी, व मातुश्री, व चार भोगांगना अशा सहा स्त्रिया, माडीवर एका जागेंत आंत कडी लाऊन बसल्या होत्या. रावसाहेब व तात्या टोपी यांनीं खजिनदारापासून खजिना आपल्या ताब्यांत घेतल्या-नंतर तिसरे मजल्यावर रावसाहेब खुद्द जाऊन असें ह्मणाले कीं, राजाचे मातुश्रीस मी नमस्कार करतों, व राजाच्या स्त्रिया माझ्या बहिणी आहेत. मी धर्माकरितां प्राणावर उदक सोडून, या प्रसंगांत बुद्धिपूर्वक पडलों आहें; तशांत सरकारी फौज धर्माकरितां बिघडून आपल्यास सांपडली, याजमुळें जें करूं तें होईल, ह्मणून या कर्मास आरंभ केला. सर्व राजेरजवाडे यांनीं सामर्थ्यानुरूप पैशाची मदत

केली, त्याप्रमाणें येथेंही तीन लक्ष रुपयांची मागणी केली, परंतु आम्हीं लढाईस येतों असा निरोप आल्यावर मजकडे दोष नाहीं. तथापि आपण भिऊं नये. माझ्याकडून कोणतेंही पातक व्हावयाचें नाहीं. आपण दरवाजा उघडून रोजच्याप्रमाणें जेवणें खाणें करावें. आपला लहान मुलगा आहे, त्यास गादीवर बसवून आह्मीं येथून जाऊं. आह्मांस राज्याची जरूरी नाहीं व वस्तुमात्राचा नाशही करणें नाहीं. असें सांगतांच राजाच्या मातुश्रीनें दरवाजा उघडला. नंतर रावसाहेब क्षणभर तेथें बसून आपले गोटांत निघून आले. खजिन्यांत तीन चार लक्ष रुपये रोख होते. ते मात्र घेतले व कांहीं वस्त्रें घेतलीं, व गहूं व तुरीची डाळ, व घोडे व बैल घेतले. रावसाहेबांनीं स्वतः राजपुत्रास मोठ्या थाटानें मिरवणूक काढून गादीवर बसविलें. याप्रमाणें हकीकत कळली. या राज्यांत मोर फार आहेत, कारण मोर मारण्याची मनाई आहे. तेथून बंडवाले कूच करोन निघाले, परंतु शिपाई फार उन्मत्त झाले. शहरचे लुटीचा अर्थ शिपाईलोकांपाशीं फार झाला होता. प्रत्येकाच्या कमरेशीं अर्थाचा कसा होता. नंतर हैदराबादचा निजाम बंडवाल्यांस मिळणार आहे, अशी बातमी लागल्यावरून बंडवाले लोक दक्षिणेकडे फिरले, व नर्मदा उतरून सातपुड्यांतून दक्षिणेंत जाण्याचा रस्ता काढावा असें ठरलें, तेव्हां आह्मीं त्यांजबरोबर जाण्याचें सोडून देऊन ब्रह्मावर्ताकडे फिरलों. मी हगवणीनें अशक्त झाल्यामुळें हळूहळू चालत, व कोठें मिळेल तेथें गाडी करीत जाऊं लागलों, तों एके दिवशीं बेटमा ह्मणून शहरासारखा गांव लागला तेथें येऊन

पोंहोंचलों. शहरांत शिरून बाजारांत शिधासामग्री घेण्याकरितां गेलों, तों शहर ओस दिसूं लागलें. रस्त्यांत माणूस भेटेना, उतरण्याकरितां जागेचा शोध करितां एक घर एकानें दाखविलें. तेथें शिरतां मालकांनीं सांगितलें कीं, आह्मी शेणवी आहों, तशांत गांवांत मरगीचा उपद्रव चालू आहे, व आमचे येथेंही मनुष्य लागलें आहे, तेव्हां तुम्ही गांवाबाहेर ओढा आहे तेथें जाऊन, स्वयंपाक वगैरे करून रात्रीं पाहिजेल तर येथें राहावयास यावें. प्रवासांत भयंकर प्रसंग कसे येतात याची साक्ष पटविण्याकरितांच कीं काय, आह्मांस तें गांव लागलें. आमचेबरोबर आणखी एक ब्राह्मण वाटसरू चालत होता, तेव्हां आम्ही तिघे शिधा व गाठोडीं घेऊन गांवाबाहेर गेलों, तेथें नदीकांठीं स्नानें करून स्वयंपाकाची तयारी करूं लागलों तों विस्तव नाहीं. इतक्यांत एक प्रेत जवळच जळण्यासाठीं आलें, त्याचेबरोबर विस्तव होता, तो मी मागूं लागलों. विस्तव नेणारा मनुष्य मागें पुढें पाहूं लागला, तेव्हां मी त्यास धर्मशास्त्र सांगितलें कीं, हा अग्नि स्थंडिलावर ठेऊन स्थापित केला जाईल, तेव्हां क्रव्यादग्नि होईल, तो देऊं नये; सध्यां हा लौकिकाग्नि आहे. तेव्हां त्यानें आम्हांस अग्नि दिला. असो. भोजनें करून आम्ही रात्रीं वस्तीकरितां शेणव्याचे घरीं आलों व ओटीवर निद्रा केली. पाहाटेस शेणव्याच्या घरीं आणखी एक बाई लागली. घरचीं माणसें औषधोपचाराचे गडबडींत लागलीं व आह्मीं उठून रस्ता आक्रमिण्यास आरंभ केला. जातां जातां उजाडण्याच्या सुमारास, आमचे सोबत्यास एकाएकीं रेच झाला, तोही घागरभर. तेव्हां आम्हां सर्वांचें धाबें दणाणलें. आलेल्या गोष्टीस सादर

असावें, या शिवाय आपले हातीं काय आहे, असें मानून आम्ही पुढें गांव लागला तेथें वस्ती केली, व सोबत्यास पुष्कळ औषधोपचार केला. परंतु त्याचें मरण त्या गांवांत ठरलें होतें, त्याप्रमाणें बारा वाजण्याचे सुमारास त्याचें प्राणोत्क्रमण झालें. नंतर गांवचे पाटलास बोलावून त्याच्या चीजवस्तांची यादी करून सर्व माल त्याचे हवाली केला, व शवाचें दहन गोवऱ्यांनीं केलें, कारण तेथें लांकडें मिळत नव्हतीं. एक वांसा आणून त्याला तें प्रेत बांधून आम्हीं दोघांनीं स्मशानांत नेलें, व त्यास अग्नि दिला. नंतर स्वच्छ स्नानें करून गांवांत येऊन पुढच्या गांवास गेलों, तेथें भोजन तयार करून अन्न ग्रहण केलें, व रात्रीं तेथेंच वस्ती केली. तो दिवस आम्हांस फार भयंकर गेला. दुसरे दिवशीं हळू हळू मार्ग आक्रमण करून एका मुक्कामावर आलों, तेथें बरेच दिवस विश्रांति घेतली. श्रावणाचा महिना असून पाऊस फार पडत होता. भाद्रपदमासीं पुन्हां कूच केलें तों रस्त्यांत एका मुक्कामावर, ब्रह्मवर्ताकडील दोन ब्राह्मण, काकांच्या परिचयाचे दक्षिणेकडून आले, त्यांनीं बंडवाल्यांची पुढील हकीगत सांगितली. ती फार महत्वाची असल्यामुळें येथें लिहून ठेवितों.

नर्मदा उतरून सातपुड्यांत जाण्याच्या इरायानें बंडवाले निघाले तेव्हां मागेंपुढें अडीचे स्वार चालत असत. ह्या स्वारां जवळ मोठमोठे घोडे असून त्यांचेपाशीं हस्तनळीच्या तोफाही असत. त्यांपैकीं मागील स्वारानें असें कळविलें कीं, दोन मजलावर इंग्रजांची फौज व मंद्राजी काळे पलटण पाठलाग करीत येत आहे. अशी बातमी लागतांच डब्बल कूच करून-म्हणजे रोज पंधरा पंधरा कोसांची

मजल मारून बंडवाले नर्मदेवर येऊन पोंहोंचले. तेथें इंग्रजांची फौज होतीच. नर्मदेस नात्र नसून पर्जन्य फार पडत असल्या कारणानें पाणीही पुष्कळ चढलें होतें. तेव्हां महासंकट पडलें. ईश्वर वाट कशी देतो अशा विवंचनेंत त्या मुकामावर रात्र गेली. पाहाटेस तात्या टोपी यांनीं चार स्वार बरोबर घेऊन सर्वांस असें सांगितलें कीं, नर्मदातीरास कोठें तरी पायउतार असल्याचे शोधास जातों. असें सांगून नर्मदेच्या तीरीं गांवोगांव शोध करीत चालले. मुळींच बंडवाले लोक जेथ जात तेथें त्यांची बातमी लागतांच गांवांतील लोक पळून जात; गांवांत अतिवृद्ध व बालक मात्र राहत. तात्या टोपी यानें हुशंगाबाद दक्षिणतीरावर आहे, त्याचे पूर्वेस ईशान्य बाजूस सांडिया घाटाचे उत्तरेस जंगलांत लहानसा गांव आहे तेथें बहुत चवकशी केली, परंतु नर्मदेस उतारा आहे असें समजलें नाहीं. तों त्या गांवीं एक शूद्र अतिवृद्ध ९० वर्षांचा भेटला; त्याजपाशीं तात्याटोपी बसून सर्व हकीकत सांगून असें विचारलें कीं, नर्मदेस पायउतारा कोठें आहे तें सांगावें, तुजला शंभर रुपये बक्षिस देऊं. याप्रमाणें त्यास राजी करून त्या वृद्धापासून उताराची माहिती मिळविली. त्यानें स्वतः नर्मदाकांठीं येऊन जागा दाखविली आणि तात्याटोपी व स्वारांनीं त्याचे शब्दावर भरंवसा ठेऊन नदींत घोडे घातले. तेथें पात्र फार रुंद असून खालीं वाळू होती. शूद्रानें दाखविल्याप्रमाणें समोरचे खडकावर नजर ठेऊन चालले तों पाणी छातीवर खोल नाहीं व पाण्यास ओढही नाहीं असें पाहिलें. पलीकडे जाऊन पुन्हां परत येऊन त्या वृद्धास रुपये देऊन संतुष्ट केलें. व. लागलेच स्वार पाठवून

सर्व लष्कर तेथें नर्मदातीरीं आणविलें. ते समयीं सर्व बंडवाले भिऊन गेले होते. कारण नर्मदा नदी पर्जन्यामुळें फार वाढली आहे, भयंकर तास दिसत आहे, असें आपसांत बोलत होते. इतक्यांत रावसाहेबांनीं घोड्याखालीं उतरून नर्मदेस नमस्कार घालून हळद कुंकू वाहून भरजरी शाल व जरीकाठी खण गंगेस अर्पण केला, आणि प्रार्थना केली कीं, गंगाबाई! तूंच आतां रस्ता देशील तर उपाय आहे, असें ह्मणून घोड्यावर बसून घोडा पाण्यांत घातला. मागोमाग तात्या टोपी, जळका रामभाऊ वगैरे सरदारांनीं घोडे घातले व पलीकडे निघोन गेले. मग लष्करांत ओझ्याचे बावीस हत्ती होते ते नर्मदेंत उभे करून लोक हत्तीवरून उतरूं लागले. सर्व सामान सुद्धां उतरोन, दक्षिण तीरानें पुन्हां सांडियाच्या घाटावर येऊन, बहुत झाडी होती तेथें तळ दिला. सर्वांचीं मनें निर्भय होऊन आनंदानें आपआपलीं जेवणें करण्यास लागले. इतक्यांत इंग्रज मागें लागला होता तो संध्याकाळचे सुमारास नदीवर पलीकडे पोंहोचून त्यांनीं तोफेस बत्ती दिली. तात्या टोपी यानेंही जवळच टेकडी होती त्याजवर तोफ नेऊन आवाज काढूं लागले. तेव्हां इंग्रजांस आश्चर्य वाटलें कीं, नर्मदेस पूर आला असोन सर्व लष्कर पलीकडे कसें गेलें. इकडे पृथ्वीवर असा लौकिक झाला कीं 'श्रीमंतांस नर्मदेनें वाट दिली. नदीस पूर आला होता, इंग्रजी फौज आली तों वाट नाहीं.' असा. इंग्रजानें नावांचा वगैरे बंदोबस्त करून नदी उतरण्याची खटपट चालविली. श्रीमंतांकडील फौज आठ दिवस तेथें तळ देऊन होती. नंतर बुंदीकोट्याकडील लूट येथोन पुढें बरोबर नेणें कठिण, असें जाणोन सर्वानुमतें तेथेंच वडाचे

झाडाखालीं खुणेनें पुरून ठेविली. मुख्य ठेवणाऱ्यांत श्रीमंताचा हुजऱ्या व तात्या टोपी होते. मग तेथून कूच करून सातपुड्यांत गेले. रस्त्यांत शेतांचें बरेंच नुकसान केलें. मक्याचीं शेतें शिपायांनीं खाल्लीं. उसांचीं गुऱ्हाळें लागलीं होतीं तेथेंही लूट केली व ऊंस खाल्ले. तों हैदराबादेस पाठविलेले लोक आले; त्यानीं रावसाहेब व तात्या टोपी ह्यांस असें सांगितलें कीं, हैदराबादवाला अनुकूल नाहीं इकडे आल्यास नाश होईल. असा मजकूर समजतांच सर्व फौजेसुद्धां ते माघारे फिरले. पलटणी लोकांजवळ लुटीपासून अर्थ फार झाल्यानें वेळचेवेळेवर हुकूम उठत नाहींसा झाला, तरी माघारे फिरले. सातपुड्यांत महिना पंधरा दिवस राहिले. नंतर झांशी व सागर यांचे दरमियान जंगल बहूत आहे त्याचे आश्रयानें राहावें असा विचार करून तेथें पोहोंचले तों फौज फार कमी झाली. कित्तीएक पलटणी लोक पळून गेले. इंग्रजांनीं जाहिरनामा लाविला होता कीं, ज्या लोकांस आमचें भय वाटत आहे, त्यांनीं भय सोडून शिपाई-पणाचा ड्रेस टाकून हत्यार विरहित खुशाल आपापले घरीं जाऊन निर्भयपणानें राहावें. त्यावरूनही कैक लोक बंड सोडून घरीं गेले. आम्हीं विचार केला कीं, आपण बंडांत अर्थ संपादनाकरितां आहों तो तर मिळत नाहीं, तेव्हां आपणही बंड सोडून ब्रह्मावर्तास परत जावें. याप्रमाणें विचार करून बाहेर पडून जात आहों तों तुमची आमची संगत पडली. आतां एकमेकांस जपून ब्रह्मावर्तास जाऊं. याप्रमाणें त्या ब्राह्मणांनीं हकीगत सांगितली. नंतर आम्ही सर्व मिळून मजल दर मजल करीत ब्रह्मावर्तास पोंचलों, व तेथें वेदशास्त्रसंपन्न बाबा कर्वे यांजकडे बिऱ्हाड करून राहिलों. तेथें श्रीमंताचे बाग

मोकळे होते. त्यांत सकाळीं जाऊन फुलें, बेल, तुळशी बहुत आणून देवपूजन करीत असों. व क्षेत्रांतील देवालयाचीं दर्शनें घेत असों. याप्रमाणें कार्तिकमास तेथें राहिलों. असो. येथून बंडाची हकीकत संपली,* तत्रापि आमची पुढील हकीकत थोडक्यांत देतों.

भाग ८ वा.

तीर्थयात्रा.

धर्मे मतिर्भवतु वः सततोत्थितानाम् ।
स ह्येक एव परलोकगतस्य बन्धुः ॥

ब्रह्मावर्तास कार्तिक मास संपला, पुढें काशीस जाण्याचा विचार करूं लागलों. द्रव्य कसें मिळेल या विवंचनेंत होतों. इतक्यांत वे. शा. रामचंद्र शास्त्रीबुवांनीं सांगून पाठविलें कीं, बैलसियाचा राजा तुळापुरुष करणार आहे तें अनुष्ठान कुंडमंडणाचें आहे, तेव्हां तुम्हांस आमचे बरोबर येऊन अनुष्ठान पार पाडलें पाहिजे. बेलसियाचें ठिकाण ४०।४९ कोस असून उत्पन्न तीन लक्षाचें होतें व राजा ऋग्वेदी ब्राह्मण होता. वय ८० वर्षांचें, राजपत्नी ७५ वर्षांची असून औरस संतति नाहीं. त्यांनीं मुद्दाम शास्त्रीबुवास मेणा पाठवून बोलाविलें होतें. नंतर मी दानमयूख, दानचंद्रिका, इत्यादि ग्रंथ पाहून अनुष्ठान तयार केलें. नंतर शास्त्रीबोवा आणखी

---

* रावसाहेब कोठें नाहींसे झाले याचा पत्ता नाहीं. व तात्या टोपी पकडला जाऊन फांशी गेला हें इतिहासप्रसिद्ध आहे.

कांहीं ब्राह्मण समवेत आह्मास घेऊन बेलसियास.गेले. शास्त्री-बोवांचें वय ते समयीं पाऊणशें वर्षांचें होतें. तो पुरुष केवळ राजरत्नच होय. कांहीं वेदपठण करून नंतर न्याय व व्याकरणाचें अध्ययन केलें होतें; व गाणेंही चांगले शिकले होते. श्रीमंत बाजीराव साहेबांचे आग्रहावरून श्रीमंतासमोर फक्त पुराण वाचीत असत. श्रीमंतापाशीं ९५ वर्षे आश्रयाला होते, व लक्षावधि रुपये मिळविले होते. श्रीमंतांकडे श्रौतसंबंधी व किरकोळ स्मार्त प्रकरणीं जे संकल्प होत होते ते शास्त्रीबोवा सांगत असत. श्रीमंताचे पदरीं राघवेंद्राचार्य, आपाशास्त्री मीमांसक, तातुदीक्षित भडकमकर वगैरे खरी विद्वान् मंडळी होती. तरी धर्मशास्त्र शास्त्री-बुवांनींच सांगितलें पाहिजे. याप्रमाणें शास्त्रीबोवांचा लौकिक चोहीं-कडे होता. असो. मजल दरमजल आह्मीं बेलसियास पोंचलों. एक बंगला आह्माकरितां स्वतंत्र दिला होता तेथें सर्व मंडळी उतरली. रात्रीं फराळास पेढे बरफी दुध वगैरे राजानें पाठविलें होतें. रात्रौ सर्वांस बिछाने व पांघरण्यास रजया वगैरे उत्तम बंदो-बस्त होता. दुसरे दिवशीं शास्त्रीबोवा सांगूं लागले कीं, मी अशीच मंडळी घेऊन चार पांच वेळ येथें आलों, परंतु हमेशा यश मिळत होतें. आतां पाहावें. येथून बारा कोशावर कनोज-क्षेत्र आहे तेथें हजारों कान्यकुब्ज ब्राह्मण राहतात. तेथील गौड पंडित येथें फार येतात. त्यांचीं मनें आपल्याविषयीं शुद्ध नसून ते अनेक कूटार्थ काढतात. इतक्यांत गौड ब्राह्मण व राजोपाध्ये येऊन कुंडमंडप तयार केला होता तेथें बोलावणें करून गेले. शास्त्रीबोवांनीं सोमयाजीबावास पाठवून दिलें. तेथें सर्व

कुण्डें तयार होतीं, पद्मकुण्ड मात्र तयार होणें बाकी होतें. त्या ठिकाणीं दक्षिणी व गौड खडूनें कुण्ड तयार करीत होते, परंतु कुण्ड जमेना, तेव्हां शास्त्रीबुवांस पुन्हा बोलाविणें आले. ते समयीं मी विनंती केली कीं, मी जाऊन पाहतों, मग आपण यावें. असें सांगोन बागांत गेलों व मंडळीस सांगितलें कीं, आह्मी कुण्डार्क पाहिला आहे ते पुस्तक आणून टीका पाहून मग खडूच्या रेघा माराव्या. तेव्हां पुस्तक आणविलें गेलें, व पद्मकुण्डाची टीका वाचून मी रेघा मारण्यास आरंभ केला, तों त्या ब्राह्मणाचें कण्ठसूत्रच चुकलें होतें, ते उत्पन्न होतांच सर्व मंडळीस आनंद झाला व पद्मकुण्ड सिद्ध झालें. याप्रमाणें गौड मंडळींत प्रतिष्ठा चांगली होऊन शास्त्रीबोवांस यश आलें. असो. नंतर दुसरे दिवशीं प्रातःकाळापासून कर्मास आरंभ झाला. तें निर्विघ्न पार पडलें. शेवटचे दिवशीं राजा व त्याची बायको व घरांतील देव बाण शाळिग्राम सुद्धां जवळ घेऊन तुळेमध्यें बसवून भारोभार रुपये घातले. नंतर अनुष्ठान समाप्त झालें. मजला सादस्य वर्ण दिला होता. भोजन झाल्यावर सभा करून द्रव्य बहुत वाटलें. शास्त्रीबोवास दोनशें रुपये किंमतीची हिरवी शालजोडी दिली व १५० रुपये रोख दिले. मजला पितांबर व पन्नास रुपये मिळाले. ख़ेरीज मधुपर्काबद्दल सहा मिळाले. याशिवाय शास्त्रीबुवांनीं राजास सांगून मजला पन्नास रुपये निराळे देवविले. 'याप्रमाणें द्रव्यप्राप्ति होऊन दोन चार रोजांनीं आम्हीं परत निघालों ते ब्रह्मावर्तास आलों. तेथें कांहीं दिवस राहून नंतर नैमिषारण्य व श्री अयोध्येचे यात्रेस मंडळी ३०।३२ निघाली, त्यांजबरोबर आम्हींही निघालों. ते कानपुरावरून लखनौस आलों. दुसरे दिवशीं

शहरांत जाऊन वस्ती केली. पांहाटेस गाड्या भरून, जाऊं लागलों तों प्रहर दिवसास गोमती गंगेवर आलों. पुढें लोहेश्वरसांबाचे प्रसिद्ध ठिकाण लागलें तेथें पुजा करून मजल दरमजल चालते झालों. वाटेनें सर्व निर्भय झालें होतें. नैमिषारण्यांत पोंचून प्रथम पंचप्रयाग तीर्थावर वस्ती केली. दुसरे दिवशीं क्षौरश्राद्ध वगैरे करून दधीच ऋषीचे आश्रमास गेलों; आणि नैमिषारण्यासंबंधी तीर्थ व यात्रा करूं लागलों. एकंदर नैमिषारण्य क्षेत्र ८४ कोशांचें आहे व ती भूमी देवांची आहे, जागा तपश्चर्येस फार योग्य आहे. सर्व अरण्यांत दोन हातावर पाणी महापूर आहे. क्षेत्र सर्व सपाट असून त्यांत दर्भ, कुश, काश वगैरे यज्ञीय तृणांची समृद्धि आहे. पाऊस बहुधा दर महिन्यास पडतो. अरण्यांत वृक्षही यज्ञीय म्हणजे आंबे, जांबूळ, उंबर, पळस वगैरे आहेत. तसेंच फुलझाडेंही त्या वनांत अतिशयित आहेत. तांबड्या पांढऱ्या कण्हेरी, रासतुरे, पिंवळे तांबडे नागचाफे, मोठमोठ्या आपोआप झालेल्या सर्व प्रकारच्या जासवंदी, सर्व प्रकारच्या कोरांठी असून सदागुलाबाचीं ठोंबें तर बहुतच आहेत. मोगरा चमेली वगैरे फुलांच्या वेली वृक्षांस वेष्टून आहेत. नैमिषारण्यांत सर्व ऋषि दीर्घ सत्रास बसत. सूताचा पुराण सांगण्याचा चबुतरा पांच हात लांब दाखवितात. त्याजवर कोणी बसेल ह्मणोन त्याजवर उंच देवळासारखें करून वर कळस केला आहे. असो. याप्रमाणें गंगापुत्रांनीं ठिकठिकाणचा क्षेत्राचा महिमा सांगितला. एके दिवशीं गोतमी गंगेचे पार जाऊन तीर्थे हिंडत होतों, तों उंबराचे वृक्षाची झाडी लागली. गंगापुत्रांनीं सांगितलें कीं, या उंबराचे फळांत कीड मुळींच नाहीं. तेव्हां सर्वांनी फळें

फोडून पाहिलीं तों फळें अंजिराप्रमाणें होतीं, तीं भक्षण केलीं. कांहीं बायांनीं ओव्यांतून भरून घेतलीं. तीर्थें करून परत गौतमीवर येतांच गंगापुत्रांनीं सांगितलें कीं येथील फळें येथेंच टाकावीं, न्यावयाचीं असल्यास भारंभार सोनें इकडे ठेविलें पाहिजे, नाहींतर यात्रा फुकट जाईल. तेव्हां त्या बायांनीं निरुपाय होऊन फळें तेथेंच टाकिलीं, आणि कोसभर ओझें बाळगल्याबद्दल गंगापुत्रास रागें भरल्या. असो. गोमतींत सूर्यावर्त ह्मणोन ऊष्णोदकाचें तीर्थ आहे त्यास गंधकाचा वास येत नाहीं. तेथें स्नान करोन पांडवतीर्थावर आलों. तेथून रामतीर्थावर येऊन रात्रीं बिन्हाडीं वस्तीस आलों. दुसरे दिवशींही हत्याहरण तीर्थावर श्राद्धें करून आणखी तीर्थांचे दर्शन घेतलें; नंतर ललिता देवीचें पूजन करून घरीं आलों. एकंदर नैमिषारण्याचे यात्रेस दाहा बारा दिवस लागले. नैमिषारण्यांत कांटा लागेल तर गुलाबाचाच लागेल, इतर कण्टक वृक्ष तेथें मुळींच नाहींत. प्रत्येक गांवा भोवतालीं कळकीचे बेटाचें कुसूं असतें व आंत जाण्यास रस्ता एकच असतो. बाहेरून तोफ लाविली तरी गांवांत गोळा जाणें कठीण. परंतु मुशाफराचा असा बंदोबस्त केला होता कीं, गांवचे लोक मुशाफरावर पाहरा करीत, कारण कोणतीही चोरी झाली तर ती गांवबाल्यांपासून भरून घेत असत. याप्रमाणें इंग्रजानें चोरीचा बंदोबस्त केला होता. तेथोन अयोध्येकडे जातां १४ कोशावर घोग्रा व शरयूचा संगम आहे. तेथें बिल्व वृक्ष फार आहेत, ते पाहून तेथें स्नानसंध्यादि करून दुसरे दिवशीं अयोध्येस पोंचलों. रामनवमीचे पर्वास लोक फार जमले होते, त्यांत बैरागी फार होते. रामनवमीचे सकाळीं स्नानें वगैरे करून रामाचें

दर्शन घेतलें. तेथें दक्षिणी ब्राह्मण पुजारी होता. त्याचें कारण शोधतां त्याचे पूर्वज अतिमोठे रामभक्त गोदातीरीं गंगाखेड्यास राहत होते. प्रपंचाकरितां कर्ज फार झालें ह्मणून तेथून निघून अयोध्येस येऊन शरयूंत स्नान करून तप करीत बसले असतां एके दिवशीं स्वप्नांत रामचंद्रानीं येऊन सांगितलें कीं, उदईक स्नानास शरयूंत उतरले असतां पायांस मूर्ती लागतील त्या काढून देवळांत बसवून पूजा करीत जावें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं मूर्ति सांपडल्या, त्या वाळूच्या असून एका ओळीनें एका प्रभावळीनें हातीं आल्या. त्या किनाऱ्यावर काढून ठेविल्या. ती खबर सर्व लोकांस लागली. अयोध्येचा राजाही तेथें आला, त्यानें मंदिर बांधण्याचा हुकूम केला. मंदिर तयार झाल्यावर मूर्ती नेऊं लागले तों त्या जाग्यावरून हालेनात, तेव्हां सर्वांनीं त्या ब्राह्मणास विनंति केली कीं, आपण मूर्ती न्याव्या. तेव्हां त्यानें सहज नेल्या. असा साक्षात्कार पाहून त्या ब्राह्मणाकडे पूजा सांगितलेली अद्याप त्याच्या वंशजाकडे आहे. या रामास दक्षिणी लोक विशेष मानतात. याशिवाय एका देवालयांत रामाची सुवर्णाची मूर्ति आहे. रामनवमी शिवाय तिच्या दर्शनास १। रुपया पडतो. अयोध्येच्या दक्षिणेस हणमंतगडी ह्मणोन लहानशी टेकडी आहे तेथें मारुतीचें देवालय चिरेबंदी आहे. अयोध्येस वानर फार आहेत व माकडेंही बरींच आहेत. अयोध्येंत परशराम बोवा ह्मणोन एक कोंकणस्थ ब्राह्मण महान साधु होऊन गेले. त्यांचा हल्लीं मठ प्रसिद्ध आहे. मठांत मारुतीची स्थापना आहे. परशराम बोवा प्रथम बहुत दिवस शरयूतीरीं मठ बांधून होते. वृद्धापकाळीं शरयूवर जाववेना तेव्हां बोवांनीं शरयूस हात जोडून विनंति केली,

तेव्हां शरयूचा ओघ वळून मठापाशीं आली. या गोष्टीमुळें देशोदेशीं कीर्ति झाली. पुढें शिंदे सरकार दर्शनास आले त्यांनीं मठाकडे तीनशें रुपयांची नेमणूक करून दिली. पुन्हां दुसऱ्या वेळेस आले तेव्हां विनंती केली कीं, मला कांहीं खर्च करण्यास आज्ञा व्हावी. तेव्हां आज्ञा केली कीं, वानरांस लाडूचें भोजन घालावें. तेव्हां वानर किती होतील ह्मणोन विचारितां पांच साहा हजार होतील ह्मणोन सांगितलें. नंतर आज्ञेप्रमाणें बारा पंधरा हजार बुंदीचे लाडू तयार करविले, तेव्हां साधूंनीं हणमंतगडीस जाऊन सर्व वानरांस विनंति केली, उदईक येथें रामप्रसादास यावें; व दुसरे दिवशीं लाडू हणमंतगडीवर नेऊन देवालयाभोवतीं राशी केल्या. नंतर साधु महाराजांनीं पुन्हा येऊन वानरांस विनंति करतांच सर्व वानर येऊन प्रत्येकानें दोन दोन लाडू नेले. असा तो साधू मोठा साक्षात्कारी होऊन गेला. त्याचा मठ अद्याप तेथें आहे.† असो. नवमीचे दुपारीं शरयूचें स्नान करून रामजन्म झाला त्या भूमीचें दर्शन घेतलें. या दर्शनास लाखों लोक आले, त्यांनीं तुळशी व सुपारी हातांत आणली होती. जन्माची जागा मैदान असून पन्नास हात लांब व चाळीस हात रुंद अशी आहे. पक्का चुना ओतून कंबरभर उंचीचा चवुतरा केलेला आहे. दुसरे दिवशीं स्वर्गदार ह्मणजे लक्ष्मणानें प्रायोपवेशन केलें त्या ठिकाणचें दर्शन घेऊन नागेश्वरावर पाणी घातलें; तेथें पाणी घातलें म्हणजे यात्रा सफळ होते. अयोध्या क्षेत्र पूर्वीं लुप्त झालें

---

† हा परशराम बोवा दिनकररावाचा चुलता होता, व तो आबा महाराज म्हणोन कल्याणस्वामीचा यश शिंद्याचें पदरीं आहे त्याचा सांप्रदायी असून त्याचे लहानपणी तेथील संस्थानांचा बंदोबस्त त्यानें उत्तम ठेविला होता.

होतें तें विक्रमानें तपश्चर्या करून नागेश्वरावर अयोध्यामहात्म्याचा शोध लावून कायम केलें अशी आख्यायिका आहे.

अयोध्येंत २२ दिवस मुक्काम केला. तेथून डाक चालू लागली असें ऐकून घरीं तीर्थरूपास पत्र लिहिलें, तें असें:—घरून निघाल्यापासून सुखदु:ख भोगीत आज तागाईत दिवस गेले. प्रपंचाकरितां पैसा मिळाला नाहीं. अनेक तीर्थें मात्र पाहिलीं; येथोन काशीस जाण्याचा विचार आहे, यास्तव त्रिस्थळीची आज्ञा व्हावी. 'आत्मा वै पुत्रनामासि' या श्रुतीवरून तीर्थविधि मी आपल्याकरितां करूं शकतों, तसेंच 'अवश्यं पितृराज्ञया' ह्मणूनही वचन आहे, तरी पत्रोत्तर काशीस ब्रह्मघाटावर केळकर यांचे पत्त्यावर यावें. याप्रमाणें मजकुराचें पत्र घरीं घातलें. नंतर आम्ही गाड्या करून लखनौ शहर पाहून काशीस मजल दरमजल पोंचलों. सोबत रस्त्यांत रावसाहेब हिंगणे नाशिककर यांची मिळाली होती. हिंगणे हे गृहस्थ पूर्वापार आहेत; आरंभीं दिल्लीचे बादशाहाजवळ वकील शिवाजी राजाकडोन होते. त्यांजपाशीं अंत नव्हता अशी दौलत होती. परंतु कालगतीनें ऐश्वर्य जाऊन गरीबी पैकीं दिवस आले होते. रावसाहेबांचे वय २५ पासून ३० पर्यंत होतें. अद्याप संतति झालेली नव्हती. कांहीं जहागीर बादशाहाकडून दिल्लीजवळ होती, त्यांपैकीं कांहींवर वहिवाट नसल्यामुळें सरकारांत गेली होती, व कांहींवर वहिवाट असून सावकाराकडे गुंतली होती. ती सोडविण्याकरितां हिंदुस्थानांत दोन वर्षांपासून होते; तेथील काम आटोपून काशीस कांहीं इष्टेट होती त्याची व्यवस्था लावण्याकरितां जात होते. काशीस त्यांचा वाडा प्रसिद्ध आहे व मंगळागौरीचा घाटही त्यांचे पूर्वजांनीं बांधिलेला आहे.

बरोबर माणसें आचारी, शिष्य, गडी, पहारेकरी असून कांहीं आप्त बायका होत्या; व मातुश्री व कुटुंबास बसावयास छकडी गाडी होती. आम्ही उभयतां मिळोन भाड्याचें घोडें करून जात होतों. रस्त्यांत बराच परिचय झाल्यावर हिंगणे यांनीं आम्हास आग्रह केला कीं तुम्ही निराळें भोजन करूं नये. परंतु आम्ही विनंती केली कीं, आतां काशीयात्रेस जात आहों, तेव्हां परान्न सोडलें आहे, एऱ्हवीं भिक्षुक आहों. जन्मभर परान्न घेतोंच आहों, आपला लोभ असावा. असो. काशीस पोंचल्यावर वरुणेवरून वक्रतुंड गणपतीस येऊन साष्टांग नमस्कार करून नंतर आपले बिऱ्हाडीं म्हणजे ब्रह्मघाटावर केळकर यांचे घरीं गेलों, तों तेथें घरून पत्र आलें होतें. पत्र हरिपंताचे हातचें होतें. बारीक अक्षरांनीं लिहिलेले दोन बंद होते, कारण घरून निघाल्यापासून आमचें पत्र घरीं नाहीं, व घरचें आम्हांस नाहीं. तें पत्र वांचतां वांचतां माझे डोळ्यांस व ऐकणारांचे डोळ्यासही पाणी येऊं लागलें. घरीं सर्व मंडळी खुशाल आहेत, देशीं येऊन सर्वांस काळजींतून काढावें. असा एकंदर पत्रांत निष्कर्ष होता. असो. पत्रीं वडिलांनीं आज्ञा यात्रेची दिली होती. त्याप्रमाणें सर्व यात्रा यथासांग केली. त्याचें वर्णन सविस्तर लिहूं लागलों तर ग्रंथविस्तार होईल. गयावर्जनही केलें. नंतर प्रयागास आलों. तेथील यात्रा करून तेथून विंध्यवासिनीचेंही दर्शन करून आलों. याप्रमाणें सर्व यात्रा यथासांग झाल्यावर परत जाण्याचा विचार करूं लागलों.

भाग ९ वा.

उपसंहार.

स्वजनरमहि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते ।

मीं मनांत असा विचार केला कीं आपण प्रपंचाचें मदतीकरितां द्रव्य मिळवून घरीं न्यावें आशा हेतूनें निघालों, तो हेतू आपला साध्य झाला नाहीं. त्यास आपल्यास शक्ति आहे. मातापितरां-करितां गंगेची कावड न्यावी हीच त्यांची सेवा करावी. असा मनांत निश्चय करून काकांशीं गोष्ट काढली. माझा पुष्कळांनीं निषेध केला. कावड नेणें महाकर्म कठिण आहे. अनवाणी चालावें लागेल, कित्येक महिने कावड खांद्यावर वाहावी लागेल. गंगा कधीं कधीं जड होते, तेव्हां प्राणांतिक संकट प्राप्त होतें. इत्यादि पुष्कळ अडचणी लोकांनीं सांगितल्या. परंतु वाडवडिलांचे पुण्याईनें मी नेईन, असा निर्धार सांगितला. तेव्हां सुमुहूर्त पाहून यथाविधि कावड भरली. दोन रुद्र ह्मणजे बावीस कुप्यांत गंगा भरून कावडींत गवत वगैरे घालून त्यांत भरल्या व कावड बंद केली. नंतर सुमुहूर्तावर आषाढ शु० ५ चे दिवशीं प्रयागाहून निघालों तो मजलदरमजल ब्रह्मवर्तास पोंचलों. तेथें बाबा कर्वे यांच्या वाड्यांत पुनः उतरलों. व्रताविषयीं चौकशी करून एवढा नेम ठेविला होता कीं, श्राद्धादि-उत्तरकार्याला जावयाचें नाहीं. शुद्ध परान्न मिळाल्यास घ्यावें. अन-वाणी चालावयाचें व पागोटें घालावयाचें नाहीं. ब्रह्मावर्तास चार पांच दिवस मुक्काम करून ग्वाल्हेरीस जाण्याचे इराद्यानें रवाना

झालों. बरोबर गाड्या आणखी होत्या. काकांस ओझ्यासुद्धां गाडींत बसावयाची सोय केलेली होती. असें चालले असतां एके दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणें प्रातर्विधि आटोपून स्नानसंध्यादि व लिंगार्चन करून गंगेस हळद कुंकू वाहून कावड उचलून रस्ता चालूं लागलों. तो एकाएकीं ती कावड अति जड झाली. खांद्यास भार सहन होईनासा झाला. डावे उजवे खांद्यावर पुष्कळ फिरविली, परंतु भार सहन होईना, यामुळें गाड्यांच्या मागें मागें राहूं लागलों. संध्याकाळीं चार वाजतां लोक मुक्कामावर उतरले. मी मोठ्या शर्थीनें तेथें पोंचलों. दोन्ही पायांस ढोंपराखालीं सूज आली होती. पावलेंही सुजलीं. मजलेवर येतांच भोजन तयार होतेंच. भोजन आटोपून मंडळीस हकीकत सांगितली. मंडळी ह्मणूं लागली कीं, पुत्राचे खांद्यावरून गंगा येऊन स्नान होणें महत्पुण्याईचें काम आहे, तुमच्यानें आतां चालवणें कठीण होईल. पायास व पावलांस सूज आली आहे. त्यापेक्षां येथें शिवलिंग आहे त्यास गंगेनें स्नान घालावें. तें ऐकून उत्तर न देतां नित्याप्रमाणें कावड उशागती ठेवून निद्रा करण्याचे हेतूनें आथरुणावर बसलों. प्रथम मनोमय कुळस्वामिणीस नमस्कार करून नंतर गंगेची प्रार्थना केली. कुटुंबाकरितां द्रव्यार्जन करण्याचे हेतूनें निघालों तें साध्य झालें नाहीं, तेव्हां गंगेची कावड नेत आहे कीं हा तरी जगांत लौकिक होईल. तरी मातापित्यांस गंगास्नान न घडेल व येथें शिवलिंगास गंगा वाहिली तर मी देशीं जाणार नाहीं. बैरागी होऊन बद्री-नारायणास जाईन. असा निर्धार करून गंगेस नमस्कार करून झोंपीं गेलों, तो स्वप्नांत बारा तेरा वर्षांची ब्राह्मणाची मुलगी कानांत

मोत्याचे डागिने घातलेली हास्यमुख अशी येऊन बोलूं लागली. मला बहिणीचा भास झाला. "दादा तूं घाबरूं नको, मी तुझ्याबरोबर घरीं येणार." असें स्वप्न पाहून जागा होऊन पाहातों तों पायास सूज नाहीं व ठणकाही नाहीं. तेव्हां अत्यानंद झाला. काकांस जागेकरून स्वप्न सांगितलें व पाय दाखविले. तेव्हां त्यांस आश्चर्य वाटून प्रत्यक्ष गंगेनें तुला दर्शन दिलें असें बोलून सर्वांनीं पुन्हा निद्रा केली. दुसरे दिवशीं नित्याप्रमाणें सर्व विधि आटोपून कावड घेऊन रस्ता चालूं लागलों तों ती हलकी वाटूं लागली. असो. मजल दरमजल ग्वाल्हेरीस पोंचून वे. शा. भाऊ वैशंपायन दानाध्यक्ष यांजकडे उतरलों. तेथें मजला हगवणीचा उपद्रव झाला ह्मणून केशवभट मांडवगणे झांसीवाले ग्वाल्हेरीस राहत होते, त्यांचे येथें सोय चांगली पाहून मीच एकटा कांहीं दिवस जाऊन राहिलों. तेव्हां त्यांस फार आनंद झाला. नंतर प्रकृति बरी झाल्यावर झांशी सागर मार्गानें कुच दरकूच हुशंगाबादेस आलों. सांडियाच्या घांटावर शांडिल्य ऋषीचें स्थान पाहिलें. हुशंगाबाद नुकताच जिल्हा झाला होता. आह्मी शहरांत शिरतांच चौकीदार यानें आह्मास चौकीवर बसवून घेतलें व नंतर साहेबापुढें उभें केलें. साहेबानें चौकशी केली तेव्हां आह्मीं केवळ यात्रेकरी आहों बंडापैकीं आमचेकडे कांहीं दोष नाहीं व मुंबई इलाख्यांत पेण तालुक्यांतील वरसईचे राहणार आहों, अशी त्यानें पक्की खातरी करून घेतली. कारण तो साहेब ठाणे जिल्ह्यांत बरेच वर्षें कामगार होता. तेव्हां साहेबानें सांगितलें कीं, तुह्मी गंगेची कावड नेतां परंतु जागोजाग मुशाफराचा फार बंदोबस्त आहे तरी मी तुह्मास सरटिफिकिट देतों तें बरोबर ठेवानें

नंतर साहेबांचे आभार मानून आह्मी त्यांनीं दिलेलें सरटिफिकिट घेतलें आणि आतां मुक्काम कोठें करावा या विचारांत जात असतां एक गौड ब्राह्मण भेटला तो आह्मास घरी घेऊन गेला. या प्रमाणें दैव अनुकूल असल्यामुळें सर्व गोष्टी सुरळित होऊं लागल्या. आमचे जवळ द्रव्य कमी होतें व पुढचा पल्लाही बराच लांबचा होता. सबब द्रव्य कोठें मिळेल या विचारांत असतां समजलें कीं इंदुरास किबे यांचे कन्येचा विवाह आहे. तेव्हां टेंभुरणीवरून नेमावरांत उतरून सिद्धेश्वर महादेवाचें स्थान आहे, हे हेमाडपंती देवालय असून दगडी कळसाचें आहे. तेथें श्री० अहल्याबाई होळकरीण इची टांकी सुरू आहे; ह्मणजे सर्व गांव टांकीवाल्यास इनाम आहे. त्यांनीं प्रतिदिवशीं चिरे घडावे, बहुत चिरे झाले म्हणजे गंगेचा घांट बांधीत असतात. देवालय नर्मदातीरीं आहे तेथें धोतऱ्याचीं फुलें अतिशय, एका दिवसांत लक्ष पूजन होईल. तेथें शिवपूजन करून मजल दरमजल इंदुरास पोचलों. देवास, धार, उज्जनी वगैरे ठिकाणाहून हजारों ब्राह्मण जमले होते. परंतु विद्वान पाहून परीक्षा घेऊन याद करीत आहेत असें समजलें. तेव्हां आह्मीं परीक्षेचे ठिकाणीं गेलों. तेथें विवाह प्रकरणीं कांहीं चर्चा चालली होती. 'कुलमग्रे परीक्षेत' ह्मणून कन्येची परीक्षा सूत्रांत सांगितली. वर परीक्षेसंबंधानें कांहींच उल्लेख किंवा नियम नाहीं हें कसें, हा विषय होता. तेव्हां मी सांगितलें कीं वृत्तिकारांनीं व भाष्यकारांनीं 'अग्रे' या शब्दावर असे लिहिलें आहे कीं, प्रथम मुलीची परीक्षा करावी मग हीच परीक्षा वराची करावी. वृत्ति काढून पाहावी. तेव्हां पुस्तक काढून पाहातां तसें निघालें. या विषया नंतर किबे यांचे उपाध्ये दिनकर शास्त्री यांनीं

त्यांस पांच सहा शंका अन्य होत्या त्या विचारिल्या, त्यांचेही निराकरण केलें. यानंतर आमचीं नांवें यादींत लिहिलीं गेलीं, व दिनकरशास्त्री यांनीं शिपाई देऊन कावडीसुद्धां आमचें बिऱ्हाड आपले घरीं नेलें. लग्नास चार पांच दिवस राहिले तेव्हां गडगनेर होऊन बुंदीचे लाडू करून मुक्तद्वार सुरू झालें. तो लग्नसमारंभ फारच मोठा झाला. श्रीमंतपूजनापासून कर्माचे जागीं यादीचे ब्राह्मण येत असत, वरातीचे दिवशीं दाजीसाहेब किबे पत्नीसह मंडपांत येऊन बसले. तथापि वंशपात्रांतील दिवे लाविले नव्हते, तेव्हां दाजीसाहेबांनीं हरकत काय आहे ह्मणून उपाध्यास विचारितां वराकडील तेल यावयाचें आहे ह्मणून सांगितलें. असो. याप्रमाणें लग्न निर्विघ्न झाल्यानंतर यादीचे मंडळीस उत्तम मेजवानी होऊन प्रत्येकाची यथायोग्य संभावना झाली. याशिवाय राजाकडील नित्यदानाचेही कांहीं रुपये आह्मांस मिळाले. मग आम्ही इंदुराहून कूच केला. सातपुड्यांत एकदां रस्ता चुकून मी व आणखी एक सोबती असे भिल्लाच्या एका खेड्यांत पोंचलों. आह्मास प्रथम भय वाटलें परंतु भिल्लांनीं गंगेची कावड पाहून आमचे उत्तम आदरातिथ्य केलें. रात्रीं तेथेंच वस्ती केली. सकाळीं त्यांनीं वाटाड्या देऊन आह्मास आमच्या मंडळींत पोंचतें केलें व रवानगी करतांना आह्मास तीन तीन रुपये दक्षिणा दिली. सातपुड्याहून खानदेशांत धुळे मालेगांवीं आलों, थंडी फार पडत होती, पायाचे पावलांस कापसाचें रजईचे फडकें बांधलें होतें तथापि पाय फुटून खोटांस भेगा पडल्या होत्या. परंतु राळ मेण वगैरेचें लुक्कण करून ठिकठिकाणीं भेगांत भरीत होतों. पिंपळगांवास पोहों-

चल्यावर तेथून सप्तशृंगाचे देवीचें दर्शन करावें ह्मणून निघून पायथ्याशीं बणीगांव आहे तेथें भोगमूर्ती अष्टदशभुजा आहे तिचें दर्शन घेऊन डोंगर चढलों. हेमाडपंतांनीं टाकीनें पायऱ्या करविल्या आहेत. तीन कोश चढण आहे. वर मैदान मोठें असून ठिकठिकाणीं पाणी आहे. तेथें स्नानें करून पुन्हा चढाव लागतो तो चढून देवीचें दर्शन घेतलें. स्वरूप फार भयंकर आहे. मूर्ति दोन अडीच पुरुष उंचीची आहे. दशभुजा आहेत. नथ लहानशा पराती येवढी आहे. असो. पुन्हा डोंगर उतरून वणीस वस्ती केली. नंतर नाशकास पंचवटीस पोहोंचलों त्या दिवशीं कावड अति हलकी झाली होती. पंचवटींत कावडींतील कुप्यांच्या गुडद्या आपोआप कावडींत उडून पडल्या. तेसमयीं तेथील ब्राह्मण मंडळी जमली होती त्यांनीं सांगितलें कीं, कावडींतील गंगा लवकर गोदेस भेटवा. विलंब झाल्यास कावडींत गंगा राहणार नाहीं. असें सांगतांच कावड तशीच रामतीर्थी नेऊन सर्व कुप्या गोदा गंगेनें भरून गुडद्या मारल्या व कावड बिऱ्हाडीं आणून ठेविली. नंतर तेथील सर्व यात्राकृत्य काकांनीं केलें व आह्मीं त्र्यंबककेश्वरींही जाऊन आलों. नंतर तेथून निघोन पुण्यास धीरेश्वर शास्त्री चितळे यांचेकडे राजेबहादर यांचे वाड्यांत उतरलों. तेथें दोनचार दिवस राहून खालापुरास आलों. ब्रह्मावर्ताहून पत्र घरीं पातलें होतें, त्याजवर पत्र पाठविलें नव्हतें. मध्यंतरीं रहाळकर ह्मणोन एक संगाती हुशंगाबादेहून वरसईस गेला त्यानें तेथपर्यंतचा कुशलतेचा मजकूर कळविला होता. त्याजवर पत्र नव्हतें सबब घरची मंडळी काळजींत होती.